म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 3085

REFBK-0024547
REFBK-0024547

म. गं. नातू

संदर्भ वि. / आ. [illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

3 0 MAY 1985

( क्र. मा. पद्दा )
५०००-३-८४

संदर्भ निबंध
३०८५
२४५४६
७म३०८५

# वेदनेचा वेध

## खानोलकरांची कादंबरी – एक आकलन

म. गं. नातू

REFBK-0024547

अभिनव प्रकाशन, मुंबई ४०० ०१४

किंमत पंधरा रुपये

प्रकाशक :
वामन विष्णु भट,
अभिनव प्रकाशन,
५३, गुरु नानक मार्केट,
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

■ ■

© म. गं. नातू

■ ■

मुखपृष्ठ : ग. आ. गांगल

■ ■

प्रथमावृत्ती : नोव्हेंबर १९७८

■ ■

मुद्रक :
रवींद्र श्रीराम पराडकर,
वैभव प्रिंटींग प्रेस,
२९९, कसबा पेठ, फलटण

घुसमटे खोल कळ किटेल्या शून्यात,
फुटायाचा आहे कोंभ आसूंच्या थेंबात.

तुम्हाला . . .

# लेखानुक्रम . . .


| | | |
|---|---|---|
| १. पार्श्वभूमी | | ९ |
| २. 'रात्र काळी ... घागर काळी' | : एक अनोखे दुःख | १५ |
| ३. 'अजगर' | : नेणिवेच्या शोधात | २५ |
| ४. 'कोंडुरा' | : श्रद्धा आणि विवेक यांची भीषण लढत | ३३ |
| ५. 'त्रिशंकू' | : विवेक माझा सांगाती | ५२ |
| ६. 'गणुराया' | : सृजनास धास्तावलेले मन | ७० |
| ७. 'चानी' | : सुन्न करणारी शोकान्तिका | ८३ |
| ८. 'अज्ञात कबुतरे' | : एका थोर संशोधकाची वेदना | ९५ |
| ९. 'अगोचर' | : एक वेगळा पवित्रा | १०४ |
| १०. 'भागधेय' | : गूढगहन पात्रांच्या जगात | ११४ |
| ११. 'पाषाणपालवी' | : वासनेची अतिरेकी असोशी | १३१ |
| १२. 'खानोलकर' | : एक किमयागार | १३८ |

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
३०८५
दा.क्र. ३२०.५४८
नोंद क्र. ९९१३१८५
ग्रंथ शाखा

# मनोगत ....

दाद देणे हेहि गाण्याहून आहे दुर्घट :
गुंफणे गजरे दवाचे आणि वायूचे घट.

– आरती प्रभू

देखण्या प्रतिमांनी बहरलेली खानोलकरांची कादंबरी म्हणज दव–बिंदूनी तरारलेली वनश्रीच ! जरासा धक्का लागला तरी सारे बिंदू ओघळून जायचे. अशा अलवार लेखनाचा आस्वाद वास्तविक तेवढ्याच ताकदीच्या प्रतिभावंताने घेणे योग्य. माझ्यासारख्या व्यक्तीने ते करू पाहणे हे एक धाष्टर्यच ! पण ते मी करीत आहे याचे कारण खानोलकरांच्या कादंबऱ्यात आढळणारे समाज-प्रबोधनाचे सामर्थ्य. अंधश्रद्धा, नीति-अनीतीचे पक्षपाती नियम, कार्यकारणभावाचे अज्ञान, इत्यादींमुळे माणसाला–त्यातही स्त्रीला–भोगावे लागणारे दुःख व तिची होणारी दुर्दशा खानोलकर अतिशय कलात्मकतेने चित्रित करतात. कलेच्या आनंदाबरोबरच वाचकाला अंतर्मुख करण्याचे, त्याचा विवेक जागृत करण्याचे, त्यांचे सामर्थ्य लक्षणीय आहे. प्रस्तुत पुस्तक म्हणजे खानोलकरांचे हे सामर्थ्य शोधण्याचा एक प्रयत्न

चिकित्सक आणि रसिक व्यक्तींशी चर्चा समीक्षालेखनास नेहमीच उपकारक ठरते. त्यायोगे आपल्या मतांबद्दल निःशंक होण्यास मदत होते. या दृष्टीने माझ्या सहकारी प्रा. विजया डबीर आणि प्रा. सुशीला पाटील यांचे मला साहाय्य लाभले, हे नमूद करावेसे वाटते.

‘ भागधेय ’ आणि ‘ खानोलकर : एक किमयागार ’ ही प्रकरणे वगळता ह्या पुस्तकातील इतर प्रकरणे ‘ समाज प्रबोधन पत्रिका ’ ‘ आलोचना ’ व ‘ प्रतिष्ठान ’ या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाली होती. या तीनही नियतकालिकांच्या संपादकांनी लेखांच्या पुनर्मुद्रणास परवानगी दिली याबद्दल त्यांचे आभार मानणे अगत्याचे आहे. ‘ अभिनव प्रकाशन ’ चे श्री. वा. वि. भट यांनी जिव्हाळ्याने ह्या लेखांची दखल घेतली व आत्मीयतेने हा संग्रह अल्पावधीत प्रसिद्ध केला याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच.

‘ परिमल ’ — म. गं. नातू

१४, अंबाझरी लेआऊट, नागपूर – १०

# वेदनेचा वेध

खानोलकरांची कादंबरी – एक आकलन

# १. पार्श्वभूमी

‘ म्हणू नये पण म्हटली गाणीं, कळीकळीवर रक्तखुणा; ’
– आरती प्रभू

चि. त्र्यं. खानोलकर यांच्या वाटचाला आलेले आयुष्य लक्षात घेता, त्यांचे वाङ्मय म्हणजे एक चमत्कारच म्हणावा लागेल. कुडाळसारख्या कोकणातील एका खेड्यात दारिद्रय, आजार व उपेक्षा यांच्या सोबतीने या आयुष्यातील ऐन उमेदीचा काल त्यांना कंठावा लागला. जागतिक श्रेष्ठ वाङ्मय तर दूरच पण मराठीतील अभिजात वाङ्मयही त्यांना तेथे उपलब्ध होणे दुर्मिळ, समानधर्मा लाभणे तर त्याहूनही दुर्मिळ ! आयुष्यही अवघे शेहेचाळीस वर्षांचे लाभलेले ! त्यात लेखनकाळ फक्त तेवीस वर्षांचा. परंतु या अल्पावकाशात साहित्यक्षेत्रात त्यांनी बजावलेली कामगिरी मराठी मनाला नितांत अभिमान वाटावा अशा मोलाची आहे. काव्य, कादंबरी, नाटक, कथा या सर्व वाङ्मयप्रकारांत मौलिक व समृद्ध भर टाकण्याची किमया त्यांनी केली. हे अघटित कसे घडले ? त्यांना लाभलेले अम्लान प्रतिभेचे देणे हे याचे एक मुख्य कारण तर आहेच, पण माझ्या मते त्या प्रतिभेला पल्लवित करणारा दुःखभोग हे त्याहूनही प्रभावी कारण आहे. मात्र खानोलकर आपल्या व्यक्तिगत दुःखात कधीच बुडून राहिले नाहीत. त्या दुःखाचा बडिवार तर त्यांनी कुठे माजवला नाहीच, पण त्याची अंधुकशी छायाही आपल्या कलाकृतीवर त्यांनी कधी पडू दिली नाही. अर्थात त्यांचे

वाङ्मय हे वेदनेचेच वाङ्मय आहे. पण ते कोणत्याही एका विशिष्ट व्यक्तीच्या वेदनेचे नाही–खानोलकर नामक व्यक्तीच्या दुःखाचे तर नाहीच नाही. त्यांना तर नशीबी आलेला दुःखभोग हसत हसतच पचवायचा होता. ते म्हणतात–

कसें ? कसें हांसायचें ?
हांसायचे आहे मला,
हांसतच वेडया जीवा
थोपटीत थोपटीत
फुंकायचा आहे दिवा …

पण अनुभव तर उलटाच येत होता, म्हणून त्यांना प्रश्न पडला.

हांसायचें
कुठें ? आणि केव्हां ?
कसें ? आणि कुणापास ?
इथें भोळ्या कळ्यांनाही
आसवांचा येतो वास …

त्यांच्या हळव्या मनास सुकुमार कलिकांचे अश्रू दिसले, त्यांनी हलकेच ते टिपले व जाई, बकुळ, इंदू, सुशी, राहूल, चानी या करुणरम्य व्यक्तिरेखां-तून त्या अश्रूंना वाचा दिली. वैयक्तिक दुःखापलीकडे जाऊन वैश्विक दुःखाचा वेध त्यांनी घेतला. असे लेखनच चिरंजीवितेच्या मार्गावर वाटचाल करू शकते. स्त्रीच्या जीवनात दाही दिशांनी येणाऱ्या अपार दुःखाचा साक्षात्कार त्यांना कुडाळमध्ये झाला. ते सांगतात, " ऑगस्ट १९५४ चा एक दिवस असा आला की त्यानं–

" उभी रस्त्याकांठ नरा तुझी मादी "

असे उद्गार काढायला लावले. तो दिवस डोकीवर मध्यान्हीच्या सूर्यासारखं एक ओझं घेऊन आला …… देहाची लज्जा उघडी टाकून शिळया शितांवर पदर घालणारी ही भिकारीण माय – पण त्या मायेची लाज राखणारे डोळे कुठं होते जाग्यावर – गवळ – देवाच्या माळावर मी पाहिलाय् तो करुण प्रसंग–

कुठे वडापास
जाते विसाव्यास
तिथेहि फुंकिती कुणी सांजवात
कुणी म्हणे, " तेथे कण्हे दिवाभीत "

पाठलाग चालला होता तिचा. माळावरचा दिवा वाऱ्यानं गिळून टाकावा तसा तो देह त्या माळावरच्या झुडुपाआड एका पागळ दारुड्यानं ओरबडलेला उघडया डोळयांनी पहावा लागलाय्.

आणि अनेक पागल डोळयांची वासना शमवीत ती अखेर देवाला लपूनछपून विनवणी करू लागली –

'मला नवमास दे देवा सांवली' –

आणि नंतर तेही एक ओझं बाळगीत पुन्हा शिळया शितांवर पदर घालून निघूनही गेली.

एप्रिल १९५७ चा एक दिवस असा आला. कुडाळच्या एस्टी स्टँडवर अशी एक मुलगी दिसली की –

'कळे निर्मळ स्तनाचे टपोर भरले
लाल ओंठ तरी तिचे दुधाचे राहिले'
'श्वास आणि कवडसे चंद्र आणि राधा
त्वचेची दुपार तिचा गोरागोरा बांधा'

त्या दिवसालाही मी अजून प्रणिपात करतो." [१]

या अनुभूतीतूनच चानी सारखी लावण्यमयी निरागस कारुण्यमूर्ती त्यांनी घडविली असावी. पुरुषी उन्नत वासनेने ओरबाडलेली, अनावर मातृत्वाकांक्षेने व्याकूळ होणारी आणि अतृप्त कामवासनेने कासावीस झालेली स्त्रीची कुडाळने दाखविलेली ही त्रिविध रूपे त्यांना तीव्रपणे जाणवतात. ही अस्वस्थता शिगेस पोचली की सारा अनुभव देखण्या प्रतिमाप्रतिकांच्या मुशी-

---

१ चि. त्र्यं. खानोलकर : 'कुडाळातील ते दिवस' ललित, दिवाळी अंक १९७०, पृ. १४१–४२

तून अलगदपणे आविष्कृत होतो व ते नितळ रूप पाहून वाचक कासावीस होतो.

दु:खानुभूतीप्रमाणेच कुडाळमुळे रमणीय निसर्ग सौंदर्याचा लाभही त्यांना झाला. त्यांना पहिली कविता सुचली तीच मुळी आईने भुईचाफा लावलेल्या केळीखाली अंघोळ करताना.

‘ गंधगर्भ भूईपोटी ठेवोन वाळली
भुईचंपकाची पाने कर्दळीच्या तळी ’

निसर्गाने आपले सारे लावण्य त्यांच्यासमोर मोकळे केले होते. त्यांनीही ते मनसोक्त लुटले व आपल्या अलौकिक प्रतिभासामर्थ्याने ते मराठी रसिकांपर्यंत पोहोचते केले. निसर्गाचे कुसुमकोमल रूप व त्याचा रौद्रभीषण अवतार ही दोन्ही त्यांनी सारख्याच ताकदीने न्याहाळली व सारख्याच समर्थपणे शब्दबद्ध केली.

अशा या सिद्धहस्त कलावंताच्या कादंबरी वाङमयाचा आस्वाद घेण्यापूर्वी आपल्या कवितेच्या आस्वादाची जी रीत त्यांनी रसिकांना सांगितली आहे ती प्रथम लक्षात घेतली पाहिजे.

‘ प्रेम हवंय का या कवितेचं ?
... ... ... ...
पण त्यासाठी तुमचे हात तुम्हाला
चांदण्याहून पारदर्शक करावे लागतील
कराल ?
... ... ... ...
ती भोगतेय जे जे काही त्यातल्या तिळमात्रही वेदना
तुम्हाला सोसायच्या नाहीत ’

कवितेप्रमाणेच त्यांच्या कादंबऱ्यातही असह्य वेदनेचा हाहाकार ऐकू येतो. स्त्रीचे दु:ख कवेत घेण्याचा येथे त्यांचा ध्यास आहे. त्यांचे संपूर्ण कादंबरीविश्व स्त्रीदु:खाने काळवंडलेले आहे. कारुण्य हा त्याचा स्थायिभाव

आहे. सुखी, सुरक्षित व आनंदी स्त्रीचा त्यांना अभावानेच प्रत्यय आला असावा. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांत सर्वत्र स्त्रीचे दुर्दैवी जीवनच आविष्कृत झाले आहे. आपल्या अनुभूतीशी पूर्ण इमान राखल्याचा हा पुरावा आहे.

आशयाच्या सघनतेप्रमाणेच तो प्रभावीपणे मूर्त करण्याचे त्यांचे सामर्थ्यही विलक्षण आहे. सारा भावार्थ विद्युल्लतेप्रमाणे क्षणार्धात लख्ख उजळून टाकणारी त्यांची नितांत सुंदर प्रतिमासृष्टी रसिकाला स्तंभित करते. नवनवीन भावनानिष्ठ समतानता निर्माण कराव्या तर खानोल-करांनीच, असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. एवढे त्यांचे प्रतिभावैभव न्यारे आहे.

टवटवीत प्रतिमांप्रमाणेच अर्थघन प्रतीकनिर्मिती हे त्यांच्या प्रतिभेचे आणखी एक आगळेपण ! भरगच्च प्रवाहात राहूनही उपडी वाहात असल्यामुळे सदैव तृषार्तच राहिलेली घागर, सर्व गावावर वचक ठेवणारा जणू हुकुमशहाच असा कोंडुरा, निरागस जीवने गिळंकृत करणारी रामाची कोंडी, तसेच भव्यभीषण माळ व अवाढव्य वाडे या वस्तू इथे निर्जीव राहातच नाहीत. मानवी जीवनाच्या शोकांतिकेची त्या सजीव माध्यमे होतात. त्यामुळे अचेतन व सचेतन यांच्यात एक अतूट नाते निर्माण होते व संपूर्ण कादंबरी-विश्व चैतन्याने तरारून उठते.

खानोलकरांचा पिंड कवीचा असल्यामुळे काव्यात्मता हा त्यांच्या कादंबऱ्यांत एक स्वतंत्र घटक म्हणून नांदतो. या संदर्भात पु. शि. रेगे यांच्या कादंबऱ्यांचे स्मरण होते. परंतु रेग्यांच्या काव्यप्रकृतीने कादंबरीचा आशय काव्यमाध्यमातून अनुभवल्यामुळे कादंबरीत तो व्यक्त होताना काव्याची प्रकृती घेऊनच अवतरला. म्हणून त्यात संदिग्धता, गूढता, सूक्ष्मता व प्रतिकात्मता मोठ्या प्रमाणावर आली. ही प्रकृती मराठी कादंबरीला इतकी नवीन होती की सर्वसाधारण वाचकांना तिचा काही बोधच होईना. समीक्षकांच्या मदतीशिवाय ती आकलन करणेच त्यांना अशक्य झाले. खानोलकरांच्या कादंबऱ्यांचे तसे झाले नाही हे विशेष ! आपली कथा फुलविताना ते काव्य, नाट्य व संवाद यांचा अशा कौशल्याने उपयोग

करतात की कादंबरीचे कादंबरीपण तर जाणवत राहावेच पण त्याचबरोबर काव्य व नाट्य यांच्या योगे सारा आशय मुलायम, भावतरल व प्रत्ययकारी व्हावा.

अशा ह्या समर्थ कलावंताच्या कादंबऱ्यांचा पुढील प्रकरणांतून विचार करावयाचा आहे.

□ □

# २. ‘ रात्र काळी .... घागर काळी ’ एक अनोखे दुःख

‘ रात्र काळी ... घागर काळी ’ या त्यांच्या पहिल्याच कादं-बरीने विलक्षण खळबळ उडवून दिली. उलटसुलट चर्चांना उधाण आले. मराठी कादंबरीला नवे परिमाण लाभल्याचे प्रशस्तीपत्र कोणी खानोलकरांना दिले; तर अश्लील, विकृत, भडक आणि अवास्तव पात्रनिर्मितीचा त्यांच्यावर कोणी आरोप केला. त्यांच्या नाटकांच्या बाबतीतही अगदी असाच प्रकार घडला. त्यांच्या ‘ एक शून्य बाजीरावा ’ ने मराठी नाटकाच्या कक्षा रुंदावल्या, असा काहींचा दावा, तर हे ‘ एक शून्य नाटक ’ असा काहींचा आक्षेप. आश्चर्याची गोष्ट अशी की समीक्षकांच्या या दोन्ही प्रतिक्रियांत तथ्यांश नव्हता असे नाही. त्यामुळे खानोलकर हे एक विवाद्य लेखक ठरले.

‘ रात्र काळी ... घागर काळी ’ ही कादंबरी १९६३ मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर ‘ अजगर ’ ( १९६५ ), ‘ कोंडुरा ’ ( १९६६ ), ‘ त्रिशंकू ’ ( १९६८ ) व ‘ गणुराया आणि चानी ’ या दोन लघुकादंबऱ्या ( १९७० ) ‘ अज्ञात कबुतरे ’ १९७२ ‘ अगोचर ’ ( १९७५ ), ‘ भागधेय ’ ( १९७५ ) व ‘ पाषाण-पालवी ’ ( १९७६ ) या कादंबऱ्या त्यांनी

लिहिल्या. या दहा कादंबऱ्यांचे कालक्रमानुसार वाचन केल्यास स्थूल मानाने असे दिसते की ' रात्र काळी ' पासून ' चानी ' पर्यंत त्यांच्या लेखनाचा सतत विकास होत गेला आहे. ' चानी ' ही त्यांची सर्वात यशस्वी कलाकृती म्हटली तर वावगे ठरू नये. त्यानंतर मात्र त्यांच्या कादंबरीलेखनास उतरती कळा लागल्याचे जाणवते. अर्थात सर्वच कलावंतांच्या लिखाणात चढ–उताराची ही प्रक्रिया चालू असते. खानोलकरांच्या बाबतीत या उताराच्या कारणांचा आपण अंदाज करू शकतो. त्यांच्यामागे सतत हात धुवून लागलेली आर्थिक विवंचना व प्रकृतीअस्वास्थ्याचा ससेमिरा यामुळे त्यांच्या अखेरच्या कादंबऱ्या सपक होत गेल्या असाव्यात का ? पण त्यांचे कविता-लेखन असा आलेख दाखवीत नाही. तेव्हा असा एक विचार मनात येतो की, कादंबरी हा वाङमयप्रकार विशेष अर्थप्राप्ती करून देणारा असल्यामुळे पैशाची नड भागविण्यासाठी त्यांनी शेवटी तो राबविला असावा काय ? अपरिपक्व अवस्थेतच असलेली कथानके वेळेच्या अभावी त्यांना प्रसिद्धी–साठी द्यावी लागली असावीत काय ? ते काहीही असले तरी खानोलकर अधिक जगले असते तर त्यांच्या कादंबऱ्यांनी पुन्हा प्रगतीकडे निश्चितपणे झेप घेतली असती असे म्हणण्याइतका पुरावा मात्र त्यांच्या शेवटच्या चार कादंबऱ्यांत आढळतो.

त्यांची पहिली कादंबरी गाजली ती त्यांतील लक्ष्मीच्या अप्रतिम लावण्याने व अनोख्या व्यक्तिमत्त्वाने. तिचा विषय जसा नावीन्यपूर्ण तशी त्याची हाताळणीही नवलाईची. अनेकांसमोर विवस्त्र होण्याची धिटाई व निर्लज्ज–पणा करूनही तिच्या सौंदर्य-आगीस स्पर्श करण्यास कोणीही धज वू न शकल्यामुळे आयुष्यभर अतृप्तच राहिलेली लक्ष्मी, तिने सोडून ठेवलेल्या लुगड्यालाही एकांतातसुद्धा इच्छा असून देखील हात लावण्यास भ्यालेला, पण त्याचबरोबर तिच्याबद्दलच्या अमर्याद आसक्तीने तिच्या घरासमोरील आपल्या पडवीत सदैव खोंगी घालून बसलेला तिचा चुलतसासरा दास्या आणि त्यानंतर तीच जागा घेणारा तिचा धाकटा दीर वामन, रोज तिच्या–कडे ओढत आणल्यासारखा येऊन हतबुद्ध होऊन बसलेला दाजी, अशा अनेक विक्षिप्त पात्रांनी भरलेली पण देखण्या प्रतिमांनी बहरलेली ही दुनिया

मराठी वाचकांना नकोनकोशी वाटत असतानाच हवीहवीशी वाटत होती. तीच गत ' अजगर ' कादंबरीची झाली. यातील सर्वच पात्रे प्रकृतीऐवजी विकृती प्रकट करताना पाहून वाचक गोंधळात पडले. स्थूलदृष्टीच्या वाचकांना तर दोन्ही कादंबऱ्यातील मालमसाला म्हणजे लोकप्रियतेसाठी लेखकाने उभा केलेला बाज वाटला. 'कोंडुरा 'त हा साराच देखावा पालटला. शंकेचे सावट दूर होऊ लागले. मंत्रमुग्ध करणारा तो कोंडुरा, त्यात वावरणारी, त्याच्या धाकाने भयग्रस्त होऊनही त्याच्याच खांद्यावर विश्वासाने मान टाकणारी व त्यापायी मोडून गेलेली यातील पात्रे वाचकांना ओळखीची वाटली. ' त्रिशंकू ' त ही जवळीक अधिक वाढली. शिवाय त्यात सामाजिक संदर्भ आला. तिच्यातील समस्या खऱ्याखुऱ्या समस्या वाटू लागल्या. मुख्यतः अस्तित्ववादी विचारसरणीचे धागेदोरे आपल्या जीवनातून उलगडून दाखविणारा यातील नानू विशेष लक्षणीय ठरला. पितृऋणाखाली चेंगरला जाणारा ' गणुराया ' ही परिचयातीलच वाटला. आणि 'चानी ' ने तर वाचकांना वेड लावले. 'अज्ञात कबुतरे' मधील एका अनोळखी, पोरक्या व कष्टाळू किशोरीसाठी प्राण पाखडणारे व जिवाच्या आकांताने तिचा शोध घेणारे बनहट्टी असामान्य वाटले. 'अगोचर' मध्ये खानोलकर एक वेगळाच पवित्रा घेत असल्याचे, पण त्यात अपयशी झाल्याचे जाणवले. ' भागधेय ' मधील अतिशय प्रामाणिक, कष्टाळू पण पूर्ण निर्बुद्ध अहमदमिया, त्याच्याचसारखा त्याचा मुलगा हसन व अत्यंत देखणी सून यांच्या शोकांतिकेने मन व्याकूळ झाले व ' पाषाण–पालवी ' तील क्षयी पतीस वाचविण्यासाठी अनेक व्यभिचार नाइलाजाने करणारी पण मनासारखा जोडीदार न मिळाल्यामुळे लक्ष्मीसारखीच अतृप्त राहिलेली उमा पाहून खानोलकरांच्या कादंबरीलेखनाचे वर्तुळ जणू पूर्ण झाले असे वाटले.

' रात्र काळी ... ' ही कादंबरी एका दृष्टीने फार महत्त्वाची आहे. पुढील अनेक कादंबऱ्यांवर तिची दाट छाया आहे. अप्रतिम सौंदर्य पापीच असते या कल्पनेने लक्ष्मीप्रमाणे चानीचे जीवनही उद्ध्वस्त केले जाते. जाई या भाविणीच्या मुलीचे प्रियकरावरील प्रेम व निष्ठा ' त्रिशंकू ' तील सुशीत

पुन्हा आढळतात. दास्या जीव देण्यास जातो तो परिसर पुढें 'कोंडुरा' चे भव्य रूप धारण करतो. बकुलेचे समंजस, संयमित, सोशिक पण दुर्दैवाने असफल झालेले जीवन पार्वतीत सफल होते. लक्ष्मीने अत्यंत वात्सल्याने वामनला जवळ घेतले असता त्याच्या मनात मात्र आग पेटते. तशीच आग 'अजगर' मध्ये पावसकरणीने जवळ घेतलेल्या पांगळ्यातही पेटते. अनेकांची कोसळती जीवने सावरण्याच्या आपल्या धडपडीतून 'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे' या वचनाची प्रतीती आणून देणारा अच्युत, चानी व मामी यांची चिता वाहाणाऱ्या दिनूत परत भेटतो. 'देहातील मस्ती काजळासारखी जोडीदाराच्या डोळ्यांत पेरू पाहणारी' लक्ष्मी, 'नैवेद्यासारखं हे तारुण्य त्याचं आहे. स्वामी, याला सुबुद्धी द्या हो' असे स्वामींना काकुळतीने विनविणाऱ्या 'अगोचर' मधील नंदिनीत पुन्हा दिसते. आणि 'भिंगालाही भोवळ यावी' अशा लक्ष्मीच्या अपूर्व सौंदर्याचे दर्शन 'आरशाचा पाराही वितळवून टाकणाऱ्या' हसनच्या पत्नीच्या लावण्यात पुन्हा घडते.

अशा या प्रभावी कादंबरीचा विषयही तसाच मोठा आगळा आहे. सौंदर्याच्या समृद्धीनेच जिचे जीवन पार करंटे बनविले त्या लक्ष्मीच्या अतृप्त मनाच्या काहिलीचा शोध हा या कादंबरीचा मध्यवर्ती गेंद. बकुळ, जाई, दिगंबर, सदाशिव ही विरोधी लयीतील पात्रेच नव्हेत, तर केमळेकर, दाजी, खटखटे इत्यादी संवादलयीतील पात्रेही हा गेंद कोमेजवितात, सुकवितात व त्याला निर्माल्याची अवकळा आणतात. असे हे सौंदर्य होते तरी कसे ? वयात येताच 'आपलंच अंग तिनं मोठ्या कौतुकानं न्याहाळलं. तिलाच त्या किमयेचा पत्ता नव्हता. मृण्मय देहाची ही चैत्रगौर तिला स्वतःलाच गौरवास्पद वाटली. आणि क्षणभर तिच्याच डोळ्याचे आरसे झाले.' पण या सौंदर्याने डोळे निवण्याऐवजी दचकतात. लक्ष्मीला वाटते, देवचाफा दचकला. अंबेपुढील ज्योती दचकल्या, व पुढे केळीचे वन तर इतके दचकले की शक्य असते तर ते तिच्यापासून दूर पळून गेले असते. संज्ञाहीन वस्तूंची ही कथा मग हाडामासाच्या माणसाची या लावण्यापुढे काय गत होणार ? जो तिच्या सर्वस्वाचा कायदेशीर धनी होता व 'ज्याच्या चरणावर पारिजातकाच्या फुलाप्रमाणे आपले सर्वस्व' तिने मोठ्या भक्ति-

भावाने अर्पण केले होते त्या तिच्या पतीलासुद्धा तिच्याजवळ फिरकण्याची हिंमतच होत नाही. ‘ असं रूप माणसाला मिळत नाही. मी कधी पाहिलं नाही. मला भीती वाटते. माणूस हाडामासाचं असतं पण इतकं लावण्यमय असतं ? हे शंभर नंबरी सोने नव्हे, ’ या कल्पनेचा भुंगा त्याचे मन खोल खोल पोखरीत राहतो. त्यामुळे सामान्य स्त्रियांनाही जे सुख सहजासहजी मिळते ते तिच्यापासून दूर दूर पळते. शेवटी गृहिणीची चालरीत विसरून ती जेव्हा त्याला त्वेषाने डिवचते तेव्हा राक्षसी वृत्तीने तो तिला एकदाच जवळ करतो. पण तेवढ्यानेच ‘ चुकार बीज ’ पेरले जाऊन सदूचा जन्म होतो. दिगंबर मात्र वेडा होऊन तिला कायमचा मुकतो. पुढील उभ्या आयुष्यात पाप करायची इच्छा असूनही तिच्या हातून पाप घडत नाही. कारण तिच्या दाहक सौंदर्याला स्पर्श करण्याची हिंमतच कोणाला होत नाही. ते सौंदर्य लोहचुंबकासारखे केमळेकर, दास्या, दाजी इत्यादींना आपल्याकडे खेचून आणते. पण त्याची धग त्या व्यक्तींना लक्ष्मणरेषा ओलांडू देत नाही. त्यांच्या समोर नग्न होऊन पसरण्याचा अघोरीपणा करून व वर ‘ लुटा ही गंमत, ’ ‘ किती ताजी टवटवीत आहे रे मी ? ’ यासारखी बीभत्स आव्हाने देऊनही पुढे पाऊल टाकण्यास कोणाचीच छाती होत नाही. त्यामुळे एका अर्थाने तिचे लावण्य तिच्या शीलाचे कवच ठरते. ती मात्र तळमळत राहते. रात्र काळी तशीच घागर काळी, लुगडे काळे, तिचा पलंग काळा, मांजर काळी, मन काळे, कृत्ये काळी व भविष्यही काळेच. सारेच अंधारलेले – काजळलेले व भयाण !

स्त्रीसुलभ सर्व संकोच व मर्यादा पूर्ण ओलांडून अनेक पुरुषांना बेधडक अतिरेकी आव्हाने देणारी ही लक्ष्मी मुळात कशी होती ? व्रतस्थ भिक्षेवर घरातील यज्ञकुंड प्रज्वलित ठेवणाऱ्या यज्ञेश्वरबाबांच्या संस्कारात वाढलेली त्यांची ही अजाण कन्या. बापाने लग्न ठरल्याचे सांगताच अत्यंत हरखून देहभान विसरलेली व त्यांच्या सांगण्यावरून अंबेला नमस्कार करण्यास चालली असताना जोडीदाराच्या रूपाची मनाशी कल्पना बांधीत बसलेली. ‘अल्लड पोरीच्या कमरेवरचा घडा डचमळावा तसं तिच्या जोडीदाराचं चित्र डच-मळत होतं. ते नीट आकार घेत नव्हतं. पण एखादी दणकट रेघ दिसली की,

त्यानंही ती शिंपल्यात टच्कन् तयार होणाऱ्या मोत्यासारखी चमकली, लाजली, तिची पावलं लयबद्ध झाली, त्यांना सुरांचं वजन मिळालं' पण अशा अत्यानंदात असलेल्या या लक्ष्मीच्या भीषण भवितव्याची चाहूल याच क्षणी लागते. खाडीच्या पाण्यात तिने पाऊल टाकताच 'पाणी थरारलं... ... ... तसूतसूनं देहावर चढत होतं. तिला वाटलं, पावलं वर तरंगताहेत. देहावरचं वस्त्र असं सुटं व्हायला का पाहतंय.' आणि तेवढ्यात मातीची एक काळी घागर उपडी उपडी वाहात तिच्याजवळ येते व तिच्या पायाखाली केस लागतात. तिला वाटतं. 'कुणी बुडालं होतं का ? ... कुणा नववधूची पावलं घागर पाण्यात बुडवताना पाण्यानं खेचलीत. आपल्या पावलांना तिच्याच लांबसडक केसांचा विळखा पडलाय.' तोच रानातून उठलेले पाव्याचे सूर तिचा पाठलाग करतात. 'एकेक सूर म्हणजे उंच उंच उडणारी एक एक चिळकांडी वाटत होती.' असे ते सूर जोडीदाराच्या रुंद पाठीमागे लपतात व स्वतःच्या उफाड्या देहाकडे पाहात ती एकेक रेघ जुळवू लागते. भावी पतीच्या विचारात हरवून बसलेल्या अशा या लक्ष्मीचे जेव्हा लग्न होते तेव्हा स्वाभाविकच त्याच्या मीलनासाठी तिचा उत्साह अगदी उतू जातो आणि दुसरीकडे 'हे शंभर नंबरी सोने नव्हे' असे मनांत म्हणत तिचा पती तिला दूर ढकलीत राहतो. नवरा षंढ असेल का अशीही शंका तिला चाटून जाते. तेव्हा तिला भोवळ येते पण त्याही स्थितीत 'जन्मभर अशीच राहीन पण काय ते कळायला हवं' असे म्हणण्याइतकी तिची पतिनिष्ठा खंबीर असते. परंतु घडले ते विपरीतच. 'घुबडानं सूर्योदय पाहिला नाही हा दोष तिचा घडला.' तिच्या डिवचण्याने तो तिच्यावर तुटून पडतो. तेव्हा 'राक्षस भिडला आहे. उरावर समुद्रकाठचं तुफान उठलंय. वाघानं वासरू कमरेवर टाकून रानवाट धरली आहे' असे भास तिला झाले. तरीही तिची निष्ठा कायम होती. एवढेच नव्हे, तर वेडाच्या भरात तो तिचा जीव घेण्यासाठी भुतासारखा गरगरू लागला असता तिचे रक्षण करण्यास आलेल्या अच्युतला ती म्हणते, 'मारू देत. त्यांच्या हातून मेले तर काय वाईट ?' आणि तिचा चुलत सासरा दास्या जेव्हा तिने अंथरूणावर सोडून ठेवलेल्या तिच्या लुगड्याला हात घालण्यासाठी खाली वाकल्याचे ती पाहते तेव्हा तिला वाटते, 'त्या काळ्या लुगड्याची ज्वाळा होऊन दास्याची राख का नाही झाली ? नको

बाई, या घरात राहणंच नको ... पोटात गोळा आहे म्हणून तरी पळालं पाहिजे.' असे म्हणत घर सोडणारी लक्ष्मी पुढे इतकी वहावली कशी? विशेषतः याच कादंबरीतील बकुळ नेमके दुसरे टोक गाठते. लक्ष्मीच्याच दुधावर वाढलेली व सौंदर्याचे लेणे ल्यालेली, अच्युतला बांधावर सापडलेली ही एक अनाथ मुलगी. लक्ष्मीचेच दुःख नेमके तिच्याही नशीबी येते. पण आयुष्यभर ती अतिशय संयमाने व शहाणपणाने वागते. तिने ज्याच्यावर जिवाभावाने प्रेम केले होते व ज्याने तिच्या प्रेमाला साद घातली होती, त्या सदाशिवापासून लक्ष्मी तिला ती अस्सल बीजाची नाही म्हणून तोडते व आपल्याला पूर्ण वाहून घेतलेल्या वामनशी तिचे लग्न लावून देते. अशा परिस्थितीत सदू जेव्हा तिला जवळ करू पाहातो तेव्हा ती त्याला दूर ठेवते व लक्ष्मीपायी प्रेतवत जिणे जगणाऱ्या वामनशी एकनिष्ठ राहते. विडचा वळण्यासारखे कष्ट करून दोघांचा चरितार्थ चालविते. या कादंबरीतील दुसरी अशीच संयमी व्यक्ती म्हणजे जाई. भाविणीची मुलगी. दिगंबरने वेडाच्या भरात तिला ओरबाडले. तरीही 'पोटी मोठचाचे बीज आहे ... ... गर्भ वाढेल.' या आशेवर आयुष्यभर त्याच्या नावाचा जप करीत ती बसते. अच्युतला वाटते, 'हिनं जीव ओवाळून टाकलाय लाह्यासारखा ... ... भरल्या घरची सवाष्ण बोलते आहे. भावीण कोण म्हणेल हिला? ... ... दिगंबरास आणायला हवं. हिच्याशी घरोबा करून राहील.' शेवटी ही जाई झिजत झिजत मृत्युमुखी पडते. दिगंबरावरील तिचे प्रेम व निष्ठा अभंग राहतात. स्त्रियांचे असे चित्रण करणारे खानोलकर लक्ष्मीच्या जीवनातील कारुण्य एवढे केविलवाणे व तिरस्कारार्ह कसे करतात? मानवी मनाचे खेळ अतर्क्य असतात. म्हणून कामवासनेने पछाडलेल्या लक्ष्मीचा तोल पूर्ण सुटतो असे घटकाभर मानले तरी तिचे वडील व सारा गाव तिच्याविरुद्ध ब्रही काढीत नाहीत. हे कसे? ही त्यांची पहिलीच कादंबरी असल्यामुळे जरा जास्तीच्याच उत्साहाने त्यांनी लक्ष्मीची अतृप्ती रंगविली व त्यातून कच्च्या जागा निर्माण झाल्या असे म्हणावयाचे काय? या तुलनेत 'रणांगण' मधील हॅर्टाचा अत्यंत कष्टाने आवरून धरलेला मीलनोत्सुक आवेगाचा बांध ताटातुटीच्या अगदी शेवटच्या क्षणी फुटणे, 'बॉब, मी आले' म्हणत तिने एकदाच विवस्त्र होणे, व लगेच तो ताण असह्य होऊन बेशुद्ध पडणे हे सगळे किती स्वाभाविक व काळजाचा ठाव

घेणारे ठरते ? आणि मग असा प्रश्न पडतो की खानोलकरांसारख्या अस्सल कलावंताचे संभाव्यतेचे व सूचकतेचे भान कसे सुटले ? सकृद्दर्शनी उद्‌भवणाऱ्या या प्रश्नांची दोन प्रकारांनी संगती लागू शकते. एक तर लक्ष्मीची वाट या मार्गाकडे वळणे शक्य कोटीतील वाटावे अशी तिची प्रकृती व तिच्या भोवतालची परिस्थिती दाखविण्याची सावधगिरी खानोलकरांनी बाळगली आहे. लक्ष्मी नुसतीच सुंदर नव्हती तर विलक्षण वासनासक्त होती. तिचे व्यक्तिमत्त्व प्रमाथी होते. एरवी लग्न ठरल्याचे कळताच नुकतीच वयात आलेली ती इतकी देहभान विसरती ना. पाव्याचे सूर ऐकून तिला जिवाचे काजळ झाल्यासारखे वाटते. सुरांच्या चिळकांड्यांनी तिचे मन अधांतरी उचलून धरल्यासारखे होते. गळ्यापर्यंत पाणी आले तरी ती पाऊल मागे घेत नाही. अशा या लक्ष्मीस पती मिळतो तो भरदार देहाचा, रुंद छातीचा, खोल गहिऱ्या डोळ्यांचा व अंगभर मुसमुसणारी कांती असलेला. स्वाभाविकच तिच्या आतुरतेस भरती येते. 'ये ना!' हा एकच ध्यास तिला लागतो. 'एवढी उमेद वरात असताना पती असा मालवून का जातो' या प्रश्नाने ती थकते, शेवटी नाइलाजाने स्वतःच आपल्या देहावरून हात फिरविते. तिचे दुर्दैव एवढे की, हक्काचा पती तर तिला तळमळत ठेवतोच पण तिच्यावर भाळलेले इतर पुरूषही तिची अशीच अवस्था करतात. केमळेकर तिला आसरा देतात. तिच्यासाठी स्वतंत्र, नवे घर बांधतात व तिच्या इतरही सर्व सोयी करतात. पण स्वतः मात्र 'काठावरूनच परत जातात.' इतर कोणतीच विवंचना नसल्यामुळे तिचे मन रिकामे असते, वेळ भरपूर असतो. त्यामुळे वासनेचा जोर वाढतच राहतो. त्यात केमळेकर ज्या दुकानदार दाजीला तिला लागेल ते सामान देण्यासाठी तिच्याकडे पाठवितात तो दाजी तिचे लावण्य पाहून जागच्या जागी गोठून जातो व स्वतःच एक सामान होतो. रोज तिच्याकडे तासन्‌तास दिङ्मूढ होऊन पहात बसतो. 'हाडामासाचा देह असा कसा असेल ?' या विचाराने त्याचा पारा गळून जातो. तो तिला सोडू शकत नाही व धरूही शकत नाही. त्यामुळे लक्ष्मीची घालमेल विलक्षण वाढते. बासरीचे सूर तिचे अंग अन् अंग तटतटून दुखवीत राहातात. तुडुंब प्रवाहात राहूनही तिला तृषार्तच राहावे लागते. तेव्हा एक दिवस तिची धगधगती वासना अनावर होते. जाणिवेचा खडा पहारा सर्व

सामर्थ्यानिशी ती दूर ढकलते व पलंगावर 'नग्न ज्वाळे सारखी पसरते.' 'दाजी, या ना' – 'स्वतःच्याच मानेवर सुरी फिरविल्यासारखी' कळवळून बोलते व दाजींनी 'माफ कर' म्हणताच त्वेषाने पितळी ग्लास आरशावर फेकते. तिची बेभान अवस्था संपते तेव्हा तिला वाटते, 'सदूला कुठं तरी बाहेर ठेवला पाहिजे. या घरानं आज वस्त्र फेडलं आहे.' पण हा पश्चात्ताप फार वेळ टिकत नाही. तिची तगमग वाढतच राहाते. इतकी की तिला काही धरबंधच राहात नाही. 'या रात्री काढायच्या तरी कसल्या आशेवर ?' या प्रश्नाने तिची कासाविशी शिगेस पोहोचते. 'सारंगियानं तारांवरून सहज हात फिरवावा तसा ती देह आपल्या आपणच कुरवाळीत होती. मी अशी अशीच राहणार का ?' या विचाराने ती इतकी बेचैन होते की तिला मुलगा शोभेल असा लालचुटूक ओठांचा सुंदर खटखटे पाहाताच तिला वाटते, 'परत एकदा पाप पाप म्हणतात ते करावं. सगळं होऊन चुकलंय. इतकं तरी मिळवता आलं तर? भिक्षा घेऊन आग जागती ठेवायची.' अशा तिच्या विलक्षण कृतिउक्तीतून खानोलकर तिच्या अंतःकरणाची काहिली वाचकांच्या मनाला थेट नेऊन भिडवतात. ही सारी वर्णने अतिशय प्रत्ययकारी असली तरी ती सर्व प्रश्नांची – लक्ष्मीच्या अतिरेकाची – सर्वच पुरुषांनी तिच्यापुढे नांगी टाकण्याची, इत्यादी – उकल करू शकत नाहीत. म्हणून घराबाहेर पडल्या-नंतरची लक्ष्मीची सारी वर्णने 'लक्ष्मी' ची नसून ती निखळ विषयवासनेची असावीत अशी एक संगतीही लावता येईल. चालत्या बोलत्या लक्ष्मीचे आदिमवासनेच्या प्रतीकात रूपांतर होते. त्यामुळे लवथवती उघडीवाघडी वासना तिच्या सर्व अंगोपांगांसह प्रतीत होते. कादंबरीच्या शेवटी खटखटे-समोर लक्ष्मीला तीच लाचारी करावयास लावल्यामुळे कथानक व्यर्थ ताणले जाऊन कादंबरीचा घाट बिघडला व लक्ष्मीबद्दलची घृणाही शिगेस पोहचली. पण विषयवासनेचा ठार आंधळेपणा व पराकोटीचा अविवेक दाखविण्यासाठी खानोलकर हे दोषही पत्करतात. शिवाय, खटखट्यांचे आपल्या आईवरील प्रेम व तिच्या पावित्र्याबद्दलची आस्था पाहताच कामासक्त लक्ष्मी क्षणार्धात भानावर येते, बावरते व पदर सावरून निघून जाते असे दाखवून त्यातून लैंगिक-वासना व वात्सल्य-भावना या दोन मूलभूत प्रेरणांपैकी वात्सल्य-भावनेचे वर्चस्व ते सूचित करतात. पुरुषपात्रांच्या बाबतीतही हीच प्रतीका-

त्मता त्यांनी उपयोजिलेली असावी. दास्या, वामन, केमळेकर, दाजी, अण्णा ही सारी पात्रे पुरुषी आसक्तीची प्रतीके असावीत. पुरुषप्रकृतीचा हा खेळ प्रतीकरूपात बद्ध करून विषयवासनेची आदिम रूपे खानोलकर मूर्त करीत असावेत.

□ □

# ३. 'अजगर' : नेणिवेच्या शोधात

'अजगर' ही खानोलकरांची दुसरी कादंबरी. एका अर्थाने 'रात्र काळी...' हूनही अधिक विवाद्य ठरलेली. अनेकांनी तिची ओंगळ, विकृत, अश्लील अशी संभावना केली, तर काहींनी खानोलकरांची ती सर्वोत्कृष्ट कादंबरी ठरविली. ही कादंबरी अथपासून इतिपर्यंत एक अनाकलनीय गूढ वाटते. पहिल्या वाचनात ज्यांना ती समजली असे वाचक हाताच्या बोटावर मोज-ण्याइतकेच असावेत. सर्वसाधारण वाचकांच्या तर ती आटोक्याबाहेरचीच आहे. अशी वस्तुस्थिती असली तरी तिचे पुन्हा काळजीपूर्वक वाचन केल्यास तिचा आशय उमगू लागतो, आणि हळूहळू त्याची आकृती स्पष्ट होत जाते. असा भावलेला आशय सांगण्याचा हा प्रयत्न.

'रात्र काळी... 'तील लक्ष्मी देहावरील वस्त्रे फेडून वासनेचे निखळ रूप दाखविते, तर या कादंबरीतील पात्रे मनावरील जाणिवेची आवरणे फेडून नेणिवेचे दर्शन घडवितात. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीचे विकृतीत रूपान्तर होते. ते पाहून वाचक गोंधळात पडतो. कारण व्यवहारात वेड्या व्यक्ती वगळल्यास बाकी सर्वांचे वर्तन बव्हंशी संज्ञ मनाकडूनच होत असते. भविष्याच्या पोटात काय काय दडले असेल याचा जसा माणसाला थांगपत्ता नसतो, तसाच त्याच्या जाणिवेखाली दडपलेल्या नेणिवेच्या हालचालींचाही मागमूस त्याला नसतो. म्हणून एखादा कलावंत जेव्हा त्या

हालचालींचे दर्शन घडवितो तेव्हा वाचकाला ते असंभाव्य, चमत्कारिक व भयावह वाटते. असंज्ञ मनावर सभ्यतेची, संस्कृतीची पुटे चढलेली नसल्यामुळे मनाचा तळ दिसू लागतो, त्याचे खरेखुरे रूप पाहणे शक्य होते. पण हे सत्यदर्शन अपरिचित व कटु असल्यामुळे त्याकडे पाहण्याची बहुतेकांत हिंमत नसते म्हणून या मनाचा वेध घेऊ पाहणाऱ्या कलाकृती त्यांना अप्रिय वाटतात. प्रस्तुत कादंबरी अशाच प्रकारची आहे.

मुंबईतील एका चाळीत राहणाऱ्या, भिन्न भिन्न समस्यांनी पछाडलेल्या काही व्यक्तींच्या जाणिवे-नेणिवेचा खेळ खानोलकरांनी या कादंबरीत रेखाटला आहे. यातील पात्रांना एकएक जीवघेणी समस्या विलक्षण सतावून सोडीत आहे. तिला सामोरे जाताना त्यांची संज्ञ व असंज्ञ मने परस्परांत मिसळत आहेत, एकमेकांवर मात करू पाहात आहेत. या चुरशीत असंज्ञ मनाचा विजय झाल्यामुळे सर्व पात्रांचे वर्तन बव्हंशी विकृत (ॲब्नॉर्मल) झाले आहे. अशा प्रकारे विविध पात्रांतून असंज्ञ मनाचे व्यवहार चित्रित करून निखळ विकृतीचे दर्शन घडविणारी मराठीतील ही पहिलीच कादंबरी असावी.

पेन्शनीत निघालेले हरिपंत चौगुले, समोर रिकामाच रिकामा असलेला काळ कसा घालवावा या चिंतेने हैराण झाले आहेत, नाटकवेडी इंदू कधीही न पाहिलेल्या नाटककाराच्या शोधात स्वतःला हरवून बसली आहे. पावसकरीण मातृत्वाच्या जीवघेण्या तहानेने पूर्ण अगतिक व व्याकूळ झालेली आहे. इतर पात्रांचीही अशीच गत आहे.

हरिपंत चौगुल्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी घडलेल्या एका प्रसंगाने कादंबरीची सुरुवात होते. निवृत्त होण्याच्या कल्पनेने त्यांच्या अंतःकरणात माजलेली खळबळ व अस्वस्थता विकृत वर्तनातून प्रगट होते. पंतांना प्रथम तीव्रपणे जाणवते, ते कचेरीत सतत पस्तीस वर्षे अव्याहतपणे गाजवलेले अधिकारपद जाणार याचे दुःख. ही खंत एका विक्षिप्त विचारात परिवर्तित होते. त्यांना वाटते, आपल्या अत्यंत ऐटदार, काळ्या तुकतुकीत पॉलिशच्या भल्या भक्कम खुर्चीवर आता कोण बसेल हे सांगता यावयाचे नाही. तेव्हा आपला पट्टेवाला मोऱ्या याला त्या खुर्चीवर बसवून तिची शान

घालवून टाकावी का ? हा विचार त्यांच्या मनात येताच अधिकाराच्या गुर्मीत व गंमत म्हणून तो प्रत्यक्षात आणण्याचा ते प्रयत्न करतात काय, आणि त्या प्रयत्नात बिचारा मोरे वेडा होतो काय, सारेच अघटित, भयानक ! साहेबांची घंटी वाजताच नेहमी शिक देखील नाकात दाबून धावत त्यांच्या खोलीत जाणारा आज्ञाधारक व कार्यतत्पर मोरे त्यांच्या या विचित्र हुकमाने प्रथम भांबावतो, नंतर साहेबांच्या दरडावण्याने भितो; परंतु पुढे साहेब रागावण्याऐवजी जेव्हा गयावया करू लागतात तेव्हा त्यांचे ते अनपेक्षित रूप पाहून तो 'तंगड्यातून कापू लागतो.' त्याचा स्वतःवरील ताबा सुटू लागतो. असंज्ञ मन त्याचा ताबा घेऊ लागते. त्याला वाटते, की साहेबांना त्या खुर्चीवर यम बसलेला दिसत आहे. तो त्यांची करुणा भाकतो, तरी साहेब गंमत म्हणून पुन्हा त्याला दरडावू लागतात. तेव्हा बिचारा भीतभीत खुर्चीच्या दिशेने एकएक पाऊल टाकू लागतो. पंतांची लहर वाढतच जाते आणि ते त्याला म्हणतात, " मोरे, बहाद्दर गडी आहेस, हां हां ... मागं वळलास ? अरे, हा काय भित्रेपणा ! घे रामनाम." 'रामनाम' हे शब्द ऐकताच संज्ञ मनावरील त्याचा ताबा पूर्ण सुटतो. त्यामुळे खुर्चीवर पिशाच्च बसले आहे, साहेब अधिकारी म्हणून त्यांना ते दिसले, स्वतःला वाचविण्यासाठी ते आपल्याला पुढे करीत आहेत असे त्याला वाटते. " या विचाराने मोरेचे अगदी बर्फ होऊन गेले. " या वाक्यातून जाणिवेकडून नेणिवेकडे क्रमाक्रमाने होणारा प्रवास संपल्याचे आपल्या लक्षात येते. ' बर्फ ' या शब्दाने त्याच्या संज्ञ मनाची शक्ती पूर्ण बधिर झाल्याचे जाणवते. मग खुर्चीवर कोणीतरी वेड्यावाकड्या पायाचे केसाळ कुत्रे असल्याचा त्याला भास होऊ लागतो. त्याची मुद्रा निर्जीव व वेडसर होते, तोंडातून थुंकीही गळू लागते. आपण सहज चालविलेल्या थट्टेचा हा विपरीत परिणाम पाहताच पंत घाबरतात व तो नॉर्मलवर यावा म्हणून सर्व शक्तीनिशी " मोरे ऽ ऽ " असे जोरात ओरडतात. पण परिणाम उलटाच होतो. त्या खुर्चीवरील कुत्रे आपल्या अंगात शिरले आहे असा मोऱ्याला भास होतो. हाताच्या मुठी दांडगेपणाने आवळून तो पंतांवर झेप घेऊ लागतो. पण तेवढ्यात बाहेर कोणीतरी वाजविलेल्या घंटेचा आवाज ऐकताच तो भानावर येतो. त्याच्यातील कुत्रे पळून जाते

आणि लोळागोळा होऊन तो जमिनीवर पडतो. आयुष्यभराच्या सवयीमुळे घंटेने त्याच्या असंज्ञ मनावर मात करून त्याला जाणिवेवर आणले. पण क्षणभरच. पुढे बिचारा आयुष्यातून उठतो. कुत्र्यासारखे भुंकतो. कचेरीतील खुर्ची पाहून पळत सुटतो. पंतांकडे त्यांना फाडून खाण्यासाठी जातो. पण पंतांनी ताटावर पळा मारून आवाज करताच धप्पदिशी जमिनीवर पडतो. आज्ञाधारकपणे उभा रहातो व त्याना म्हणतो "साहेब, काय केलंत हे माझं ! ... घ्या ! काय दिलंत ते घेऊन तरी टाका. आपण साहेब आहात." पण आपण काय दिले हेच पंतांना माहीत नसते. त्यामुळे तेही जागच्या जागी थबकतात. त्यामुळे मोरे थकल्या पायाने निघून जातो.

पंतांच्या जीवनात निर्माण झालेली काळाची पोकळी जणिवेखाली दडपलेल्या त्यांच्या अनेक वासना वर ढकलते. आतापर्यंत कामाच्या रगाड्यात सहन होऊ शकलेली विधुरावस्था वेळ मिळताच त्यांना असह्य होऊ लागल्यामुळे कामवासना त्यांच्यावर हुकमत गाजवू लागते. हळूहळू तिचा जोर एवढा वाढतो, की त्यांच्यासमोर लहानाची मोठी झालेल्या इंदूला लग्नाबद्दल विचारण्यापर्यंत त्यांची मजल जाते. तसेच आजपर्यंत अधिकाराच्या रुबाबात व वेळेच्या अभावी दुसऱ्यांच्या जीवनात डोकावून पाहण्याच्या मानवसुलभ कुतूहलाची पूर्ती त्यांना करता आली नव्हती. पण आता वेळ मिळताच ते कुतूहल त्यांना बेचैन करू लागते. तेव्हा हरवलेल्या मुलाच्या शोधासाठी रस्त्यावरील गर्दी अहोरात्र निरखून पाहाणाऱ्या सोपानच्या बापाची ते मोठ्या आपुलकीने विचारपूस करतात. एवढेच नव्हे, तर त्याने घरी यावे म्हणून त्याला आपला पत्ताही देतात. तरीही त्यांना खाण्यास वेळ दत्त म्हणून उभाच असतो. मुलाच्या पाठीवर काळा डाग असल्याची खूण सोपानाचा बाप सांगतो तेव्हा असाच एक पाठीवरील काळा डाग दाखविणारा केळेवाडीजवळील पांगळा पंतांना आठवलेला असतो. तेव्हा एक दिवस वेळ जाण्यासाठी ते त्या पांगळ्यालाच हमालाकरवी आपल्या खोलीत घेऊन येतात. आणि चाळ जेव्हा याबद्दल त्यांना जाब विचारते व मोरेही खोलीवर येतो तेव्हा ते स्वतःच पांगळ्यासारखे 'आँ आँ' करू लागतात, सरपटू लागतात व देवाला विनवतात, 'दत्ता, नकोरे, मला

असा वेडा करू नकोस. मी एकटा आहे ... तो तर माझ्या जिवावरच टपलाय.'

बिचारी इंदू तर नाटककाराच्या ध्यासाने देहभानच हरवून बसते. त्यामुळे तिचे सगळेच वर्तन असंज्ञ मनाकडून होते. नाटकाच्या वेडाने ती एकटीच भाषणे म्हणत राहाते. मध्येच डोळे मिटून त्या नाटककाराचे रूप आठवू लागते. भोवतालच्या सर्व व्यक्तींकडे व त्यांच्या हालचालींकडे नाटकातील पात्रे म्हणूनच ती पाहात असते. पंत खोलीत शिरताना पाहताच ती म्हणते, 'या, पंत, तुमची एन्ट्री कशी झाली सांगू ?' एकदा पंत खुर्चीवर झोपी गेलेले पाहून तिला वाटते, 'एक पात्र भाषण विसरून तसेच झोपी गेलेय. त्यामुळे बाजूच्या पात्रांचे काय हाल होतील ? तेही खुर्चीवर बसेल. कंटाळून झोपी जाईल. मग तिसरे, चौथे सगळीच पात्रे झोपी जातील. कुणीही नट जागा राहाणार नाही आणि प्रेक्षकही झोपी जातील ... तो नाटककार भेटेल ? कुठे राहतो तो ? भेटला तर त्याला ही आयडिया सांगायला हवी. इंटरेस्टिंग आहे.' पांगळा पाहून तिला वाटते, त्याचा मेकप् उत्कृष्ट आहे. पण कुठल्याही नटाने इतका मेकप् करू नये. कारण त्याला पाहून तिला चक्क ओकारी येत होती. पंत जेव्हा पांगळ्यासारखे करू लागतात तेव्हा ती म्हणते, 'ही भूमिका नका करू. फार अवघड आहे. 'तिचे हसणे दगड मारून काच फुटावी किंवा मोठेसे वारे येऊन केळीची दुर्दशा व्हावी' तसे होते. कारण तिला वाटत असते की, नाटककार काचेची खूप तावदाने असलेल्या वाड्यात राहात आहे. 'या वाड्याच्या तावदानातून आतली दालने दिसत आहेत. आत जाता येणार नाही का ?' असे म्हणत ती हसत सुटते. पण तिला मात्र वाटते की 'मी हसत नाही ... ही : ही : ही : ... पंत, मी हसत नाही. या काचा फुटताहेत काचा ! अहो मीच फोडतेय त्या. कुठल्या दालनात असेल तो ? ... एक तावदान फोडलं, पंत, पंत, बाजूला व्हा. काच पायाला लागेल. ही: ही : ! ' ... 'भरलेल्या मातीच्या घड्यांच्या उतरंडीतून एकेक घडा सावकाश जपून खाली उतरून ठेवावा त्याप्रमाणे इंदू आपला आवाज उतरीत होती, थकत होती.' शेवटी ती कॉटवर झोपी जाते. तिचा पदरही जागेवर राहात नाही. तिच्या हास्याने चाळ दारावर

उभी राहील म्हणून वास्तविक पंत दाराला कडी घालतात. पण सहवासाने इंदूचे नाटक त्यांच्याही अंगात शिरते व कडी लावताच त्यांना वाटते की, आपण एक गिऱ्हाईक म्हणून इंदूकडे आलो आहोत. हे कळताच इंदू बावरते. रागाने इतक्या जोरात ओठ चावते की त्यातून रक्ताची धार वाहू लागते. पण हळूहळू तिचा राग मावळतो व तिला वाटते, 'पंतांना त्यांची भूमिका करू द्यायची ... पण इथे प्रेक्षकाची भूमिका स्वीकारणेही अवघड आहे; पण तो धोका पत्करूनही, सगळ्या अडचणी स्वीकारूनही हे पहाण्यासारखे नाटक आहे.'

नाटकापायी अशी वेडी झालेली ही इंदू! खानोलकरांच्या इतर किशोरींची जी दुर्दशा होते तीच हिचीही होते. – पुरुषी अत्याचार व त्यामुळे आत्मनाश! एक दिवस मीरेचे काम करून ती मेकअप रूममध्ये झोपी जाते. तेव्हा कुणीतरी तिला लिबलिबीत विळखा देतो. विडीची दुर्गंधी तिच्या ताबडतोब लक्षात येतेच. 'दारूचा दर्प, देहात घुसलेला चिखल, तिला सगळ्याच गोष्टी कळल्या... ... 'त्याचे' शरीर बाटलेच ... नाटक खोटे आहे. तो खरा आहे... दुसऱ्याचे बीज घेऊन जगू नये. जावे. घरसुद्धा खोटे आहे, असे वाटून ती निघून जाते नाटककाराकडे, – कधीही न पाहिलेल्या.

मूर्तिमंत मातृत्व अशी पावसकरीण, हे या कादंबरीतील सर्वात करुण व प्रभावी पात्र. वात्सल्याची तिची भूक कल्पनातीत असते. म्हणून ती चार घरठाव करते. तरीही निपुत्रिकच राहाते. त्यामुळे वयाने वाढलेल्या पांगळ्याला तिचा पती, त्याचे दुर्गंधी कपडे काढून टाकून जेव्हा आंघोळ घालू लागतो तेव्हा त्याचा तो विवस्त्र देह, तोंडातून गळणारी लाळ व फक्त 'आँ आँ' हे उद्‌गार हे सारे पाहून तिच्या वत्सल दृष्टीने त्याचे अठरा वर्षांचे वय पुसले जाते व तिला तो अगदी अर्भकासारखा दिसतो. 'वाटीएवढा देह पण वळवळ बघा मेल्याची ... नीज माझ्या लेकरा. 'चा' ला टाकत्ये हां!' म्हणत ती डोळ्याला पदर लावते. आपल्याला एक मूल लाभले म्हणून गहिवरून येते. त्याचा विद्रूपपणा व ओंगळपणा तिला जाणवतच नाही. ती त्याला चांगले चांगले कपडे घालते, त्याच्या गळ्यात कंठा घालते. लाळेने भरलेले त्याचे रुमाल प्रेमाने धुते. चांदीच्या टिकल्यांचा रंगीत पाट, स्टेनलेस स्टीलचे ताट,

गोडधोड पदार्थ – सारे सारे त्याच्यासाठी करते. प्रेमाने त्याला भरवते. तो पानात भडाभडा ओकतो. पण एरव्ही वाटणारी घृणा तिला मुळीच वाटत नाही. वात्सल्यानंदात ती पूर्ण बुडून गेलेली असते. त्याला ती स्वच्छ धुते. 'लेकरा, लेकरा' – म्हणत त्याच्यावर मायेचा वर्षाव करते. पण पांगळ्याचे वाढलेले वय मात्र तिच्याकडे नेहमी वखवखलेल्या नजरेने हावरटपणे पाहात असते. त्या मातृहृदयाला त्याची यत्किंचितही कल्पना येणे शक्य नव्हते. त्यामुळे एक दिवस तो जेव्हा आपल्या अशक्त हाताने तिची कंबर कवळू लागतो व तुटक्या जिभेने तिचे पोट चाटू लागतो तेव्हा आपला मातृभाव त्याला समजला, आपल्याला देव पावला या समजुतीने ती हर्षभरित होते, फुलून येते व आत्यंतिक प्रेमभराने त्याला पदराखाली घेते. तिला धन्य झाल्यासारखे वाटते न वाटते तोच त्याचे गळलेले पौरुष तिला दिसते. तेव्हा असहाय व दुःखी होऊन एकीकडे ती 'भसाभसा' रडू लागते पण दुसरीकडे 'माजं लेकरू पुरुष जातीचं आहे. शरीरधर्म कुणाला सुटलेत? पण बाबा, मूठभर हाडात ही घाण आली रे कुठून! माज्या लेकराला आंघोळ घालायला हवी आंघोळ ... तू मात्र माजं लेकरूच ऱ्हा पुता. नीज, नीज. उगी, उगी' एवढ्या मोठ्या धक्क्यानेही तिच्या वात्सल्यात खळ पडत नाही. हिच्या तुलनेत अशाच घटनेमुळे लक्ष्मीने वामनची आयुष्यभर केलेली फरफट – दुर्दशा आठवते व पावसकरणीचे अगाध मातृत्व मनावर विशेष ठसते. पांगळ्यावरील तिचे प्रेम इतके उत्कट व अभंग असते की एक दिवस पांग–ळ्याला पोचवून देण्यासंबंधी त्याच्यावर पोट जाळणाऱ्या कुणा दादाचे धमकी-वजा एक पत्र येते. तेव्हा पंत व पावसकर या पुरुषांची भीतीने गाळण उडते. इतकी की खोलीचे दार लावून घेऊन ते एकमेकांना कवटाळून बसतात. पण पावसकरीण मात्र गुंडापासून पांगळ्याला वाचविण्यासाठी त्याला घेऊन रातोरात पसार होते. मातृप्रेमाचा हा उच्चांकच!

या कादंबरीतील वाचकाला मुळापासून हादरून टाकणारा पांगळा अवघ्या चार सूचक उल्लेखांतून खानोलकर आपणापुढे उभा करतात. आपला हरवलेला मुलगा सोपान याचा सतत सतरा वर्षे डोळ्यांत प्राण आणून शोध घेणारा, त्यासाठी अजगरासारखे वळसे घेत असलेली मुंबईच्या रस्त्यावरील

प्रचंड गर्दी अहोरात्र निरखीत बसलेला तो बाप, सोपानची खूण म्हणून अगदी सहजपणे त्याच्या पाठीवरील काळचा डागाचा उल्लेख करतो. पण तो डाग नेमका पांगळ्याच्या पाठीवरील डागाशी आपले नाते सांगतो व ज्याला पाहण्यास बापाची सारी इंद्रिये डोळ्यांत गोळा झालेली असतात-तो बिचारा पांगळा होऊन रस्त्यावर भीक मागत बसल्याचा दैवदुर्विलास आपल्या अंत:करणावर चरे ओढीत जातो. म्हाताऱ्या धारपांना पाहून पांगळ्याला वाटते, 'त्या दारू पीत पडलेल्या झोपडीतल्या खडकाहून हा माणूस वेगळा आहे.' 'खडक व दारू' या दोन शब्दांतून त्याला पळविणाऱ्या गुंडांचा निष्ठुरपणा व व्यसनीपणा भेदकपणे आपल्या मनावर ठसविला जातो. मूर्तिमंत घाण, कुजक्या कातडीसारखी ओंगळ विजार, केवळ हाडांची मोळी असे शरीर, फाटके कमीस वर करून, डोके पायांच्या काड्यांवर ठेवून पांगळा दाखवीत असलेला पाठीवरचा डाग इत्यादी वर्णनातून त्याच्या भिकेवर आपले पोट जाळण्यासाठी कोणा गुंडाने त्याच्यावर केलेल्या अत्याचाराचे जळते पलिते जणू आपल्या मनास डागत आहेत असे वाटते. कळस म्हणजे त्याची 'तुटकी जीभ वळवळू लागली' या वाक्यात 'तुटकी' या एकाच विशेषणात त्या मवाल्याची अमानुषता – सारे क्रौर्य खानोलकर अचूक पकडतात. त्याच्या तोंडातून सतत गळणारी लाळ, फक्त आँ, आँ असा निघणारा आवाज, या साऱ्यांचा उलगडा होतो व माणसाच्या हिडीस स्वार्थाची पराकोटी पाहून आपण आपली सारी संज्ञाशक्तीच गमावून बसतो !

अशा प्रकारे खानोलकर आपल्या कादंबऱ्यांतून विविध थरावरील विविध प्रकारच्या अनुभवांचा आकार शोधतात. त्यात सुसंगती राखण्याची सावधगिरी बाळगतात. पण नेमक्या याच त्यांच्या अवधानावर टीका केली जाते, की 'रात्र काळी ... ...' तील सगळ्याच व्यक्ती विक्षिप्त कशा ? आणि 'अजगर' मधील सारी पात्रे विकृत का ? या कादंबऱ्यांत खानोलकरांना त्याच थरांवरील अनुभव रेखाटावयाचा होता याचे आपलेच भान सुटते, हे आपल्या लक्षात येत नाही. □□

# ४. ‘कोंडुरा’ : श्रद्धा आणि विवेक यांची भीषण लढत

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □

“कोंडुरा” या कादबरीने प्रथमदर्शनीच वाचकांना विलक्षण मोहिनी घातली. मराठी साहित्याचा मानदंड ठरावा अशा तोलामोलाची ही कलाकृती.

पाणियाची मुळी व्हावी निळी कमळण
तैसा शब्द व्हावा सार्थ तृषातृप्त द्रोण

“पूजा” या कवितेत प्रगट झालेली खानोलकरांची ही मनीषा या कादंबरीत पूर्णपणे सफल झाली आहे. ही कादंबरी वाचकाला एका वेगळ्याच विश्वात नेते. हिच्यातील भव्य, भयाण कोंडुरा मन मंत्रमुग्ध करतो. श्रावण-सरीसारख्या चेतोहारी प्रतिमांनी न्हाऊन निघताना मन फार फार सुखावते; आणि आशय व अभिव्यक्ती यांचे दुर्मिळ अद्वैत पाहून स्तिमित होते. येथील दृश्य व अदृश्य शक्तींचा संघर्ष एक वेगळीच दिशा – भिवविणारी व अज्ञाताचा काही थांग लागेल या आशेने खुणावणारीही – दाखवितो.

या कादंबरीत अज्ञाताशी सामना देण्याचे आव्हान खानोलकर स्वीकारीत आहेत का? हिच्यातील तो कोंडुरा –

‘धो ऽ ऽ धो ऽ ऽ धो ऽ ऽ धा ऽ ऽ स –
अखंड गर्जना. धो ऽ ऽ धो ऽ ऽ धा ऽ ऽ स.

डोंगराचा एक तुटलेला कडा दोन चार उंच माडाएवढा उभा आहे. आणि त्याच्या पायाशी केवढं तरी विवर. सगळ्या जगाचा काळोख त्यातच असावा. अमावास्येचं उगमस्थान. त्या विवरातून बाहेर सरपटलेले आहेत केवढाले तरी खडक... त्या पाषाणावर आदळतात, समुद्राच्या आयाळी. एकेक लाट आकांत करीत येते आणि त्या विवरातून चेंदामेंदा होऊन बाहेर पडते. ... आजूबाजूच्या वीसपंचवीस मैलात सर्वस्व हरवून बसलेल्या एखाद्या वेड्या बाईच्या हाकेसारखी ती हाक घुमते. 'धो ऽऽ धो ऽऽ धा ऽऽ स' आसमंतातील गावांचा 'देव' बनून गेलेला हा कोंडुरा.

वास्तविक कोंडुरा म्हणजे निसर्गातील अतिप्रचंड वस्तू. समुद्राच्या काठावरील असामान्य उंचीचा डोंगराचा एक कडा व त्याच्याखाली काळा-कुट्ट अंधार, पोटात तुडुंब रिचवलेले तितकेच खोल विवर, आणि त्यातील खडकावर जोराने आदळल्यामुळे होणारा समुद्राच्या लाटांचा कर्कश आवाज. सारेच निर्जीव व असंज्ञ. तेव्हा त्याचा अवती भोवती वावरणाऱ्या माणसांच्या सुखदु:खाशी, भवितव्याशी काय संबंध होता? पण हे अवाढव्य रूप पाहून लोक धास्तावतात. कानठळ्या बसविणाऱ्या लाटांच्या आवाजाने भयभीत होतात आणि मग मनाला धीर देण्यासाठी त्याच्यावर निरनिराळ्या कल्पना लादतात. देवाची निर्मिती ज्या असुरक्षितपणाच्या भावनेतून व अज्ञाताच्या ओढीतून माणसाकडून केली जाते त्याच वृत्तीतून कोंडुऱ्यावर विविध हेतू व सामर्थ्ये लादली जातात. त्यांना असे वाटू लागते की ती गर्जना म्हणजे 'कोणीतरी विश्वरहस्याला' मारलेली हाक आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्याही कानात ती 'काहीतरी ज्वलंत' सांगत असते. यातून अनेक कथा, दंतकथा, कहाण्या निर्माण होतात. घराघरांतून त्यांचे पडसाद उमटतात. मनाला दिलासा देणारे एक कल्पित विश्वच तेथे उभे केले जाते. केवळ अंधारच अंधार असलेले ते भयकारी विवर रिकामे असलेले लोकांना चालत नाही. म्हणून ते त्यात 'एक हजारो वर्षांचं म्हातारं कासव'– खडकासारखी पाठ असलेलं– नेऊन बसवितात. निर्जीव वस्तूत अशा प्रकारे जीव ओतला जातो. पण कासव सजीव असले तरी तो एक निर्बुद्ध प्राणीच. तेव्हा त्यांचे प्रश्न तो कसे सोडविणार? म्हणून 'पृथ्वीचा आदि – अंत माहीत असलेला,

यच्चयावत् माणसांचे पापपुण्य जाणणारा कासवाहूनही म्हातारा एक पूर्ण 'पिकलेला यती' त्या कासवाच्या पाठीवर बसविला जातो व नंतरच आपल्या भवितव्याबद्दल ते पूर्ण निश्चित होतात. कारण तो यती जरी 'कासवाच्या कवचासारखाच कोरडा' असला तरी या जगाची त्याला काळजी असते. खुद्द परमेश्वराशीच त्याचे नाते असल्यामुळे तो सर्वशक्तिमान असतो. 'डोक्यातला मणी हरवून बसलेल्या चिरंजीव वेदनेशी – अश्वत्थाम्याशी त्याचा परिचय' असतो. कधी कधी 'तेऽऽल' अशी आरोळी देत अश्वत्थामा कोंडुऱ्याशी येत असल्याचा पुरावाही लाटांवर अधूनमधून तरंगणाऱ्या 'तेलकट तवंगातून' – जो वास्तविक भक्तांनी वाहिलेल्या नारळांमुळे आलेला असतो, – त्यांना मिळतो. ते पूर्ण सश्रद्ध बनतात व 'आपला जन्म–मृत्यू, आपलं सगळंच काही, आपलं भवितव्य या कोंडुऱ्याच्या पोलादी मुठीत अगदी सुरक्षित आहे; त्याची गर्जना हा एक पहाराच आहे' असे समजून शांत होतात – स्वस्थ होतात. कोंडुऱ्याच्या या निसर्गनिर्मित व मानवनिर्मित वातावरणात वाढलेल्या, कमी अधिक श्रद्धा असलेल्या, विविध प्रकृतीच्या व्यक्ती, ज्ञात व अज्ञात शक्तींशी त्यांचा चाललेला लढा, त्यात त्यांना प्राप्त झालेले–जयापजय या साऱ्यांच्या नेटक्या वर्णनातून एक अनुभवसंपन्न व अतिरमणीय कलाविश्व आपल्या समोर साकार होते.

कोंडुऱ्याच्या वर्णनात सहजपणे आलेली काही वाक्ये जणू या कादंबरीचा आशयच सूत्ररूपाने सांगत आहे असे वाटते. "जिवाचा चेंदामेंदा करण्यातच त्या तुफानी लाटांना समुद्रातला त्यांचा जन्म सार्थकी लागल्यासारखा वाटत असेल तर त्याला तरी काय करणार?" कोंडुऱ्यावरील अढळ श्रद्धेमुळेच सुतारीण व अनसूया यांचा बळी जातो. पण त्या लाटांप्रमाणे त्यांनाही त्यातच आपल्या जीवनाची सार्थकता वाटली असेल तर त्याला त्या तरी काय करणार? "तुटलेला कडा पोटात रहस्यवत् अंधारच घेऊन राहणार असेल! काळोखाचं गर्भाशय विश्वरहस्याचा स्वतःतील शिक्का स्वतःतच ठेवणार असेल! काहीच कुणाला सांगता येणार नाही." यती, मुळी, घंटानाद ही रहस्येही अखेरपर्यंत रहस्येच राहणार का, याबद्दलही कोणालाच काही सांगता येणार नसते. "डोक्यातला मणी हरवून बसलेल्या चिरंजीव वेदनेशी – अश्वत्थाम्याशी त्याचा परिचय आहे." तात्या जेव्हा

पार्वतीला मुळी उगाळलेले तीर्थ देतात, तेव्हा " डोक्यातला मणीच काढून घेतल्यासारखे पांगळे होतात. म्हणजेच चिरंजीव दुःखाचे वाटेकरी होतात. हे सारेच कसे अनोखे, गूढ, शब्दातीत परंतु तरीही समर्थपणे शब्दांकित केलेले.

कोंडुऱ्याच्या दराऱ्याने दबलेल्या, भ्यालेल्या पण पूर्ण निःशंक नसलेल्या पर्शरामतात्यांच्या विशिष्ट व्यक्तिमत्वातूनच कथानक फुलत जाते. कोंडुऱ्याच्या वातावरणात वाढल्यामुळे त्यांच्या मनावर श्रद्धेचा प्रभाव असतोच, पण त्याचबरोबर विवेकाचीही एक प्रबळ प्रवृत्ती त्यांच्या ठिकाणी असते. आणि त्यामुळे या दोहोंचा झगडा अपरिहार्य होतो. परिणामतः मनाची अनिर्णित अवस्था, त्यातून होणारे धरसोडीचे वर्तन, पदोपदी आत्मवंचना व परवंचना आणि त्यामुळे होणारा मनस्ताप व आयुष्याची वाताहत हे सारे अटळ होते. याच्या जोडीस संतप्त, निराश व अनिर्णयाच्या अवस्थेत विशिष्ट भास होण्याचीही तात्यांची प्रकृती असल्याचे दिसते. अशा परिस्थितीत ते सापडले की त्यांच्या मनाला लागलेल्या गोष्टी त्यांच्या नकळत भासाच्या रूपात परावर्तित होऊन त्यांच्यापुढे येत असाव्यात असे वाटते. कथेच्या प्रारंभी त्यांना भेटणाऱ्या जोग्याच्या प्रसंगात त्यांच्या ह्या प्रकृतिवैशिष्ट्याची अंधुकशी कल्पना आपल्याला येते, आणि घंटानादाच्या प्रसंगात ती ठळकपणे जाणवते. ज्या जोग्यामुळे त्यांच्या जीवनात वादळ निर्माण होते तो जोगी त्यांना मनाच्या कोणत्या अवस्थेत व कोठे भेटला आणि त्याने तात्यांना काय सांगितले व काय दिले याचा बारकाईने विचार केल्यास त्यांच्या या प्रकृती-वर प्रकाश पडतो. तात्या मुंबईस जाण्यास निघतात ते भावाच्या रागावर. बायको वयात येण्यासाठी ते तडफडत असतात. पण ती वयात आल्यावर आठ - दहा दिवसातच त्यांच्या सुखाचा बोजवारा उडतो. कारण एका रात्री त्यांनी तिच्या खोलीत पाऊल ठेवले तोच वडील भाऊ विष्णु 'घर हालतंय गो, घर हालतंय' असे आपल्या बायकोला सांगत असल्याचे ते ऐकतात. भावाच्या 'पोटात असा जाळ उठलेला' पाहून त्यांना मोठाच धक्का बसून ते मागच्या मागेच फिरतात. 'वाढलास एरंडासारखा, आता काढा पोरं' या भावाच्या वाक्याने ते विलक्षण दुखावतात - त्यांची वासना त्यामुळे बधिरच होते. पोरांच्या उल्लेखाने तर ते जखमीच होतात. त्यांना वाटते,

भाऊ आपल्यावर असा डाफरतो पण त्याला 'पोरं व्हायची चुकलीत का? मीच ती आजपर्यंत अंगाखांद्यावर खेळवली ना?' त्यांचा भार घरादाराला झाला नाही आणि 'माझ्या पोरांचा मातर होणार यांच्या उरावर भार! ...... धंदेच नको ...... जाऊ मुंबईत ..... राहू कुठंतरी नोकरीचाकरीला. पैसे मिळाले की नेऊ हिलाही मुंबईला.' असे म्हणत ते घराबाहेर पडतात. पण आपल्याला कोणी अडवले नाही, एखादे पोरसुद्धा 'काका, नका हो जाऊ' म्हणाले नाही, म्हणून त्यांना वाईट वाटत असते. आपल्यामागे बायकोला वहिनी जाचेल ही धास्तीही वाटत असते. त्यांच्या मनात जशी ही आग पेटली होती तशीच आग बाहेरही पेटली होती. 'माळावर उन्हं पेट घ्यायला लागली होती. क्षितिजाकडे मृगजळांना लाटा फुटत होत्या. दूरवरची समुद्राची निळी धार सुरीसारखी चमक घेऊन उठत होती... तात्यांच्या गालावरून गळ्यापर्यंत घामाच्या धारा लागल्या होत्या कानावरची गर्जना एकाएकी वाढली.' याप्रमाणे अंतर्बाह्य होरपळलेल्या अवस्थेत तात्या जिवाला बडवीत अनवाणी चालत असताना त्या माळावर त्यांच्यासमोर 'सुक्या काष्टासारखा कसातरीच उंच व पांढरी स्वच्छ कफनी घातलेला एक जटाधारी जोगी' उभा राहतो व आपल्या अवघ्या तीन आदेशांनी तात्यांचे जीवन उलटेपालटे करून 'क्षितिजाकडे हलणाऱ्या मृगजळात एखाद्या लाटेसारखाच अंतर्धान' पावतो. यातील मृगजळाचा उल्लेख, माळावरील 'वडापिंपळाची बेवारशी भणंग पुरुषासारखी' अनेक झाडे, जोग्याचे रूप व त्याने तात्यांना हव्याशा असलेल्या व दंश करीत असलेल्या दोन्ही गोष्टी नेमक्या देणे या साऱ्या घटना फार बोलक्या आहेत. 'तू मांघारी जा. वाट ठरलेली आहे तुझी,' हा जोग्याचा पहिला आदेश– तात्यांना हवा असलेला. घरी जाण्यासाठी ते आतुर होतेच. नंतर जोग्याने तात्यांच्या हातावर ठेवलेली गर्भ पाडण्याची मुळी – विष्णुदादाने तात्यांना मुले होण्याच्या आधीच त्या मुलांबद्दल दाखविलेल्या तिरस्काराने एकूण निर्मितीबद्दलच– आपल्या व इतरांच्याही– तात्यांच्या मनात घृणा निर्माण केलेली असावी. 'ब्रह्मचर्य पाळ.' ही जोग्याची आज्ञाही अशीच. भावाच्या डाफरण्यामुळे तात्यांना वैवाहिक जीवनाचा वैताग आलेलाच होता. सारांश, तात्यांच्या मनातील सारी

वेदना त्या जोग्यात प्रक्षेपित (projected) झाली असावी असे वाटते. पण हा तर्क खरा असला, तात्यांच्या मनाचेच हे सारे खेळ असले तरी तात्यांच्या दृष्टीने ती सत्य परिस्थिती होती. श्रद्धा, अश्रद्धा व भास यामुळे जोग्याच्या रूपाने तात्यांच्या पुढे एक भले मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले होते. त्यामुळे जोग्याच्या खरेखोटेपणाचा पडताळा घेण्याचे ते ठरवितात. पण त्यासाठी ते जे जे प्रयत्न करतात त्यामुळे जोग्याचा तर उलगडा होत नाहीच पण भावकाई, घंटानाद ही रहस्ये मात्र त्याला येऊन बिलगतात; त्यातून तात्यांच्या अंगी 'महाराज' पणा चिकटवला जातो, कळत नकळत बुवाबाजी सुरू होते. त्यातच भर म्हणून पार्वतीबद्दलची आसक्ती येऊन मिसळते आणि तात्यांच्या अंतःकरणात हलकल्लोळ माजतो. जोग्याचा प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नांत तात्यांचेच उभे आयुष्य एक यक्षप्रश्न होऊन बसते ! तात्यांच्या जीवनातील हे कारुण्य खानोलकरांनी इतक्या जिव्हाळ्याने व इतक्या मनोहारी प्रतिमांतून रेखाटले आहे की तात्यांच्या आयुष्याचे मर्म कळण्यासाठी त्यांच्या चित्रणाचा सविस्तर विचार करणे व तोही शक्यतो खानोलकरांच्याच शब्दात, – अवश्य ठरावे.

'वाट ठरलेली आहे तुझी' या जोग्याच्या वाक्याने स्वतंत्रपणे आयुष्य उभारण्याची तात्यांची सारी उमेदच लुळी पडते. जोग्याने दिलेल्या मुळीकडे पाहून ते शहारतात. त्यांना वाटते, 'ही कसली पातकी मुळी ? ... हा होता तरी कोण ? ... आपलंच एखादं गतजन्मीचं पातक ? ... आपण हे घ्यायला नको होतं.' बाहेर दाही दिशा जळत असतात. अशा स्थितीत शेवटी व्हावयाचे तेच होते. कोंडुऱ्याला हात जोडून तात्या परत फिरतात. "माळावरच्या गुंतवळीतून ती तेवढी वाट अलगद सुटून एखाद्या वाहणे–सारखी तात्यांच्या अनवाणी पायात सरकली होती." अदृश्याच्या भीतीने तात्यांनी जरी मुंबईची वाट सोडली असली तरी घरी येताच दडपलेला त्यांचा विवेक पुन्हा डोके वर काढतो. त्यामुळे त्यांच्यापुढे अनेक प्रश्नांचे मोहोळ उठते. त्यांची तगमग वाढते. मग ते निश्चय करतात. 'आयुष्याची चूड पेटवून काळोखातल्या गोष्टी पाहायला हव्यात.' जोग्याच्या आज्ञेप्रमाणे ब्रह्मचर्याचे व्रत ते पाळतात व वेळ जाण्यासाठी घरामागे विहीर खणण्याचे

काम हाती घेतात. काम जोरात सुरू होते.. तेवढ्यात एक गडी कोणाला तरी "शिवाक कोंडऱ्यानं दर्शन दिलांहा. त्येण्याच शिवाक पाण्याचो कानमंत्र दिलांहा. खरांहा तां" असे सांगत असल्याचे तात्या ऐकतात व पुन्हा हबकतात. कारण विहिरीला पाणी लागल्यास मुळीही खरी ठरणार होती. म्हणून विहिरीचे काम ते बंद करतात, वर येण्यास आतुर असलेले पाणी अवघ्या दोन हातावर खोळंबून ठेवतात. आता शरीरकष्ट थांबवल्यामुळे त्याना रात्री सहजासहजी झोप येणे शक्य नव्हते. अशा स्थितीत घरात झोपल्यास ब्रह्मचर्याचे व्रत मोडण्याची भीती म्हणून ते अपरात्री खळ्यात येतात. तेव्हा त्यांना दिसते, 'खळ्यात गारेगार काळोख पसरला होता. समोरील माडांची बाग एकमेकांत गुंतून फाटलेल्या पडद्याप्रमाणे उभी आडवी दिसत होती. काळोखात वस्तूंचे आकारच विचित्र श्वापदासारखे झाले होते. कुणीतरी काळोखात प्रचंडपणे आपला काळा पंजा फिरवून उलाढाल करतोय, प्रत्येक वस्तूमागचा आपला हक्क, आपली सूत्रं, आपलं अस्तित्व खुंटा हलवून ठाम करतोय असं वाटत होतं. माडासारखा माड दिसत नव्हता ... सगळ्या माडाझाडांचे चेहरेच आपल्याला दिसताहेत, त्यावरून कुणाचा तरी गिधाडासारखा एक पंजा फिरतोय. तात्यांना वाटलं, हे रांडचं काय ? पूर्वी कधी हे दिसलं नाही.' तात्यांची अस्वस्थता शिगेस पोहोचते. ते विहिरीवर येतात तेव्हा तेथील मातीचा ढिगारा म्हणजे 'भलतंच काहीतरी आपल्याचं मनातल्या जडपणासारखं' त्यांना वाटलं. तेवीस हात खोल स्वतःच खणलेलं ते विवर – 'त्यातलं पाणी अवघ्या दोन हातांवरच थांबून बाहेर यायच्या कल्पनेतच कुजत राहाणार आहे,' या पापाच्या टोचणीने ते विलक्षण बेचैन होतात. हवालदील होतात व तेथेच बसून राहातात. अशा अस्वस्थ मनःस्थितीत असताना त्यांना नेमक्या त्याच अपरात्री खालच्या मठातून 'घणन् घणन्' असा घंटेचा आवाज ऐकू येतो. ते दचकतात. त्यांना वाटते, 'यावेळी घंटेचा आवाज कसा आला ? का ? कशासाठी ? की आपल्याला भास झाला ?' ते घाईघाईने मठात येतात. पण सभागृहातील घंटा किंचितही हलत नसलेल्या पाहून ते शून्य होतात. त्यांना मग प्रश्न पडतो, "आपली वाट आपल्याला मिळणार तरी कशी ? ... आपण जायचं कुठं ? ... आपण केवळ कुणातरी

अशाच अदृश्य शक्तीच्या हातातलं बाहुलं आहोत." ते ठरवतात, की ज्याला काहीतरी थोडा अदृश्य शक्तीचा स्पर्श झाला आहे त्या पुण्यवान शिवा धनगराला भेटायचे. उजाड़ता उजाडता ते घरी येतात व बागेकडे सहज नजर टाकतात तेव्हा "रात्रीचे ते तुटके फुटके, ढोरावासरांच्या सापळ्यासारखे आकार नाहीसे झाले होते. बाग प्रसन्नपणे उभी होती. जिकडे तिकडे पक्ष्यांच्या किलबिलाटाचं जाळं पसरलं होतं. झाडामाडांवरून त्यांच्या अंतरंगीचा ताजा गार जिव्हाळा दवाच्या रूपानं ठिबकत होता. पोफळीच्या शेंड्यावर हळदीची उन्हं फाकली होती, अदृश्य गिधाडांचा पंजा कुठल्याकुठं बेपत्ता झाला होता." या प्रसंगावरून खानोलकर हे स्पष्ट दाखवितात, की रात्री तात्याना बागेत दिसलेले सारे विचित्र आकार शुद्ध भास होते. ती काळोखाची मायानगरी होती. आणि मग आपल्या लक्षात येते की रात्री तात्यांना ऐकू आलेला घंटानाद हाही त्या विचित्र आकारांसारखा भासच असावा. खुद्द तात्यांनाही तशी शंका आली होती. तेव्हा अदृश्य शक्तीने धास्तावलेल्या व पापाच्या टोचणीने भ्यालेल्या त्यांच्या मनाचाच तो प्रक्षेप (projection) असावा असे वाटते. पुढे दररोज त्याच वेळेस तोच घंटानाद फक्त त्यानाच ऐकू येत राहतो. तेव्हा आपण पुण्यवान असल्याची तात्या समजूत करून घेऊ पाहतात. पण पार्वतीची अभिलाषा, तिला मुळीचे तीर्थ देणे, आणि शेवटी पत्नीवर बलात्कार करून ब्रह्मचर्याचे व्रत मोडणे, अशी एकाहून एक भयंकर पापे केल्यावरही तात्याना तो घंटानाद ऐकू येतोच, आणि त्यामुळे त्यांच्या मनाचाच तो खेळ असावा या आपल्या ग्रहास पुष्टी मिळते.

तात्यांचा योग असा की ते शिवा धनगराकडे जावयास निघतात, पण अर्धी घाटी चढून जाताच त्यांना एक काळीसावळी पण नाकीडोळी कोरीव अशी वेडी खुळीशी बाई दिसते. तात्याना पाहताच ती त्यांना म्हणते, 'माज्या आंगात देवी हां. कोंडुरो भेटलो माकां. त्येणा सांगितल्यान आता तू देवी असास, तुज्या आंगात देवी येतली ... माजां नाव? भावकाय देवी.' कोंडुऱ्याचे नाव ऐकताच तात्यांच्या अंगावर काटाच उभा राहतो. तरीही धीर करून ते तिला विचारतात, "पण ते खरं कशावरून?" ते ऐकताच ती म्हणते, "ह्यो – ह्यो नास्तिकपणा सोडून दी लेकरा! ... जा गावांक

सांग, देवीची पुजा बांदा... मी आता सगळ्याच गावची आवस, मी माता आसय तुमची- जा ! " "ती शांतपणे एक फार मोठी जबाबदारी एखाद्या वाड्याच्या तुळईसारखी तात्यांच्या खांद्यावर ठेवीत होती." त्यामुळे त्यांच्या डोक्यातील उलट सुलट विचारांचा गुंता वाढत होता, नव्हे त्यात अनेक निरगाठी पडत होत्या. त्यामुळे त्यांची विलक्षण घालमेल होत होती. भाव- कायीच्या देवळाच्या जीर्णोद्धारासाठी त्यांना गावातील धनाढ्य नारोबा जडयेकडे जावे लागते व त्यामुळे रहस्यात, प्रश्नांत आणखी भर पडते. नारोबा म्हणजे त्या गावची फार मोठी असामी. जेवढी धनाढ्य तेवढीच पापी. "जोगी भेटला त्या दिवसापासून तात्यांना एकेक प्रश्न जीवनमरणा- सारखा पडायचा आणि त्याचं उत्तर काही मिळायचं नाही... नारोबानं तरी अशी काय पर्वताएवढी तपश्चर्या केली म्हणून तो या गावाच्या उरावर मसणासारखा पसरून हवी ती पापं यथेच्छ करतोय ? खुद्द पुरुषभर उंचीची दगडाची देवीची मूर्ती या देवळात आहे आणि तरी सुद्धा हे देऊळ असं का ढासळतंय ? ... अनेक प्रश्न फणा उभारून तळपत होते. फक्त फूत्कार करीत होते, पण एकाचंही उत्तर तात्यांना सापडत नव्हतं वाळवंटातल्या पाय- वाटांसारखेच ते प्रश्न होते." अशा मनस्थितीत तात्या जडयेकडे जातात. काळ्या दगडाचा नारोबाचा तो भलाभक्कम वाडा, आरशासारखा स्वच्छ असलेला चौक, प्रसन्न बाग - "दुपारचं ऊनसुद्धा कसं गाळून घेऊन बागेत फक्त त्यातलं चांदणंच कुणीतरी पसरून" ठेवावं अशी. आणि त्या वाड्याच्या ऐपतीला शोभणारी कातीव, कोऱ्या अंगाची, लकाकत्या डोळ्यांची व मधुर हनुवटीची ती पार्वती. तिला पाहून तर तात्या स्तंभितच होतात. त्यांच्या अंतःकरणात मोठीच खळबळ माजते. तिचा देखणेपणा त्यांच्या मनात घर करून बसतो. ब्रह्मचर्याच्या व्रतामुळे वासनेची होत असलेली तडफड, त्यात या लावण्यवतीचे दर्शन व वासूसारख्या एका विझलेल्या विद्रूप माणसाचे तिच्यावरील स्वामित्व या सर्वांमुळे तिच्याबद्दलच्या आकर्षणाचे व सहानुभूतीचे अभिलाषेत रूपांतर होते. अज्ञात शक्तीच्या शोधापायी त्यांच्या जीवनात निर्माण झालेल्या समस्यांच्या जाळ्यात त्यांच्या चारित्र्याचा एक नाजूक पण चिवट धागा गुंफला जातो, आणि त्यामुळे तात्यांचे जीवन धारेला लागते.

पार्वतीच्या आसक्तीबरोबरच तात्या नाइलाजाने बुवाबाजीच्याही आहारी जातात. भावकाईण प्रथम त्यानाच भेटली. देवळाच्या जीर्णोद्धाराचे कामही त्यांच्याकडेच होतें. म्हणून लोकात त्यांचा दबदबा वाढत असतो. त्यात सुतारणीचा नवरा व जनार्दन भटजी भक्तांकडून मिळकत व्हावी म्हणून तात्यांच्या अंगी चमत्काराचे सामर्थ्य चिकटवीत असतात. भावकाइणीने प्रत्यक्ष मेलेल्या माणसाला जिवंत केल्याची अफवा उठवितात. तात्या मनात जळफळतात, पण लोकांच्या श्रद्धा त्यांना दुखवायच्या नसतात. त्या अज्ञानी लोकांना चार शब्द सुनवावेत असे त्यांना वाटते. पण अज्ञानी कोण हेच त्यांना कळत नसते. ‘त्या माणसांच्या एखाद्या जुन्या पुराण्या चिखलातेलानं बरबटून चिकट झालेल्या गोधडीसारख्या श्रद्धांनी त्यांचं मन विटून गेलं होतं.’ आपल्याला अकारण प्राप्त होत असलेला मोठेपणा झटकून टाकण्याचा ते प्रयत्न करतात. पण परिणाम नेमका उलटा होतो. ‘तात्यामहाराज की जय !’ हा गजर ऐकताच त्यांना मेल्याहून मेल्यासारखे होते. ते पुटपुटतात, ‘समाधि-पुरुषा, मी एक सामान्य पामर !’ पण या शब्दांनी लोकांची त्यांच्यावर अधिकच श्रद्धा बसते व ते तात्यांचा जोरात जयजयकार करतात. काय करावे ते तात्यांना समजत नाही व विवेकही स्वस्थ बसू नेत नाही. शेवटी ते लोकांना स्पष्ट शब्दात सांगतात, “कुठल्याही माणसाला देवीनं जिवंत केलेलं नाही.” पण लोक हटत नाहीत. उलट म्हणतात, ‘ही पाषाणातली देवी तुमच्या बरोबर परतक्ष बोलता !’ हे ऐकताच तात्या विलक्षण चिडतात. सुताराला रागारागाने विचारतात, “तू काय कंड्या पिकवल्या आहेस या ? ... थोबाडून काढीन. खरं सांग काय ते.” पण हे ऐकून लोक तात्यांचे आणखीनच कौतुक करू लागतात. लोक त्यांच्या अंगी चिकटवीत असलेले सामर्थ्य खोटे असल्याची तात्या देत असलेली प्रत्यक्ष ग्वाहीच त्यांच्या साधुत्वाचा भक्कम पुरावा ठरते व त्यांच्यावर ‘महाराज’ पणाचे शिक्कामोर्तब केले जाते. तात्या अतिशय व्याकूळ होतात. त्यांना वाटते, ‘आपल्याला हवा भरून फुगवलं जात आहे. यातून सुटायचं तरी कसं ?’ ते नकळतच महाराज बनून गेले होते. भजने झडत होती. तेव्हा ते ठरवतात की आपण हे गावच सोडायचे पण त्यांना ‘कुठंतरी सूक्ष्मपणं बरंही वाटत होतं.’ त्यामुळे आतापर्यंत परवंचना केल्याबद्दल सुतारावर मनापासून

चिडणारे तात्या अनायासे मिळणाऱ्या मानसन्मानाच्या मानवसुलभ मोहाने आता नकळत आत्मवंचना करू लागतात. "गाव सोडून सुद्धा आपल्याला त्याचा काही फायदा होईल का ? ... भेटलेला जोगी सांगून गेलाय, 'तुझी वाट ठरलेली आहे.' हीच वाट ? जोग्यानं दिलेली ती मुळी उपयोगात आणल्याशिवाय यातनं मार्ग सापडायचा नाही. वासूचं बीज त्याच्या बायकोच्या गर्भाशयातून नष्ट करायचं." पण लगेच त्यांना वाटते, 'वासूनं काय केलं आपलं ? ' या प्रश्नाने ते भुईसपाट होतात. घरी येताच घरची माणसेही त्यांना हात जोडतात. "अरे मी तात्याच आहे. पामर एक पामर ! " असे ते कळकळीने सांगतात. तेव्हा ती अधिकच नम्र होतात "सगळीजणं त्यांना मखरात ढकलू पाहात होती." तेव्हा शेवटी हतबुद्ध होऊन ते ठरवतात– आता फक्त "जे जे होईल ते ते पाहाणे." त्यांच्या कीर्तीची कमान चढत असते. मुखी 'जगदंब ! जगदंब ! ' हे शब्द, अंगावर कफनी, हातात रुद्राक्षाची माळ. ही सारी सोंगे मग तात्या खुशीने करतात. भोवती भक्तांचा गराडा व तात्यांच्या जयजयकाराच्या आरोळ्या उठत असतात. पार्वतीला दिवस गेले म्हणून एक दिवस सासू तिला देवीच्या दर्शनास आणते, तेव्हा ती तात्यांना दुरूनच नमस्कार करते. तिच्या स्पर्शासाठी हपापलेल्या तात्यांना फार राग येतो. ते मनात म्हणतात, "एका विद्रूप, बेढप कुरूप पुरुषाला नवरा म्हणून पत्करणारी ही पोर एका सत्पुरुषाच्या पायाला स्पर्श करायला संकोच करते. उद्धट. श्रीमंतीचा माज आलाय होय तुला ? " "तिनं जणू काय त्यांचं माहात्म्य लाथाडलं होतं." वासूच्या भाग्याचा त्यांना वाटणारा हेवा सतत वाढतच असतो. एकदा ते वाड्यावर येतात तेव्हा सोहोनी मास्तर त्यांचा महाराजपणाचा फुगा फोडण्यासाठी त्यांना खूप छेडतात. पण मास्तरांच्या प्रश्नांची उत्तरे देणे कठीण असल्याचे लक्षात येऊन तात्या शांत राहतात. तेव्हा बुवाबाजीस भीक न घालणारे चिकित्सक सोहोनीही चरकतात व "कदाचित हा " माणूस सत्पुरुषही असावा अशी शंका त्यांच्या मनाला चाटून जाते. मास्तर व नारोबा यांच्या बोलण्यातून पार्वती पूर्ण पवित्र असल्याचे कळताच तात्यांच्या एका स्वप्नावरून बोळा फिरवला जातो. 'ती पवित्र असल्याचे पुरावे प्रत्येक वेळी मिळत होते. या राक्षसाच्या वाड्यातही ती स्वतःचं,

आपल्या नवऱ्याचं रक्षण करीत होती.' तात्यांना वाटते, 'प्रत्यक्ष नारोबा सारख्यांना जी दुःसाध्य राहिली, ती आपल्याला कशी काय?' या विचाराने तात्या चिडतात. पार्वतीने केलेल्या पराभवाने नारोबाही संतप्त झालेले असतात. तिच्या भावी अपत्याला त्यांना इस्टेटीचा वारस होऊ द्यावयाचे नसते. म्हणून ते तात्यांच्या पायांशी लोळण घेतात. तेव्हा तात्या 'पार्वतीनं ओरबाडून काढलेली बुवाबाजी पुन्हा प्राप्त झाली' म्हणून विलक्षण सुखावतात व मूर्तिमंत पाप अशा नारोबाशी अर्ध्या मिळकतीच्या मोबदल्यात मुळीचे तीर्थ देऊन पार्वतीचा गर्भपात करण्याचा सौदा करतात. वास्तविक स्वतः नारोबानेच आपण सुतारणीला भ्रष्ट केल्याची कबुली तात्यांना दिलेली असते. शिवाय त्यांची एकाहून एक भयंकर अशी पापे त्यांना माहीत असतात. 'नारोबांनी भावाच्या बायकोशी अतिप्रसंग केला, आणि तिला त्या क्षणापासून वेड लागलं. त्यांचा भाऊ त्यांच्या तोंडावर थुंकला... आणि बायकोची खंत घेऊन वारला होता.' पुतण्या वासू हा इस्टेटीचा वारस होऊ नये म्हणून नारोबांनी त्याला 'पद्धतशीरपणे वेडाबागडा बनविला होता. त्याला शिक्षण दिलं नव्हतं. नीट खाऊ-जेवू घातलं नव्हतं. तासन्तास पाण्यात भिजत ठेवलं होतं, रानात एकटं एकटं सोडून त्याला घाबरवलं होतं ..एवढ्याशा चुकीसाठी ... भयाण फोडून काढलं होतं. त्याच्या खांद्यावर नारळांनी भरलेलं पोतं देऊन त्याला वर खाली जिन्यावरून चढउतार करायला लावला होता तासन्तास.' त्याची बुद्धी ठेचली होती. पण पार्वतीबद्दलच्या आपल्या तीव्र अभिलाषेला कात्री लागलेली पाहून तात्या सूडाने पेटतात व नीच नारोबाचे साथीदार होतात. नंतर मात्र त्यांच्या मनाला या पापाची फार बोचणी लागते. ते कमालीचे व्याकूळ होतात. पण पुन्हा आत्मवंचना करून घेतात. 'पार्वतीचा गर्भ जिरवायचा, वासूवर, पार्वतीवर सूड उगवायचा, अर्ध्या इस्टेटीचे मालक व्हायचं, सगळी सुखं यथेच्छ भोगायची ... राजयोग्यांचं असंच असतं... हे पाप होणार असलं तर घंटा ऐकायला येणार नाही ... पूर्वजन्मात मीच या मिळकतीचा मालक असेन. पार्वती माझीच होती, असेल. पापाचा अर्थच कळत नाही मला. स्वतः देवीवर बलात्कार करणारा नारोबा पापी नव्हे? ...प्रत्यक्ष कोंडुऱ्यानं जिला भेट दिली त्या सुतारणीवर ...कोंडुरा तरी गप्प

कसा बसला ? ' पण त्या रात्रीही तात्यांना घंटानाद ऐकू येतो तेव्हा आपण पुण्यवान असल्याची त्यांना खात्री वाटते. त्याच वेळेस काष्ठवत् झालेली सुतारीण त्यांच्याकडे येते व हुंदके देत त्यांना सांगते, ' मी सुतारीण. सुतारीणच रवलंय आतां मियां. देवी गेली या कुडीवरची. कूड भरस्ट जाली ... नारग्या जड्यानं. मेल्यान डोंगरातच पकडल्यान माकां. काजीआड नेऊन विटंबना केल्यान माजी. आणि रात जाली तसो आपल्या वाड्यांवर घेऊन गेलो ... रानातल्यानं भटकत आसतंय. कोणाक तोंड दाखवू ? ' तात्यांचे काळीज चिरले जाते. ते तिला मनापासून सांगतात, ' भिऊ नको, तू गावात ये ... पवित्र आहेस तू. ' त्यांचा विवेक तिला जगण्याची हिंमत देऊ पाहतो. पण सुतारणीची श्रद्धा व पापाची टोचणी जीवन स्वीकारू शकत नाही. ती म्हणते, ' मी पापी आसंय ... माज्यार देवी असताना मी भ्रष्ट जालंय. देवीचो कोप जालोहा माज्यार. पण म्हाराजानू, माज्या लेकरां-बाळांवर कृपादिस्टी ठेवा ...जातंय. आता कोंडुऱ्याकच ही कूड मेळतली. ' नारोबापासून आपले रक्षण करण्यास देवी असमर्थ का ठरवी हा प्रश्न त्या भोळयाभाबड्या, श्रद्धाळू जीवाला ओझरताही चाटून जात नाही, ती स्वतः-लाच दोषी ठरवते व आत्मनाश करते. तात्यांना वाईट वाटते. ' पण त्यांच्या स्वार्थी वृत्तीला कसल्या तरी संकटातून मुक्त झाल्यासारखेही वाटते. ' कारण भावकायी गेल्यामुळे त्यांचे महत्त्व आता अधिकच वाढणार होते. ते पुन्हा बुवाबाजीत गुरफटतात. त्यांच्या संवेदना निबर होतात. एक दिवस 'सुतारणीचे मूल दुधावाचून आक्रोश करीत मेले ' असे सुतार त्यांना सांगतो, पण ते हळहळत नाहीत. 'सगळेच तुम्ही मरणार आहात. म्हणून सांगतो, ईश्वराचा नामघोष करा ' असे सुताराला सांगून भक्तमंडळीत अधिकाधिक प्रिय होण्याची धडपड करतात. एका विधवा बाईस तिच्या दीराने मारहाण करून लुबाडून घराबाहेर घालवून दिले तेव्हा तात्यांकडे येऊन ओक्साबोक्शी रडत ती त्यांचे पाय धरते. पण तात्या मख्ख राहून वर निर्लज्जपणे तिला म्हणतात, ' या देहाला कुणी मारलं काय अथवा थोपटलं काय ... देह काय, आज दिसत आहे, उद्या ... तुला तुझ्या दीरानं लुबाडलं म्हणतेस; पण मला त्या ईश्वरानं लुबाडलं त्याचं काय ? ही बघ माझी कफनी तेवढी माझ्या अंगावर राहिलीय आता ' भक्तजन ' वा वा ' म्हणतात. तात्या

' जगन्माते ऽऽ ' अशी आरोळी देत नाचू लागतात. भक्तही त्यांच्याबरोबर धुंदपणे नाचतात. ढोंग चांगले वठले जाते.

• पार्वतीला मुळीचे तीर्थ देण्यासाठी तात्या वाड्यावर येतात. तेव्हा त्या पापी कृत्याच्या कल्पनेने ते गांगरतात. 'पण त्या घंटेचा ' नाद ' तात्यांना अजूनही साथीला होता. अनादिअनंतातून एखाद्या दिव्य विहंगासारखा त्यांच्याकडे पंख पसरून येत होता. ' म्हणून त्यांना धीर येतो बुवाबाजीत ते तरबेज होत चाललेच होते. म्हणून प्रथम पतिनिष्ठ पार्वतीला ते तिच्या पतीचे भविष्य सांगतात, की 'त्याला आयुष्य भरपूर आहे; डोळे जाणार होते म्हणून मी याच्या डोळ्यांना तीर्थ लावले.' वासूच्या चिंतेने व्याकूळ झालेली ती साध्वी तात्यांच्या या ढोंगाने फसते. तिच्यावरील विवेकाचा पहारा उठतो व ती तीर्थासाठी हात पुढे करते. तिच्या पोटात तीर्थ उतरत होते आणि तात्यांच्या कंठावरून मात्र घामाच्या धारा वाहात होत्या. आपल्या कफनीला आग लागल्यासारखे त्यांना वाटते. विलक्षण अस्वस्थ मनःस्थितीत ते घरी येतात. अनेक तऱ्हांनी समर्थन करूनही तीर्थ देण्याचे कृत्य त्यांना महत्पाप वाटत होते. तो जोगी शाप देत आहे असे वाटत होते. शेवटी पश्चात्तापाने पोळत असलेले त्यांचे विव्हळ अंतःकरण, पार्वती अप्राप्यच राहिली म्हणून सूडाने पेटलेली अतृप्ती व वासूबद्दलचा अंगार ओकणारा द्वेष यांचा काला होऊन त्यांच्या पापावर कळस चढतो. व्रती पत्नीवर ते बलात्कार करतात; तिच्याद्वारे पार्वतीचा भोग घेण्याची आपली राक्षसी इच्छा तृप्त करून घेतात. त्यानंतर मात्र हे सारे अक्षम्य वाटून पापक्षालनार्थ स्वतःच खोदलेल्या विवरात आत्मनाश करण्याचा ते निश्चय करतात. पण त्याच वेळेस घंटानाद पुन्हा त्यांच्या मदतीस येतो. ते बधिर होतात. त्यांना वाटते, ' हा अनादिअनंतातून येणारा नाद असाच सुरू राहाणार आहे? याचा शोध घ्यायला हवाय रांडेचा! पाप आणि पुण्य म्हणजे तरी काय? आपल्याच डोक्यातला मणी शोधायला हवाय. ' त्यासाठी गावापासून शेकडो मैल लांब जाण्यासाठी ते घर सोडतात— ' आपलीच शक्ती शोधण्यासाठी. '

यातील ' आपलीच शक्ती ' हे शब्द फार बोलके आहेत. शेकडो नव्हे, हजारो मैल जरी तात्या भटकले असते. तरी घंटानादाचा अर्थ त्यांना

लागणार नव्हता. त्यांच्या मनाच्या प्रक्षेपणाचा शोध बाहेर कोठे लागणे कसे शक्य होते ? त्यांची अवस्था कस्तुरी-मृगासारखी होणे अटळ होते, असे त्या शब्दांतून जाणवत राहाते.

तात्यांनी दिलेले तीर्थ घेतल्यावर पार्वतीचा गर्भ पडला की नाही यासंबंधी खानोलकरांनी मौन पाळले आहे. पण जोग्याने देवी बनविलेल्या सुतारणीची विटंबना त्याच जोग्याने दिलेल्या मुळीचे वैयर्थ्य पटविण्यास पुरेशी ठरावी.

तात्यांच्या तुलनेत अनसूयेची दुर्दशा अधिक शोचनीय वाटते. एका गरीब भिक्षुकाची ही मुलगी. वयाच्या दहाव्या वर्षी सासरी येते. पती आपल्याकडे लालबुंद डोळे करून का पहातो हेच तिला कळत नसते. आणि जेव्हा कळते तेव्हा आठ-दहा रात्री सोडल्या तर 'पुढच्या सर्व रात्री पतीनेच तिच्यासाठी वाळवंटासारख्या कोरड्या करून पसरून ठेविल्या होत्या.' प्रथम प्रथम बिचारी रात्र रात्र भिंतीला पाठ टेकून पतीची प्रतीक्षा करीत मूकपणे वेदना सोशीत बसते. अतिशय शालीन, संकोची व सहनशील असल्यामुळे आपल्या व्यथेस यत्किंचितही बाहेर डोकावू देत नाही. या संदर्भात लक्ष्मीचा बेफामपणा आठवला की हिचे व्यक्तिमत्त्व विशेषच डोळ्यात भरते. पुढे जेव्हा तिला कळते की खुद्द कोंडुऱ्याचीच पतीला तशी आज्ञा आहे तेव्हा तिची इच्छाच पार आटून जाते. पतीला लाभलेले हे दैवी देणे आपल्यामुळे नासू नये म्हणून अनेक व्रतवैकल्ये व उपासतापास करून ती शरीर काष्ठवत् करते. सर्वांनी तिला सांगितलेले असते, 'तू सत्पुरुषाची बायको आहेस, तुझं नशीब थोर आहे. आपोआप तुला वैराग्य आलं आहे.' जेव्हा जेव्हा तात्यांचा तोल जाऊ पहातो तेव्हा तेव्हा अतिशय सावधपणाने व चपळाईने ती त्यांना व्रतभंगापासून वाचविते. पण संस्काराने स्वतःलाच दोष देते. "त्याच्या तपश्चर्येत आपण एखाद्या अटळ मोहासारख्या आडव्या आलोत असं वाटून तिचं मन कातरून जातं." ती स्वतःवरच आणखी कडक पहारा ठेवते, पण शेवटी व्हायचे ते चुकत नाही. कारण प्रश्न तिच्या संयमाचा मुळी नसतोच. पार्वतीचा लाभ न झाल्यामुळे अपमानित व उत्तेजित झालेले

तात्या ती नको नको म्हणत असता "तू धर्मपत्नी आहेस माझी" असे म्हणून तिच्या मनगटाभोवती आपला 'पंजा आवळतात' व समईवर 'फूत्कारासारखी फुंकर' घालून तिला मांडीवर खेचतात. "मी खरंच खरंच पापी आहे... मीच चांडाळीण" असे म्हणत हुंदके देत, देहातील सगळी शक्ती गोळा करून ती तात्यांचे हात निऱ्यांवरून दूर ढकलते; अंगावरची वस्त्रे त्वचेसारखी घट्ट पकडून ठेवते. पण वासनापिसाट पुरुषी शक्तीपुढे तिची ताकद क्षीण ठरते, व 'अखेर दुबळ्या देहातल्या हाडाहाडांतून तात्यांच्या वासनेची ठिणगी फुटून जाते' तात्या तिला दूर ढकलून देतात. हुंदके देत ती विवराशी येते. 'समाधिपुरुषा ! माफ कर. मी चांडाळीण–' असे म्हणत आपला देह झर्‌कन् विहिरीत झोकून देते ! आपल्यासारख्या पवित्र स्त्रीवर बलात्कार करणारा पतो हा कसला महाराज ? अशी शंका तिला स्पर्शूनही जात नाही. कारण तात्यांना प्रत्यक्ष कोंडुऱ्याने दर्शन दिले होते. शिवाय गावकऱ्यांनी तिला वेगवेगळ्या तऱ्हांनी बजावून सांगितले होते. 'बाई गो,.. अनेक पापांची मोळी आहेस तू. महंतांच्या तपश्चर्येच्या आड येऊन गंगा गढूळ करू नकोस ! बाई महंतांना महान शाप असतो. तू त्याला चकवशील तर नरकात पडशील.' म्हणून ती ठरवते : "यापुढं हा देह ठेवायचा नाही. महंताला त्याचा महंतपणा टिकवता आला पाहिजे."

या कादंबरीतील सर्व पात्रांच्या विरोधलयींत असलेली पार्वती ही सर्वात लक्षणीय व्यक्तिरेखा. आपल्या आगळ्या वैशिष्ट्याने मराठी कादंबरी-विश्वातही मानाचे स्थान मिळविणारी, सर्वगुणसंपन्न, तरीही मानवी वाटणारी. जेवढी देखणी तेवढीच कर्तृत्वसंपन्न. हिचे वर्णन करताना खानोलकरांची शैली –

कां कमळावरी भंवर । पाये ठेविति हळुवार ।
कुचबैल केसर । इया शंका ॥

अशी कमालीची हळुवार झाली आहे.

पार्वतीच्या सौंदर्याने मन मोहरून जाते. लक्ष्मी, उमा, हसनची पत्नी या रूपगर्वितांच्या सौंदर्याचा दिमाख वेगळा व शालीन पार्वतीच्या लावण्याची

प्रसन्नता वेगळी. ‘ गोऱ्या झळझळीत कांतीची ’ व अत्यंत तेजस्वी डोळ्यांची वीस एकवीस वर्षांची ही नववधू. हिचा अंबाडा तरी कसा, तर ‘ विपुल केशभारांचा व अबोलीच्या वेणीने भलतीच प्रौढी मिरवणारा. ’ ‘ पावले गोरीपान व कशी कमळासारखी. ’ ‘ प्रत्येक हालचाल भरजरीची. ’ ‘ पाहाणाराच्या डोळ्यांत विजेची कांडी फिरावी अशी. ’ अशा या लावण्यवतीचे दैव वासूसारख्या विद्रूप माणसाशी बांधले गेलेले पाहून तात्यांना वाटते, ‘ त्या कोवळ्या देखण्या पोरीच्या अंगावर वासूची एक ओंगळ सावली पडली आहे ... एवढं सुंदर आयुष्य शेवाळासारखं एका कूपात सडत राहणार का? कुणाला सांगेल ती आपलं दुःख ? ’ पण पार्वती मुळी कपाळाला हात लावून रडत बसणारी स्त्री नव्हतीच. शिवाय तिला माहीत होते की खुद्द वासूच्या चुलत्यानेच त्याला पोरके करून व त्याचे हालहाल करून त्याचे माकड बनविले होते. म्हणून आपल्या असीम प्रेमाची पाखर त्याच्यावर घालून त्याला माणसात आणण्यासाठी ती प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असते. कोंडुऱ्यावर सर्व भार टाकून बसलेल्या व्यक्तींचा भोवती गराडा आणि श्रद्धेने पूर्ण कोंदाटलेले वातावरण असूनही स्वतःच्या हिमतीवर आपले कोलमडू पाहणारे जीवन ती सावरते. कोंडुऱ्याला साकडे घालून स्वस्थ बसणे तिच्या विवेकी मनाला पटणारे नव्हते. कादंबरीत ती प्रथम दिसते ती वासूची काळजी घेण्याच्या पवित्र्यातच. वासू तात्यांसाठी कळशामागून कळशा ओढीत असताना, ‘ आता पुरे ! ’ एक अत्यंत कोमल आज्ञा वासूच्या दिशेने येते व पाठोपाठ तात्यांना उद्देशून अधिकाराची वाणी येते, ‘ माणूस राबणारा असला की दुसरी परकी माणसंसुद्धा हवं तसं राबवून घेतात. बाई बाई बाई ! गडी का आहेत ते ! ’ या तिच्या बोलण्यातून ‘ तात्यांना वाड्याच्या एका वेगळ्याच सूक्ष्म नाडीचा पत्ता लागत होता. ’ वासूला ती ‘ अहो जाहो ’ करते तेही मोठ्या मंजुळ आवाजात. पण सासरा जेव्हा वासूला ‘ चामडं सोलून काढीन ’ असे म्हणतो तेव्हा ज्वाळेसारखी भडकून ती धारदार आवाजात त्यांना सुनावते, “ ते काही कुणाचे नोकर नाहीत. त्याना वारसदार करू नका पण माणूस म्हणून त्यांना जगू द्याल की नाही ? पूर्वी झाले ते झाले. पण आता नाही चालू देणार. ” वासूला

अंतर्बाह्य बदलण्याची ती शिकस्त करते. त्याला मास्तरांची शिकवणी लावते. स्वतः अहोरात्र शिकवीत असतेच. त्याचा वेष व हालचाली पालटते. मलमलचे कपडे, हिऱ्याच्या अंगठ्या अशा थाटात त्याला ठेवते. वीरासन घालून बसण्याची सवय लावते. त्याला नोकरांना हुकूम करण्यास सांगून त्याचा न्यूनगंड दूर करू पाहाते, आणि कोणी त्याच्यावर अन्याय करू नये म्हणून सावलीसारखी त्याच्या मागे उभी राहते. हे सर्व प्रयत्न केल्यानंतर शेवटचा उपाय म्हणून ज्या तात्यामहाराजांच्या पायाला स्पर्श करण्याचे तिने नाकारले होते, त्यांनाही ती विनवते, 'महाराज, आमच्यावर कृपा असू दे. आजवर इकडून खूप छळ सहन केला आहे. यांना – यांच्यावर आपली कृपादृष्टी ठेवा. यांना तसं ... तसं सगळं समजतं. पण आपल्या सारख्यांच्या आशीर्वादानं ... ... ' तात्यांना वाटते, " प्रत्येक शब्द अंतःकरणातून निघालेला ... ... आपल्या आयुष्याचं तुळशीपत्र तिनं वासूच्या वेड्या-भोळ्या नावानं वाहिलं आहे. " तात्यांची आपल्यावर खिळलेली पापी नजर व वासूबद्दलचा तिटकारा ती क्षणार्धात ओळखते व त्यांना स्वच्छ शब्दात सांगते, " आपण चला. मामंजी वाट पाहात असतील. " तात्यांना जाणवते की गेल्या कित्येक दिवसांचा आपल्या अंगावर झगमगलेला महाराज तिने धुळीसारखा झाडून टाकला आहे. सारा वाडा ज्याला चळचळ कापत होता व पूर्ण गावाला ज्याची दहशत वाटत होती त्या कर्दनकाळ सासऱ्यापासूनही ती आपल्या तळपत्या व्यक्तिमत्त्वाने स्वतःचे रक्षण तर करतेच पण ह्या नराधमाने तिच्या पतीची ठेचलेली बुद्धी व पिचवलेले शरीर पुन्हा पूर्ववत् करण्यासाठी जिवाचे रान करते. तिचे कष्ट फलद्रूप होतात तिची कूस भरली जाते. नारोबा सर्व बाजूंनी पराभूत होतात. तेव्हा शेवटची धडपड म्हणून तो गर्भ आपला आहे असे लोकांना पटवून आपले पौरुष सिद्ध करू पाहतात. चिकित्सक निर्भीड सोहोनी मास्तर " ती फार फार पवित्र आहे " असे म्हणतात. तेव्हा नारोबा त्यांना एक ओंगळ प्रश्न करतात, " मग तिनं लग्न कसं केलं वासूशी ? " त्यावर " तिचा बापच तसा निघाला त्याला ती तरी काय करणार ? आपल्या समाजात बाई माणसाला काय किंमत आहे ? नऊ नऊ वर्षांच्या मुली इथं स्मशानात पुरल्यासारख्या दुसऱ्यांच्या घरी दिल्या जातात " असे ताडकन् उत्तर देऊन मास्तर नारोबाची अखेरची धडपड केविलवाणी

करतात. 'कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं' असे नारोबा पूर्ण कोलमडतात. पार्वतीच्या खंबीर पतिनिष्ठेने तात्यांच्या वासनेचीही पूर्ण वासलात लावलेली असते. त्यामुळे सूडाने पेटून ते दोघे पार्वतीचा गर्भपात करण्याचा कट रचतात. अतिशय खंबीर, चाणाक्ष व सावध अशी पार्वती पतीवरील अगाध प्रेमापोटी तात्यांच्या ढोंगास शेवटी दुर्दैवाने बळी पडते व तीर्थासाठी हात पुढे करते.

अवघ्या पाच पात्रांच्या प्रकृतीवैशिष्टयांवर खानोलकरांनी ही कलाकृती तोलून धरली आहे. या पात्रांच्या अदृश्य शक्तीवरील कमी अधिक श्रद्धांतून कादंबरीचा आकृतिबंध तयार होतो. या शक्तीच्या शोधाच्या प्रयत्नांतून व त्याच्या क्रिया प्रतिक्रियांतून कादंबरीचा आशय समृद्ध होत जातो. सुतारीण व अनसूया या दोघी श्रद्धेचे टोक गाठतात. त्यापायी प्राणाचे मोल देतात. याच्या उलट वाटेल ती पापे करून मिळविलेली सुखे एकीकडे यथेच्छ भोगीत, दुसरीकडे देवाला खरोखरी भिणारे नारोबा रोज पहाटे न चुकता रुद्राची आवर्तने म्हणत देवावर अभिषेक करतात. त्यांच्या ऐश्वर्याला धक्का लागत नाही. या दोन तऱ्हांच्या मध्यावर तात्या उभे असतात. त्यांची अवस्था त्रिशंकूसारखी होते. या सर्वांच्या विरोधात उभी असलेली, स्वतःच्या प्रयत्नाने जीवन सफल करू पाहणारी पार्वती पतिप्रेमापायी क्षणभर श्रद्धेच्या आहारी जाते, व गर्भनाशाचा धोका नकळत आपल्यावर ओढवून घेते. अदृश्य शक्तीवरील विविध श्रद्धांची ही फलिते तात्यांप्रमाणे आपल्या समोरही अनेक शंका उपस्थित करतात. सुतारीण व अनसूया या दोन निष्पाप व निःस्वार्थी जीवांचा सर्वनाश कोंडुरा उघड्या डोळ्यांनी पाहू शकतो म्हणून तो दोषी, की निर्जीव अशा कोंडुऱ्याला सर्व शक्तीमान समजून त्यावर पूर्ण श्रद्धा ठेवणाऱ्या या दोघी दोषी ? अति क्रूर, स्वार्थी, लंपट व पापी असूनही नारोबा देवाची पूजा करायला कसा धजावतो ? देवही त्याची पूजा कशी स्वीकारतो ? नारोबा इतक्या ऐश्वर्यात कसा राहू शकतो ? का देव, पापपुण्य, या साऱ्या निव्वळ कल्पनाच ? अदृश्य शक्तीचे वैयर्थ्य जाणवून देणारे हे प्रश्न खानोलकरांनी इतक्या कलात्मक पद्धतीने सुचविले आहेत की ते असे वेगळे काढणे म्हणजे कलाकृतीस घायाळ करणेच ठरावे. हाच या कादंबरीच्या मोठेपणाचा पुरावा !

# ५. 'त्रिशंकू' : विवेक माझा सांगाती

'कोंडुरा' कडून 'त्रिशंकू' कडे वळल्यावर एक निराळाच देखावा दिसतो. 'कोंडुरा' प्रमाणे येथील वातावरण अज्ञात शक्तीने, चमत्काराने किंवा अद्‌भुततेने भारलेले नाही; ते पूर्ण लौकिक आहे. हिच्यातील नायक एक आगळे सामर्थ्य व वेगळ्या समस्या घेऊन आपणांसमोर येतो. एक सामान्य व्यक्ती आपल्यावर ओढवलेल्या संकटांना तोंड देत असता असामान्यत्वाकडे कशी वाटचाल करते व हा विकास केवळ विवेकशक्तीच्या बळावरच कसा साधते याचे दर्शन या कादंबरीत प्रामुख्याने घडते. या कादंबरीचे आणखीही काही लक्षणीय विशेष आहेत. मराठी अस्तित्ववादी कादंबऱ्यांत हिचा क्रमांक बराच वरचा लावला जातो. हिच्यातील काही पात्रे व प्रश्न खानोलकरांच्या मनात इतकी घर करून बसली आहेत की त्यांचे पुनर्दर्शन त्यांच्या पुढील काही कलाकृतीत आपल्याला घडते. स्त्रीदुःखाच्या विविध परी यात चित्रित झाल्या आहेत; त्या दुःखाचे मूळ खानोलकर येथे शोधीत आहेत; त्यातून मानवी अस्तित्वाच्या अर्थाचा वेध घेत आहेत; हा वेध घेताना लोकमानसात अति पवित्र म्हणून दृढमूल झालेल्या देव, धर्म, आई, वडील, घर, शील, देश, इत्यादी मूल्यांची तळस्पर्शी चिकित्सा करून त्यांचे वैयर्थ्य ते जाणवून देत आहेत.

कादंबरीचा नायक नानू याच्या व्यथेतून कथेतील भावाशय उमलत

जातो. त्याच्या भावविश्वाचा विलक्षण गुंता हाच या कलाकृतीचा आकार. त्याच्या प्रेमळ व उमद्या जीवनात इवल्याशा वाऱ्याने कंपित होणारी व हळुवार श्वासानेही कोळपणारी सुशी आणि शकू ही दोन रम्य सूर्यफुले येतात. त्याच्या आयुष्यात प्रचंड वादळ निर्माण करून त्याला सैरभैर करतात व शेवटी स्वत:ही मिटून जातात. सुशीच्या सौंदर्याने नानू काही काळ धुंद फुंद होतो, तीही फुलते. पण त्यामुळेच तिला नष्टही व्हावे लागते. तिला दिवस गेल्याचे कळल्यावर नानू तिच्याशी लग्न करण्यास तयार होतो पण सुशी भाविणीची मुलगी असल्यामुळे समाज तिला ते सुस्थिर, प्रतिष्ठित जीवन जगू देण्यास कडवा विरोध करतो. आई पासून तो सारा गाव नानूवर तुटून पडतो. तरीही तो आपल्या निश्चयापासून रेसभरही ढळत नाही. पण ब्राह्मणांनीच त्रिशकूसारखी लोंबणारी ही अधांतरी जात निर्माण केली म्हणून त्या जातीवर विलक्षण चिडलेला व चवताळलेला सुशीचा मामा त्याचे लग्न होऊ न देण्याचा चंग बांधतो, ब्राह्मणाचे बोज पाडून टाकण्यासाठी सुशीचा गर्भपात करतो, आणि दुर्दैवाने त्यात तिचा भयानक अंत होतो. शकूचा तर अगदी बाळपणापासून नानूवर विलक्षण जीव असतो. त्याच्या भोवती आपल्या प्रेमाचे कवच घालण्याचे अनेक प्रयत्नही ती सतत करीत असते. पण नानूच्या प्रथम ते लक्षातच येत नाही, व पुढे जेव्हा ते येते तेव्हा वेळ निघून गेलेली असते, कारण सुशीच्या जबाबदारीने तो त्यावेळी पूर्ण बांधला गेलेला असतो. त्यामुळे शकूला आयुष्यभर त्याच्या आठवणीवरच झुरत बसावे लागते. सुशीच्या दारुण मृत्यूने नानूच्या नशीबीही जीवन्मृताचेच आयुष्य येते. पण अशा स्थितीतही त्याच्या संबंधात आलेल्या निरागस तरुणींची कोलमडू पाहाणारी जीवने तो सावरतो, त्यांना सुस्थिर झालेल्या पाहिल्यानंतर मात्र तो अस्तित्वशून्य होऊन जातो. हा या कादंबरीचा थोडक्यात भावार्थ.

ही कादंबरी अस्तित्ववादी मानली जात असल्यामुळे प्रथम त्या-संबंधी थोडा विचार करणे उचित ठरावे. यासंबंधात प्रथम एक महत्त्वाची गोष्ट जाणवते ती म्हणजे पाश्चात्त्य अस्तित्ववादी तत्त्वज्ञ व साहित्यिक यांच्या लिखाणांच्या वाचनातून खानोलकरांच्या कलाकृती निर्माण झालेल्या

नाहीत तर त्यांच्या अनुभूतीतून त्या स्फुरलेल्या आहेत. खास मराठी मातीशी आपले नाते सांगणाऱ्या त्या आहेत. अस्तित्ववादी म्हणून सर्वांत गाजलेली त्यांची कलाकृती 'एक शून्य बाजीराव' ही आहे. या बाजीरावाचे त्यांनी केलेले स्पष्टीकरण त्यांच्या निधनोत्तर 'सत्यकथे' च्या सप्टेंबर १९७६ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे. त्यात 'अस्तित्ववाद' ह्या शब्दांचा उल्लेखही नाही. अर्थात यातील विचार काही बाबतीत अस्तित्ववादी विचारसरणीशी निश्चितपणे मिळते-जुळते आहेत. पण त्याचे कारण विचारवंत व कलावंत यांच्या चिंतनात व अनुभूतीत काही साम्यस्थळे अनेकदा आढळतात हे होय. बाजीरावाची भूमिका समजावून सांगताना खानोलकर म्हणतात— "एक अव्यवस्थित आयुष्य. व्यवस्थेबद्दलच्या या माणसाच्या अपेक्षा आणि व्याख्या वेगळ्या आहेत ... माणूस— मग ती स्त्री असो अथवा पुरुष -चौकटी कायम ठेवूनच मानवी व्यवहार सांभाळू पाहातो हे या बाजीरावाला मान्य नाही." [१] त्याचप्रमाणे "व्यवस्थेचा निषेध करून अस्मितेचे प्रतिपादन करणे ही अस्तित्ववादी तत्त्वज्ञांचीही प्रतिज्ञा असते ... एखादी व्यवस्था कळत किंवा नकळत स्वीकारली म्हणजे माणसाचा प्रत्यय त्या व्यवस्थेच्या कोंडीत रुद्ध होतो, विपर्यस्त होतो ... 'मी कोण आहे व कसा आहे' या प्रश्नांची उत्तरे माणसाने स्वतःचे जीवन घडवीतच द्यावयाची असतात." [२] अस्तित्ववादात वैयक्तिक अनुभूतीला, प्रतिष्ठेला विशेष महत्त्व आहे. हा शुद्ध आत्मप्रामाण्यवाद आहे. संकल्पना स्वातंत्र्यातच मानवाचे मानवत्व आहे असे हे तत्त्वज्ञान मानते, म्हणून प्रस्थापित व्यवस्था, परंपरा, श्रद्धा, संकेत इ. कशाचाही आधार न घेता व्यक्तीने स्वतःच्या निर्णयावरच आपले जीवन उभारले तरच ते सार्थ ठरेल, असे हे मत मानते. या मार्गात व्यक्तीवर फार मोठी जबाबदारी येऊन पडते. कारण ही अंधारातील उडी ठरते. तिला अनेक संकटांना एकाकी तोंड द्यावे लागते, प्रसंगी आत्मविनाशाचा धोकाही पत्करावा लागतो. सर्वसामान्य माणसात ही हिम्मत नसते. म्हणून तो परंपरांना चिकटून राहतो. पण अस्तित्ववादी हा धोका पत्करतो. खानोलकरांचा बाजीराव जीवनाचा अर्थ शोधण्याच्या

---

१. सत्यकथा, सप्टेंबर ७६ पृ. १७

२. दि. के. बेडेकर : 'अस्तित्ववादाची ओळख' पृ. २५, ३३, ३८

प्रयत्नात जीव गमावून बसतो. पण शरणागती पत्करत नाही. खानोलकर म्हणतात, "युद्ध आणि काठी या दोन गोष्टी त्याला मागच्या पिढ्यांकडून वारसाहक्कानं मिळालेल्या आहेत. ... ... ज्या रूढीत उभं राहण्याचं सामर्थ्य नाही त्या काठीसारख्या शुष्क रूढींबरोबरच सगळे मानवी झगडे होत असतात. आणि त्यातूनच युद्धाची बीजं पेरली जातात. काठीबरोबर मलखांब खेळण्याचा प्रसंग यातूनच उद्‌भवतो आणि त्यामुळेच जन्माला येणाऱ्या माणसाला आपलं स्वत्व, आपलं चैतन्य, आपली कलात्मक अभिरुचि, आपल्या नाजूक भावना या सर्व गोष्टींच्या मृत सावल्याच शवपेटीच्या रूपानं घेऊन फिरावं लागतं. आणि म्हणूनच त्याच्यात आणि चौकटीतल्या माणसात अंतर आहे – जेवढं अंतर दोन कोनात असतं ... एकीकडे समष्टी आणि दुसरीकडे एक व्यक्ती हा हिशेब काहीसा विषम आहे ... वेगवेगळ्या पातळ्यांवरून बाजीराव जीवनाकडे पाहण्याचा प्रयत्न करतो आहे. या जगाच्या आशा आकांक्षा, मौल्यवान गोष्टी जपण्याचा त्याला ध्यास लागलेला आहे. त्याला या मानवी जगात रस आहे... मला अभिप्रेत असलेला 'एक शून्य बाजीराव' हा असा आहे. तो अधांतरी तरंगणारा आहे... ... तो एका नवीन विक्षिप्त पद्धतीनं मानवी आयुष्यातल्या सर्वच गोष्टींचा अर्थ लावू पहात आहे. पण अशा दिशेला उलटचा प्रवाहावरचं तारूच पोचलं तर पोचू शकतं. बाजी-रावाचं तारू त्याच्यासकट त्या प्रवाहात बुडालेलं आहे... सर्वच मागचे अर्थ पुसून टाकून काहीतरी नवीन मूल्य अस्तित्वात आणू पाहणारी माणसं अशीच नष्ट होतात!"[३] बाजीरावाच्या भूमिकेचा हा थोडक्यात भावार्थ आहे. 'त्रिशंकू' तील नानूची अवस्थाही बऱ्याच प्रमाणात अशीच आढळते. सुशीसारख्या निष्पाप मुलीचा बळी घेणाऱ्या समाजाची निरर्थक जीवनमूल्ये त्याला अस्वस्थ करतात. मानवी अस्तित्वाचे सर्वत्र होत असलेले विडंबन पाहून तो व्यथित होतो. पण तो निष्क्रिय, तुच्छतावादी, निराश व हताश होऊन बसत नाही. तर सर्व संकटांना धीरोदात्तपणे सामोरा जातो. नवीन मूल्ये मांडू पाहतो. निवडीचे त्याच्यापुढे सुशी व शकू हे दोन पर्याय होते. पहिल्यात वेदना, लोकक्षोभ, समाजाशी दुरावा, ताटातूट ही होती तर

३. सत्यकथा, सप्टेंबर ७६, पृष्ठ १७-१८

दुसरा सुरक्षित होता. पण जबाबदारीच्या जाणिवेने त्याने सुशीची निवड केली व त्यापायी आयुष्याची ससेहोलपट करून घेतली.

कादंबरीची सुरुवात नानूच्या मनोगताने होते. "आपल्या हाती काही नसतं हेच खरं" या कटू सत्याचा प्रत्यय आल्यामुळे हतबुद्ध, एकाकी व आर्त मनःस्थितीत असलेला नानू आपल्या पूर्वायुष्याची मनाशी छाननी करतो. 'सुशी कशी आली आयुष्यात' या प्रश्नाचा धागा पकडून मनात झालेला आठवणीचा प्रचंड गुंता तो हळूहळू उलगडू लागतो, धागे मागेपुढे होतात व कादंबरीचा पूर्वार्ध आकारित होतो.

एका सुखवस्तू कुटुंबातील विधवा आईचा नानू हा एकुलता एक मुलगा. सुरक्षितता, संपत्ती यांबरोबर बुद्धिमत्तेचेही देणे लाभलेला. त्यामुळे त्याच्या जीवनात कोणतेच बिकट प्रश्न निर्माण झाले नव्हते. पण बी. ए. ला असताना प्रा. नाबरांच्या व्याख्यानांनी त्याच्या सुस्थिर जीवनात खळबळ निर्माण होते. "माणूस कःपदार्थ आहे. त्याचं स्वातंत्र्य हिरावलं गेलं आहे. परमेश्वरासारखी एक काल्पनिक वस्तू कल्पून आम्ही आमच्या पारतंत्र्याचा आध्यात्मिक अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत आहोत... इथं समष्टीहूनही एकेका व्यक्तीच्या स्वातंत्र्याला अधिक अर्थ आहे.. जातीपाती, जुने संस्कार, सामाजिक जुन्या चालीरीती यांचा क्रमाक्रमानं त्याग करावा लागेल. हळूहळू या सगळ्यांतून तुम्हाला वेगळं व्हावं लागेल" हे प्राध्यापक नाबरांचे विचार त्याच्या मनात इतके ठसतात की सुट्टीत मुंबईहून गावी जाताच "आपणही आपल्यापरी लग्नाचं एक बंधन तोडावं...... जातपात माहीत नसलेल्या देवदासीच्या मुलीशी विवाह करायचा .. अधांतरी राखरांगोळी होऊन जाणाऱ्या मुलीचं आयुष्य एका पक्क्या पायावर स्थापन करायचं" या ध्येयाने प्रेरित होऊन तो काशी भाविणीच्या घरी मोठ्या उमेदीने जातो. पण काशीने आपले पूर्वीचे जीवन बंद केल्याचे कळल्यामुळे तो फार खट्टू होतो. कारण त्याला वाटते, आता तिची मुलगी सुशी "हिच्याशी लग्न होऊन बंधन ते कसले तोडले जाणार ?" तरी तिच्या अप्रतिम लावण्याने तो तिच्याकडे ओढला जातो. भेटी वाढू लागतात. तारुण्यसुलभ वासनेच्या पाशात दोघेही बद्ध होतात. निसर्ग आपला दावा साधतो व मग मात्र 'लग्न

करणार ना ? ' या तिच्या प्रश्नाला उत्तर देताना नानू गांगरतो, विलक्षण घाबरतो. त्याच्या ध्येयाचा त्याला पूर्ण विसर पडतो. कारण ते ध्येय त्याला आतून स्फुरले नव्हते. नाबरांच्या व्याख्यानांनी त्याच्या मनात शाब्दिक क्रांती केली होती. म्हणून सलामीलाच तो हातपाय गाळतो. त्याला वाटते, "लग्न होणं कसं शक्य आहे... आपल्या कुळाशी, घराशी, गावातील आपल्या मानापमानाशी त्याचा संबंध आहे. उभा गाव तोंडावर थुंकेल आणि आईला काय सांगायचं ? " पण त्याला पराभूत करणाऱ्या या त्याच्या विचारातच त्याची परप्रत्यनेय बुद्धीही नष्ट होते, तो स्वतःचा होतो व सुशीशी लग्न करणे अशक्य कोटीतले असले तरी ते केलेच पाहिजे; ती आपली जबाबदारी आहे, "एका सुंदर देहाची आपण लयलूट केली... आता तिनं कुठे जावं ? लग्न हाच एक उपाय आहे" या निर्णयावर येतो. येथेच नाबरांचा व त्याचा संबंध तुटतो. नानू स्वतंत्र होतो. यापुढील त्याचे निर्णय तो स्वतःच घेतो. मधूनमधून दिशाशून्य अवस्थेत त्याला क्षणभर नाबरांची आठवण येते. पण "ते काय करणार ? " असे वाटून तो स्वतःच सर्व जबाबदारी पत्करतो. या दृष्टीने नाबरांचे पात्र कथेत उपरे वाटते. कदाचित शाब्दिक पांडित्य व कृतिशील विचार यातील फरक दाखविण्यासाठी लेखकाने नाबरांची योजना केली असावी.

निःशंक होऊन नानू सुशीशी लग्न करण्याचा आपला बेत पक्का करतो. ही अंधारातीलच उडी असते. एक ब्राह्मणाचा मुलगा देवदासीच्या मुलीशी लग्न करणार ही घटना परंपरांच्या व सामाजिक प्रतिष्ठेच्या चौकटीत घट्ट बसलेल्या संपूर्ण गावालाच भयंकर वाटते. त्यांना ते एक महान पाप वाटते. त्यामुळे ते सर्व नानूभोवती विरोधाचे रान उठवतात. पण नानू डगमगत नाही. विरोधकांची समजूत घालताना त्यांच्या श्रद्धांची, जीवनमूल्यांची तो मुक्त बुद्धीने चिकित्सा करतो. तेव्हा त्याच्यापुढे एकेका भयाण कटू सत्याचा स्फोट होतो. परिणामतः त्याच्या विचारात मौलिक भर पडते व तो अधिकाधिक समृद्ध होत जातो.

त्याचा जिवलग मित्र विश्वनाथ त्याला पहिला धक्का देतो. नानूला तो अगदी सहजपणे सांगतो, "आजवर आपल्या आजापणजांनी असल्या

बाया हव्या तेवढ्या ठेवल्या, पण हे असलं लग्नाचं ? छाट ! असं सांगणाऱ्या बाईलाही त्यांनी माडाच्या आळयात पुरून टाकलं असतं. " पुढे नानूसाठी तो ओक्साबोक्सी रडतो. पण नानूला त्याच्याबद्दल विशेष जिव्हाळा वाटत नाही. कारण " माणसानं कुठेतरी कसाला लागलं पाहिजे. माणसामाणसाच्या संबंधाचं जातिपाती बाजूला ठेवून सूत्र निरखता आलं पाहिजे. " पण विश्वनाथ ह्या कसोटीस उतरला नव्हता. केवळ मैत्री हे सूत्र संबंध टिकविण्याच्या दृष्टीने नानूला पुरेसे वाटत नव्हते. त्यानंतर तो आईकडे वळतो. तेव्हा ती तर विलक्षण भडकून उठते. देवाजवळ धरणे धरून बसते व आपले आयुष्य ही पणाला लावते. स्त्रीजातीतीलच सुशीसारख्या अजाण जीवाचा होणारा विध्वंस व तोही आपल्या मुलामुळे, तिच्या स्त्रीहृदयाला पाझर फोडू शकत नाही. " या घरात हा असला भ्रष्टाकार मी चालू देणार नाही. " असे तिने म्हणताच नानू माणसाच्या जन्माचे आणि आईचे नातेही तपासतो. त्याला तिचे शब्द असह्य होतात. तो म्हणतो, " भ्रष्टाकार ! याला भ्रष्टाकार म्हणायचा ? सुशीही आम्हा सारखीच जन्माला आली. जन्माला येणं तर तिच्या हाती नाही ना..? या भ्रष्टाकाराला घर बांधून एक सांस्कृतिक देव्हारा मिळवून दिला आम्ही... उष्टया अन्नाला महाग होऊन दारोदार भटकणारी माणसंसुद्धा याच जगात जन्माला येतात. त्यांनाही आम्ही भ्रष्ट म्हणतोच आहोत. कारण वेळप्रसंगी त्यांनाही आपलं शील विकावं लागतंच आहे. पण शील ही वस्तू इतकी सांस्कृतिक आहे का ? ती माणसाच्या जन्मासारखीच मूलभूत आहे का ? ती तशी असती तर केवळ विष्ठा आणि तेज निर्माण करणाऱ्या पोटासाठी ती विकण्याची पाळी आमच्यावर येती ना ! पोटासाठी लिंगाचा बाजार करणे... एका अवयवासाठी दुसरा अवयव विकावा लागणं कितपत सांस्कृतिक आहे ? "
" आई म्हणजे काय ? फार पूर्वी एकदा एक नीतीची कल्पना पुढे आली. आई म्हणजे आपल्या गर्भाशयामुळे उदात्त ठरलेली एक बाईच. " प्रेयसी, बाप ही नातीही त्याला अशीच निरर्थक वाटतात.

या विचारांचे खानोलकरांना इतके मोल वाटत होते की, ' पाषाण पालवी ' तील नायक विक्रम याच्या तोंडून उमेच्या संदर्भात हेच विचार

त्यांनी पुन्हा वदविले आहेत. माणसाच्या रक्तात भिनून गेलेल्या मूल्यांची ही सत्यदर्शी चिरफाड भयानक हादरे देत वाचकांना अंतर्मुख करते.

शकूप्रमाणे सुशी ही दाजींचीच मुलगी पण अनौरस, म्हणून तेही नानूला बजावतात, "मूर्खा, मी सांगतोय हे ऐकायला हवंय तुला. तू तुझ्या घरात दहा रखेल्या ठेव. त्यात मला काहीसुद्धा वाटायचं नाही. पण लग्नाचा बाटगेपणा करू नकोस." पुढे सुशीच्या मामाचाच लग्नास विरोध असल्याचे कळल्यावर प्रश्नच मिटला म्हणून दाजींना हायसे वाटते पण सद्सद्विवेकाची टोचणी असलेला नानू त्यांना सांगतो, 'नाही दाजी ; कदाचित लग्न झालं नाही तरी मी त्यातनं कधीच सुटायचा नाही. एवढी सोपी गोष्ट नव्हे ती. मरेपर्यंत फक्त याच एका गोष्टीचा विचार सुरू राहील. घडलंय हे फारच घडलंय.' शकूला तो सांगतो, "माणसाला कशाबद्दल तरी मोल वाटायला हवं. तुझे दाजी म्हणजे त्या बाबतीत कोरी ठणठणीत पाटी. सुशीही त्यांचीच लेक ना ? लग्न झालं तरच फक्त लेकी-लेकांची माया वाटते का ? इथं... काळजाशी त्याचा कसलाच संबंध नाही ?"

रस्त्यावर शेण गोळा करणारी व अतिशय प्रेमळ असलेली बाया गाठेकरीणही नानूला सांगते. "पण लगीन मतर करू नुको हाँ ऽऽ आजपर्यंत खंच्या गावणग्यान आसलां करूक नाय . . ." या सर्वांच्या तुलनेत सुशीची आई व मामा यांनी केलेला विरोध नानूला पुष्कळ समर्थनीय वाटतो. पण सुशीची आई प्रतिष्ठेसाठी गावातच लग्न करण्याचा हट्ट धरते व हक्काची भाषा बोलता बोलता सारेच गमावून बसते. मामाची वेदना व चीड रास्त असतात. नानू त्यांना परोपरीने समजावतो, अगदी कळवळून सांगतो, 'मी लग्न करतो तिच्याशी. बीज पाडून टाकण्यासारखं पाप नाही दादा.' पण चवताळलेला मामा त्याला सुनावतो, "पाप वगैरे तुम्हाला. आम्ही तुमची पापं. वाढलोत आपले त्रिशंकूसारखे . . . मेली तर ब्याद गेली. आमच्या-सारखे आगापिछा नसलेले पुरुष जन्माला घालणारं एक भांडं फुटलं असं समजेन."

एकेकट्या व्यक्तीच्या विरोधाप्रमाणे समष्टीच्या विरोधालाही नानूला तोंड द्यावे लागते. त्या विरोधात जातीय कट्टतेचा आणखी एक

बळकट धागा असल्यामुळे त्याची धार विशेष असते. जातीजातीतील श्रेष्ठ-कनिष्ठ भाव व आर्थिक विषमता यामुळे वर्णव्यवस्था व वर्गव्यवस्था पूर्ण अव्यवस्था झाल्या होत्या हे नानूला समजत होते. स्वत: तो सर्व भेदा–भेदाच्या पलीकडे गेला होता. कूळकायदा येणार असल्याचे दाजीकडून त्याला कळते तेव्हा कुळांना नोटिशी देण्याऐवजी जमिनीच देऊन टाकण्याचे तो ठरवितो. परंतु कुळवाडी मात्र ब्राह्मणाचा प्रतिनिधी म्हणूनच त्याच्याकडे पाहतात. हेटाळणीच्या व उपहासाच्या दृष्टीने एकामेकाला खुणावीत छद्मी-पणाने बोलतात, " बामणानू, हे लक्षात ठेवा हां, राजेसुद्धा गेले, थुंय तुयचां रे काय घोडा पानी पितालां ? " तेव्हा नानू तापलेल्या आवाजात त्यांना बजावतो, " ही उखडाउखडीची भाषा पटत नाही मला. कोणीच कोणाला उखडू शकणार नाही, तुम्ही लोक अन्यायाविरुद्ध जरूर उभे राहा. पण बामणकुळवाडी हा भेद करू नका. बामण कोण ? कुळवाडी कोण ? समजा, एखाद्या गावात कुळवाडी समाजात श्रीमंत जमीनदार असेल तर कुणाचा छळ होईल ? " नानूला त्यांच्या तक्रारी पटत होत्या पण त्यांची पद्धती चुकीची वाटत होती. त्याच्य ामते सगळीच घिसाडघाई होत होती.

अशा रीतीने नानू सर्वांकडून कमालीचा दुखावला जातो. केवळ परंपरा-निष्ठेपायी माणसासारखी माणसे सुशीसारख्या एका निरागस जीवाचा बेदिक्कत बळी घेऊ शकतात हे पाहून त्याला मोठा धक्का बसतो. पण तो निष्क्रिय होत नाही. त्याला कळून चुकते की परंपरांच्या प्रतिष्ठेपुढे माणसाची प्रतिष्ठा शून्यवत् झाली आहे, व्यक्ती ही केवळ साधन बनली आहे. तेव्हा वाटेल ती किंमत देऊन आपण माणसाच्या अस्तित्वाची, प्रतिष्ठेची, स्वातं-त्र्याची, मानव्याची बूज राखली पाहिजे. म्हणून प्रत्यक्ष काळ समोर उभा ठाकला असतानाही तो आपल्या या ध्येयाशी अविचल इमान राखतो. घाबर-लेल्या व साशंक झालेल्या सुशीला तिच्या आईच्या आग्रहाखातर गावातच लग्न करण्याचे तो आश्वासन देतो. तेव्हा काही मारेकरी त्याला घेरतात व ' उजडावयाच्या आधी गाव सोडून जा ! ' असा दम भरतात. तरी नानू ' कोयत्याच्या श्वापदी धारेकडे पहात ' ठामपणे ' नाही ' म्हणण्याचे धैर्य दाखवतो. त्यावर ' घाल कोयतो. कवळा हणल्यासारखो हाण त्या बामणाक. '

असे एकाने म्हणताच नानू धीटपणे उत्तरतो, ' शक्य नाही . . . माझे प्राण घेणं तुमच्या हाती नाही. ' अर्थात् ' कोयत्याची धार मान छाटून रक्तानं निथळत राहणार ' ही खात्री असल्यामुळे वर आकाशाकडे पाहात तो मृत्यूस तयार होतो. कदाचित् त्याच्या या अलौकिक धैर्यामुळेच मारेकरी काळोखात विलीन झाले असावेत.

या सर्व प्रसंगात नानूला विलक्षण ताण पडतो. विरोधकांना तोंड देता-देता तो अगदी थकून गेलेला असतो. पण हा त्याचा ताण मर्यादेबाहेर वाढून त्याला तुटू न देणाऱ्याही काही शक्ती होत्या. पहिली मुख्य शक्ती म्हणजे सुशीचे त्याच्यावरील उत्कट प्रेम व त्यापायीच तिला मूकपणे सोसाव्या लागत असलेल्या दारूण यातना. दुसरी शक्ती म्हणजे नानूचा सदैव जागरूक असलेला सद्सद्विवेक. त्यामुळेच आपल्यावरील जबाबदारी पार पाडण्यासाठी तो स्वतःला सतत सावरतो. विश्वनाथची पत्नी सुनंदा ही या समस्येकडे माणुसकीच्या व स्त्रीत्वाच्या दृष्टीने पाहणारी समंजस व स्वतंत्र दृष्टीची एकमेव स्त्री. नानूला ती सांगते, " भाऊजी, पोरीचे हाल होतील असं काही करू नका ! . तुम्ही यांचं काही ऐकू नका. सुशीची विटंबना होईल यात. ...हे गावचे लोक असेच. ' नानू मुंबईस जाण्यासाठी निघाल्याचे कळताच ती त्याला अगदी कळवळून सांगते, " पोरीला उघडयावर टाकू नका ! बायकांचा जन्म वाईट असतो परवाच आली होती. विष घ्यावंसं वाटतं म्हणत होती. " नानूवर विलक्षण जीव असलेली शकू सुशीला दिवस गेल्याचे कळताच नानूस मुकावे लागणार म्हणून फार दुःखी असते. पण तिच्यातील माणुसकी नष्ट झालेली नसते व विशेष म्हणजे सुशीबद्दल वाटणारा हेवा खुद्द नानूस सांगण्याइतका प्रामाणिकपणा तिच्याजवळ असतो. नानूला ती सांगते – ' मीही स्वार्थी आहे रे ! स्वार्थी ! सुशेचं बरं व्हावं असं मला वाटत नव्हतं. अजूनही वाटत नाही. माझी बहीण असूनही वाटत नाही. केव्हाच वाटणार नाही " पण चारही बाजूंनी त्याच्या भोवती मोहोळ उठते तेव्हा त्याच्या भोवती भोवती राहून शकू त्याला सांभाळते. त्याच्यावर जीवा-भावाची सतत पाखर घालते. एवढेच नव्हे, तर आईने प्राण पणाला लावल्याचे कळताच ' जा सांग तिला, लग्न करणार नाही म्हणून ' असे जेव्हा तो

म्हणतो तेव्हा त्याच्या मनातील आत्मघाताचा बेत तिच्या तत्क्षणी लक्षात येतो व तो निरोप सांगण्यास ती नकार देते व त्याच्या गळ्याभोवती मिठी घालते. आपल्या मनातील बेत न सांगता तिने ओळखला तेव्हा "नानूला क्षणार्धात पटून गेलं की आपला रस्ता चुकलाय. ही मुलगीच आपल्यासाठी घडली होती ...आपण चुकीचं निवडलं. पण आता मात्र त्याच रस्त्यानं चालत राह्यलं पाहिजे." वास्तविक ही आत्मवंचना होती. सुशीशी लग्न करण्याच्या मार्गातील अनुल्लंघनीय अडचणींच्या तुलनेत शकूशी लग्न करणे फारच सोपे होते. शिवाय त्याच्यावर तिचे नितान्त प्रेमही होते. अशा परिस्थितीत प्रसंगी कच खाणे, कमकुवतपणा दाखवणे, अवाजवी आत्म-समर्थन करणे हे सारे स्वाभाविक होते. एकाहून एक तापदायक प्रसंगांनी तो इतका त्रस्त झाला होता की मधूनच त्याच्या मनात भलते सलते विचारही येत. एकदा तर त्याला वाटते, प्रा. नावरांच्यामुळेच आपण या मार्गाकडे वळलो. तेव्हा त्यांचाच खून करावा का? पण लगेच त्याच्या लक्षात येते की त्यामुळे सुशीचा प्रश्न काही सुटणार नाही. मग त्याला वाटते, "सुशीचा खूनच केला तर? सुटेल ती. परमेश्वराकडे जाईल पटकन्..गर्भाशयातला जीव काही मरायचा नाही..त्याला नख कसं लावता येईल?" पण असा वैताग व बेताल विचार अगदी आणीबाणीच्या प्रसंगी त्या त्या वेळेपुरते व क्षणिक असतात. कायम असते ती जबाबदारीची जाणीव-सुशीशी लग्न करण्याचा निश्चय. नायकाला अतिरेकी उदात्त बनविण्याच्या मोहापायी अटीतटीच्या प्रसंगी स्वाभाविकपणे प्रगट होणाऱ्या त्याच्या मनोदौर्बल्यावर खानोलकर पांघरूण घालीत नाहीत व म्हणूनच ही व्यक्तिरेखा जिवंत वाटते.

सुशीचा मामा तिला मुंबईस घेऊन जात असल्याचे कळताच नानू पायपीट करून रातोरात बंदर गाठतो. पण बोटीत ती दोघे न दिसल्यामुळे कमालीचा निराश होऊन सारी रात्र तेथील प्रचंड माळरानावर मोठ्या विमनस्क स्थितीत काढतो. आणि पडल्या पडल्या मनाशी स्मृतींचे धागेदोरे जुळवीत राहण्याच्या ज्या प्रसंगाने कादंबरीचा पूर्वार्ध सुरू होतो, त्याच प्रसंगाने त्याचा शेवटही होतो. तीन दिवसांनी सुशीच्या शोधासाठी मुंबईस

जाण्यासाठी नानू बोटीत बसतो व तेथून कादंबरीचा दुसरा भाग सुरू होतो. कादंबरीच्या या विभाजनावर काही आक्षेप घेतले गेले आहेत. या दोन भागात एकसंघता राखली न गेल्यामुळे कलाकृती सदोष झाली आहे. दुसरा भाग अपरिहार्य वाटत नाही. यात आलेली नवीन पात्रे व त्यांच्या समस्या यामुळे कादंबरी अकारण ताणली गेली आहे. डिटेक्टिव्ह साळुंकेमुळे ती रहस्यकथेकडे सरकली आहे इत्यादि.

कादंबरीचे उद्दिष्ट लक्षात घेतल्यास वरील आक्षेपांचे निराकरण होणे शक्य आहे. कादंबरी दोन भागात विभागण्याचे कारण म्हणजे मुंबईस आल्यानंतरची नानूची भिन्न अवस्था. आता तो पूर्ण एकाकी आहे. आपल्या गावात त्याला दिलासा देणाऱ्या ज्या काही थोड्या व्यक्ती व घटना होत्या त्याही येथे नाहीत. उलट सुशीच्या दुःखाबरोबर इतर काही किशोरींची भयानक दुःखे त्याच्यापुढे येतात सुशीच्या दुर्दशेतून चुकीच्या मूल्यांपायी माणसाच्या अस्तित्वाच्या होणाऱ्या गळचेपीचा त्याला अनुभव आला होता. या किशोरींच्या दुःखाने तो अधिकच तीव्र झाला. त्यात यंत्रयुगाच्या प्रभावाची आणखी भर पडली. भूक व झोप यांतून निसर्गाची बांधिलकी त्याला जाणवली आणि पैसा हेच समाजाचे सर्वश्रेष्ठ मूल्य असल्याची कटू प्रचीतीही, विशेषतः सुमनवर ओढवलेल्या प्रसंगातून त्याला आली. वास्तविक यापूर्वीही शिक्षणाच्या निमित्ताने तो मुंबईस रहातच होता. पण सुस्थितीमुळे त्यावेळी त्याच्यापुढे कोणतेच प्रश्न कधी निर्माण झाले नव्हते. सुशीवरील प्रसंगाने त्याला नवीन दृष्टी आली होती. तिच्यात यातना होत्या, समाजाशी दुरावा होता, दुभंगलेपण होते; परंतु त्याचबरोबर त्याला सत्याचे दर्शनही घडत होते. या दुसऱ्या भागात आलेली सुधा, वासंती व सुमन ही पात्रे मुद्दाम ओढूनताणून आणल्यासारखी वाटत नाहीत. सुशीशी त्यांचा संबंध नसला तरी तिच्याच शोधात असलेल्या नानूसमोर ती प्रसंगाच्या ओघात येतात; नानूच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी काही उदात्त पैलू प्रकाशात आणतात, आणि स्त्री जीवनातील दुःखाच्या विविध परी दाखवतात. डिटेक्टिव्ह साळुंकेचा उपयोगही खानोलकर नानूचे व्यक्तिमत्त्व अधिक भरीव करण्यासाठी करतात. संशयास्पद मृत्यू म्हटला की डिटेक्टिव्ह येणारच, पण तेवढ्याने काही ती रहस्यकथा होत नाही. खूनी म्हणून नानू-

वर कडक पहारा ठेवणाऱ्या साळुंकेलाही नानूचा लहान मुलासारखा निरागसपणा पदोपदी प्रत्ययास येतो आणि त्याची खात्री होते की, "हा फक्त एक एकाकी माणूस. याची सोबतीण अशी क्रूरपणे जगानं निकालात काढलींय. हा यात उगीचच – "

मुंबईस आल्यानंतर निर्भेळ आनंदाचा एक क्षणही नानूला कधी लाभत नाही. मानवी जीवनात ऊनसावल्यांचा पाठशिवणीचा खेळ सदैव चालू असतोच, पण काही व्यक्तींच्या बाबतीत सुखाचे प्रसंग अगदी अत्यल्प असतात. आणि नानूच्या बाबतीत तर हे अत्यल्प प्रसंगही दुसऱ्यांच्या दुःखात लपेटूनच त्याच्यासमोर येतात! मुंबईस पोहोचताच त्याच्यावर बेघर होण्याचा प्रसंग येतो. आपल्या खोलीत मित्राची पत्नी – हिरवे पातळ नेसलेली एक नववधू – मोठ्या आनंदात संसार थाटून बसलेली त्याला दिसते. नानूला पाहताच जागा जाणार म्हणून ती भेदरून जाते. तेव्हा नानू क्षणार्धात तिला तेथेच राहण्यास सांगून स्वतः हॉटेलचा रस्ता धरतो व 'खोलीच्या समोर एक सुंदरशी हसणारी वेल लावून खोली तिच्या स्वाधीन करून आलो' या समाधानात हॉटेलमध्ये येतो. तेथेही दुसरे दुर्दैव त्याच्यासमोर येते. श्रीधर नावाचा एक लहानसा पोऱ्या नानूचे सामान खोलीत ठेवून तुरतुर निघून जातो. त्याच्याकडे पाहून नानूचे मन गलबलून जाते. हसतखेळत रमण्याच्या, शाळेत जाण्याच्या वयात त्याला करावी लागणारी कामे पाहून नानूचा संताप होतो, त्याला वाटते, "श्रीधर हे नाव ठेवून याच्या आईबापांनी याला असा उघड्यावर सोडून द्यावा, हे बरोबर नव्हे .. मॅनेजर असली पोरं उंदरासारखी खेळवतात. ...श्रीधर! क्षमा कर!" गरिबांच्या लहानग्या जिवाची सर्वत्र होत असलेली फरफट खानोलकरांच्या मनाला फार लागलेली दिसते. कारण 'अवध्य' नाटकात पंढरीच्या रूपात ते हाच श्रीधर अधिक ठळकपणे रंगवतात.

काही दिवसांनी नानूची खोली मिळालेल्या देशपांडेकडून नानूला कळते की सुशीच्या मामाने आपल्या भाचीचे लग्न नानूशी होणार असल्यामुळ त्याला खोली खाली करण्यास सांगितले आहे. सुशीचा पत्ता लागला व मामाने लग्नाचीही परवानगी दिली म्हणून नानूला केवढा आनंद झाला

असेल ! पण खोली जाणार म्हणून काळजाचे पाणी करून बसलेल्या त्या जोडप्याकडे पाहून आपल्या आनंदाची रेषाही चेहऱ्यावर उमटू न देण्याचे दिव्य तो करतो; व मी खोली तुम्हाला देऊन टाकली आहे असे सांगून त्यांना प्रथम निर्धास्त करतो. आणि तेवढ्यातच वासंतीच्या भयानक अंताची बातमी त्याला कळते तेव्हा तो जागच्या जागी थिजून जातो. कादंबरीत प्रत्यक्ष न येताही वाचकांना घायाळ करणाऱ्या वासंतीचे आयुष्य होतेच तसे करुण ! चाळीतील लोकांची असंख्य कामे सदैव हसत खेळत करणारी लाघवी वासंती, चाकरमानी नवरा मिळून सुखाने संसार करीत असेल अशी नानूची कल्पना होती. पण चौकशी अंती त्याला कळते ते भलतेच. देशपांडे सांगतो, "उठवलं कुणीतरी—वास्याला दिवस गेलेत.. पोर जेवत नाही... पावलं सुजलीत.. बातमी वासंतीला कळली आणि ती पोर कण्यातूनच मोडून पडली ... शेवटी डॉक्टर आला. ... पोरीला कावीळ होऊन महिना लोटला होता. पण तिरडीवर सुद्धा तिचं तोंड हसरंच होतं ... या—या आठ आठ मुलांच्या रिकामटेकड्या बायांनी बळी घेतला तिचा. यांच्या डोकीवर पाटेवरवंटे घालायला हवेत. पोर जेवत खावत नाही याचा अर्थ काय ती गरोदर राहिली ? डोकंच अश्लील साल्यांचं ! " वासंतीच्या मृत्यूची जबाबदारी नानू स्वत:वर घेतो. तिची क्षमा मागतो. तिला खांदाही देता आला नाही म्हणून हळहळतो. कळवळून म्हणतो, 'वास्या ऽऽ मी तुझा थोरला भाऊ... आता सुशीबरोबर माझं लग्न झालं की तुझा जन्म होणारच.' स्वत:वरील दु:खाने नव्हे तर वासंतीच्या दु:खाने तो काही काळ भ्रमिष्ट होतो. चाळकऱ्यांनी, आपलीच कामे हसतमुखाने उपशीत असलेल्या वासंतीचा अकारण घेतलेला बळी खानोलकरांच्या इतका जिव्हारी लागला होता की 'बाप' या त्यांच्या अपूर्ण कादंबरीत हीच वासंती कावेरीच्या रूपाने त्यांच्या लेखणीतून पुन्हा अवतरली. "आंबेकरांच्या चाळीतील कावेरी. एक प्रश्नचिन्ह कितीतरी अवघड. एक हास्य, कितीतरी करुण ... अगदी जशाचं तसं होतं चितेवरसुद्धा. एखाद्या सौभाग्यवतीच्या चितेवरसुद्धा न जळू शकलेल्या पदरासारखं." [3]

---

[3] दीपावली : वर्ष ३२ वे १९७६ पृष्ठ २८

वासंतीच्या दुःखाचे प्रचंड ओझे बाळगीतच नानू सुशीच्या मामाकडे जातो, तेव्हा सुशी माडीवर आहे, आता एकदम माळ घालतानाच एक–मेकांना पहा, कारण काशीची तशी आज्ञा आहे असे मामाने सांगताच तिला भेटण्यास अत्यंत अतुर झालेले आपले मन नानू मोठ्या कष्ठाने आवरतो. पण सुशी सुखरूप आहे व आपले लग्न होणार या बातमीने आतापर्यंत त्याला झालेला असह्य ताण सैल होऊन तो सुटकेचा निःश्वास टाकतो न टाकतो तोच सुमनची विटंबना त्याच्यापुढे दत्त म्हणून उभी राहते ! तिच्या वडिलांकडून दहा हजार रुपये उकळण्यासाठी मामाच्या माणसाने तिला कुंटण-खान्यातून सोडवून आणले होते. तिला तिच्या गावचे तिकीट काढून देण्याची जबाबदारी मामा नानूवर टाकतो आणि त्याच वेळेस सुशीच्या व त्याच्या तीन दिवसांनी होणाऱ्या लग्नाच्या पत्रिकांचा गठ्ठा त्याच्या हातात देतो. सुशी दुःख–मुक्त होणार म्हणून स्वर्गही ठेंगणा वाटणाऱ्या नानूच्या मनाला सुमनची दुर्दशा डागण्या देत राहते. सुशीभोवतीचा वणवा जरी विझला असला तरी सुमन वणव्यात असतांना आपल्या सुखाचा विचार करणे त्याला अक्षम्य वाटते. तिच्या आठवणीने "अगदी काळजातून सुरी फिरल्यासारखं त्याला वाटतं. एखाद्या स्त्रीला अशा तऱ्हेची वागणूक या जगात मिळते ? आपल्याला सुशीशी लग्न करण्याचा तरी काय अधिकार ?" असे त्याला वाटते. म्हणून प्रथम तो हॉटेलमध्ये सुमनची सर्व व्यवस्था करतो. तिच्या वडिलांना तार करतो व तिला कळवळून सांगतो की, "भावाकडे आहात असं समजा." मग त्याला आपल्या लग्नाची आठवण येते व त्यासाठी तो प्रथम नोकरी मिळवतो. खोली मिळेपर्यंत सुशीला माहेरी ठेवण्याचे ठरवितो. कारण आपल्या सुखासाठी मित्राचा संसार उस्कटणे त्याला पटत नाही. खोली मिळताच धावत जाऊन तिला घेऊन येऊ असे त्याला वाटते. तो स्वतःशीच म्हणतो– "सुशे ! आजवर भोगलंस त्यानं मोडून गेलीयस. आता यापुढं तू माझीच होणार आहेस. या सगळ्या वणव्यातून तू दिसतही नव्हतीस... उगीचच आमच्या पूर्वजांची ही पापं आमच्या डोकीवरून गिधाडासारखी फिरत होती." पण सुमनचा विचार त्याच्या डोक्यातून काही केल्या जात नाही. तिच्या चिंतेने तो इतका अस्वस्थ होतो की शेवटी प्रा. नाबरांकडे जाऊन त्यांना विचारतो, "काल एक मुलगी कुंटणखान्यात

आणली गेली. तिच्या किंकाळ्यांनी हे रहाटगाडगं कसं बंद पडलं नाही, याचं आश्चर्य वाटतंय मला ! " त्यावर नाबर शांतपणे सांगतात, "त्याचा संबंध मी विश्वरहस्याशी लावणार नाही .. माणसाला यात तसं महत्त्व नाही. माणूस अस्तित्वात असता तर हे असं घडलं नसत.' हे ऐकताच नानूला एकदम पोकळ झाल्यासारखे वाटते. " माळावर पडलेल्या हाडाच्या नळीसारखे पोकळ... पैसा भरीव... रक्तासारखा मूलभूत... श्वासोच्छ्-वासाइतका आवश्यक. पायाच सगळया जीवनसत्त्वांचा... बाई ग, कुणाला तरी भूक लागली होती - म्हणून त्यानं तुला पळवून आणली. पोट नको भरायला ? पैसा नको ? खुळी कशी तू...? एकानं पळवून आणली-दुसऱ्यानं पोचती केली. एकानं नागडी करण्यासाठी आणली. नागडेपणाचा पैसा करण्यासाठी. दुसऱ्यानं नेसलेपणाचा करण्यासाठी पोचती केली. " याप्रमाणे काळीज पोखरीत असताना खोलीवर जाऊन नानू सुमनला 'ताई ग ऽऽऽ' अशी हाक मारतो. आतून उत्तर येत नाही तेव्हा ती मेली की काय या शंकेने हादरून जाऊन पुन्हा जोरात हाक मारतो. त्यावर 'बाबा आले की सांगा' असे आतून थकलेले उत्तर ऐकताच तिच्या बंद दारावरून तो 'थरथरता हात' फिरवता. पण ती सुखरूप असल्यामुळे त्याला वाटणारे हे समाधानही एका क्षणात नाहीसे केले जाते. आपल्या खोलीत येताच दुःखाचा कळस करणारी, उभे आयुष्य अंधकारमय करणारी व त्याची सारी तितिक्षा विफल करणारी घटना त्याला कळते तेव्हा नानूप्रमाणे वाचकही कोसळतात. कारण खानोलकरांनी या घटनेसंबंधी वाचकांना विश्वासात घेतले नसल्यामुळे नानूप्रमाणे तेही अज्ञानातच असतात. बिचारा नानू सुशीसाठी मुंबईत वणवण करीत असतो. पण सुशी होतीच कुठे मुंबईत ? गर्भ पडताना सुशी गावीच मेली होती. चार जवान गड्यांनी डोंगराच्या उताराखाली पुरुषभर खोलीच्या खड्ड्यात पुरून टाकली होती. आणि तरीही तेवढ्यावरच तिची दुर्दशा संपली नव्हती. तिच्या संशयास्पद मृत्यूचा पोलिसांना पत्ता लागल्यामुळे तिचे प्रेत बाहेर काढले जाऊन त्याचे पोस्टमॉर्टेम झाले होते. प्रेताच्या आतड्यात विषाच्या खुणा सापडल्या होत्या. काळीज आतून विरघळून फुटून गेले होते. तो खुनाचाच प्रकार होता, असे सांगून साळुंके त्याला म्हणतात, "तुम्ही खून केल्याचा तुमच्यावर आरोप आहे. पण

माझ्या मताप्रमाणं तुम्ही खुनी नाही." आपल्यावर झालेल्या अन्यायाचा सूड घेण्यासाठी मामा नानूला छळत होता. शेवटपर्यंत एखाद्या उंदरासारखा तो त्याला खेळवणार होता. कारण 'या बामणांमुळेच' आमची भ्रष्ट जात निर्माण झाली असे त्याचे म्हणणे साळुंके नानूला सांगतो. एवढी घोर फसवणूक कधी कुणाची झाली नसेल ! असा भयंकर सांपळा कधी कोणी उभा केला नसेल. सगळेच भयंकर–अति भयंकर होते ! 'नानू एखाद्या अचेतन राखेच्या ढिगासारखा होऊन बसला होता. हात लावला असता तर पटकन कोसळून पडला असता' वाचकही बधिर होतात. त्यांना प्रश्न पडतो की सुशीचे दुःख मोठे का नानूचे ? त्या अजाण जिवाला प्राणास मुकावे लागते तर नानूला तिच्या दारुण मृत्यूचे दुःख सोशीत जिवंत राहावे लागते. तो म्हणतो, "सुशे ! मला मरणच नाही का ?"

अत्यंत सालस, प्रेमळ व निरागस अशा सुशीची व्यथाही आपले काळीज चिरीत जाते. या अजाण बालिकेला अकारण सोसाव्या लागलेल्या असीम वेदनांचा आर्त करुण सूर संपूर्ण कादंबरीभर व्याकुळपणे अव्याहत घुमत असतो. आपल्या अगदी ओझरत्या दर्शनातून व कमीतकमी कृति–उक्तीतून वाचकांना कायमचा चटका लावणारी ही एक अतिदुर्दैवी कलिका ! आपल्याला ती प्रथम दिसते ती चाफ्याच्या झाडाखाली फुले वेचतांना. केतकी कांतीची; निळसर टपोऱ्या डोळ्यांची; चंद्रकोरीसारखा चेहरा असलेली. तिला पाहून नानूला वाटते, 'ही फुले वेचतेय तर चाफाही फुले गाळीतच उभा राहील.' जाणते-अजाणतेपणाच्या सीमारेषेवर रेंगाळत असलेल्या त्या वयात नानूच्या टक लावून पाहण्याने व भेटीने तिच्या मनात काहीतरी जागे होत असते. 'किती दिवस राहणार ? पुन्हा येशील ना ? आठवण ठेव' अशा वाक्यातून ते व्यक्त होते. पण कळत मात्र काहीच नसते. 'माझे प्रेम आहे तुझ्यावर !' असे नानूने म्हणताच तिच्या डोळ्यात भीतीचा वास असलेले प्रश्नचिन्ह उभे राहते आणि नानू जेव्हा तिच्या गालावर गरम गरम ओठ टेकतो तेव्हा तर त्या टपोऱ्या डोळ्यांच्या अश्रु–धाराच बनून जातात व अतिशय भेदरून ती पळून जाते. पण पुढे आपुलकी, ओढ, आतुरता, औत्सुक्य या पायऱ्या चढत चढत नानूची वाढती तगमग पाहून

एक दिवस ती त्याच्या स्वाधीन होते. "तो एखाद्या हिंस्र जनावरासारखा तिच्या देहाला हावरेपणाने कवटाळीत होता... ... आणि ती तर कोमेजून जात होती . ... गयावया करीत राह्यली, नानू ! नको रे नको ! ... ..." पण मग ती त्याच्या वादळी मिठीत एखाद्या काटकीसारखी मोडून पडली. शेवटी तिनं विचारलं, 'संपलं ? संपलं ? ' आणि नंतर एक दिवस रडत ती त्याला सांगते, ' दिवस गेलेत मला. लग्न करणार ना ? ' नानूने होकार दिल्यावर 'सुरक्षित पावलाने' निघून जाते. त्यानंतर ती त्याला एकदाच भेटू शकते. एवढेसे तोंड करून त्याला म्हणते, ' मला भीती वाटते रे-भीती वाटते ! ... मला यात काहीसुद्धा समजेना झालंय. मला कापरं भरलंय... तू गावात लग्न का करीत नाहीस ? ' हे तिचे शेवटचेच बोलणे ठरते. त्यानंतरची तिची दुर्दशा इतरांकडून कळते. दाजी नानूला सांगतात की 'सुशीच्या गोऱ्या अंगावर तांबडे लाल वळ उमटलेत. काशीनं फोडून काढली होती तिला.' नंतर तिला सोसाव्या लागलेल्या यमयातना साळुंकेकडून कळतात. भाविणीची मुलगी म्हणून जिवंतपणी तिच्या मनाचे व संसार-सुखाचे पोस्टमार्टेम केले जाते; मेल्यावर तिच्या प्रेताचे, आणि नंतर नानूच्या मनाचेही !

सुशी व नानू यांच्या भावजीवनातील हे कारुण्य भावविवशतेच्या पातळीवर राहात नाही. आपल्यावर दुःखाचा डोंगर कोसळला तरी तशाही स्थितीत दुसऱ्याच्या दुःखाची चिंता वाहण्याइतके विकसित झालेले नानूचे व्यक्तिमत्त्व वाचकाला अंतर्मुख करते, आणि परंपरागत मूल्यांचे पुनर्मूल्यन करण्याची अपरिहार्यता जाणवून देते हेच या कादंबरीचे मुख्य बळ आहे.

▭ ▭

# ६. 'गणुराया' : सृजनास धास्तावलेले मन

'गणुराया' ही खानोलकरांची पाचवी कादंबरी. ही कादंबरी म्हणजे गणुराया व त्याची प्रेयसी बेबी यांच्या मनातील सुप्तासुप्त उलाढालींचा, पडझडींचा, आंदोलनांचा एक आलेखच ! हा आलेख अगदी लहान लहान व तुटक तुटक वाक्यांतून रेखाटल्यामुळे आशय व अभिव्यक्ती यांचे येथे साधले गेलेले अद्वैत लक्षणीय आहे. खानोलकरांच्या अनुभूतीने येथे एक वेगळाच आकार शोधला आहे. या कादंबरीस कथानक असे फारसे नाहीच. हिच्यातील नायिकेलाही लेखकाच्या इतर नायिकांप्रमाणे अतृप्तीचा, पराभूत जीवनाचा शाप आहे. पण तो वेगळ्या वाटेने येणारा आहे. तिचा प्रियकर गणुराया याचे तिच्यावर प्रेम आहे. त्याच्या अंतर्मनाची 'चाहूल' होण्याइतकी ती त्याच्या मनाशी मिसळून गेली आहे. गणुराया परोपकारी, कष्टाळू, कनवाळू, त्यागी, कर्तव्यदक्ष, इत्यादी गुणांनी संपन्न आहे. दुष्टपणा तर त्याच्याजवळ औषधालाही नाही. पण त्याच्या या गुणापायीच या दोन प्रेमी जीवांचे मीलन होऊ शकत नाही. पितृऋण व प्रेयसी यांच्या संघर्षात कर्तव्यभावना प्रेमभावनेवर मात करते व त्याखाली आपल्या चाहूलसह तो चेंगरला जातो, असे या कादंबरीचे लहानसे कथानक; पण अनेक पातळ्यांवरून वावरणारे, निवेदनाचा फोकस पात्रे व घटना यावरून अति जलद गतीने फिरत असूनही व्यक्तिमनांचे पापुद्रे व प्रसंगातील

बारकावे वाचकाला प्रतीत होतात. अत्यंत मोजक्या पण अतिशय अर्थपूर्ण शब्दांत गोठविलेला कादंबरीतील आशय खानोलकरांच्या शब्दकळेची एक वेगळीच ताकद जाणवून देतो. परस्परांवर माया करणाऱ्या दोन प्रेमिकांचा जीवघेणा कोंडमारा खानोलकरांनी अशा अर्थघन प्रतिमा-प्रतीकांतून आविष्कृत केला आहे की त्यामुळे कादंबरीला एक आगळाच घाट लाभला आहे. अल्पाक्षरी संवाद, संज्ञाप्रवाह व सूक्ष्म मनोव्यापार टिपणारे निवेदन, आणि पत्रे अशा तिपेडी विणीतून कलाकृतीचा आशय गुंफला आहे. गणुराया व बेबी यांच्या परस्परविरोधी मनोवृत्तीमुळे निर्माण झालेल्या लयीतून कथा आकार घेते. या लयीला प्रत्येकाच्या अंतर्मनातील द्वंद्व व दोघांच्या वडिलांच्या स्वभावातील आणि परिस्थितीतील विरोध यांचे अनेक पदर येऊन मिळतात. त्यामुळे मध्यवर्ती ताण अनेकविध दिशांकडे ओढ घेऊ लागतो व लय भरीव होत जाते. दोघांतील भावसंबंध उलगडत असताना कथा सहजपणे उमलत जाते.

वर वर पाहता ही एक परिचित अशी मध्यमवर्गाची कुटुंबकथा. प्रेमविवाहातही प्रियकराकडून हुंड्याची मागणी केली जाते, व त्यामुळे लग्न मोडते. हुंडा देण्यास मुलीचा बाप असमर्थ असतो म्हणून नव्हे, तर प्रियकर आपल्याला पैशाने मोजतो-प्रेमाचा बाजार मांडतो या कल्पनेने दुःखी झालेल्या प्रेयसीच्या स्वाभिमानी वृत्तीमुळे लग्न मोडते. पण लेखकाला अशीही एक सोपी व ठोकळेबाज कथा येथे सांगावयाची नसून कथेत वावरणाऱ्या पात्रांच्या मनांचा तटस्थपणे वेध घ्यावयाचा आहे, त्यातून माणसाच्या अंतर्द्वंद्वाची एक अर्थपूर्ण आकृती सिद्ध करावयाची आहे.

गणुराया व बेबी यांच्या प्रणयाच्या ऊनसावल्यांचा खेळ मुख्यतः सागराच्या साक्षीने चालतो. समुद्र हा त्यांच्या परस्पर विरुद्ध मनोवृत्तींचे प्रतीकच आहे. त्याच्या मीलनासाठी अत्युत्सुक असलेल्या तिच्या मनाला आतुरतेची सतत भरती येत असते, तर त्याच्या आतुरतेला मात्र प्रतिक्षणी ओहोटी लागत असते. त्यांच्या स्वभावातील हा विरोध अनेक तऱ्हांनी प्रगट होतो. ती कुसुमकोमल मनाची, अत्यंत हळवी व प्रेमभावनेस जिवापाड जमणारी, तर तो सारी कोवळीक सहजपणे पायाखाली तुडविण्याइतका रुक्ष

व कठोर. तिला लाटांवरची संध्याकाळ व त्याच्या केसांवर पडलेली सायं-कालीन पिंगट शोभा मोहवून टाकते, तर त्याला काळाठिक्कर पडलेला समुद्र आवडतो. त्याने आपल्याला जवळ घ्यावे म्हणून अगदी हळुवारपणे आपला हात ती त्याच्या खांद्यावर ठेवते. पण तो मख्खच राहतो. 'मी तुझ्यावर इथल्याइथं बलात्कार केला तर -' असे विचारण्याइतका तो रांगडा, रुक्ष व कठोर आहे. दोघांच्या वृत्तीतील हा फरक निसर्गात प्रति-बिंबित करून खानोलकर त्याची तीव्रता वाढवितात. 'दोघंही उठतात. वरचा चंद्र तसाच एखाद्या शिळ्या भाताच्या मुद्रेसारखा तिथल्या तिथंच' खानोलकरांच्या लेखणीतून चंद्राची अशी उदास प्रतिमा कधी बाहेर पडली नसती. पण त्यांच्या प्रेमाचे वैफल्य सूचित करण्याकरता नितान्त रमणीय चंद्रबिंबाला ते अशी अवकळा आणतात.

समुद्राप्रमाणेच या कादंबरीत माणसांच्या तुफान गर्दीचे उल्लेख सतत येतात. "गर्दी ! गर्दी ! गर्दी ! " चौपाटीवरील माणसांची तुडुंब गर्दी, उतारूंनी गच्च भरलेले प्लॅटफॉर्म्स व टरार फुगलेल्या लोकलगाड्या. पण माणसांच्या या लोंढ्यातही मनुष्य एकाकीच राहतो. या प्रचंड गर्दीत बेबी त्याला डोळ्यातील बाहुलीसारखी घेऊन बसते व तो मात्र दिवसभर तर स्वतःला कामात गाडून घेऊन तिच्यापासून दूर राहतोच पण रात्री पेंगलेल्या डोळ्यांसमोर ती येताच 'चल हट् ! मला झोपायचंय आता' असे म्हणून कल्पनेतही तिला जवळ राहू देत नाही. तिच्यापुढे तो आणि फक्त तोच असतो, तर त्याला त्याचे वडील, आई, बहीण, मित्र, लहान मुले इत्यादी अनेक व्यवधाने असतात.

कादंबरीची सुरुवात 'मी तुझी वाट पहात राहीन. आजच्या-सारखीच उद्याही वाट पहात राहीन' या बेबीच्या सूचक वाक्याने होते. तिला आयुष्यभर त्याची वाटच पाहात बसावे लागणार होते. 'तू इतकी हळवी बिळवी होऊ नकोस ! ... ... ते मला आवडत नाही.' हे गणुरायाचे उद्गार त्यांच्या आयुष्यात पडणाऱ्या भावी अंतराकडे बोट दाखविणारे आहेत. 'उद्या येऊ नको. परवा ये' या त्याच्या वाक्याने दुराव्यास सुरुवात होते. व त्याची ही आज्ञा मोडून दुसऱ्या दिवशी ती चौपाटीवर येते तेव्हा तो तिच्यावर रागावतो व 'तिकडे कोणातरी दुसऱ्याबरोबर बैस जा' असे

म्हणून तिच्या जिव्हारी घाव घालतो. तिच्या डोळयांतून अश्रू घरंगळतात. तरी तो मजेतच असतो. पण तेवढयात दूरवर कोणाच्या तरी मुलाचे रडणे कानावर येताच लगबगीने तिकडे जाऊन त्या मुलांसाठी वाळूचा किल्ला बांधून तो त्याला गप्प करतो. अशा रीतीने एकीकडे बेबीला झिडकारीत असताना दुसरीकडे मुलांच्या रडण्याने व्याकुळ होणाऱ्या त्याच्या मनः-स्थितीचा संदर्भ कादंबरीत सतत येतो, व त्यांच्या प्रेमवैफल्याचे एक महत्त्वाचे कारण सांगून जातो. प्रेमाचे साफल्य विवाहात. विवाह म्हणजे मुलांना जन्म देणे आणि नंतर ओघानेच येणारे मुलांचे हाल अशी कारण-परंपरा त्याचा जीव कासावीस करते. त्यामुळेही तो तिच्यापासून दूरदूर पळू पाहतो. त्याच्या जोडीला पित्याच्या जबाबदारीमुळे पुत्राला आपल्या आयुष्यातील सारी सुखे कशी दूर सारावी लागतात याचा अनुभव तो घेत होताच, त्यामुळे कोणाला जन्म देणे नको असे त्याच्या मनाने घेतले होते. कुत्रीचे विणे, मांजरीचे विणे, डिकुन्हाच्या पत्नीचे व शेजारणीचे गरोदरपण, ह्या साऱ्या उल्लेखांतून जन्म देण्याबद्दल धास्तावलेले, अस्तित्वाला नकार देत असलेले त्याचे मन आपणाला जाणवत राहते. पण त्याच्या मनात माजणाऱ्या ह्या खळबळीची बेबीला काहीच कल्पना नसते. त्यामुळे त्याच्या चमत्कारिक वागण्याने व कठोर थंडपणाने ती भांबावून जात असते. आज तर त्याने तिचा चक्क अपमानच केला होता. त्यामुळे तिचं मन कसं तरी उलटंसुलटं होऊन दुखत राहतं. त्याने आपल्याला ' जळत्या सिगारेटच्या थोटकासारखं ' फेकून दिले म्हणून प्रेमाचा पुनर्विचारही तिला स्पर्शून जातो. ' पुरुषाचा अपमान, चौकट, थोडी बाहेर गेल्ये तर. उद्या ये म्हणून हुकुम, तर आजच गेल्ये, म्हणून एवढा अपमान ? का म्हणून ? कोण सहन करील ? ... काय वाटलं याला ? चौकट. बुरसटलेली ? ' या विचारात गुरफटलेली असताना ती घरचा जिना चढू लागते तेव्हा एका पायरीवर क्षणभर थबकते. जिन्याखालच्या काळोखातील केशवबद्दल तिला वाटत असलेल्या किवेत क्षणभर आपुलकीची भावना मिसळून जाते. तिला पाहिले की केशव नेहमीच विडीचे जळते थोटूक जमिनीवर घासून जणू आपली तिच्याबद्दलची वासना चिरडून टाकण्याचा प्रयत्न करीत असे.

जसजसा काळ लोटत जातो तसतशी त्याच्या बेफिकीर वागणुकीने

बेवीच्या मनाची फरपट वाढत जाते. त्याची निर्विकारता, महिना महिना चौपाटीवर न येणे, तुसडी वृत्ती या साऱ्यांमुळे तिचे मन सतत ठेचाळते, खरचटते व रक्तबंबाळही होते तरीही त्याच्यावरील अपार मायेने ती त्याला समजावून घेण्याचा प्रयत्न करते. त्याच्या विक्षिप्त वागण्याकडे दुर्लक्ष करते. तो भेटत नाही म्हणून व्याकूळ होते. शंकाकुशंकांनी तिचे मन कातरून निघते. 'ती उभी .. हर्ष, आनंद आणि त्यात चंद्राएवढं कारुण्य ... येरे! लवकर ये ... किती शोधू तुला ? येऽऽ! मनाला आपोआपच हाका फुटत होत्या. मीही अखेर स्त्रीच. जरा बरी दिसतेय इतकंच !' ती कशी दिसत होती ? पांढरी शुभ्र साडी नेसून ती चौपाटीवर जाण्यास निघते तेव्हा चाळीतील माणसे 'चंद्राकडे पाहातात तशी तिच्याकडे पाहात होती ... तरणी पोरं आ वासत होती ... गल्लीतील पोरं ... डोळयांसमोर काचेची गोटी घेऊन' तिच्याकडे पहात होती. पण ती चौपाटीवर जाते तेव्हा गणुराया तेथे नसतो. त्याच्या जागी तिसराच कोणी काळाकुट्ट इसम बसलेला पाहून तिला वाटते, 'त्याचाच तर हा खडक झाला नाही ना ! .. ... ... तिचं मन आक्रोश करीत होतं ... खूप लोक तिला सगळीच्या सगळी दृष्टीत घेत, पुन्हा अलगद जागच्या जागी ठेवीत . . . पण काळा इसम कमनशिबी.' कारण तिच्याकडे पाठ करूनच तो उभा होता. गणुरायासारखाच तिच्या मनाला केशवचा विचार पुन्हा चाटून जातो. उगीचच. निराश होऊन ती परत जाण्यास उठते तेव्हा खोताची हाक कानावर येते. त्याचे बोलणे म्हणजे 'वाळू अंगावर उडत आहे.' असे वाटणारे असते. म्हणून ती आपली शुभ्र साडी झटकते. जणू त्याबरोबर त्यालाही झटकून टाकते. त्याने आपल्या पायाभोवती सुरेखसे वर्तुळ काढून घेतले आहे हे पाहून तिला त्याची कणव येते. ती मनात म्हणते, 'पण वेडया ! त्या वतुळात मी कशी राहणार रे ? त्यात फक्त एखादी मातीची कुंडी राहील.' घरी जाते तेव्हा जिन्याखालील 'कोकण्या' दिसतच नाही. आईबाबांना आपली वेदना कळू नये म्हणून ती थोडा वेळ गॅलरीतच उभी राहते.

तिकडे गणुरायावर एकेक जबाबदारी मुसळधार कोसळत असते. तो फक्त स्वतःवरच चिडतो. वडिलांनी आपल्याला जन्म दिला तेव्हा आपण त्यांचे देणे लागतो या कर्तव्यभावनेचा त्याच्यावर एवढा जबरदस्त

पगडा बसलेला असतो की, वडील जे जे मागतील त्यावर प्रतिप्रश्न करण्याची, शंका घेण्याची, त्यात काही काटछाट करण्याची कल्पनाच त्याच्या मनाला स्पर्श करीत नाही. दुर्दैव असे की, कृतज्ञतेने भारावलेल्या अशा या पुत्राला पिता मिळतो तो नेमका अविवेकी, दरिद्री, स्वार्थी, परप्रत्ययनेय व असंतुष्ट वृत्तीचा. त्यामुळे त्याच्या मागण्या सतत वाढतच राहतात. त्या पूर्ण करण्यासाठी गणुराया उरी फुटेपर्यंत कष्ट करतो, महिना महिना प्रेयसीसही भेटत नाही. पण तरीही वडिलांना संतुष्ट करू शकत नाही. गावातील धनाढ्य भेंडयांची बरोबरी करण्याच्या ईर्ष्येने पेटून व मतलबी मित्र बाळोबा याच्या चिथावणीने अंध होऊन वडील मुलावर पैसे पाठविण्याची जबाबदारी अधिकाधिक वाढवीतच राहतात. त्यांच्या मागणीचा आकडा फुगतच राहतो. त्याच्या आईची माया बापाच्या आक्रस्ताळेपणापुढे मुलावरील ओझे हलके करण्यास थिटी पडते. गणूराया मात्र हा सारा त्याग अगदी सहजपणे करीत असतो. बहिणीची जबाबदारीही तो आनंदाने पत्करतो. आपण तिला खूप शिकवू, 'यापुढे तर बाईच्या जातीला शिक्षण हवेच. तिला चांगला नवरा मिळवून देऊ. त्यासाठी खूप पैसा खर्च करू. तिलाही मुलं होतील. होईनात ... आपण असेच राहू. शप्पत... नरजन्म वडिलांनी आपल्याला दिला. नाहीतर आपली धडगत नव्हती. आपण कुणाला जन्म द्यायचा नाही... आपण इस्पितळ बांधायचं व त्याला आईचं नाव द्यायचं . मुलं बापाची नावं लावतात, आईचं नाव कुणी लावत नाही. वडिलांसाठी चिक्कार पैसा मिळवायचा, त्यासाठी शिवलीला, तुकाराम, ज्ञानेश्वरी, गुरुचरित्र वाचायची. शनिमाहात्म्य तर खिशातच ठेवायचं.' असे त्याच्या जीवनाचे तत्त्वज्ञान हळुहळु बनत जाते. पण ही जबाबदारी पार पाडीत असताना त्याला असह्य ताण होत असतो.

'बहिणीचं शिक्षण करायचं,'
'वडिलांना मदत करायची.
कढणाऱ्या मेंदूवर अक्षरं ठसताहेत.'

कादंबरीतील काही उल्लेखांना गणुरायाच्या जीवनाचे प्रतीक म्हणून अर्थ आहे. पैशासाठी स्वतःला समुद्रात झोकून देणारा पाकिटमार मुलगा

म्हणजे गणुरायाच ! पैसा हेच त्याच्याही जीवनाचे ध्येय बनते. त्यापायी तोही स्वत:ला व्यवहाराच्या भीषण सागरात झोकून देतो. शिक्षणक्षेत्र हे पैसा मिळविण्यासाठी नाही याची जाणीव असूनही तो त्याच क्षेत्रात पैसा मिळवतो. रात्रंदिवस शिकवण्या करतो. त्यामुळे बेबीस भेटू शकत नाही. 'मी महिना सहाशे मिळवतो, तेव्हा निदान दहा हजार हुंडा घेण्यास हरकत काही नाही.' 'वडिलांना भेंडयांच्या घरासारखी आपल्या घरावर माडी बांधता येईल. हे स्थळ बरं आहे.' असा विचार करण्यात त्याला काही गैर वाटत नाही. वाळूत किल्ले बांधण्याचा त्याला नाद असतो. आयुष्यातील त्याचे सगळे प्रयत्न वाळूच्या किल्ल्यासारखे कोसळणारे होते. कितीही पैसे दिले तरी त्याचे वडील कधीच संतुष्ट होणार नव्हते, बहीण शिकणार नव्हती आणि त्याचे प्रेमही सफल होणार नव्हते. त्याच्या बोटाच्या फटीतून जशी वाळू निसटून जाते तसे कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या फटीतून त्याचे स्वत्व निसटून जाणार होते.

बेबीचे वडील म्हणजे गणुरायाच्या वडिलांचे दुसरे टोक. काळाची पावले ओळखून मुलीला आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य ते आनंदाने देतात. त्याला भेटण्यासाठी ती चौपाटीवर जाण्यास निघते तेव्हा 'सावकाश ये' हे त्यांचे वत्सल शब्द तिच्या पाठीशी असतात. मुलीने निवडलेला वर पाहण्यास ते उत्सुक असतात. परंतु दहा महिने झाले तरी मुलगी काही सांगत नाही म्हणून अतिशय अस्वस्थ होतात. शेवटी तिला सौम्य स्वरात विचारतात, 'तुझ्यावर आमचा विश्वास ! ... पण आता दहा महिने झाले, अलिकडे तू वाळत चालली आहेस ... त्याला आम्हालाही पाहायचंय.' गणुराया पाहून त्यांना समाधान वाटते. पण त्याने पहिल्याच सलामीला दहा हजार हुंडा मागताच ते थोडे गांगरतात. बेबीला काय वाटेल या चिंतेने व्याकूळ होतात व त्याला अजिजीने सांगतात की 'हे पहा, एक विनंती. हुंडयाबद्दल बेबीला कधीच काही सांगायचं नाही.' गणुराया निघून गेल्यावर बेबीचे आईवडील आपापल्या अश्रूंची एकमेकांना जाग लागू देत नाहीत. त्यानंतर एक दिवस बेबी जेव्हा त्यांना गणुरायाकडे उद्याच्या उद्या पंधरा हजार पोचते करा असे म्हणते तेव्हा ते फक्त आठ दिवसांचा अवधी मागून घेतात व आपल्या

ऐपतीबाहेरची ही रक्कम गणुरायाकडे पोहोचती करतात. तिच्या सुखासाठी वाटेल तो त्याग करण्याची तर त्यांची तयार असतेच पण स्वाभिमान दुखावल्यामुळे गणुरायाशी लग्न न करण्याचो व त्याच्याकडून पैसेही परत न घेण्याची मुलीची इच्छा दिसताच ते पंधरा हजार रुपयांवर अगदी सहजपणे पाणी सोडतात. आणि मुलीला चाकोरीबाहेरचा निर्णय घेऊ देतात. वाट पाहून थकलेला गणुराया त्यांच्याकडे लग्नाचे विचारण्यास येतो. तेव्हा ते त्याला शांतपणे सांगतात, 'हे बघा, आम्हाला मुलगी झाली. हो की नाही ? तिची किंमत आम्ही भरली-पंधरा हजार. तुमच्या ऋणातून ती मोकळी झाली. तुम्ही आता हवा तर चहा घेऊन जा.' मुलीसाठी एवढा त्याग व सोशिकपण दाखविणारे बेबीचे वडील कुणीकडे व 'लग्न मोडलं, पंधरा हजार परत करा!' या गणुरायाच्या पत्राला– 'मी माडीचे सामानसुमान, लाकूड वगैरे खरेदी केले ... बाळोबा म्हणतात, 'आपण काही मुलीच्या बापाकडे पंधरा हजार फुकट मागितले नाहीत. त्यांनी ते दिले. त्या अर्थी मुलीतच काहीतरी खोड असणार ... बाळोबांनी स्थळ आणले आहे. मुलगी गरीब आहे, नाकाडोळ्यांनी बरी आहे;'–असे निर्लज्जपणे उत्तर देणारे गणुरायाचे वडील कुणीकडे ?

गणुरायाशी लग्न न करण्याच्या निर्णयावर बेबी काही एकाएकी येत नाही. वैतागाने येत नाही. सुखासुखी तर नाहीच. तर स्वाभिमानामुळे येते व आपण होऊन दारुण मनोभंग पदरी घेते. वास्तविक ती वर्ष-दीड वर्ष प्रेयसीच्या भूमिकेतून त्याच्याशी सतत तडजोड करीत असते. त्याच्या–बद्दलच्या अनावर ओढीने चौपाटीवर जातच राहाते. अपमानही गिळते. तो केव्हातरी येईलच या आशेने त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसते. तिच्या अपेक्षेप्रमाणे दोन महिन्याच्या दीर्घावधीनंतर का होईना, पण तो चौपाटीवर येतो त्याला पाहाताच ती अगदी हरखून जाते. त्याच्या येण्याचे कारण मात्र अगदी वेगळेच असते. शेजारचे जोडपे कुलपात मुले ठेवून कचेऱ्यांत जातात. त्यांच्या उरावर थेरडीही ठेवतात. ती त्या मुलाना धपाटे घालते. ती किंचाळतात, रडतात, त्यांचे करुण डोळे गणुरायाला बघवत नाहीत. त्याला वाटते, 'काय अपराध केला त्यांनी ? पैसा. पैशानं यांना ही शिक्षा दिली.' तो थेरडीला दम भरतो. त्याच्या मनात येते,

'मुलं नकोत आपल्याला .' त्याला मुलांचे रडणे ऐकवत नाही, तो डोळे मिटून बिलकूल हळवा होऊन जातो. तो म्हणतो, 'पोरांना रडवू नये. पोरं निर्मळ मनाची असतात... पोरांना मारू नये.' पण शेजारचे जोडपे मुलांना बदडतच असते. अशा मन:स्थितीत असतानाच तो चौपाटीवर आलेला असतो. बेबी दिसताच तो तिला विचारतो, 'तुला काय हवंय् ? मुलगा की मुलगी ?' बेबी लाजते आनंदून त्याच्याजवळ सरकते व 'मुलगा' असे पुटपुटते. तेव्हा तो फटकन् दूर होतो व पुटपुटतो, 'मुलगा? मुलगी? थेरडी! लग्न नको, मूल नको, मुलगा नको, मुलगी नको'. ती अगदी बावचळून जाते कोमेजते. 'उद्याला येऊ ?' म्हणून आशेने विचारते. पण त्याला मात्र वाटत राहते, 'लग्न ? ते कशाला ? मुलं ? ती कशाला ?' तो अधिकाधिक ठाम होत होता. आणि ती 'पानीफुली' यायला पाहात होती. तो असा उदासीन पाहून तिला प्रश्न पडतो, या खडकाला पाझर कसा फोडायचा ? याचा नादच सोडून दिला तर ... खोत चांगला नाही का याच्यापेक्षा .. यानं खूप छळलं. किती म्हणून विनवणी करायची ? तरीही घरी गेल्यावर तिला त्याचा मनमोकळा अभिमान वाटतच राहतो 'त्याच्या पायाखाली वाळवंट आहे... त्याचे नियम स्वतःचे त्याचेच आहेत ... ... ती मनसोक्त त्याची सूक्तं मनात गाते.' केशव व खोत या दोघांनाही हात लावून तो पोकळ करून टाकील. या कल्पनेने मनाशीच हसते व त्यालाच मनात घोळवीत राहते. आणखी चार महिने सरकतात. तिचे नेहमीच्या ठिकाणी येऊन वाट पहाणे चालूच असते. पण केशवला पाहून ' कधी कधी बेबी म्हणते, याच्या जिन्याखाली थाटावा संसार, ... ... कशाला ही प्रतीक्षा ! कशाला हा कंठशोष ? पण त्यातच ती चिवट होत होती पुन्हा पुन्हा कचेरी, पुन्हा पुन्हा चौपाटी. ' खोत आपल्या घरी येऊन गेला हे कळताच तिला त्याची दया येते व दोन दिवसांनी चौपाटीवर तो दिसताच तिला वाटते, 'याचे हे डोळे, किती गरीब. हे दोन दिवे केव्हाही मालवतील. त्या दिव्यांना कुणीतरी पदर द्यायला हवा. नाहीतर..... ' तिला सांगून टाकावेसे वाटते 'चला आपण लग्न करू!' पण क्षणभरच. गणुरायावरील तिचे प्रेम अढळ असते. प्रगाढ असते तेव्हा शेवटचा प्रयत्न म्हणून ती नाइलाजाने त्याला पत्र लिहिते.

'प्रिय – ?

मी बेबी. भीती वाटत्येय. पण पत्र लिहिते ... येऊ मी खोलीवर? नको ?

लिही ! मी तुला विसरूच शकत नाही, खरंच रे ! तुझ्याशिवाय कशी जगू मी ? अजून जगते आहे. इतका निर्दय नको होऊ. मी इतका अपराध केला तुझा ? ... ... वाट पाहतेय. तुला अखेरचे विचारायचेय. '

'तुझी बेबी '

बेबीचे पत्र पाहताच त्याचेही मन कुठेतरी थोडेसे कुरतडले जाते. तो उत्तर लिहितो,

'स. न. वि. वि.

तू ये. रविवारी दुपारी मी खोलीवर मिळेन. दोनच्या नंतर मी भेटणार नाही. दोनपर्यंत ये.

ग. बा. धोंड '

पत्र मिळताच गुलाबी साडी नेसून बेबी मोठ्या उत्साहाने त्याच्या घरी जाते. पण तो मख्खपणे विचारतो, काय काम आहे ? हा त्याचा कोरडा प्रश्न ऐकून बेबी हादरते. तिला सरळ सरळ वाटतं. 'या माणसाला नकार द्यावा. हा नुसता खडक आहे.' पण तेवढ्यातच ज्या त्याच्या दुर्लभ शब्दां-साठी ती आसुसलेली असते ते शब्द तिच्या कानावर पडतात, 'लग्न ठरलंय आपलं.' ती अंतर्बाह्य मोहरते. पण घड्याळ पाहून तो जेव्हा म्हणतो, 'आता थांबता येणार नाही मला.' तेव्हा ती मोठ्या कष्टाने बाहेर पडते. 'एखाद्या दुकानातून सौदा पटवून मागं फिरावं ' तशी ती माघारी फिरते.

चौपाटीवर येताच खोत भेटतो व तिला विचारतो, 'लग्न करायचं ना ? ' बेबीची मान इकडच्या अल्याड तिकडच्या पल्याड फिरली. खोत हबकला.. बेबी नकार देऊन गेली ... 'जिन्याखालचा केशव गोवरीसारखा संपत चालला होता.' या घटनांतून आत्यंतिक निराशेच्या क्षणी तिच्या मनात पळभर डोकावून गेलेल्या व्यक्ती आता तिच्या जीवनातून पूर्ण बाद

झाल्याचे सूचित होते. यानंतर तिची सारी तितिक्षा विफल करणारा विदारक प्रसंग तिच्यावर ओढवतो. गणुरायाला त्याच्या वडिलांचे पत्र येते की, 'दहा हजारात वाढ झाल्यास बरी.' तेव्हा गणुरायाला वाटते, 'पंधराही मागायला हरकत नव्हती.' त्याला आणखी प्रश्न पडतो की, बेबीला हुंड्याबद्दल काही सांगावयाचे नाही असे का? 'आपण काही दहा हजारांची चोरी करीत नाही आहोत. हक्कानं मागतोत.' बिचारी बेबी लग्न ठरल्याच्या आनंदात मोठ्या उत्साहाने त्याच्या घरी जाऊन 'ए ऽ ऽ मी आलेय' असे म्हणते. त्यावर 'का आलीस? ... ... पंधरा हजार तरी सांग वडलांना; दहा हजारात काय होतंय, बाबांचं पत्र आलंय.' ही त्याची वाक्ये कानावर पडताच तिच्या कल्पनेतील गणुराया व प्रत्यक्ष गणुराया यांतील महदंतर पाहून तिला फार मोठा धक्का बसतो व ती मागच्या मागे निघून जाते. घरी जाऊन वडिलांना त्यांच्याकडे पंधरा हजार पोचते करण्यास सांगते आणि समुद्रावर जाऊन स्वतःला समजावीत राहते. 'मी एक मुलगी. मी नोकरी करीन. मी एक मुलगी म्हातारी होईन.'

गणुरायाला वाटते, पंधरा हजार मिळाले. 'शनिमाहात्म्य पावलं... पंधरा हजार. पाण्यात द्वारका सोन्याच्या खारका... लग्न करायला हवं... आपल्याला आपण विकून घेतलं..' पण तीन महिने झाले तरी बेबी लग्नाची गोष्ट काढीत नाही, म्हणून तो तिच्या घरी जातो व 'लग्नाचं काय' म्हणून विचारतो. तेव्हा आयुष्यभर उराशी जपलेले स्वप्न साकार होण्याची प्रत्यक्ष संधी सामोरी आली असताही ती क्षणार्धात त्याला सांगते, 'पंधरा हजार मिळाले ना? मग आता काय? ... मी तुझं देणं लागत नाही. मी छान आहे. आता स्वस्थ आहे. मी एक मुलगी–' त्यानंतर आत जाऊन तिच्या जीवनातील सर्वोच्च आनंद जो विवाह त्याचे प्रतीक असा हिरवा पोषाख, हिरवा चुडा घालून व हिरवीच पर्स घेऊन बाहेर येते. 'बेबी! पाहू –' या गणुरायाच्या हाकेनेही विरघळत नाही. उलट 'वडील येतील आता... आलेच ते बघ' असे म्हणून त्याला टोलवते व 'समुद्रावर जाते' असे वडिलांना सांगून निघून जाते. या तिच्या कृतिउक्तीतून, 'मी आनंदात आहे. पराभूत नाही' असे ती त्याला सुचवीत असावी. तसेच चौपाटी म्हणजे

त्यांचे संकेतस्थळ. पण तेथील स्मृतींनी व्याकूळ होण्याइतक्या आपण कम–कुवत नाही हेही ती त्याला दाखवीत असावी. तिचा हा सारा बाणेदारपणा विलक्षण आहे. वास्तविक गणुरायाने तिला अनेकदा दुखावलेले असूनही ती पुन: पुन: तडजोड करीत होती. पण तिच्या या तडजोडींना एक लक्ष्मणरेषा होती. हुंडा मागून गणुरायाने ती ओलांडताच तिचा स्वाभिमान वर उफाळून येतो. तडजोड संपते. कारण जेथे व्यवहार सुरू होतो तेथे प्रेम संपते. खानोलकरांच्या इतर नायिकांप्रमाणे ती अतिरेक करीत नाही. लाचारी तर नाहीच नाही. प्रेमभंगामुळे झालेल्या आत्यंतिक वेदना आतल्या आत गिळण्याचे सामर्थ्य तिच्याजवळ असते. आपल्या दु:खाचे प्रदर्शन तर ती करीत नाहीच, पण चेहऱ्यावर त्याची छटाही उमटू देत नाही. एवढेच नव्हे तर आपल्यावर अपार माया करणाऱ्या आईवडिलांपुढेही ती आपल्या अश्रूंना वाट वरून देत नाही. आयुष्यभर वहात राहणारी जखम होऊनही बाह्यत: शांतच राहाते. स्त्रीचे हे एक आगळेच सामर्थ्य खानोलकर येथे दाखवितात. त्यामुळे ही कादंबरी एका वरच्या पातळीवर जाते. गणुराया येताच हिरवा पोषाख करण्याचा तिने घेतलेला निर्णय तिची फार मोठी योजकता दाख–वितो. अनेक पृष्ठे लिहूनही जे साधले नसते ते केवळ तिच्या हिरव्या पोषाखातून साधले जाते.

गणुरायाही आपली सहानुभूती मिळवून जातो. दु:ख सोसण्याचे त्याचेही बळ विलक्षण आहे. दोघांच्या वाटचालाला अपार दु:ख येते, पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वेगवेगळे कंगोरे असतात. गणुरायाच्या व्यक्ति–मत्त्वाला अनेक परिमाणे असतात, तर बेबीची वाटचाल एकाच दिशेने होत असते. कौटुंबिक जबाबदाऱ्यांनी वाकलेल्या गणुरायाला मित्राची चिंता कासावीस करीत असते. कडक उन्हात चालत असताना त्याच्या अनेक आठवणी त्याच्यावर छत्री धरत असतात. लखुराया परागंदा झालेला असतो. वडिलांच्या एका पत्रातून तो मेला असेही कळते. त्याला दिलासा देणाऱ्या बेबी व लखुराया या दोन्हीही व्यक्ती त्याला दुरावतात. आपण पुन्हा नोकऱ्या करून बेबीचे पैसे फेडावयाचे असे तो ठरवितो व मोठमोठ्या अक्षरात वडिलांना पत्र लिहितो. 'तुम्ही आणि बाळोबांनी बघितलेली मुलगी पसंत.

मुहूर्त कळवा. मी येतो. आंधळी असली, मुकी, बहिरी असली, लंगडी–पांगळी असली तरी चालेल.' म्हणजे ही एक प्रकारची त्याची आत्महत्याच ! आपल्या कमकुवतपणाची त्याला विलक्षण टोचणी लागते. 'लखू कुठं गेला ? बेबी कुठं गेली ? त्यांनी आपले दिवे आपण लावले... आपली घरटी आपणच बांधली. आपण काय करणार ? आपली द्वारका पाण्यात.'. त्याच्या डोळ्यात अश्रूंचा पूर दाटतो. पण तो अश्रू ढळू देत नाही. तो सारा पूर डोळ्यांतच थोपवून धरतो. आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधून आपल्यापुरता काळोख करून घेतो व आपले जीवन आपल्यापुरते संपवतो. गांधारीची पट्टी येथे आठवून जाते.

आपले काय चुकले हेच गणुरायाच्या अखेरपर्यंत नीटसे लक्षात येत नाही ही त्याची खरी शोकांतिका आहे.

□ □

# ७. ‘ चानी ’ : सुन्न करणारी शोकांतिका

‘ गणूराया ’ सह एकाच वेष्टनात अवतरलेल्या ‘चानी’ या कादंबरीची प्रकृती पूर्णतः भिन्न आहे. या कादंबरीत एक तीक्ष्ण, धारदार व अतिकरुण अनुभव त्याच्या सर्व अंगोपांगांसह मूर्त झाला आहे. कमीत कमी साधनांनी जास्तीत जास्त परिणाम साधणारी कला ती उत्कृष्ट कला या श्री. कृ. कोल्हटकर यांच्या निकषाची साक्ष येथे पटते. अनेक वर्षे लोटूनही चानीच्या वियोगाने तळमळत असलेल्या दिनूचे कादंबरीच्या आरंभीच आलेले आर्त आक्रंदन वाचकाला प्रभावीपणे आकृष्ट करते, व पुढे अत्यन्त वेगाने, पण अगदी सहजतेने, उलगडणारे चानीचे रम्यभीषण जीवन त्याला एवढे घट्ट पकडून ठेवते की त्याचे काळाचेच नव्हे तर स्वचेही भान हरपते.

उंची अत्तराच्या एका थेंबाने सारे वातावरण भारून जावे तसेच चिमुकल्या चानीच्या लोभसवाण्या व्यक्तिमत्त्वाने आपण विलक्षण हरखून जातो आणि क्षणार्धात तो सुगंध वाऱ्यावर विरलेला पाहून पूर्ण बधीर होतो. अप्रतिम लावण्य व पोरकेपणा या पायी चानीला अपार दुःख भोगावे लागते. ‘ रात्र काळी . . . ’ तील जाई व. बकुळ आणि ‘ त्रिशंकू ’ तील सुशी ह्या चानीच्या धूसर पूर्वाकृती. जाई व सुशी ह्या भाविणींच्या मुली व बकुळ हा बांधावर सापडलेला एक अश्राप जीव. म्हणून असह्य यातनांचा चरचरीत

डाग या तिघींच्या भाळांवर दिला जातो. ती जखम मृत्यूची किंमत दिल्या-वरच वाहण्याची थांबते. अशा या असाहाय्य किशोरींच्या जीवनातील कारुण्य खानोलकरांच्या हृदयास आरपार भेदून जाते. ह्या दुःखाचा सूर 'चानी' मध्ये त्यांना नेमका गवसल्याचे दिसते. आरंभापासून अखेरपर्यंत या सुरावरील त्यांची पकड येथे घट्ट असल्याचे जाणवते.

चानी हे लेखकाचे आवडते प्रतीक. जिव्हारी भिडणारे, अर्थाची अंनेक वलये सामावून घेणारे, नावातच निरागसता, चापल्य व आकर्षकता गर्भित असलेले. झुपकेदार शेपटीची सुंदर उभे पट्टे रेखलेली, मोठ्या चपळाईने वावरणारी, मागील पायांवर डौलदारपणे बसून पुढील पायांनी आकर्षक हालचाली करीत फळे खाणारी, कोणाचेही भक्ष्य होऊ शकणारी, पण त्याची मुळीच जाणीव नसल्यामुळे निःशंकपणे बागडणारी खार त्यांच्या कादंबऱ्यात अनेकदा आढळते. 'त्रिशंकु' मध्ये सुशीच्या दुःखाने व्याकुळ झालेला नानू म्हणतो, "अंगणातल्या फणसाच्या एका तिढ्या फांदीवर एक चानी आली होती. एवढ्या मोठ्या फुफाट्यात तो जीव चपळपणे वावरत होता. विश्वाच्या रहस्यासारखा हाती सापडायला कबूल नव्हता . . . एक होती चानी आणि दोन होते कावळे. आणखीनही खूप चान्या असतील आणि आणखीनही खूप कावळे असतील." प्रस्तुत कादंबरीची ही नांदी असावी का ? हिच्यातील चानीलाही आप्पा बामण व आठवले मास्तर हे दोन कावळे सतत टोचा मारून अखेर उद्ध्वस्त करतात.

कादंबरीचे निवेदन दिनूच्या मुखाने करण्यात लेखकाने अभिव्यक्तीची गरज नेमकी हेरली आहे असे वाटते. प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या आठ-दहा वर्षांच्या दिनूची पंधरा-सोळा वर्षांच्या चानीशी योगायोगाने भेट होते. एखाद्या परीसारखी दिसणारी हसरी, लाघवी चानी त्याच्या बालमनाला मोहित करते. त्याच्या निष्पाप प्रेमाचे पोरक्या चानीलाही अप्रूप वाटते. या आपुलकीचे रूपांतर बहीणभावाच्या नितळ नात्यात होते. अल्पावधीतच हे नाते इतके दृढ होते की चानीचे सुखदुःख केवळ तिचे एकटीचे राहातच नाही. तिच्या जीवनातील उलथापालथ लहानग्या दिनूचे सारे विश्वच बदलून टाकते. आणि चानीच्या अचानक अंताने सारा खेळच विस्कटला जातो—

आटोपतो. पण या दोन निरागस जीवात निर्माण झालेला निरपेक्ष प्रेमाचा धागा एवढा अतूट असतो की दिनू पुढे आयुष्यात चानीला विसरू शकत नाही. तिच्या अनेक आठवणी त्याचा सतत पाठपुरावा करून त्याला व्याकुळ करतात. तो म्हणतो, "तिला टाळणे अशक्य आहे. आणि मुद्दामहून टाळावे असे तिच्या हातून काही घडलेही नव्हते. ती चुकून या जगात जन्माला आली एवढेच." त्याच्या मते चानी म्हणजे "असह्य कर्माच्या कहाणीचा ठणका. पोवळ्यासारख्या ओठात दाबून बसलेली, या संस्थानच्या राजपुत्राची राणी होऊ पाहणारी. सुंदर चित्रे काढणारी, एक अत्यंत देखणी षोडशा." तिच्या वियोगाने त्याला होणाऱ्या असह्य ताणातून त्याचा स्मृतिपट अलगद उलगडला जातो व आपल्यासमोर चानी साकार होते. तिची चित्तथरारक विविध रूपे द्रुतगतीने आपल्या डोळ्यांपुढून सरकतात व चानी दिनूप्रमाणे आपलाही पूर्ण कब्जा घेते. सर्वांगांनी उमलू पाहणाऱ्या चानीच्या जीवन–पुष्पाला प्रफुल्लित करणाऱ्या आणि कोमेजून टाकणाऱ्या संवादी–विरोधी शक्तींच्या ताण्याबाण्यातून कादंबरीचे पोत तयार होते. चानी व दिनू यांच्या संबंधात येणाऱ्या विविध व्यक्ती, त्यांच्या वासना, समजुती व अंधश्रद्धा आणि त्यामुळे चानीला भोगावा लागणारा मृत्युदंड या साऱ्यांच्या नेटक्या व नेमक्या आविष्काराने कादंबरीला रेखीव व सुबक घाट मिळतो.

सोनेरी पिंगट केसांची, गव्हाळ कांतीची, हसऱ्या गुलाबी जिवणीची, निळ्याभोर डोळ्यांची चानी प्रथम आपणास भेटते ती डोकीवर शेणाची पाटी घेऊन "मास्तरानू, मी इलंहय. जमीन सारवोची आसा मा? ... मास्तरानू, मांका बोर्डाखालच्यो ते खडवाचे कांडचो दितास?" असे शाळेच्या खिडकीतून डोकावून विचारण्याच्या पवित्र्यात. मूर्तिमंत सौंदर्य व शेणाची पाटी यांची ही सांगड तिच्या दुर्दैवी भूतभविष्याची भेदक जाणीव करून देते. तिच्या जीवनप्रवासास आरंभ होतो तोच मुळी गळक्या होडीतून. अनौरसपणाचा डाग घेऊनच ती जन्मास येते. "स्वातंत्र्ययुद्धातील इंग्रजांच्या पिसाट सुटलेल्या अँग्लो इंडियन सोल्जराने भर रानात एका मोळीवाल्या बाईवर बलात्कार केला आणि त्यातून ईश्वराला या चानीचा सुंदर देह घडविता आला." आईच्या ह्या पापामुळे गावात पटकी आल्याच्या समजाने

व त्या समजास देवीच्या कौलाचा पाठिंबा मिळाल्यामुळे शेजाऱ्यांनी पाठोपाठ तिच्या आईला नदीत बुडवून चानीला संपूर्ण पोरके केले. तिचे हे सर्वस्वी निराधार व उपेक्षित जीवन लेखक अवघ्या दोन प्रसंगात शब्दबद्ध करतो. तिच्या लोभसवाण्या व्यक्तिमत्त्वाने आकर्षित झालेला दिनू तिला खडू देताना जेव्हा म्हणतो, "ती शेणाची पाटी उतर ना खाली. ओझं होत असेल तुला." तेव्हा एखादी हरवलेली वस्तू अनेक वर्षांनी अचानक सापडल्याप्रमाणे ती तल्लीन होऊन त्याच्याकडे पाहात राहते व तिचे डोळे भरून येतात. त्यानंतर काही महिन्यानी तो जेव्हा तिला "ताई" म्हणतो तेव्हा ती इतकी गहिवरते की अत्यंत आनंदून आवेगाने त्याला मिठीत घेते व थरथरत्या हाताने केसावरून, भाळावरून, पाठीवरून त्याला कुरवाळते. ह्या दृक् व स्पर्शसंवेदनातून निरपेक्ष प्रेमासाठी आसुसलेले तिचे मन अलगदपणे वाचकांच्या मनास जाऊन भिडते. येथे प्रत्यक्ष अनुभवच जसाच्या तसा वाचकांपर्यंत संक्रमित होतो. तसेच या प्रसंगातून आतापर्यंत तिच्याकडे फक्त तुच्छतेने व वासनेने पाहणाऱ्या असंख्य नजराही लेखक आपल्यासमोर उभ्या करतो. तिच्या या अथांग प्रेमाने दिनू पूर्ण भारला जातो व भांबावतोही. कारण अशी सुंदर, प्रेमळ व शाहणी चानी आठवले मास्तर व दुष्ट आप्पा बामण यांच्याकडे का जात असते हे त्याला कळत नाही. त्याला माहीत नव्हते की चानीचे मन परीकथांचे अद्भुत विश्व व कठोर वास्तव यात आंदोलत होते. म्हणून एकीकडे राजपुत्राशी लग्न करण्याचा आपला बेत तिला हास्यास्पद वाटत नाही, तर दुसरीकडे तारुण्याच्या उंबरठ्यावरील तिच्या वयास कठोर वास्तवही खुणावीत असताना त्याच्या आहारी न जाण्याचे शहाणपणही तिला सुचू शकत नाही. प्रौढ, जबाबदार व तिला पिता म्हणून शोभणारे आठवले मास्तर व आप्पा बामण तिच्या पोरकेपणाचा फायदा घेऊन तिची पावले भलत्या मार्गाकडे वळवितात. विद्यार्थ्यांना बुद्धीचा चांगला उपयोग करावयास सांगणारे आठवले मास्तर व पहिला नंबर येणाऱ्या विद्यार्थ्यास देवाधर्माचे पुस्तक बक्षीस देणारा व मुलांनी पाखरे मारू नयेत असे सांगणारा गावातील धनाढ्य आप्पा सावकार या दोघांच्या पिसाट वासना या अर्धवट उमललेल्या कळीस चुरगळून टाकतात. अकाली चाळवलेल्या व सतत धगधगत ठेवलेल्या आपल्या विषयवासनेस

आवर घालण्याची कल्पनाही चानीला शिवत नाही. कारण त्याच्या दुष्परिणामाची त्या किशोर वयात व अनाथ अवस्थेत तिला मुळी जाणीवच नसते. म्हणून तर बिळातून बाहेर पडलेल्या पिवळयाधोम नागाला अत्यंत चपळाईने पकडून टाचेखाली ठेचणारी ही निर्भय चानी स्वत: मात्र वासना-सर्पाची शिकार बनते. रामाच्या कोंडीतील भयंकर जबड्याच्या सुसरीपासून स्वत:चे संरक्षण करू शकणारी ही किशोरी क्रूर आप्पा बामणाच्या जबड्यात आपणहून चालत जाते. त्यात काही गैर आहे व धोका आहे असे तिला क्षणभरही वाटत नाही. दिनूला ती अगदी सहजपणे सांगते की, " आपा बामण माका मनापासून आवडता. '

तिला हवाहवासा वाटणारा पण न सोसवणारा ताण लेखक दोनच दृश्यातून प्रभावीपणे आपल्या मनावर बिंबवतो. शाळेच्या खोलीत मेण-बत्तीच्या प्रकाशात " आठवले मास्तरांच्या मिठीत एखाद्या केळीच्या पाना-सारखी चानी थरारत होती. " " चानी थकल्यासारखी माडीच्या कठड्यावर छाती टेकून राहिली होती ... ... डोळयातील काजळ तिच्या गव्हाळी गालावरही उतरले होते आणि तिच्या पोवळचा रंगाच्या ओठातून रक्तही फुटले होते. " या शारीरिक असह्य ताणाबरोबरच आप्पा बामणाने 'पाप' या शब्दाची विलक्षण टोचणी तिच्या अजाण मनाला लावून तिला अंतर्बाह्य कासावीस केले होते. आपण पापी असल्याची खंत तिला भाजून काढीत होती. " पापी आसंय ना मी. " असे मोठ्या दु:खाने ती दिनूला सांगते - त्या शब्दांच्या अर्थाचा खुद्द तिलाही नीटसा बोध होत नव्हता. पण तरीही ती व्याकुळ होत होती. कारण आप्पा बामणावरील तिचे प्रेम व विश्वास. त्याचा दुष्टपणा अखेरपर्यंत तिच्या लक्षात येत नाही. अगदी कोवळचा वयात त्याने तिला घातलेली मोहिनी व लावलेली विषयाची चटक यामुळे तो तिचे सर्वस्व होतो. इतका की त्याच्यावरील तिच्या प्रेमास प्राणाचे मोल द्यावे लागूनही अखेरपर्यंत तडा जात नाही.

अशी ही भाबडी व प्रेमळ चानी एक दिवस आप्पा बामणाने दिलेल्या चांदीच्या साखळचा पायात घालून दिनूला मासे देण्यासाठी प्रेमाने त्याच्या घरी येते. दिनू म्हणतो, " आज आठवताहेत ती लोभस, खुळी पावले.

चांदीच्या साखळचा त्यावर कशा चांदण्याच्या चुण्या पडाव्यात तशा दिसत होत्या." पण तिचे दुर्दैव असे की मोठ्या आपुलकीने दिनूच्या घरी ती येण्यास व त्याच्या घरावर संकटे कोसळण्यास एकच गाठ पडते. आणि ते अनर्थ तिच्यावर लादले जातात. त्याचा मोठा मामा म्हणतो, "ती भोसडीची चानी इथं आली आणि गायीचा सत्यानाश झाला. आईचे दोन्ही गुडघे मोडले तुला दिगल्यानं मारला... सगळं घरच ढेपाळलं." गाय आंधळी झाली म्हणून कळवळणारा हा मामा चानीच्या बाबतीत मात्र पूर्ण निष्ठूर होतो. धाकटा मामा तर दुष्टच होता. तो म्हणतो, "चेटकीण आहे ती–चेटकीण. मी तुम्हाला विचारतो, माणूस इतकं असेलच कसं देखणं ? माझं मत आहे, हे देखणं माणूस गावात पाप माजवणार. हिचा काटा काढायला पाहिजे." तेवढ्यात चानीने देऊळ बाटविल्याची बातमी बाहेर फुटते व देवीला कौल लावला जातो. छोट्याशा दिनूला मात्र प्रश्न पडतो, "एखादे माणूस नुसते घराच्या अंगणात आले की घरावर संकट कसे काय येते ?" तसेच "चानी देवळात गेली म्हणून काय झाले ? ती काय एकटीच गेली नव्हती. तिच्याबरोबर आप्पा बामणसुद्धा होता." "एका चानीला उद्ध्वस्त करण्यासाठी उभा गाव देवळात उभा राहतो." देवीही त्यांना कौल देते, याचे त्याला आश्चर्य वाटते. म्हणून तो धावत चानीला सावध करण्यास जातो. पण ह्या अजाण, अशिक्षित चानीची नीतिमूल्ये तिच्याचसारखी निर्व्याज असतात. म्हणून ती म्हणते, "मी गावाचा कय्येक करूंक नाय...... बायल माणसाच्या अंगावर हात टाकूक लोक इतके खुळे नाय आसत. मी देवीच्या पाया पडाक इल्लय भावाशी, मी राजाकडे जातय. आठवण ठेव माझी." पण अशा या निष्पाप जीवाला, ज्याच्या खांद्यावर तिने विश्वासाने मान टाकली होती, तो आप्पा बामण खवळलेल्या जनसमुदायासमोर क्रूरपणे ढकलून देतो व असंख्य लाथाबुक्यांखाली तो सुंदर देह निर्दयपणे तुडविला जातो व शेवटी देवळात हत्या केल्याचा गुन्हा घडू नये म्हणूनच मार थांबतो. अशा या असहाय्य जिवाला सावरू कोण पहातो ? चिमुकल्या दिनूचे दोन कोवळे हात ! प्रक्षुब्ध जनसमुदाय निघून गेल्यावर आप्पा बामण पुन्हा चानीजवळ येतो तेव्हा तो दिसताच त्याच्या गळ्याभोवती हात

टाकून ओक्साबोक्सी रडत ती अत्यंत प्रेमाने व विश्वासाने त्याला गच्च बिलगते व त्याच्या मिठीत विसावू पाहते. त्या भोळ्या-भाबड्या जिवाला एवढ्या अनुभवानेही अंधकुशी शंकाही येत नाही की आपण काळालाच मिठी मारत आहोत. आप्पा बामणाच्या बोलण्यातून हृदयाचे पाणी पाणी करणारी आणखीही एक भयानक घटना मनाला स्पर्शून जाते व आपला थरकाप होतो. चानीला तो म्हणतो, "तुला आता त्यांनी शिक्षा केली आहे. तुझं पाप धुऊन निघालं. आता चल. मी तुला आपल्या नेहमीच्या ठिकाणी नेतो. आणि तुला आता दोन दिवसांत खडखडीत बरी करतो." यातील 'आपल्या' व 'नेहमीच्या ठिकाणी' हे शब्द फार काही सांगून जातात. तशाही स्थितीत त्याने आपली अखेरची वासना तृप्त केल्यामुळे तिचा अंत झाला असला पाहिजे. जखमेवर मीठ, आगीत तेल, इत्यादी साऱ्या म्हणी निष्प्रभ ठराव्या अशी ही भीषण घटना! तिचे प्रत्यक्ष वर्णन न करता केवळ दोन शब्दांतून ते सुचविण्यात लेखकाची कलात्मकता तर असेलच; पण चानीवर अगाध माया असलेल्या खानोलकरांची लेखणीच इथे थबकली असेल! जागच्या जागी गोठून टाकणारा चानीचा दारुण अंत एका वाक्यात पेलण्याचे त्यांचे सामर्थ्य विलक्षण आहे. "आणि दुसऱ्या दिवशी रामाच्या कोंडीवर चानीचे प्रेत तरंगत असलेले लोकांनी पाहिले."

या दुष्ट आप्पा बामणाच्या विरोधी लयीत असलेला प्रेमळ गंगाराम होडीवाला आपल्याला चटका लावतो. शरीराने अती आडदांड, काळा-कभिन्न, रुंद खांद्याचा, कमरेभोवतीच्या पट्ट्यात तीक्ष्ण धारेचा रुंद कोयता बाळगणारा, नदीतील सुसरींना हटविण्याकरिता वीज कोसळल्यासारखी आरोळी देणारा, पण मनाने अत्यंत हळवा, मृदू व प्रेमळ. चानीच्या आईला लोक नदीत बुडविताना बापुडवाणा होऊन दिङ्मूढ झालेला व तिच्यामागे चानीला पित्याच्या वात्सल्याने वाढविणारा, चानीबद्दल विलक्षण अभिमान असलेला. त्याच्या आरोळीने भ्यालेल्या दिनूस तो म्हणतो, "चानू आमचा, काय एक भयभिती नाय तेका." परंतु चानीला बाहेर धोका होत आहे याची माहिती नसलेला. शिवाय आत्मविश्वास

एवढा जबर की चानीच्या मागे आपली बलदंड शक्ती उभी असल्यामुळे तिला धक्का लावण्यास कोणी धजणार नाही व धजावल्यास आपण त्याचा नायनाट करू अशी खात्री असलेला. म्हणून दिनूला तो म्हणतो, "काय रे पोरा, आमचा चाना सगळ्या गावाकच आवडता काय रे? पण याक लक्षात ठेवा हां. चान्यावर ओगीचच वाकडं डोळं करून बघशांत तर एकाएकाक ह्या नदीत बुडवुन मारीन हां." अशा या वेड्याबागड्या जिवाला जेव्हा एक दिवस त्याच नदीत चानीचे प्रेत तरंगताना दिसते तेव्हा तो वाचाच हरवून बसतो. चानीवर विलक्षण जीव व तिला वाचविण्यास भरपूर शरीरबळ आणि धैर्य असूनही तिचा सर्वनाश झालेला पाहण्याचे त्याच्या नशिबी येते. उलट क्रूर, विषयांध पण कावेबाज आणि सावध आप्पा बामण चानीला मातीला मिळवूनही स्वत: नामानिराळा राहू शकतो. दुष्टतेने सुष्टतेवर केलेली ही मात चांगुलपणातील दुबळ्या जागांवर नेमके बोट ठेवून वाचकांना सावध करते.

चानीच्या जीवनप्रवाहाशी संवादलयीत झुळझुळणारा मामीचा जीवन-प्रवाह. अर्थात् चानीच्या जीवनप्रवाहात धबधब्याचा खळखळाट, विलक्षण धार, डोहाची सखोलता व जीव घेणारे भयानक भोवरे, तर मामीचा जीवनप्रवाह शांत, स्थिर, पण कुटुंबियांच्या घरंदाजपणाच्या चुकीच्या समजुतीमुळे झाकाळलेला व त्यापायी शेवटी रिता झालेला. 'पाप' हा अवघा दोन अक्षरी शब्द या दोघींचे भावविश्व ढवळून टाकतो. त्याचा नेमका अर्थ माहीत नसूनही. "जे कोणाला आवडत नाही, ते करणं वाईट" असा मामी आपल्या समजुतीप्रमाणे त्याचा अर्थ करते. किरमिजी डोळ्यांच्या या सासुरवाशिणीचे घर म्हणजे उसाचा चरकच! प्रत्येकजण सदैव कामात गुंतलेला. कोणाला एकमेकांशी बोलायलाही सवड नव्हती व इच्छाही नव्हती. अशा कोरड्या ठणठणीत वातावरणात या अति तरल संवेदनाक्षम हळव्या जिवाचा कोंडमारा होई व डोंगरा–पलीकडील आपले माहेर दिसताच ओठावर आपोआप शब्द येत :

"अलिकडे सासर सासर<br>
कठीण उसाची साखर

पलिकडे पलिकडे माहेर ।
आंबा पिकून गळे रस
मधुर मधुर मधुर मधुर ''

पण घरंदाज स्त्रीने कवने करणे व गाणे म्हणणे 'पाप' हे या निरागस मनावर सासरच्या लोकांकडून बिंबवले गेले होते. म्हणून मनाला आवर घालण्याचा ती सतत प्रयत्न करी. परंतु प्रसंग येताच तिच्या तोंडून न कळत शब्द बाहेर पडत. विहीर हे तर तिचे मोठे स्फूर्तिस्थान. तिथे पाणी भरण्यास जाताच तिचे दु:ख फुटून बाहेर येई.

" विहिरीबाई ग तुझा काठ । त्याला टेकून उभी सून ।।
तुला ठाऊक आसू तिचे । कसे असती ऊन ऊन ... "

दु:खाचा भार असह्य झाल्यावर डोळ्यातून वाहणाऱ्या तिच्या अश्रु-धारांना कांदा चिरताना आपोआप आडोसा मिळे. दु:ख सहन करण्याची युक्ती ती मनाला सांगते :

" सेजीबाई ग भरल्या । भरल्या ग घरामध्ये ।।
कामधंद्यात रमून । दु:ख ठेव मनामध्ये ।। "

तिच्या ओव्या कानावर पडताच मोठी जाऊ तिच्यावर कडाडते,

" गात राहा मेल्यांनो ! ... ... नाही तर नाचा देवीपुढं. लक्षणं बरी नव्हेत ही ... कसलं कर्माचं गाणं घेऊन आली कोण जाणे ! दळभद्री मेली ! गाणी करायची होती तर लग्न का केलंस ? ... ... घराणं कुठचं तुझं, याचा काही विचार करशील की नाही ? या घरची बाई कवनं करते, हे कुणाला कळलं तर तोंड दाखवायला नकोत आम्हाला बाहेर. आजवर गप्प राहिले. पुन्हा कवनं कानावर आली तर धाकट्या भावोजींना सांगणार." या भडिमाराने कावरीबावरी झालेली मामी ' चुकले मी ' म्हणत पुन्हा ओठाबाहेर ओव्या पडू न देण्याचा दृढनिश्चय करते. पण विहिरीपाशी जाताच तिचे मन ताब्यात राहत नाही.

" ओठावर येती शब्द । किती लोटू मागे मागे ।।
मन गुंतले मुक्याने । त्याचे तोडू किती धागे ।। "

पण मग तिला प्रश्न पडतो की हे धागे विणून केलेले भरजरी वस्त्र आपण लपवून तरी कोठे ठेवणार ? तरीही ज्या घराने तिचा छळ चालविला होता त्या घराच्या भल्यासाठी ती तुळशीजवळ प्रार्थना करते – आपल्या प्राणावर उदार होऊन !

" तुळशी ग बाई । समोर मी पाकोळीशी ।।
गेले पाहिजे येथून । जशी आले तशी तशी ।।

चांगले काय, वाईट काय या विचारात बिचारीचे मन खोल पाण्यात बुडावे तसे बुडून जाते. आणि अचानक ती जीवनाचे तत्त्वज्ञानच बोलून जाते.

" अरे हासऱ्या जीवाला । भय मरणाचे काय ।
आणि दुःखाचा रे राजा । पाय नको तेथे जाय ।।"

चानी व मामी यांच्या जीवनाचे सारच तिच्या तोंडून बाहेर पडते. कवने करण्याच्या सक्त मनाईने तिचा बळी घेतला. अनावर प्रतिभेस बांध घालता घालता ती विलक्षण थकते. तिला सोसाव्या लागणाऱ्या दुःखाला सूर दिल्यानेच तिला ते सह्य होऊ शकत होते. पण ते सूर दाबले गेले. तेव्हा " किरमिजी डोळ्यांचा एक जीव असा एका रहाटगाडग्यात सापडलेला – संपलेला. होय, धाकटी मामी एक दिवस मी मुंबईला जात असताना अचानक आटोपली. "

चानी व मामी – एक रंगात हरवून बसलेली, तर दुसरी सुरात. दोघीही निष्पाप, निरागस व निकोप. पण दोघींच्याही गळ्याभोवती फास आवळले जातात. चानीभोवती पुरुषी पिसाट वासना व अंधश्रद्धा यांच्या लोहशृंखलांचा, तर मामीभोवती घरंदाजपणाच्या, खुळचा समजुतींच्या रेशमी धाग्यांचा !

या दोन अश्राप जीवांचा हा भीषण अंत कादंबरीस शोकांतिकेचा घाट मिळवून देतो. ही शोकांतिका एखाद्या राजामहाराजाची किंवा सरदार दरकदाराची नसून एका बेवारशी, अजाण कोकराची आहे. पण म्हणूनच ती जवळची व अधिक चटका लावणारी आहे. चानीला व मामीला निसर्गाकडून लाभलेले सारे दुर्मिळ दान धुळीस मिळते. का ? हा विनाश थांबविता

आला असता का ? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी येते, व म्हणून आपली व्यथा शतपटीने वाढते. त्यामुळे ही कादंबरी माझ्या मते केवळ कलावाद्यांना एक आव्हान आहे. हिच्याद्वारे खानोलकरांना काय संवादादी लय साधणारा केवळ एक आकृतिबंध साधावयाचा होता की ? मर्ढेकर म्हणतात त्याप्रमाणे आसन्न मरण भिकाऱ्याशी भिन्न तऱ्हांनी वागणाऱ्या दोन व्यक्तींमधील फक्त विरोधच रेखाटावयाचा होता ?

लेखकाला जी चानी उभी करावयाची होती तिच्या वेदनांनी व त्यामागील कारणांनी तो प्रथम अस्वस्थ झाला नसेल का ? त्या अस्वस्थतेतूनच त्याच्या प्रतिभेने ही चानी निर्मिली नसेल का ? चानी जशी नितांत सौंदर्य घेऊन अवतरते तशीच समस्याही बरोबर घेऊन येते. तिचे लावण्य जितके अंगभूत तितक्याच त्यातून निर्माण होणाऱ्या समस्याही मूलभूत ! म्हणून तर ही चानी आपल्या डोळ्यांपुढून काही केल्या हालत नाही. अनेक प्रश्न विचारून ती आपला थरकाप उडवते. आपल्या विचारशक्तीस भयानक हादरे देऊन आपण अंतिम मानलेली जीवनमूल्ये तपासून पाहण्याची निकड आपल्याला जाणवून देते. भलत्या समजुतींच्या आहारी गेल्यामुळे तिच्यासारख्या किती निरागस जिवांचा चोळामोळा केला जातो याचा विचार करावयास लावते. केवळ कलावादी "अमूक कलाकृतीने मन तळापासून ढवळून निघाले, अत्यंत अस्वस्थ झाले" अशी भाषा वापरतात. या वाक्प्रयोगातून, कलाकृतीचा केवळ आकृतिबंधच त्यांना अभिप्रेत असतो का ? एखादा झुळझुळ वाहणारा झरा किंवा संपूर्ण पिसारा उभारून नाचणारा मोर पाहून काही कोणी वरील प्रकारचा अभिप्राय देत नाही. काळजाचा ठाव घेणाऱ्या "चानी" सारख्या कलाकृती-मुख्यत: साहित्यकृती, जीवन निरपेक्ष असूच शकत नाहीत. वाङ्मयकृती निर्मिणाऱ्या कलावंतांच्या सौंदर्यदृष्टीस त्याच्या जीवनदृष्टीमुळे वजन प्राप्त होते. केवळ आकृतिबंधाने किंवा रसोत्कटतेने नव्हे, तर जीवनसापेक्षतेमुळे वाङ्मयकृती श्रेष्ठ ठरू शकते. अशी कलाकृती आपल्याला मानवी जीवनाकडे व त्यातील समस्यांकडे नेऊन विचारप्रवण करते.

खानोलकरांच्या कादंबऱ्यांचा हाच विशेष आहे. दगडात देव पाहणाऱ्या व सर्व जगाला मानवतेचे धडे देण्याचे सामर्थ्य असल्याचा दावा

करणाऱ्या आपल्या धर्मात " चानी " सारख्या किती जिवांची हत्या केली जाते ? या प्रश्नाने खानोलकर व्याकुळ होतात. त्यांच्या चान्या, त्यांच्यावर झालेल्या निर्घृण अन्यायांचा आपणास जाब मागत आहेत असे वाटते. आई-बापांचा पत्ता नाही, एवढ्याचकरता बकुळेच्या उभ्या आयुष्याचा उन्हाळा केला जातो. भाविणीच्या मुली म्हणून जाई व सुशी आपला संसार तर मांडू शकत नाहीतच, पण त्यांना जगणेही अशक्य होते. चानीच्या बाबतीत लहानग्या दिनूलाही जे प्रश्न पडतात ते धर्म व संस्कृती यांच्या हजारो वर्षांच्या ज्ञानाचे गाठोडे पाठीशी असलेल्या असंख्य लोकांना पडत नाहीत. ह्या कठोर सत्याची प्रतीती प्रस्तुत कादंबरीतून येते. अंधश्रद्धेपायी उभा गाव निरपराध, असहाय्य व छोट्या चानीवर सर्व सामर्थ्यानिशी तुटून पडू शकतो, तिला तुडवू शकतो. या घटनेतून आपल्या विवेकशक्तीला केवढी घोर निद्रा लागलेली आहे हेच खानोलकर आपल्याला दाखवितात. □ □

# ८. 'अज्ञात कबुतरे' : एका थोर संशोधकाची वेदना

'अज्ञात कबुतरे' ही खानोलकरांची एकमेव आधारित कादंबरी. "एका 'झेक', पिक्चरवरून हिच्यातील मध्यवर्ती कल्पना उचलली आहे." अशी टीप त्यांनी कादंबरीच्या शेवटी दिली आहे. पण या कल्पनेला त्यांनी इतका अस्सल मराठी पेहेराव चढविला आहे की ही टीप त्यांनी दिली नसती तर ही कादंबरी आधारित असल्याची शंकाही कोणाला आली नसती. वास्तविक त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेला कोणाचा आधार घेणे मानवणारे नव्हते. पण या 'कल्पने' चा मोह त्यांना दोन कारणांनी झाला असावा. एक कारण म्हणजे निरागस किशोरीवर विषयलंपट, स्वार्थी व क्रूर समाजाकडून ओढविल्या जाणाऱ्या भयानक संकटांनी विलक्षण व्यथित होणारे त्यांचे मन. या कादंबरीतील किशोरी पोरकी आहे, दरिद्री आहे व अति लावण्यवती आहे. म्हणून चानीप्रमाणे तिलाही प्राणास मुकावे लागते. दुसरे कारण म्हणजे माणूस माणसाला समजू शकत नाही, म्हणून कादंबरीतील नायक रावसाहेब बनहट्टी यांना वाटणारी तीव्र खंत. ही खुद्द खानोलकरांचीच खंत आहे.

कादंबरीचे सार प्रारंभीच एका कवितेत ते देतात-

सर्व साक्षी असा एक अज्ञात किनारा
त्या पलीकडील समुद्राच्या गंभीर, नादब्रह्मात
एका कबुतराच्या गळ्यातील घुंगूर वाजतोय
'किण्ण किण्ण'
एक म्हातारा पंचाहत्तर वर्षांचे पावसाळे
वाळवंटात शिंपडून सोनेरी उन्हासारखे
ऐकतोय तो शब्द
त्याच्या अज्ञात भाषेतील

— आरती प्रभू

माणसाला माणूस समजावा म्हणून संपूर्ण जगाची एक भाषा असली पाहिजे या विचाराने त्या अज्ञात भाषेचा शोध लावण्यासाठी रावसाहेब बनहट्टी आपली उभी हयात वेचीत असतात. हृदयविकाराच्या दुखण्याने जर्जर झालेल्या अज्ञाताच्या मार्गावरील पंचाहत्तर वर्षांच्या या पांथस्थास इस्पितळात दिसते एक अज्ञात कबूतर, व अज्ञात हिरव्या मनोऱ्यावर राहणारी व कबुतरे उडविणारी एक अज्ञात मुलगी. रावसाहेबही सारे आयुष्यभर अज्ञातात राहून धडपड करीत असतात, अज्ञात भाषेचा शोध लावण्यासाठी. असा हा सारा अज्ञाताचा खेळ ज्ञात करण्याचा लेखकाचा येथे प्रयत्न आहे. पण या अज्ञाताच्या प्रदेशावरही निष्पाप किशोरीचा दुःखभोग आपले अधिराज्य गाजविल्याशिवाय राहत नाही.

नायकाच्या जीवनाचे सार खानोलकर एका वाक्यात सांगतात, 'प्राध्यापक बनहट्टींचं जीवन म्हणजे जणू काय कडेलोटावरील एखादा प्रचंड पाषाण.' पाषाणासारखे बनहट्टींचे जीवन कोरडे ठणठणीत असते. उत्कट ध्येयनिष्ठेमुळे जीवनातील साऱ्या कोवळिकेकडे, सुखांकडे त्यांनी पाठ फिरवलेली असते. पण हा पाषाण 'प्रचंड' आहे. आपल्या कार्यात ते इतके मग्न होते की वयाची सत्तरी उलटल्याचेही त्यांना भान नव्हते. संपूर्ण मानव समाजाची एकच भाषा असली पाहिजे याचा त्यांना ध्यास लागला होता. 'त्यांनी जवळ-जवळ प्रतिज्ञाच केली होती की कुठंतरी अज्ञातात अशी भाषा लपून बसलेली आहे की जी केवळ मानवांसाठीच

आहे... मानवाच्या मूलभूत भावना, विकार, वासना जर एक-सारख्याच आहेत, मानवाची नाती जर वेगळी नाहीत... तर या संपूर्ण मानव समाजाची भाषा वेगळी का ? ती भाषाही एकच असायला हवी. या कल्पनेने ते झपाटून गेलेले होते. त्या अज्ञात भाषेचा शोध घेण्यासाठी व्रतस्थ राहून जगातील निम्म्यांहून अधिक भाषांचा त्यांनी डोळसपणे अभ्यास केला होता. आयुष्यभर त्या भाषेचे चिंतन ते करीत होते. एक हजार पाने लिहून झाली होती. ती भाषा त्यांच्याशी बोलत होती, त्यांना ऐकू येत होती. तिचे व्याकरण सिद्ध होत होते. अशी ही त्यांची प्रचंड तपश्चर्या फळास येण्याच्या बेतात होती. पण त्यांच्या आयुष्याचा प्रचंड पाषाण कडेलोटावर उभा होता. वयाची सत्तरी ओलांडल्यानंतर त्यांना हृदयविकाराचा झटका आला. आणि ती संपूर्ण भाषा हस्तगत होण्यासाठी तर आणखी अनेक वर्षांची गरज होती. पण या झटक्याने ते अशक्य केले होते. ते आटोक्यात येऊ घातलेले साध्य त्यांच्यापासून दूर पळाले होते. यामुळे जगण्यावरील त्यांची श्रद्धाच उडाली होती.

पण हृदयविकाराच्या झटक्याहूनही त्यांना अधिक मोठा धक्का बसला तो माणसाच्या त्यांना झालेल्या दर्शनाने. आतापर्यंत अखंड उद्योगात देहभान विसरलेल्या बनहट्टींना अवती भवतीच्या माणसांकडे पाहण्यास क्षणाचीही फुरसत नव्हती. परंतु आजाराने त्यांना इस्पितळातील कॉटला पूर्ण खिळवून टाकले. तेव्हा त्यांना एकेक गोष्ट दिसू लागली. मुख्यत: ज्या मानवासाठी ते हा सारा खटाटोप करीत होते, त्याचे खरेखुरे रूप, त्याच्या मर्यादा त्यांना दिसल्या व त्यांना आयुष्यात कधी नव्हे ते पहिल्यांदा रडू आले. त्यांचा सारा उत्साह पार लुप्त झाला.

पण इकडे प्रा. बनहट्टी तो ग्रंथ हातात कधी घेतात याकडे संपूर्ण जग डोळे लावून बसले होते. त्यामुळे सरकार त्यांना जगविण्याची खटपट करीत होते. डॉक्टरांची विलक्षण धावपळ चालू होती. हे पाहून बनहट्टींना वाटले, 'एखाद्या अनिकेत, अपंग, निराधार दरिद्री माणसाला या सत्तेने या इतमामाने वागविले असते का ? ' त्यांना असा प्रश्न पडतो की ज्या मानवाया जीवन-

मरणाशी निगडीत असलेला शोध लावण्यासाठी आपण सर्व सुखांना पूर्ण आचवलो, तो मानव काय योग्यतेचा आहे ? 'एका अमूर्त, अज्ञात भाषेच्या मात्रा, वेलांटचांच्या जगात आयुष्याचा क्षणन् क्षण झिरपून गेला. अरे ही भाषा कोण बोलणार आहे ? ' हत्याकांड करणारा एक पशुवत मानव-समाज ? की या देशातलं अठराविश्वे दारिद्र्य ज्या सत्तेला उखडून टाकता येत नाही ती सत्ता ? की साध्या भाकरीच्या चतकोरासाठी अंगावरचे वस्त्र नको तिथे उघडे करून दाखविणारी भिकारीण ज्या देशात अजून आहे त्या देशातील जनता ? ' या विचारांनी ते विव्हळ होतात, आणि मग या ध्येयापायी आतापर्यंत मनात दडपून टाकलेली त्यांची एक मनीषा धीर करून हळूच डोके वर काढते. कधीतरी पन्नास वर्षामागे त्यांना एकदा वाटले होते, की कधीकाळी ज़र आपणास एखादी नात झाली तर तिचे नाव आपण मधू ठेवू. ती नात कुरळचा सोनेरी केसांची, काळचाभोर डोळयांची व अज्ञा-तातली ती माझी भाषा बोलणारी कुठे तरी नक्कीच असेल. तिचा त्यांना ध्यास लागतो. इस्पितळातील लोकांना हे सारे कळणे कसे शक्य होते ? याच्या जोडीस बनहट्टींना ठराविक वेळी खिडकीच्या गजावर दिसणारे कबूतर, त्याच्या गळयातील ' किण्ण किण्ण ' वाजणारे घुंगुर, हिरवा मनोरा व त्याच्या सज्जातून कबुतरे उडविणारी मुलगी या साऱ्या अद्‌भूत गोष्टी येतात. त्यांच्याखेरीज इस्पितळातील इतर कोणालाही त्या दिसत नाहीत. म्हणून सर्वांना ते वेडे वाटतात, आणि उलट बनहट्टींना ते सारे लोक वेडे वाटतात. आणि त्यामुळे त्यांना प्रश्न पडतो की, ' यांना आपली भाषा कशी कळणार ? कारण ती शिकता येणारी भाषा नाही, ती माझ्या त्या ग्रंथात नाही. ती तुमच्या हृदयांत आहे. आणि तो ग्रंथ फक्त मार्गदर्शन करील-तुमचा हृदयाचा संवाद तुम्ही दुसऱ्या हृदयाशी कसा करावा याचं. तुम्ही या गोष्टीला तयार व्हाल ? अशक्य आहे. उलट तुम्ही जेव्हा तो ग्रंथ वाचाल तेव्हा त्याची होळी कराल. ' या विचाराने आपला ग्रंथ फाडून टाकण्याचा ते निश्चय करतात. तेथील परिचारिका जेव्हा त्यांना विनवणीच्या स्वरात म्हणते, ' रावसाहेब, तुम्ही उठून खिडकीपाशी गेला होता असं कुणापाशीच बोलू नका... मला नोकरीवरून काढून टाकतील ते. ' तेव्हा त्याना तिची दया येते. ते तिला सांगतात की ' तुझ्या या आर्त विनवणीसाठी माझ्या या शब्द-

कोशात शब्दच नसतील.' हे वाक्य फार बोलके आहे. यातून त्या भाषेच्या अंतरंगावर प्रकाश पडतो. एका माणसाचे मनोगत दुसऱ्याला सहज उमगू शकणारी ती भाषा होती. 'हे शब्देविण संवादिजे' असे सामर्थ्य तिच्यात होते. या हृदयीचा भाव त्या हृदयी अलगदपणे घालण्याची किमया तिच्यात होती, म्हणजेच तिचा शोध लावीत असलेल्या बनहट्टीमध्ये ती होती. आत्मरूपाने विश्व पाहण्याच्या त्यांच्या सामर्थ्यात होती. म्हणूनच एके सकाळी खिडकीतून अंतराळात कबुतर उडवणारी मुलगी दिसताच त्यांच्या ओठावर 'मधु' ही अक्षरे मधाच्या थेंबाप्रमाणे येतात. अज्ञात तृप्तीच्या झळाळीने त्यांचा चेहरा उजळून निघतो. ते एका वेगळ्याच जगात जातात. फक्त तिलाच आपली भाषा कळेल या विश्वासाने त्यांचे देहभानच हरपते. आणि दुपारी जेव्हा ती मुलगी त्यांना रंगीबेरंगी वस्त्रे वाळत घालताना दिसते तेव्हा त्या दृश्यांतून त्यांना केवढा तरी अर्थ गवसतो. त्यांना वाटते, 'इतक्या उशीरा ती आपले कपडे का वाळत घालते? - कुठंतरी कामधंदा करीत असावी का ती? कुठं असेल ती कामाला? – तिला झेपत असेल का ते काम? – जेवण तरी वेळेवर मिळत असेल का तिला?' आणि या विचाराने कासावीस होऊन ते ठरवितात की आपले चाळीस हजार रुपये आपण तिला देऊ. मग ती जेवण लवकर घेईल. दहा वाजताच सज्जात येऊन आकाशातून लहरणारे निळे मेघ न्याहाळत उभी राहील. तिला कशाची म्हणून ददात राहणार नाही. केवळ दृक्संवेदनेतून त्यांना जाणवलेले तिचे दुःख कासवी आपल्या पिलांचे केवळ दृष्टिक्षेपाने पोषण करणाऱ्या संकेताची आठवण करून देते. वास्तविक ते दृश्य असंख्य लोकांनी पाहिले होते. पण त्यांना ते पूर्ण उपेक्षणीय वाटले होते. ज्या चाळीत ती रहात होती, त्या चाळीतील काहींना तर तिच्या अस्तित्वाची दखलही नव्हती. बनहट्टींना मात्र तिचा ध्यास लागला होता व तिच्याकडे जाण्यासाठी ते उतावीळ झाले होते. पण इस्पितळातील कुणालाच तिची माहिती नव्हती. वास्तविक कबुतरे उडविणारी ती मुलगी प्रत्यक्षात होती. तो बनहट्टींना झालेला भास नव्हता. पण जगाच्या दृष्टीने त्या पोरक्या व दरिद्री मुलीचे अस्तित्व नगण्यच होते.

कबूतर व त्याच्या गळ्यातील घुंगूर हे मात्र सारे भासच असावे.

पण त्याची संगती लावता येते. अर्थात ही संगती म्हणजे निव्वळ तर्कच. त्यात सत्य असेलच असे नाही. हे कबूतर त्यांना केव्हा व कसे दिसत होते ? 'जाणिवेनेणिवेचे दुवे एकमेकांत अडकत नव्हते' तेव्हा आणि आरशातून ठराविक वेळी व भिन्नभिन्न स्वरूपात. हृदयविकाराच्या झटक्याने अंथरुणाला खिळवून टाकल्यामुळे बनहट्टींना प्रत्यक्षातील जगाबद्दल कधी नव्हे ती ओढ लागून राहिली होती. कल्पनेतील नात पाहण्यास ते उत्सुक झाले होते. दुखण्यामुळे आपले काम अर्धवटच राहणार म्हणून त्यांना विलक्षण उदासीनता आली होती. माणसांच्या मर्यादा पाहून ते दुःखी झाले होते. मानसिकदृष्ट्या ते नॉर्मलवर नव्हते. अशा स्थितीत असताना आरशातून बागेचे प्रतिबिंब दिसताच त्यांना वाटते, 'माझी अज्ञातातील भाषासुद्धा या बागेसारखी विस्तीर्ण पसरली आहे. ती जशी मला कळते तशी पशुपक्ष्यानाही कळते. सगळ्यांनाच कळते.' हा विचार मनात येताक्षणीच डोक्याकडील खिडकीच्या आडव्या गजावर एक पांढरे शुभ्र कबुतर बसलेले त्यांना दिसते, फक्त त्यांनाच. आणि त्यानंतर ते नॉर्मलवर येईपर्यंत हे कबूतर त्यांना विशिष्ट वेळी व विशिष्ट स्वरूपात दिसत राहते. पहाटे सहा वाजता, दवाने चिंब भिजून, फुगलेल्या व सोनेरी प्रकाशाने झळकत असलेल्या पिसात. खिडकीच्या आडव्या गजावर ते त्यांना दिसे व एक तासाने उडून जाई. त्यावरून सकाळच्या सोनेरी किरणांनी न्हालेले व दवाचे थेंब ठिबकणाऱ्या पूर्वेच्या खिडकीच्या आडव्या गजावर स्थिरावलेले सूर्याचे प्रतिबिंब आरशातून त्यांना कबुतराच्या रूपात दिसत असावे. दुपारी एक वाजता ते डावीकडील खिडकीवर त्यांना दिसे, कारण त्यावेळी सूर्य त्या बाजूला वळलेला असे. संध्याकाळी ते पाच सात मिनिटातच निघून जाई. कारण सरसर ओसरणारे ऊन. त्याच्या गळ्यातील घुंगुराचा आवाज म्हणजे त्यांना ऐकू येणारी त्यांची अज्ञात भाषाच असावी. ते स्पष्ट शब्दात म्हणतात, 'तू मला दाद दिलीस. स्वरांचा हुंकार दिलास..... अरे, माझ्या भाषेतील शब्दन् शब्द असाच आहे.' मुख्य म्हणजे औषधोपचाराने तीनचार दिवसांनी ते नॉर्मलवर येताच त्यांना कबुतर दिसेनासे होते. यावरून त्यांच्या ॲब्नॉर्मल अवस्थेतील तो भास असावा या तर्कास बळकटी येते. घुंगुराचा नाद त्यांना फक्त दुपारी एक वाजता ते येई तेव्हाच ऐकू येत असे. 'कोंडुरा' तील

तात्यांना ठराविक वेळी ऐकू येणाऱ्या घंटानादासारखाच. खानोलकरांच्या मनावर बालवयात मठ, गाभारा व घंटानाद यांच्या उठलेल्या खोल ठशांचाही तो परिणाम असावा. कबुतराचे वर्णन करताना खानोलकर प्रतिमांच्या भाषेत लिहितात. एरवी या कादंबरीची भाषा इस्पितळाच्या वातावरणास संवादी अशी साधी, स्वच्छ व मोकळी आहे. 'डोळ्यामधून अश्रू उतरावेत तसे ते येऊन त्या खिडकीवर बसे.' 'दुपारच्या प्रकाशातून न्हाऊन आलेले कबूतर डावीकडील खिडकीच्या आडव्या गजावर ईश्वराने अज्ञातातून फेकलेल्या मोगऱ्याच्या पुष्पगुच्छाप्रमाणे अटकून राहिलं होतं.' 'तुझ्या पिसापिसावर संध्याकालीन रंगाची झळाळी पसरली आहे. तुझ्या इवल्या देहावर ईश्वरी राज्यातलं एक भरजरी वस्त्र चढवून तू इथं आला आहेस '

गळ्यात घुंगूर असलेले कबूतर जरी भास असला, तरी कबुतरे उडविणारी ती मुलगी मात्र प्रत्यक्षात होती. इस्पितळातील सगळ्यांजवळ बनहट्टी तिची मोठ्या आत्मीयतेने चौकशी करतात. पण कुणालाच तिची माहिती नसते. हे पाहून त्यांना सगळ्यांचा खूप राग येतो. पण लगेच कीवही येते. कारण त्यांचे न्यायी मन ही माणसे इतकी खुजी कशी, याचाही उलगडा करते व मग त्यांना स्वत:चीच लाज वाटू लागते. सर्व प्राणि-मात्राच्या कणवेने ओतप्रोत भरलेल्या या जिवाला वाटते, 'मी जितका माझा आहे तितकीच ही माणसं माझी आहेत. पण..... इथल्या प्रत्येक व्यक्तीच्या पायात कसली ना कसली तरी शृंखला पडली आहे. जणू काय हे सगळे डोळे फुटलेले घोडे आहेत आणि कुठल्याही माणसानं त्यांना वाटेल तसं ताबडावं, यांना मुळी कणाच नाही. कुणीही यांना हे जिवंत असताना यांच्यावर थडगी बांधावी याच लायकीची ही माणसं आहेत.' पण या विचाराने ते कष्टी होतात व परमेश्वराची क्षमा मागतात. कारण त्यांना वाटते, 'प्रत्येकाच्या मर्यादा इथं ठरलेल्या आहेत त्यातही ही माणसं सुखाने जगण्याचा प्रयत्न करताहेत ..... मी यांना त्रास दिला. क्षमस्व.'

त्यांच्या लक्षात येते की, येथे 'प्रत्येक मानवसमूहाची एक वेगळी भाषा आहे आणि या समूहातील प्रत्येक मानवाची पुन्हा वैयक्तिक भाषाही वेगळी

आहे. आई, मूल, नवरा, बायको, विविध राष्ट्रे यांचे स्वार्थ जसे वेगवेगळे आहेत तशा त्यांच्या भाषाही वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे आपला ग्रंथ पूर्ण निरुपयोगी आहे. म्हणून तो फाडून टाकण्याचे ते ठरवितात. कुणाच्याही नकळत एकेक पान टरकावू लागतात. 'आपण जे निर्माण केलं रात्रंदिवस खपून, ते थोडं तरी निर्विकारपणे नष्ट करणं आपल्याला जमलं याचंही त्यांना समाधान वाटत होतं.' आपली अज्ञात भाषा जाणू शकणाऱ्या त्या मुलीला जवळून पाहण्याची त्यांना फार ओढ लागली होती. ज्या दिवशी त्यांचा संपूर्ण ग्रंथ फाडून पूर्ण होतो त्याच दिवशी नेहमीप्रमाणे सज्जावर येणारी ती मुलगी त्यांना दिसत नाही. म्हणून ती आपल्याला नक्की भेटेल अशी त्यांना खात्री वाटते. तेव्हा एक संधी साधून डॉक्टरांकडून कॉरिडॉरमधून फिरण्याची परवानगी ते मिळवितात आणि मोठ्या हुशारीने व चपळाईने तेथून पलायन करतात. सारे आंतरिक बळ पणास लावून टॅक्सी गाठतात. टॅक्सीवाल्याकडून त्या मुलीसाठी वेलबुट्टीची एक सुबकशी जरीची लाल टोपी आणवतात. कारण कधी तरी वयाच्या पन्नासाव्या वर्षी अशी टोपी घातलेली एक मुलगी त्यांनी पाहिली होती. जिवाच्या आकांताने ते तिचा शोध करतात. पण कुणीही तिचा पत्ता त्यांना सांगत नाही; कारण अनेकांना तिच्या अस्तित्वाची दखलच नसते, व ज्यांना ती माहित असते त्यांना ती इतकी वाईट वाटत असते की आपल्याला तिची माहिती आहे हे दाखविणे त्यांना आपल्या सभ्यतेला धक्का देणारे वाटते. याला अपवाद ठरते पाचसात वर्षाची एक छोटी मुलगी. ती अगदी निरागसपणे व मोठ्या आनंदाने त्यांना सांगते, 'अहो आजोबा, इथून थोड्या अंतरावर एक हिरव्या रंगाची इमारत आहे बघा. तिथं करा चौकशी. शाळेत जाताना रोज सकाळी दिसते मला कबुतरे उडवताना.' या माहितीने बनहट्टी अत्यंत आनंदित होतात, पण तिची आई मात्र 'तुला कशाला हव्यात या उचापती? चल बघू निमूट' असे म्हणून तिच्या मुस्कटीत ठेवून देते. चाळीशी गेल्यावर तेथील लोकही त्यांना तिची माहिती देत नाहीत. बनहट्टी सारे बळ एकवटून जिन्याची एकेक पायरी चढतात व शेवटी एकदाची तिची खोली गाठतात. पण खोलीचा दरवाजा बंद असतो. चाळीतील फक्त एकच माणूस तिच्या संबंधी आस्था दाखवतो. पण तो कसा असतो? "मग त्यापैकी एक गंजीफ्राकातला बलदंड इसम म्हणाला, 'साली

कालपासून कुठे दिसली नाय. आपण बी साले अपसेट झालो हाय.' आणि त्याने दारावर प्रचंड धक्के दिले." या वर्णनातून त्या वलदंड इसमाला तिच्याबद्दल वाटणाऱ्या आपुलकीचे कारण कळून आपला थरकाप होतो. तिच्या जीवनाची सारी फरफट, असहायता व जगाची तिच्यावरील तुच्छतेची किंवा विषयी नजर आपल्या मनास घरे पाडते. सर्व लोकांच्या धक्क्यांनी दार उघडते. बनहट्टी सगळे प्राण डोळ्यात आणून तिच्या खोलीत प्रवेश करतात. स्विच ऑन करतात आणि अखेर त्यांना ती दिसतेही. पण कशा अवस्थेत? 'खोलीच्या मधोमध. रावसाहेब बनहट्टींना एक सोळा सतरा वर्षांची मुलगी अर्धनग्न अवस्थेत जमिनीवर मरून पडलेली दिसली, त्या मुलीच्या चेहऱ्यावरील स्मितहास्याची अस्पष्टशी फिकट चंद्रकोर अजूनही मावळली नव्हती किंवा तिचा गुलाबी वर्ण अजूनही फिकट पडला नव्हता. कुरळे सोनेरी केसही अस्ताव्यस्त पसरून होते. त्यावरची झळाळी जशीच्या तशीच होती.' बनहट्टींचे डोळे मूक होतात. पावलातले बळ संपते. पण मोठ्या कष्टाने खाली वाकून आपल्या जवळील लाल टोपी ते त्या मुलीच्या डोक्यापाशी ठेवतात आणि लगेच 'रावसाहेब बनहट्टी एखाद्या पिसासारखे जमिनीवर कोसळले ... ... सगळ्याच कबुतरांचे पंख फडफडले आणि क्षणार्धात मिटले गेले.' इथेच सगळेच संपते – कादंबरीही!

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०८५
दा. क्र. ३०.७.१९८६
विभाग ११३८५
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

# ९. ' अगोचर ' : एक वेगळा पवित्रा

चि. त्र्यं. खानोलकर यांची 'अगोचर' ही आठवी कादंबरी. अवघी ८३ पृष्ठांची. आतापर्यंतच्या कादंबऱ्यांहून आगळाच चेहरामोहरा घेऊन अवतरलेली. त्यांच्या एकूण लेखनाकडे पाहिले, तर त्यांच्या प्रतिभेची प्रकृती इहलोकात पाय रोवून उभ्या असलेल्या मानवाचा शोध घेणारी आहे, असे दिसते. मानवी जीवनातील सुखदु:खांचा वेध घेताना लौकिक – नैसर्गिक कार्यकारण-भावावरील तिची पकड घट्ट असते. संकटसमयी जरी त्यांची पात्रे सिद्धेश्वराला, देवीला कौल लावताना किंवा स्वामींच्या भजनी लागताना दिसली, तरी लेखक सर्वत्र त्याचे वैयर्थ्यच दाखवितो. त्यांची पात्रे येथील जीवन सफल करण्यासाठीच धडपडत असतात. त्यांच्या या मार्गात ' कोंडुरा ' चा अपवाद वगळल्यास कोणतीही अज्ञात शक्ती आड येऊन फारशी लुडबूड करीत नाही. त्यांच्या सुखदु:खास ती स्वत: किंवा इतर व्यक्तीच जबाबदार असतात. 'कोंडुरा' तही जरी बहुतेक पात्रांवर अदृश्य शक्तीचे सावट पडलेले असले, तरी ही शक्तीच त्यांचे जीवन काळवंडून व करपून टाकते. या शक्तीवरील श्रद्धेपायीच ती पात्रे आयुष्यभर मान मोडून वावरतात व संपतात, असे लेखक दाखवितो. याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रद्धेने

पूर्ण भारलेल्या या वातावरणातही विवेकाच्या बळावर ताठ मनाने उभी राहणारी, सर्व भूलभुलावणीपासून स्वत:स अलिप्त ठेवू शकणारी, आणि केवळ स्वप्रयत्नाच्या आधारावर सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीस तोंड देऊन जीवन सफल करणारी पार्वती ते उभी करतात 'अज्ञात कवुतरें' – मधील अज्ञात लिपीचा शोध घेणारे बनहट्टीही माणसाला माणूस कळावा म्हणून आयुष्यभर झटतात, एका उपेक्षित, पोरक्या व कष्टाळू अज्ञात मुलीसाठी जीव पाखडतात, आपली सारी इस्टेट देऊन तिला सुखी करण्यासाठी जिवाच्या आकांताने तिचा शोध घेत फिरतात, व ती मृतावस्थेत पाहताच तेथल्या तेथेच कोसळतात! असा हा सारा गोचराचा वेध घेण्याचा खानोलकरांचा प्रयत्न आहे. त्यांची सर्व पात्रे या गोचर विश्वात रमतात, येथील निसर्गाने हरखून जातात, या भूतलावरील व्यक्तींशी आपापली नाती जोडण्यात धन्यता मानतात. मनाला कोड्यात टाकणाऱ्या गूढ अलौकिक व अनाकलनीय वाटणाऱ्या अशा घटनांमागील यथार्थ कार्यकारण भाव उलगडून दाखवून त्या आकलनीय करण्याची खानोलकरांची धडपड, हाच त्यांचा प्रांत. अज्ञाताच्या पोलादी भिंतीवर धडका घेण्याची प्रकृती जी. एं. ची. दोन्ही आपल्या परी श्रेष्ठच! मला मात्र वेधून घेते ते गोचराचा प्रत्यय देणारे खानोलकरांचे भावविश्व!

'अगोचर' ह्या कादंबरीत मात्र नावापासून खानोलकर आपणास एका वेगळ्या वातावरणात नेत आहेत. 'एकुलता एक दीपस्तंभ जी. ए. कुलकर्णी यास' ही या कलाकृतीची अर्पण–पत्रिकाही मोठी बोलकी आहे. ह्या कादंबरीतील अगोचराच्या मागे लागलेला, अनेक सिद्धी प्राप्त झालेला स्वामी पाहून सकृद्दर्शनी असा प्रश्न पडतो की, १९६७ मध्ये 'एका स्वामीची महायात्रा' ह्या अवघ्या सतरा पृष्ठांच्या कथेत खानोलकरांनी बुवाबाजीवर टाकलेला प्रकाशाचा भेदक झोत १९७५ साली असा का मालवला? बुवा–बाजीचे पूर्ण वाभाडे काढून वाचकांना सावध करणारा हा लेखक आता स्वामीच्या भजनी कसा लागला? परंतु विचारांती लक्षात येते की, त्या कथेतील 'स्वामी' सही शेवटी वाटते की, 'आता वस्त्रे आयतीच आहेत अंगावर, याच मार्गाचा खराखुरा शोध घेतला तर?' प्रस्तुत

कादंबरी ही याच संकल्पित मार्गाचा शोध तर नाही ? या संदर्भात वा. म. जोशी यांच्या मनाचा कब्जा घेणारे असेच दोन स्वामी आठवतात, व जोश्यांचे अपयशही. 'रागिणी' या कादंबरीत बोधस्वरूप स्वामीच्या चित्रणाने बुवाबाजीवर विदारक प्रकाश टाकणारे जोशी कादंबरीच्या शेवटी प्रियब्रह्मस्वामी आणतात 'अगोचरा' तील स्वामीप्रमाणेच सर्वज्ञ, तरी निष्प्रभ !

'अगोचर' कादंबरीचे कथानक थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आनंदराव देसाई नामक एक पापराशी व धनाढ्य व्यक्ती पाण्यासारखा पैसा खर्च करून एका सिद्धिप्राप्त स्वामीस जिवावरच्या दुखण्यातून वाचविते आणि त्याच्या मोबदल्यात आपल्या दुष्कृत्यावर पांघरूण म्हणून स्वामींना वाड्यावर राहण्याची विनंती करते. कृतज्ञतेने भारावल्यामुळे स्वामीही ती विनंती मान्य करतात. वाड्यावर पोहोचताच त्यांचे अनेक चमत्कार सुरू होतात. परिणामी हजारो लोक त्यांच्या भजनी लागतात. एकीकडे त्यांच्या भक्तांची संख्या सारखी फुगत जाते, दुसरीकडे देसायांच्या पापांचा व पैशाचा डोंगर वाढत जातो. अखेरीस सूडाने पेटलेला देसायांचा भाऊ वाड्यास आग लावतो. हजारो भक्तांनी गजबजलेला तो संपूर्ण वाडा भस्मसात होतो — देसायांसकट व स्वामीसकटही !

हा वेगळा विषय हाताळून लेखकाने वाचकांच्या पदरात काही विशेष घातले आहे का ? ज्या अपेक्षांनी हजारो भक्त स्वामींच्या भोवती गर्दी करतात, त्या स्वामी पूर्ण करू शकले का ? स्वामींच्या चमत्कारसामर्थ्याने स्वत: त्यांच्या भक्तांना व स्वत: स्वामींनाही कांही बळ लाभले का ? कादंबरीतून निर्माण होणाऱ्या अशा प्रश्नांचा विचार केल्यास निराशाच पदरी येते.

स्वामींचे पहिले दर्शन होते तेच सौदा करण्याच्या पावित्र्यात. 'उपकार अनंत झालेत या माणसाचे — इस्पितळाचा सबंध खर्च यानं केला — देहाला मृत्यू कवटाळणार होता ... ... राहा म्हणतोय — राहिलं पाहिजे ... ... त्याचे उपकार फेडायचेत आपल्याला.' ( ४–५. ) आनंदराव देसायांच्या मनांतही अनेक बेत फणा काढून बसतात. त्यांना वाटते, मिळविलेल्या कमाई-

मागे आता भरभक्कम संतकृपा देवळातल्या, सभागृहांतल्या दगडी खांबासारखी उभी राहील. घरी पोहोचताच देसाई गडचाप्रमाणे राबणाऱ्या आपल्या भावावर – अच्युतवर ओरडतात. त्याने व्यवस्था नीट ठेवली नाही म्हणून त्याच्या थोबाडीत मारतात, आणि थोबाड सुजून येते स्वामींचे ! देसाई त्याच्या कमरेत लाथ मारतात आणि स्वामी आपल्या खोलीत पलंगावर 'ओय् ओय् ' म्हणून ओरडतात. सोन्याचा चोरटा व्यापार करण्याचे आपले काळे कृत्य देसाई स्वामींपासून मोठ्या सावधपणे लपवून ठेवतात, पण ' खाडीवर पडाव आलाय, सोन्याच्या चिपांनी भरलाय, उतरून घ्यायला चला देवा. ' असे स्वामीच मिटल्या डोळ्यांनी देसायांना सांगतात. त्यावर लेखक सांगतो की, हे उद्‌गार ऐकताच देसाई नखशिखान्त होरपळल्यासारखे उभ्या उभ्या लटपटले. पण प्रश्न असा आहे की, स्वामींच्या धाकाने देसाई त्या कृत्यापासून परावृत्त होतात काय ? त्यांना काही पश्चात्ताप होतो का ? कादंबरी असे सांगते की, देसाई एकाहून एक भयंकर अशी पापी कृत्ये पूर्वीप्रमाणेच बेधडक करीतच असतात. ज्योतिष्याच्या सांगण्यावरून एक दरिद्री कुटुंब देखण्या मुलीसह स्वामींच्या दर्शनास येते. तेव्हा देसाई तिच्यावर बलात्कार करतात आणि स्वामी काय करतात, तर तिच्या वडिलांना सांगतात, 'देसाईदेव माझ्यावर बलात्कार करतोय, तुझी पोर शुद्ध आहे. '(३४) हे सारे अतीच नाही का ? स्वामी स्त्रीही होऊ शकत होते का ? स्वामींचे भान सुटले, का लेखकाचे ? आणि एवढे सामर्थ्य असलेल्या स्वामीने मग देसायालाच हात का घातला नाही ? का शिशुपालाप्रमाणे शंभर अपराध भरण्याची ते वाट पाहात होते ? चमत्कारांपासून दूर राहणारे, त्यामागील ढोंग उलगडून दाखविणारे खानोलकर येथे चमत्कारांच्या आहारी गेले कसे ? त्यांच्या विवेकशक्तीने अशी पालट का खाल्ली ? देसायांच्या बाबतीत स्वामींची जी स्थिती, तीच इतर सर्व पात्रांच्या बाबतीत आढळते.

चमत्काराचा लोहचुंबक हजारो भक्तांना स्वामींच्या पायाशी खेचून आणतो. जणू त्यांच्या ' सुखाच्या खजिन्याची हरवलेली किल्ली प्रत्येकास स्वामी देणार होते. ' त्यांना वाटते, : इथे स्वामी आहेत. ' स्वामी म्हणजे परमेश्वराचे डोळे. आपल्यावर जागता पहारा ठेवून असतील, असे पाप

माजवणाऱ्यांना वाटेल.' परंतु असे कोणास वाटत नाही. प्रत्येकजण स्वामींचा व्यापार करू पाहतो. अंधश्रद्ध लोकच नव्हे, तर विचारी व्यक्तीही स्वामींच्या आहारी जातात. दादूभट हा या कादंबरीतील ताठ, सत्त्वशील माणूस, दशग्रंथी, निःसंग, सडेतोड; व सहजासहजी न बधणारा. स्वामींच्या मागे लागलेला भक्तांचा लोंढा पाहून तो म्हणतो, "माणसाना देवाधर्मानं आजवर किती चिरडलं, पण ती मात्र मरत नाहीत रांडची!" पण अशा या दादूभटाच्या मनीचे भाव स्वामी ओळखतात, तेव्हा तोही चरकतो, व भक्तिभावाने स्वामींचे पाय धरतो. 'ते चंदनासारखे शीतल होते. हाती सापडून न सापडल्यासारखे त्याला वाटले. अगोचराचा स्पर्श होऊनही तो स्पर्श अगोचरच राहिला.' 'या स्वामीनं न पाहताच सगळ्यांना ओळखलं आहे याबद्दल पुन्हा त्याची खात्री पटली.' पण अशी खात्री पटलेल्या या दादूलाही प्रश्न पडतो की, 'इतक्या योग्यतेचा हा माणूस इथं राहतो कसा?' आणि त्याच्या मनात आलेल्या या प्रश्नाला स्वामी उत्तर देतात की, 'देसाईदेवानं जीवदान दिलंय आम्हाला एकदा. ती हाडं त्यांची आहेत बाप्पा!' म्हणजे जन्म-मरण स्वाधीन असते म्हणावयाचे! पण चमत्कारांचा असा मोठा बाज उभा करूनही स्वामी मात्र कोणाचेही जीवन सावरू शकत नाहीत. त्यांचे सामर्थ्य पूर्ण लुळेच पडल्याचे आढळते. शिल्लक राहते फक्त आश्वासन! फक्त बोलणे!

नंदिनी हे या कादंबरीतील चटका लावणारे पात्र. या अश्राप जिवाला एकाच वेळी तीन वादळांना तोंड द्यावे लागते. सर्वात वडील दीर व केवळ कुटुंबाचाच नव्हे, तर सर्व गावाचा कर्दनकाळ जो आनंदराव त्याचा पाठलाग चुकविता चुकविता तिची होणारी भयानक दमछाक; पति अच्युत याला याच आनंदरावाने 'ती माझी आहे' असे सांगितल्यामुळे त्याने तिच्याशी बाळगलेला जीवघेणा दुरावा; पुतण्या तातू याला तिच्याबद्दल वाटणारे अनावर आकर्षण व तिचीही त्याच्याकडील ओढ, यामुळे तिचा झालेला कोंडमारा व पाप या शब्दाचा स्वतःवर खडा पहारा ठेवताना तिला आलेला विलक्षण थकवा; या सर्वांमुळे तिचे कोवळे मन काटयावर घातलेल्या तलम वस्त्राप्रमाणे फाटून फाटून जाते.

अशी ही अंतर्यामी सर्व बाजूंनी व्याकूळ झालेली नंदिनी पतीचा संशय दूर करण्यासाठी जिवाचे रान करते. स्वामी वाड्यावर येताच अतिशय कळवळून ती मनातल्या मनात त्यांची करुणा भाकीत असते. 'नैवेद्यासारखं हे तारुण्य त्याचं आहे. स्वामी, याला सुबुद्धी द्या हो. याचं नशीबच बदलून टाका.' सर्वज्ञ स्वामी तिचे हे मनोगत जाणतात व तिला सांगतात, 'नंदूबाळ,–सुखाचे हिशेब असेच मिटलेले राहतात. कधीतरी आपणाला भावलेली सुखं आपल्या ओंजळीतून ओघळून जातात... तेव्हा अपेक्षा कशाचीही नको–वाहत राहा बाळांनो–विचाराचं व्रत आम्ही घेतो. तुमच्या प्रवाहात विचारांचा प्रचंड भोवरा नको-गोठून-जाल.' स्वामींच्या ह्या म्हणण्यात काही तथ्यांश होता का? विचारांचे व्रत घेऊन त्यांनी काय केले? लेखक सांगतो, 'स्वामींची वाणी अस्खलित सुरू होती.' हे मात्र खरे होते. हा फक्त शब्दांचाच स्वामी होता. अच्युतला ते मोठ्या प्रेमाने सांगतात, 'अरे बाळ-तिचं गर्भाशय म्हणजे रिकाम्या देव्हाऱ्यासारखं आहे. आज त्यात बालब्रह्माची स्थापना तुला करायचीय.' पण अच्युत साफ नकार देतो. त्यानंतर काही दिवसांनी ते पुन्हा सद्‌गदित अंत:करणाने त्याला सांगतात, 'नंदिनी म्हणजे वेळू बनातला रेशमी बुंभीआडचा वारा. अच्युत, ती बुंभी हलक्या हाताने दूर कर आणि वाऱ्याच्या गर्भाची ओटी भर बेटा.' त्यावर 'ते होणे नाही' हे अच्युतचे उत्तर ऐकताच नंदिनी आतल्या आत विरूप होऊन निघून जाते. त्यानंतरही पुन्हा एकदा स्वामी त्याला सांगतात, 'पोरा, तिच्या देहाची अस्पर्श घडी मोड.' पण अच्युत पहिलेच उत्तर देतो. तेव्हा चिडून नंदिनी म्हणते, 'तू कसला स्वामी? का तूही षंढच?' तत्क्षणी अच्युत तिचे कुंकू पुसतो व तीही मंगळसूत्र तोडून त्याच्यावर फेकून देते व विजेच्या रेघेसारखी निघून जाते. त्यावर सर्वसिद्धिसंपन्न स्वामी दादूस म्हणतात, 'आज आम्ही मात्र म्हणायाचे धनी उरलो. आज जगाची माऊली विधवा झाली.' आजपर्यंत ते कशाचे धनी होते? आणि एवढे रामायण घडल्यानंतर मग स्वामी अच्युतचा संशय दूर करतात, तेव्हा तो तिच्याकडे जातो. पण फार उशीर झालेला असतो. तो दिसताच ती नागिणीसारखी फूत्कारते, 'आज सकाळी विधवा झाल्यावर मला कळून आलं की जगात देव नाही,

धर्म नाही. कुंकवालाही अर्थ नाही. ज्याला आपण पाप पाप म्हणतो तेही काहीच नसतं. असते केवळ एक नियती.' या तिच्या स्फोटाने दिङमूढ झालेला अच्युत स्वामीकडे परत येऊन त्यांना मार्ग विचारतो, तेव्हा ते म्हणतात, 'बाळा, मार्ग दाखविणारे आम्ही कोण? तुझा मार्ग तूच शोधून काढायला हवा... नियतीनं प्रत्येकाचा मार्ग आखून ठेवलेला असतो.'

अस्तित्ववादी विचारसरणीची भासणारी अशी काही वचने मधून मधून पेरल्याने कादंबरीला वजन प्राप्त होऊ शकत नाही. पात्रांच्या जीवनातून अपरिहार्यपणे ती आविष्कृत व्हावी लागतात– 'त्रिशंकू' तील नानूप्रमाणे.

नंदिनी व तातू यांच्यातील दारूण प्रेमसंबंधाचा गुंता लेखकाने अत्यंत कौशल्याने व हळुवारपणे उकलला आहे. तातू हा आनंदरावाच्या पोटी जन्मलेला. पण त्याच्या पापाचा पैसा नको म्हणून निर्धन अवस्थेत एकाकी राहणारा. त्याचे प्रेम बसते तेहि त्याची चुलती नंदिनी हिच्यावर. असा दुर्दैवी! तो संयम बाळगतो. मात्र त्याचे म्हणणे असते की, 'अच्या काकांचीच असशील तर तू मला आईसमान. माझ्या बापाची व्हायचं ठरवलंस तर मात्र मीच तुला कवटाळीन.' नंदिनीही पतीसाठी नवस करते, पण तिचे अंतर्मन तातूसाठी तळमळत असते. 'या स्वप्नाळू डोळ्यांच्या तरुणाला माळ घालता आली असती तर?' पण हा विचार पापी म्हणून ती झटकून टाकते. मनाला बांध घालते. आपल्याला विसरण्यासाठी दारूत आकंठ बुडालेल्या तातूची दुर्दशा तिच्या मनाला पोखरीत असते. परिणामत: त्याच्या भेटीने व विनवणीने तिचा बांध कोसळतो, तेव्हा पुन्हा मोठ्या ताकदीने ती दुसरा बांध घालते. त्यांच्यातील हे प्रगाढ, अस्सल व चिवट भावबंध पाहून दादूसारखा पवित्र व दशग्रंथी ब्राह्मणही त्यांच्या मीलनास केवळ मनोमनीच नव्हे, तर प्रत्यक्षही अनुमती देतो. तातूची जीवघेणी दुरवस्था पाहून दादूला वाटते, 'माणूस मेल्यावरच आम्ही रडायचे का? जितेपणात फक्त पापकर्माचा विचार करायचा का?' या प्रश्नांनी नंदिनीही पूर्ण रिकामी होते. आसन्नमरण तातूस पाहून ती म्हणते, 'या पूर्वी मी याची

झाले असते तर काही निराळंच घडलं असतं ... ... ...तातू मी आले आहे. नंदू म्हणून हाक मार रे मला.' पण तसं घडायचे नसते. येथेहि वेळ निघून गेलेली असते ! अत्यंत क्षीण आवाजात 'कोण' म्हणून तातू प्रतिसाद देतो व मीलनासाठी हातही उंचावतो; पण नंदिनीच्या आधी क्षणार्धात काळच तो हात आपल्या हातात घेतो ! चुलती व पुतण्या यांच्यातील हा निषिद्ध प्रेमसंबंध दाखविण्यात खानोलकरांनी एक धाडसी पाऊल टाकले आहे की विपरीत ?

नंदिनीचे दुर्दैव येथेही संपत नाही. तातू गेल्यावर स्वामींच्या खोलीतून 'नंदूग !' अशा आर्त हाका तिला ऐकू येतात, व स्वामींच्या जागी गुलाबी गालांचा, पिंगट केसांचा तातू तिला दिसतो. 'आत ये ... पापपुण्याचा विचार करू नको' म्हणून तो तिला आळवीत असतो. पण निग्रहाने मन आवरून ती मागे फिरते. कानात गच्च बोटे घालून थरथरते. तातूचा ध्यास घेतलेल्या तिच्याच मनाचे हे प्रक्षेपण (projection) होते की प्रत्यक्ष स्वामींनीच हा चमत्कार केला होता ? थोरल्या वहिनींनाही स्वामींच्या जागी तातू दिसतो. स्वामींना अशक्य असे काही नव्हतेच. ते काहीहि असले, तरी सतत पंधरा दिवस नंदिनीस हा ताण सहन करावा लागतो. तेव्हा शेवटी तिचं डोकं फिरून ती 'वासनेच्या चिखलात बरबटलेला तू एक दरवडेखोर आहेस,' असे म्हणत स्वामींच्या गळ्याभोवती बोटे रोवते. ते पहाताच आनंदराव तिच्या-वरील आपला सूड साधतात. कारण फक्त ती एकटीच त्याला बधली नव्हती. स्वामींपासून तिला त्वेषाने ओढून असंख्य भक्तगणांसमोर ते फेकतात व तिची विटंबना करावयास सांगतात. स्वामींच्या जयघोषात दंग असलेला त्यांचा भाविक भक्तगण नंदिनीवर तुटून पडतो. तरीही स्वामी मख्खच !

आनंदरावांची पत्नी जानकी–थोरली वहिनी एक गूढ, उंच, हाती न लागणारे पात्र. स्वामी वाड्यावर येतात तेव्हा पतीच्या आज्ञेमुळे त्यांना ओवाळते, पण नमस्कार करीत नाही. उलट स्वामीच तिच्या पायाना हात लावून नमस्कार करतात. विठोबालाही नमस्कार न करणारी ही स्त्री. पण नंदिनीवर जीवघेणाप्रसंग येई, तेव्हा पाठीवर धीराचा वत्सल हात पडे तो थोरल्या वहिनींचा ! 'सगळे दुःख शीतल होऊन जाई.' कुटुंबाकरिता सतत

राबणारी, महारापोरांना जवळ करणारी, धीरगंभीर वृत्तीची ही स्त्री जन्मभर तोंड मिटून वावरली. फक्त एकदाच तिने तोंड उघडले. दादूभटाने तिच्या तातूवरील प्रेमास छेडले तेव्हा तिने परखडपणे त्याला बजावले, 'दादुल्या, तोंड सांभाळून बोल. आईच्या काळजाला हात घालणं सोपं नाय… अनेक दुःखं इथं ठेवलीत मी या काळजात ' अशी ही थोरली वहिनी नंदिनीवरील भक्तांच्या अत्याचाराने पेटून उठते. तेवढ्यात वाड्या-बाहेरील गवताच्या पेटत्या गंजी दिसताच 'आता अंत झालाच पाहिजे' असे म्हणून प्रचंड दारास पाठ लावून उभी राहाते व आगीतून निसटू पाहणाऱ्या प्रत्यक्ष पतीवर कुऱ्हाड उगारून ही साध्वी त्याच्यासह ज्वाळांच्या भक्ष्यस्थानी पडते. स्वामी म्हणतात, 'भगवंता, मी तयार आहे.' तयार न राहून भागणार होते का? आणि मागे देसायाने वाचविल्यावर तरी स्वामींनी कोणाचे भले केले?

असा हा संपूर्ण हतबल व निष्प्रभ स्वामी उभा करून खानोलकरांनी काय साधले? मलपृष्ठावर 'खानोलकरांची प्रतिभा जे एक तपापासून शोधत होती ते अखेरीस इथे पूर्णांशाने प्रगट झाले आहे' अशी या कादंबरीची भलावण केलेली आहे; पण मला वाटते, खानोलकर आजपर्यंत जे शोधत होते ते त्यांच्या हातून येथे पूर्ण निसटले आहे.

या कादंबरीतील आणखी काही उणीवा: स्वामींच्या प्रारंभीच्या 'राहा म्हणतोय-राहिलं पाहिजे – शेजारीच तर आपला गाव आहे – एक घरही आहे – कधी स्वातंत्र्य युद्धात ते सोडलं आपण.' या उद्‌गारातील स्वातंत्र्य-युद्धात घर सोडल्याचा उल्लेख म्हणजे स्वामींच्या जीवनातील एकमेव आकर्षक पैलू! पण खानोलकर क्षणभर तो उजेडात आणून पुढे तो पूर्ण अंधारातच ठेवतात. तसेच देसायांचे चित्रण त्यांनी पूर्ण काळ्याकुट्ट रंगात केल्यामुळे ते एकांगी झाले आहे. शिवाय त्यामुळे स्वामींची निष्क्रियता व पराभव अधिकच जाणवतात. त्याचप्रमाणे कादंबरीच्या शेवटी शेवटी दयानंद स्वामींचे पात्र आणून त्यांनी कादंबरीचा तोलच घालविला आहे. त्याला 'बुवाबाजीचा धंदा वाढविण्याचे ज्ञान असल्यामुळे' आणला असल्याचे समर्थन लंगडे ठरते. कारण या धंद्यात देसाई कोणालाही हार जाणारे नव्हते.

मात्र खानोलकरांची काव्यात्म व नाट्यात्म शैली, दादू, नंदिनी व मोठी वहिनी या जिवंत रसरशीत व्यक्तिरेखा, आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या प्रतिमा ही या कादंबरीची जमेची मोठी बाजू. वरील तीन पात्रांच्या चित्रणांतून गोचरावरील खानोलकरांची पकड सुटली नसल्याचे पाहून आपल्याला दिलासा मिळतो. नितांत सुदंर प्रतिमांचे दर्शन तर ठायी ठायी घडते. उदाहरणार्थ, 'पायरीवरील संपूर्ण काळीज कापून ठेवण्यासारखी ती दाद होती; 'तातूचं सबंध शरीर म्हणजे एक वेदनांचा निवडुंग होऊन गेला होता.' 'नंदिनीच्या सगळ्या शरीरातून एक अशुभ शंका फुटक्या मडक्या-प्रमाणे वाजून गेली ! अशी किती म्हणून उदाहरणे द्यावीत ?

# १०. ‘भागधेय’ – गूढगहन पात्रांच्या जगात

‘भागधेय’ ही कादंबरी कोकणातील एका छोटयाशा मुस्लिम कुटुंबाभोवती गुंफली आहे. अगदी आटोपशीर असूनही ही कलाकृती अनेक पातळयांवर वावरते. ही जशी निष्ठावान अहमदमियाची एक आर्त कहाणी आहे, तशीच पराक्रमी पण मूर्खपणामुळे मातीमोल जीवन जगणाऱ्या त्याच्या मुलाचीही हसनचीही – करुण कथा आहे. आणि त्याहूनही अधिक हसनच्या लावण्यवती पत्नीची ही एक जीवघेणी व्यथा आहे. अतिशय भोळयाभाबडया, मठ्ठ पण प्रामाणिक अशा ह्या व्यक्तींच्या इच्छा-आकांक्षातून एक थोडा विस्कळीत पण अर्थपूर्ण आकृतिबंध निर्माण झाला आहे.

सत्तरी उलटलेला, पूर्ण निर्बुद्ध पण अत्यंत कष्टाळू व श्रद्धावान अहमदमिया, त्याच्याचसारखा मठ्ठ पण निरुद्योगी असा त्याचा मुलगा हसनमिया, हसनची नितांत सुंदर अनामिक पत्नी, गावचा म्हातारा सामंत आणि त्याचे दोन मुलगे अशा एकूण सहा व्यक्तींच्या चित्रणातून कादंबरीचे कथानक उभे राहते. अहमदमियाची सामंतावर अविचल निष्ठा असते. त्याच्या घरी तो ढोराप्रमाणे अहोरात्र कष्ट उपसत असतो. परंतु सामंताचे कुटुंब मात्र मियाच्या निष्पाप कुटुंबाशी क्रूरपणे खेळ खेळते. त्यातून कथा आकार घेते. गावचा सर्वेसर्वा असा म्हातारा सामंत मियाला सर्वस्वाने लुबाडतो. सामंताचा थोरला मुलगा निवडणूक जिंकण्यासाठी हसनला एक

खून करण्याचा भयंकर आदेश देऊन त्याचे सारे जीवनच विस्कटून टाकतो. मधला मुलगा हसनच्या देखण्या पत्नीला पळवून आपल्या वाड्यावर नेतो, आणि शेवटी थोरल्या मुलापायी तिचा अंत होतो. ही सगळी पात्रे आत्यंतिक वृत्तीची प्रतीके आहेत. अहमदमिया व हसन हे दोघे निर्बुद्धपणाचे व ब्राह्मणावरील श्रद्धेचे टोक गाठतात. हसनची पत्नी पतिनिष्ठेची आणि तिचा लहानगा दोन वर्षांचा मुलगा सोशिकतेची कमाल मर्यादा गाठतात. म्हातारा सामंत व त्याचा थोरला मुलगा स्वार्थाची व दुष्टपणाची परिसीमा करतात, तर मधला मुलगा हसनच्या पत्नीवरील प्रेमापायी आत्मनाश करून घेतो. अशी सकृद्दर्शनी अवास्तव, अतिरंजित, अतार्किक व भडक वाटणारी ही पात्रे. त्यात मुसलमान अतिशय भोळेभाबडे, सद्वर्तनी व कष्टाळू आणि हिंदू विशेषतः ब्राह्मणवर्ग त्यांना अमानुषपणे छळणारा. अशा एकांगी वाटणाऱ्या चित्रणाची भर. परंतु अपवादाने का होईना, समाजात अशा अतिरेकी व्यक्ती असू शकतात हे एकदा मान्य केले की मग त्यांच्यावर उभारलेली कादंबरीची इमारत संभवनीय वाटते. शिवाय खानोलकरांच्या कुशल हाताळणीमुळे पारदर्शक प्रतिमा-प्रतीकांमुळे व अप्रतिम शब्दकलेने वाचकांना खिळवून टाकण्यासच नव्हे, तर जीवनाचा अर्थ जाणवून देण्यासही ती समर्थ ठरली आहे. सामंताची एकनिष्ठ सेवा करणारा प्रामाणिक अहमदमिया आपल्या कुटुंबासह धुळीस मिळतो; आणि पांढऱ्या शुभ्र घोडीवर पांढऱ्या शुभ्र पोषाखात बसून काळीकुट्ट राक्षसी कृत्ये करणारा म्हातारा सामंत मात्र सुरक्षित राहतो. हे पाहून पाप-पुण्याचे, सत्यासत्याचे, इष्टानिष्टाचे आपले सारे हिशेबच उलटे पालटे होऊन जातात. त्याचबरोबर निर्बुद्ध व्यक्तींच्या वाट्याला दारिद्र्य, दुर्दशा व दुर्दैव कशी येतात, स्वार्थी समाज त्याना पशूहूनही कसा कमी लेखतो, आणि त्यांची प्राणांतिक पिळवणूक कशी करतो, हे प्रकर्षाने जाणवत राहाते. तसेच हसनच्या अत्यंत सुंदर व निष्पाप पत्नीच्या काहीशा गूढ व्यक्तिमत्त्वातून निर्माण होणारे शोकनाट्य आपल्याला अस्वस्थ करते. अहमदमिया व सामंत यांचे संबंध रंगवताना ही कादंबरी थोडी स्थूल व एका ढोबळ सामाजिक जाणिवेच्या दर्शनावर स्थिरावलेली दिसत असली तरी हसन, त्याची पत्नी, आणि सामंताचा मधला मुलगा यांच्यातील भाव-संबंध रेखाटताना शोषण प्रक्रियेच्या पलीकडे जाऊन ती मानवी मनातील

सबोध-अबोध व्यापारांचा वेध घेत असल्यामुळे तिला एक वेगळे परिमाण प्राप्त झाले आहे.

या पात्रांमध्ये निर्माण झालेल्या कमीअधिक गुंतागुंतीच्या संबंधातून कथानक उलगडत जाते. अहमदमिया व म्हातारा सामंत यांच्यात निर्माण झालेला भावबंध पूर्ण एकतर्फी असतो; गाढ निष्ठेबरोबरच मियाचे सामंतावर विलक्षण प्रेमही असते. उलट सामंत मात्र त्याच्या बाबतीत कोरड्या ठणठणीत पाषाणासारखा असतो. मियाच्या निष्ठेचा मोठ्या धूर्तपणे फायदा घेऊन तो जन्मभर त्याला लुबाडत राहतो. सामंताच्या मोठेपणावर व सद्-हेतूवर पूर्ण विश्वासून मिया त्याच्या घरचा असंख्य कामाचा घाणा डोळ्यांवर श्रद्धेची झापडे बांधून आयुष्यभर बिनतक्रार ओढीत राहातो. सामंताला तो इतके मानतो की एक दिवस सामंताने अगदी सहजपणे, "अहमदमिया, आता बैस घरी! तरणाताठा मुलगा आहे तुला. किती कष्ट काढशील सांग?" असे म्हणताच ती त्याची आज्ञाच समजून जिवाच्या कराराने तो ती पाळीत राहतो. असा हा मिया मालवणी मातीत राबणारा एक अतिशय भोळा जीव होता. तो हिंदूही नव्हता व मुसलमानही नव्हता. तो वेळेवर नमाज पढायचा, पण गावची महाकालीदेवीही त्याला आपलीच वाटायची. पाकिस्तान झाले म्हणजे काय झाले हे त्याला कधीच कळले नाही. सगळे आयुष्य कसे अगदी सरळसोपे होते. पण म्हणूनच ते अतिशय कठीण झाले होते. सामंतावरील श्रद्धा हा त्याच्या जीवनाचा स्थायिभाव होता. सामंताच्या घोडीबरोबर छाती फुटेपर्यंत तो धावतही असे. कारण लोकांना आपल्या घोडीबरोबर धावविण्याचा सामंताला शोक होता. त्याची सारी धडपड सामंताचा शब्द झेलण्यासाठी व त्यांना संतुष्ट करण्यासाठी असे. त्यापुढे रक्ताची नातीही त्याला नगण्य वाटत. इतकी की एकदा सामंताने त्याला "तुझा मुलगा मला मासे देत नाही" असे म्हणताच आईविना प्रेमाने वाढविलेल्या आपल्या पोटच्या गोळ्याला काळानिळा होईपर्यंत तो बडवून काढतो. रात्री मात्र अश्रू गाळीत राहतो व दुसऱ्या दिवशी कसला-तरी पाला त्याच्या पाठीला लावतो. मुलगा, सून व नातू यांच्यावर त्याची माया होती. त्यांच्याचसाठी तर तो इतके दिवस राबला होता. परंतु हे बंध

सामंताशी असलेल्या बंधापुढे त्याला पूर्ण तुच्छ वाटत होते. एक दिवस सामंताचा मधला मुलगा जेव्हा त्याला सांगतो, "सामंताचा शब्द काही मानत असशील तर अहमदमिया, पोराला घरात घेऊ नकोस! कारण तो खुनी आहे – खुनी." अशा भयंकर प्रसंगीही आज आपल्या घराला बामणाचे पाय लागले या जाणिवेने तो अंतरंगी सुखावतो व आपल्या घरात बामणाला बसण्यासाठी लहानसे स्टूलही नाही म्हणून त्याला खेद वाटतो. सुनेने सामंताला खोटे ठरविल्याबद्दल त्याला तिचा विलक्षण संताप येतो. "बामण खोटं कसं बोलेल?" हा प्रश्न त्याला पडतो. सून त्याची मनोभावे सेवा करते. तेव्हा त्याचे डोळे पाणावतात. कधी मायेचा स्पर्श न झालेले त्याचे मन एक हळुवार व तरल भावना क्षणभर अनुभवतेही. पण सामंताला खोटे ठरवणे म्हणजे मोठाच गुन्हा करणे असे त्याला वाटते. कळस म्हणजे एक दिवस सून घरात दिसत नाही, तेव्हा तो दुःखी होत नाही की त्याला काही प्रश्न पडत नाही. एवढेच नव्हे तर म्हातारा सामंत जेव्हा त्याला विचारतो, 'रात्री तुझी सून पळून गेली असं ऐकतो, खर ते?' तेव्हा तो खुशाल नंदीबैलासारखी मान डोलावतो. कारण 'त्याची बायकोही अशीच कुठे तरी परागंदा झाली होती' या एका लहानशा वाक्यातून प्रामाणिक, कष्टाळू पण दरिद्री व निर्बुद्ध लोकांच्या बायका किती असुरक्षित व अभागी असतात, हे विदारक सत्य खानोलकर वाचकांच्या थेट काळजाला नेऊन भिडवतात. त्यांच्या बायका, मुले, पैसा सारे सारे श्रीमंत व सुबुद्ध लोकांकडून लुबाडले जाते. पण त्यांच्यावरील श्रद्धेमुळे गरिबांच्या ते लक्षातही येत नाही. म्हणून साऱ्या भोगापुढे, तो स्वाभाविक समजून ते बिनतक्रार मान तुकवतात. रक्ताचे पाणी करून पै–पै जमवलेली आपल्या आयुष्याची साडेतीन हजार रुपयांची पुंजी मियाने निःशंकपणे सामंताजवळ ठेवली होती. सामंताने ख़ुद्द आपल्या हाताने ती एका घागरीत भरून मियाच्या घराच्या पायात पुरून ठेवल्याचे त्याला स्वतः सांगितले होते. पण त्याच्या आज्ञेप्रमाणे मृत्यूसमयी जेव्हा मिया ती घागर बाहेर काढतो तेव्हा घागरीत रुपयाऐवजी त्याला पांढरे लाल दगड दिसतात. तरीही सामंताच्या अप्रामाणिकपणाची ओझरती शंकाही त्याच्या मनाला चाटून जात नाही. उलट त्याला वाटते की आपल्या परसातील केळीच्या सर्व लोंगरांवर सामंताचा

हक्क असताना भुकेने तडफडणाऱ्या नातवासाठी का होईना, आपण एक लोंगर तोडण्याचा मोठाच गुन्हा केला आणि सामंताने 'घरी बसून राहा' असे सांगितले असताही भुकेल्या नातवाला पाठीवर घेऊन आपण गावात गेलो व त्यामुळे एका दृष्टीने त्याचा अपमान केला. म्हणूनच आपल्या रुपयांचे दगड झाले असावे. शेवटी बिचारा दोन्ही हातांची ओंजळ करून 'या अल्ला' असे म्हणत प्राण सोडतो. नितांत श्रद्धेचा हा मूर्तिमंत अवतार पाहून आपण विलक्षण कासावीस होतो.

अहमदमियाचा मुलगा हसन याच्या मनाचे धागे निसर्गाखेरीज इतर कुणाशीच कधी जुळले नाहीत. बापाने आईच्या मागे त्याला प्रेमाने वाढविले, याची त्याला जशी काही सुखद जाणीव नव्हती तशीच त्याने त्याला एकदा फोडून काढले म्हणून दुःखही नव्हते. माराचे कारण त्याच्या लक्षात आले नाही व ते विचारण्याचीही त्याला गरज वाटली नाही. सर्वच बाबतीतील त्यांचा मठ्ठपणा व भोळेपणा पाहून त्यांचा जेवढा राग येतो, त्याहूनही अधिक त्यांची कीव येते. विक्राळ सुसरीच्या जबड्यातूनच नव्हे, तर तळपते भाले घेऊन आपल्याला घेरणाऱ्या संतप्त लोकांचे वेटोळे फोडून अत्यंत चपळाईने स्वतःची सुटका करून घेऊ शकणारा, भयंकर नागच काय पण खवळलेला प्रचंड वाघ मारण्याचे विलक्षण धाडस अंगी असणारा हसन शिळ्या अन्नालाही महाग झाला होता. कारण कष्ट करण्याची तयारी असूनही सामंताच्या घरी आपणहून काम करण्याचे त्याला सुचत नाही म्हणून सामंताची त्याच्यावर नाराजी होते व त्याला आयुष्यभर बेकार राहावे लागते. आपल्या लहानशा मुलाचाही त्याला लळा लागत नाही. पत्नीच्या रूपाने मूर्तिमंत सौंदर्यच त्याच्या स्वाधीन असता तो कोरडाच राहतो. तिचे देखणेपण त्याला कधी भावतच नाही. मग तिचे प्रेम समजणे तर दूरच. पण एक दिवस मधला सामंत जेव्हा हजार रुपयांच्या मोबदल्यात त्या सुंदरीची मागणी करतो तेव्हा मात्र एरव्ही तिची यत्किंचितही कदर न करणारा व उष्टया अन्नाला मोताद झालेला हसन भला थोरला धोंडा उचलून सामंतावर धावून जातो व बेंबीच्या देठापासून ओरडतो, 'बामणा, ह्या काय सांगतोस तू माका ? तुझो जीव घेतय थांब.' माणूस म्हणून घेण्यास

योग्य असे हे एकमेव कृत्य तो करतो. पण ब्राह्मणावरील त्याची निष्ठा त्याला माणसासारखी वागूच देत नाही. मधला सामंत त्याच्या तडाख्यातून निसटून जाताच आपण एका ब्राह्मणाला मारणार होतो या कल्पनेने त्याच्या हातातून धोंडा गळून पडतो व तो फार शरमिंदा होतो. पुढे त्याची पत्नी जेव्हा 'माझी खात्री हा – माझ्या घोवानं खून करूक नाय' असे मधल्या सामंताला ठामपणे बजावते, तेव्हा आपला निर्दोषपणा तिने मनोमनी ओळखला याबद्दल धन्यता वाटण्याऐवजी तो तिला एखाद्या दैत्यासारखा बेभानपणे लाथा घालीत राहतो. कारण ब्राह्मणाला जाब देणे, त्याला खोटे ठरवणे हा त्याच्यामते फार मोठा गुन्हा होता. एक दिवस रात्री बायको घरात दिसत नाही तरी देखील त्याच्या मनाची मुळीच चलबिचल होत नाही. त्याला पशूइतकीही संवेदनशीलता नसते. बायकोने उकडून ठेवलेला भोपळीचा पाला बका-बका खाऊन तो खुशाल घोरत पडतो. भूक व झोप ह्या प्राण्याच्या दोन अगदी प्राथमिक गरजांपलीकडे त्याची धाव नसते. घरात साक्षात सौंदर्य वावरत असताना साधा पुरुषसुलभ विकारही त्याच्या मनात जागा होत नाही. त्याच्या बायकोलाच त्यासाठी पुढाकार घ्यावा लागे. असे असता म्हातारा सामंत 'तुझ्या बायकोला ढोलीतल्या वाघानं ओढून नेली. ढोलीत जा आणि जिवंत असली तर तिला घरी ने' असे त्याला म्हणतो, तेव्हा त्याची आज्ञा शिरसावंद्य मानून तो तडक जंगल गाठतो आणि खवळलेल्या वाघास आपल्या कुऱ्हाडीने ठार मारून त्याचे प्रचंड धूड सामंतापुढे आणून टाकतो. मात्र हा अचाट पराक्रम बायकोसाठी नव्हे तर सामंतासाठी तो करतो, कारण वाघ मारल्यावर जेव्हा त्याला गुहेत पत्नी दिसत नाही तेव्हा त्याला मुळीच वाईट वाटत नाही. तो अगदी थंडपणे बाहेर येतो. त्याला फक्त एवढाच प्रश्न पडतो की 'बामण सांगतो ते खोटे कसे?' म्हातारा सामंत मात्र त्याची ही विलक्षण ताकद पाहून हादरून जातो व हे बळ आपल्याला कधी काळी घातकही ठरू शकेल हे हेरून त्याची शक्ती आटवून टाकण्यासाठी आपल्या घोडीबरोबर धावण्याचे त्याला आव्हान देतो आणि तेही अवघ्या तीन भाकरींच्या मोबदल्यात! वेडच्या-बागडच्या हसनच्या लक्षात सामंताचा हा कावा येणे शक्यच नव्हते. म्हणून सामंताच्या आज्ञेप्रमाणे तो जिवाच्या आकांताने

त्याच्या घोडीबरोबर धावतो. 'आज तो हटणार नाही' हे लक्षात येताच धूर्त सामंत, 'हसनमिया, बहाद्दर गडी आहेस, पण तुझा मुलगा घरी वाट बघत असेल' असे म्हणून त्याच्या पायातील त्राणच काढून घेतो. बिचारा हसन खाली कोसळतो, पण कोसळता कोसळता त्याच्या तोंडातून गळणाऱ्या फेसाबरोबर 'बामणानं मला क्षमा करावी' असे पश्चात्तापयुक्त उद्‌गारही बाहेर पडतात.

अशा हसनला पाहून हसावे की रडावे हेच समजत नाही. अर्थात् काहीशा अद्‌भुत वाटणाऱ्या या प्रसंग मालिकेतून हसनच्या वृत्तीचा गोठलेपणा व प्रवाहीपणा वाचकांना एकाच वेळी प्रतीत होतो. तसेच हसनच्या निमित्ताने खानोलकर कोकणच्या निसर्गाचे अपूर्व दर्शन घडवतात. फूत्कार टाकणारे नाग, आपण साठवलेले धान्य लुबाडले गेल्याचे दिसताच मोठा आक्रोश करून भोवतालच्या सर्व पाखरांना एकत्रित जमवून समोर दिसेल त्या माणसाला आपल्या तीक्ष्ण चोचींनी नखशिखान्त घायाळ करणारे रान पाखरांचे थवे, दबा धरून माणसाचा पाठलाग करणारी सुसर, खवळलेला वाघ व एकटा एक माणूस यांची अपूर्व झटापट, यांच्या वर्णनातून निर्माण झालेले रोमांचकारी वातावरण वाचकाला एका वेगळ्याच विश्वात घेऊन जाते.

हातापायांच्या काड्या झालेला, अवघा दोन वर्षांचा कादंबरीतील हसनचा मुलगाही एक भयाण सत्य सांगून जातो. पातळ ओठांचा, डोळ्यात थंडगार दगडी निळेपणा असलेला, भोपळीचा पालाही निमूट खाणारा आणि भिरभिर डोळ्यानी आईला साऱ्या घरभरं शोधणारा, व ती न दिसल्यामुळे हताशपणे उंबऱ्यावर डोके ठेवून बसणारा हा असहाय कोवळा जीव आपले मन गलबलून टाकतो. हे मूल म्हणजे अतिशय प्रामाणिक, सोशिकपण, मठ्ठ वृत्तीचा वारसा चालू ठेवणारे एक प्रतीकच आहे. दरवाजात बसून बापाची वाट बघणाऱ्या व रिकाम्या पोटामुळे व्याकूळ होऊन मधूनच 'माँऽऽ' अशी आर्त हाक देणाऱ्या या मुलाच्या वर्णनानेच कादंबरी संपते. "अजूनही कुठल्या तरी गावातला एखादा हसन घोडीमागे पळतोच आहे. आणि अजून त्याचा मुलगा कुठल्या तरी रिकाम्या घरात बसून हसनची वाट बघतो

आहे." कादंबरीच्या अखेरीस आलेले हे वाक्य म्हणजे आपल्या आर्थिक व सामाजिक व्यवस्थेवर एका संवेदनशील कलावंताने केलेले मर्मभेदी भाष्यच होय. यातून खानोलकर सुचवतात की, जगरहाटी चालू आहे तोपर्यंत सुबुद्ध निर्बुद्धांना, श्रीमंत-गरीबांना, ऐतखाऊ कष्टाळूंना असेच नागवत राहणार व त्यांच्या निरागस अर्भकांची अशीच दुर्दशा होणार !

या कादंबरीत आपल्याला सर्वात जास्त व्याकूळ करते ती हसनची पत्नी. एका जिप्सी तरुणीला अनैतिक संबंधापासून झालेली ही एक नीतिमान मुलगी. असीम सौंदर्याबरोबर असीम दुर्दैव घेऊन जन्माला आलेली. अवघी तीन महिन्यांची असताना प्रत्यक्ष आईने भर माळावर एकाकी सोडून दिलेल्या या अर्भकाला क्रूर व स्वार्थी सामंत एका मुसलमानाकरवी वाढवतो. आणि ती वयात येताच हसनसारख्या बथ्थड मेंदूच्या तरुणाशी तिचा निका लावून देतो. संस्कारांच्या अभावी फारसा विचार करू न शकणारी व तरीही नकळत जीवनमूल्ये जोपासणारी ही नायिका वाचकांना मात्र विचार करावयास लावते. कादंबरीतील सर्व प्रमुख पात्रांचे बरेवाईट धागे जुळतात ते फक्त हिच्याशीच. सून, पत्नी व आई या त्रिविध नात्यांनी मियाच्या कुटुंबाशी ती बांधलेली असते. अल्लाने आपला निका हसनशी लावून दिला आहे, ह्या एकमेव विचाराने त्या कुटुंबाशी एकरूप होण्याचा ती मोठ्या नेटाने प्रयत्न करते. तिच्या सौंदर्यावर भाळून सामंताचा मधला मुलगा तिच्यासाठी प्राण पाखडतो. तिच्याही मनाचे कोमल धागे सूक्ष्मपणे त्या मुलामध्ये गुंततात. आपला मुलगा तिच्यासाठी वेडा झालेला पाहून म्हातारा सामंत तिला वाड्यावर आणवतो. कादंबरीच्या अखेरीस त्याचा थोरला मुलगाही तिच्या सौंदर्याने आकर्षित होऊन तिच्याकडे ओढला जातो. आणि त्याच्या पाशवी वासनेची परिणती तिच्या भयानक अन्तात होते.

शांत व समंजस वृत्ती, अलौकिक सौंदर्य, पतीवर प्रेम व निष्ठा—सारे सारे असूनही तिच्या दैवाचा फासा उलटा पडतो, आणि तिची दारुण शोकांतिका होते. ती जितकी अद्भुत, तितकीच वास्तव आहे. तिचे लावण्य जसे आपल्याला मंत्रमुग्ध करते, तसाच प्रसंगी तिचा थंड कठोरपणा आपल्याला अवाक् करतो. हिरव्या चाफ्याच्या मादक सुवासाप्रमाणे तिच्या

सौंदर्याचा दरवळ कादंबरीभर जाणवत राहतो. या सौंदर्याचे दर्शन घडविताना खानोलकरांची लेखणी बेहोष झाली आहे. त्यात ते प्रतिमांची उधळण करतात. तिला अनामिक ठेवून तिचा उल्लेख सतत 'तरणीताठी' या शब्दाने करून त्यातून तिचे उफाळते तारुण्य ते सूचित करतात. गव्हाळ कांती, किरमिजी रंगाचे लांबसडक केस व टपोरे निळे डोळे असलेल्या या रूपयौवनेचे वर्णन खानोलकर पुढील शब्दांत करतात. "तिच्या शरीराचा प्रत्येक अवयव इतका बांधेसूद होता की एखादी शिल्पाकृती ... ... केवळ एक मेहंदी भरलेल्या हाताचा तळवा तिने कुण्याही रसिक पुरुषाच्या समोर धरला असता तर केवळ तेवढ्या हाताच्या तळव्यावरच त्यानं प्रेम केलं असतं. मुसलमानी सौंदर्याचा मादकपणा तिच्या रोमरंध्रातून ठसलेला होता." मधल्या सामंताच्या सांगण्यावरून एक भावीण तिला चंद्रकळा नेसवण्यासाठी आली असता जेव्हा ती लावण्यवती आपला मुसलमानी पोषाख उतरवते, तेव्हा तिच्या त्या अनावृत देहाचे खानोलकरांनी केलेले वर्णन मोठे अप्रूप आहे. ते लिहितात, 'एखादी कात टाकलेली नागीणसुद्धा इतकी पिवळीजर्द दिसायची नाही. एखाद्या मद्यपात्रातून उठलेल्या निळसर ज्वाळेच्या रंगाचे तिचे डोळे खोल होते तेवढेच निर्लज्जही होते. आणि त्या निर्लज्जपणात एक प्रकारचा भयंकर करवती हट्टही होता. समईच्या मंद प्रकाशात चमकणारे किरमिजी रंगाचे केस विषाची ओढ लावणारे होते. कुठच्याही पुरुषानं स्वतःच्या हातानं त्या केसावर गळा कापून घेतला असता. संपूर्ण उगवलेल्या चंद्राला किंवा प्रखर सूर्यबिंबाला जर नग्न म्हणता आल असतं तर तिच्याही देहाला नग्नतेचं विशेषण लागलं असतं. तिचा नग्नपणा शंभर नंबरी सोन्याचा होता. जणू काय विधात्यानं तिची मूर्ती घडवताना तप्त कांचनाची तार छेडली होती." आणि काळीभोर चंद्रकळा नेसून ती जेव्हा पुरुषभर उंचीच्या आरशासमोर उभी राहते, तेव्हा तर तिच्या असामान्य सौंदर्याचा गौरव करताना खानोलकरांच्या लेखणीला उधाण येते. ते लिहितात, 'तिला स्वतःचंही आश्चर्य वाटलं. आरशात जणू काही ती स्वतः उभी नव्हती. ती होती केवळ एक जगातील सुंदर स्त्री ! असं हे अघटित स्त्रीसौंदर्य पाहताच आरशाचा पाराही वितळून जावा. असं हे एक सौंदर्याचं आश्चर्य पाहता पाहताच समयांच्या ज्योतीचे राजहंस व्हावेत. असं हे स्त्री - रूपाचं एक

नवल बघता बघता मदोन्मत्त हत्तीसुद्धा शांत होऊन महाराणीच्या गळ्यातली माळ अलगद उचलून या नवलापायी वाहील, आणि प्रत्यक्ष ते सुंदर माणूस स्वतःच्या रूपासाठी स्वतःच आत्महत्त्या करील."

अशी आगळ्या वेगळ्या सौंदर्याने विनटलेली ही नायिका नेहमीच्या चौकटीत बसणारी नाही. तिचे सौंदर्य जेवढे अघटित तेवढेच तिचे दुर्दैव विपरीत ! तिचा प्रणय जसा रांगडा तसाच द्वेषही राक्षसी. एकीकडे देखण्या सामंताची विलक्षण ओढ, तर दुसरीकडे 'मनाच्या कुठल्या तरी खोल कप्प्यात एखाद्या उंची अत्तरासारखं नवऱ्याबद्दलचं प्रेम आणि निष्ठा भरून राहिलेली.' त्यामुळे तिचे चित्रण बरेच गुंतागुंतीचे झाले आहे. ... ती व मधला सामंत यांच्या मनाचे धागे परस्परात पूर्ण गुंतले असूनही अखेरपर्यंत वेगळेच राहतात. या घटनेत केवढा तरी खोल अर्थ दडलेला होता. पण खानोलकरांनी त्याचा फारसा विस्तार केला नाही. दोघांना एकमेकांबद्दल वाटणारे प्रेम व द्वेष यांच्या विरोधी ताणातून त्यांच्या मनात घोंगावणारे वादळ खानोलकर अगदी मोजक्या व मुग्ध प्रसंगातून रेखाटतात. त्यामुळे ह्या दोन व्यक्तिरेखा एकाच वेळी गूढ व बोलक्या झाल्या आहेत. मन गुदमरून टाकणारा एक जीवघेणा अनुभव त्यातून जाणवत राहतो.

हसनसारख्या एका अतिदरिद्री व मूर्ख माणसाच्या पदरी पडलेल्या ह्या तरुणीच्या अतिसंथ एकसुरी व कंटाळवाण्या जीवनाला सामंताच्या मधल्या मुलामुळे एक विलक्षण गती येते तिचेच नव्हे तर त्याचेही सारे जीवनच त्यापायी तळापासून ढवळून निघते. दोघांची पहिलीच दृष्टभेट मोठी रोमांचकारी आहे. एका दुपारी सामंताच्या मधल्या मुलाच्या पांढऱ्या-शुभ्र घोडीच्या नुसत्या टापा कानावर येताच ती अंतर्बाह्य इतकी मोहरून जाते की तिचे पाय भारल्यागत खळ्याकडे धाव घेतात. 'तरण्या आंब्या' मागे लपलेल्या त्या सुंदरीची केवळ एक किंचितशी रेषाच सामंताला दिसते. पण तेवढ्यानेच पागल बनलेले त्याचेही पाय खळ्याकडे धाव घेतात. ते पाहताच 'एखादा सोनेरी बुडबुडा प्रवाहाबरोबर दूर वाहात जाऊन पाण्यात गुप्त व्हावा,' त्याप्रमाणे लाजेने चूर झालेल्या त्या तरुणीचे पाय अत्यंत लगबगीने घराकडे वळतात व बंद दाराशी जमिनीवर घट्ट रोवले जातात.

पण सामंत, जेव्हा ती ज्यामागे लपली होती ते झाडच कवेत घेत असल्याचे तिला खिडकीतून दिसते तेव्हा पुन्हा बेभान होऊन ती बंद दरवाज्याकडे धावते. तेवढ्यात सासऱ्याचा खोकला कानावर पडतो, त्यामुळे तिची पाठ दाराला लागते. अखेरीस परत जाणाऱ्या घोडीच्या टापांच्या आवाजाने गालावर ओघळलेले तिचे अश्रू पुसले जातात व मनातील फुलू पाहणारी बाग कोमेजती ठेवून ती मागील दारची बाग शिपण्यास 'हलक्या जड' पावलांनी निघून जाते. बराच वेळ घोडीच्या टापा कानावर येत राहतात. केवळ ओझरत्या दृष्टिभेटीतून परस्परांकडे अनावर आवेगाने खेचली जाणारी ही दोन तरुण मने, त्या मनात अचानक उठणारी वासना-विकारांची वादळे, आणि आपल्या बेलगाम भावनांना थोपवून धरण्याचे त्यांचे सामर्थ्य खानोलकर दोघांच्या मोजक्या पण अत्यंत अर्थपूर्ण हाल-चालीतून व प्रसरणशील शब्दातून साकार करतात.

पुढील कथाभागात, या जगावेगळ्या असलेल्या दोघा प्रेमिकांच्या मनातील गूढ-अगूढ संघर्ष खानोलकर अनेक नाट्यपूर्ण प्रसंगांतून तेवढ्याच ताकदीने रेखाटतात. हसनच्या पत्नीची सामंताबद्दलची आसक्ती जेवढी स्वाभाविक होती, तेवढाच हसनकडील तिचा ओढाही अकृत्रिम होता. त्यामुळे तिची फार केविलवाणी अवस्था होते. सामंताचा देखणेपणा, उमदेपणा, वैभव व आपल्यावरील प्रेम तिला त्याच्याकडे लोहचुंबकासारखे खेचत होते. पण त्याचबरोबर तिच्या निरपराध पतीभोवती खुनाच्या आरोपाचा त्याने टाकलेला फास, त्याच भोळ्या भाबड्या जिवाची त्याने केलेली निंदा, व तिच्यावर हात टाकण्याची हसनप्रमाणेच त्याच्यात नसलेली हिम्मत तिला त्याच्यापासून विरुद्ध दिशेला खेचत होती. त्यामुळे तिच्या मनाचा लंबक एका टोकाकडून क्षणार्धात दुसऱ्या टोकाकडे हेलकावे खाई. हसनच्या बाबतीतही तिची अशीच दोलायमान अवस्था होते. त्याचा मूर्खपणा, आपल्या बाबतीतील त्याची पूर्ण उदासीनता, बेफिकिरी तिला त्याच्यापासून दूर नेत होती. पण दुसरीकडे त्याची साधी भोळी वृत्ती, किलकिल्या बारीक गरीब डोळ्यांतील अजाण भाव, 'या माणसाला आपण सांभाळू शकू' ही होणारी जाणीव तिला त्याच्यापासून दूरही होऊ देत नव्हती.

सामंताच्या मुलांची अवस्थाही तिच्या बाबतीत फार शोचनीय झालेली असते. आतापर्यंत त्याने अनेक सुंदर स्त्रियांबरोबर बेछूटपणे रतिरंग उधळलेले असतात. एखाद्या बाईने नकार दिल्यास तिच्यावर बलात्कार करून तिला वाडयामागील खोल खंदकात बेदिक्कत फेकून देण्याची त्याच्या घराण्याची रीत होती. पण या रूपगर्वितेच्या बाबतीत मात्र त्याला 'सक्तीचा सलाम' नको होता. कारण खऱ्या पागलपणाचा अर्थ फक्त हिनेच त्याला जाणवून दिला होता. शिवाय अहमदमियाचे प्रामाणिक व निरागस कुटुंब पाहून त्याच्यातील सुप्त माणुसकी मधूनच डोके वर काढी आणि संस्कृतीचे, सभ्यपणाचे व खानदानीपणाचे चढवलेले मुखवटेही क्षणभर गळून पडत. हसनसारख्या माकडावरील तिचे प्रेम व निष्ठा पाहून मानवी संबंधाचे त्याला मोठे कोडेच पडे. हसनच्या बायकोलाही आपल्या मनाचा आदिअंत लागलेला नसतो. त्यामुळे आत्यंतिक प्रेमाने अचानक जवळ आलेले हे दोन मनस्वी जीव तेवढयाच अचानकपणे एकमेकांपासून दूर होतात -- कायमचे !

काहीशा गूढ व परस्परविरोधी वृत्तींमुळे या दोन गाढ प्रेमिकात सुरवातीपासूनच एक प्रकारचे द्वंद्व सुरू होते. पहिल्याच भेटीनंतर 'उभ्या गावातलं देखणं माणूस कोण आहे ?' असा प्रश्न सामंताने हसनकरवी तिला विचारला आहे. तो ऐकताच परपुरुषालासुद्धा मोहिनी घालण्याचे सामर्थ्य आपल्यात असल्याची तिला प्रथमच जाणीव झाली आहे. ही जाणीव होताच "तिच्या गात्रागात्रातील रक्ताला विजेचा झोका मिळतो. तिचे मन ढोरासारखा वाढलेला हसन आणि एखाद्या देवाच्या मूर्तीसारखा दिसणारा सामंत यांची तुलना करू लागते" आणि सामंताच्या पहिल्या भेटीच्या दृश्यात ती बुडून जाते. पण अंगांगी बहरून आलेल्या या तिच्या प्रेमभावनेला उभा छेद देणारी एक घटना पाठोपाठ घडली आहे. सामंताने बक्षीस म्हणून दिलेले नोटांचे एक जाडेजुडे बंडल हसन तिच्यापुढे करतो. सामंताने आपली केलेली ही किंमत पाहून ती संतप्त होते व तात्काळ ते बंडल चुलीत फेकून देते. या तिच्या कृत्याचा हेतू मात्र दोघांनाही कळत नाही. सामंताला वाटते की ह्या कृतीतून तिने आपल्याला उद्धट आव्हानच दिले आहे. त्यामुळे

त्याचे खानदानी रक्त पेटून उठते व खऱ्या प्रेमिकाला न शोभणारा व पहिल्या निरोपावर पाणी फिरवणारा दुसरा निरोप तो हसनमार्फत तिला पाठवितो की " हसन्या, तिला जाऊन सांग की मधला बामण म्हणावं तुला लोळवणार आहे. ती रांड समजली काय ? " हसनला तर एवढेच समजते की नोटा जाळून तिने बामणाचा अपमान केला आहे. त्यामुळे चिडून तिला मारण्यास तो तिच्यावर धावून जातो. हा त्याचा मूर्खपणा पाहून तिला त्याची कीव येते. " असा माणूस आपल्याला विकेलही " असा विचार तिच्या मनात डोकावतो व त्या किवेचे रूपांतर शिसारीत होते आणि तिची तापलेली दृष्टी पाहताच तिला मारण्याचे त्याचे अवसान गळून पडलेले तिला दिसते, तेव्हा तर तिचे मन त्याच्याविरुद्ध बंड करून उठते व ती निश्चय करते की, " यापुढं बामणाला कसलाही प्रतिकार करायचा नाही. " त्या देखण्या सामंताचे तिला वाटणारे आकर्षण इतके उचंबळून येते की ती मनाशी म्हणते, " त्या बामणाचे डोळे बघितले की वाटतं त्याच्या डोळ्याचे मुकेच घ्यावेत. त्याला उभ्याउभ्याच मिठीत घ्यावा, एखाद्या झाडासारखा. " पण ज्याची तिला एवढी जबरदस्त ओढ वाटत होती तोच सामंत पुढे जेव्हा निरपराध हसनवर खुनाचा आरोप ठेवतो तेव्हा मोकाट सुटलेल्या तिच्या बेफाट मनाला तत्क्षणी पतिनिष्ठेचा गच्च लगाम बसतो व ती सामंतावर कडाडते, " माणसाचो खून करूक दम लागता दम माणसात. तो त्याच्यात खुय हा ? बोलाच नकात तुम्ही ... आणि तुमी हुय कित्याक येतात ह्या माका ठाऊक हा. " पण कोणत्याही नवऱ्यास धन्यता वाटावी अशा या तिच्या निष्ठेबद्दल हसन तिला लाथेखाली तुडवतो व सामंत मात्र अत्यंत व्याकूळ होतो. आपल्याचमुळे हे घडले म्हणून अंतरंगी विव्हळतो, त्याचे डोळे पाणावतात व भरल्या आवाजात तो म्हणतो, " अहमदमिया, थोर माणसं आहात तुम्ही ... तुझी सून देवता आहे देवता. तिला लाथाबुक्क्यांनी मारणं हे पाप आहे. " या त्याच्या उद्गारांमुळे तिचे मन पुन्हा त्याच्याकडे धाव घेते व परत जाणाऱ्या त्याच्या घोडीच्या टापा ऐकताच " खिडकीच्या गजावर मेहंदीभरल्या हाताच्या मुठी आवळल्या जातात. "

सामंताला झालेला पश्चात्तापही स्मशान वैराग्यासारखा किंचित

काळच टिकतो. बापाच्या सांगण्यावरून तो तिला वाड्यावर पळवून आणतो. अर्धवट शुद्धीतही तिला त्याच्या घोडीवर पिसागत तरंगल्यासारखे वाटते. वाड्यात आल्यावर तेथील साऱ्या वैभवाने ती दिपून जाते. पण आठ दहा दिवस लोटले तरी काही केल्या ती त्याला वश मात्र होत नाही. हे बळ तिच्या अंगी कसे येते ? 'रात्र काळी…' तील लक्ष्मीसारखी ती काही व्रतस्थ वडिलांच्या कडक शिस्तीखाली वाढली नव्हती. सासरा व नवरा ह्या दोन अत्यंत मठ्ठ व तिच्या बाबतीत पूर्ण उदासीन असलेल्या माणसांचाही धाक बाळगण्याचे तिला काहीच कारण नव्हते. त्या घरात सर्वच बाजूंनी तिची विलक्षण उपासमार होत होती. तिच्या प्रेमाला साद घालणे तर दूरच पण तिच्या उसळत्या तारुण्यालाही हसन दाद देत नव्हता. उलट सामंत आपले सर्वस्व तिच्या चरणावर मोठ्या आनंदाने वाहत होता; अतिशय आस्थेने व प्रेमाने तिचा अनुनय करीत होता. तिला समजावीत व समजावून घेत राहिला होता. तिचेही मन वारंवार त्याच्याकडे धाव घेत होते. पण प्रत्यक्ष वेळ येताच मात्र तिचे प्रतिकार वेगवेगळ्या स्वरूपात प्रगट होत. कधी त्याने खांद्यावर हात ठेवताच तिच्या नजरेतून लकाकणाऱ्या विजा त्याच्या काळजावरून धारदार नकाराची सुरी फिरवीत; तर कधी त्याने आणलेल्या मोगऱ्याच्या गजऱ्यामुळे तिच्या रक्तावर पसरणारा फुलांचा मंद वास तिला त्याच्या स्वाधीन करू पाहात असताही त्याचा हात पाठीवर पडताच मानेवर सुरी फिरताना कोकराच्या गहिऱ्या डोळ्यात दिसणारा तिच्या डोळ्यातील असहायपणा त्याला माघारी वळवी. 'तुला इथं राह्यचं नाही का ?' ह्या त्राग्याने विचारलेल्या त्याच्या प्रश्नास 'माका व्हरानं पोचवशात ?' या तिच्या प्रतिप्रश्नाने त्याच्या काळजाला शेकडो जळवा चिकटल्याइतके दुःख होते; शेवटी जेव्हा चिडून तापल्या आवाजात तो म्हणतो, 'माझ्यापेक्षा तुला त्या हसनचा ओढा अधिक वाटावा ? … त्याचं डोकं मठ्ठ आहे. त्याच्या-सारख्या माकडाच्या हाती तुझ्यासारखं एक रत्न पडलं… हसनसारख्या गावच्या भिकारी अन्नावर पोसलेल्या एका दरिद्री माणसाला –" तेव्हा त्याचे वाक्य पुरे होण्याच्या आतच पतिनिंदेने पेटून जवळचा तांब्या अत्यंत त्वेषाने ती समोरील आरशावर फेकते. 'रात्र काळी…' तील लक्ष्मीनेही अगदी अशीच कृती केली होती. पण कशाकरिता तर – समोरचा पुरुष तिच्या

वखवखलेच्या वासना शांत करीत नव्हता म्हणून! तिच्या अतृप्त वासना तिच्यावरील सारे संस्कार स्वच्छ पुसून टाकतात. उलट हसनची पत्नी मात्र काठोकाठ भरलेला व ओठाशी भिडलेला सुखाचा पेला दूर भिरकावून देते. इतका दूर की शेवटी तिच्यासाठी आपल्या छातीत खंजीर खुपसून रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सामंताच्या प्रेताकडे ढुंकूनही न पाहता ती गाढ झोपी जाते. हा तिचा क्रूरपणा, थंडपणा आपल्याला अवाक् करतो. तिला मात्र प्रश्न पडतो की, "आपल्यासाठी का म्हणून त्यानं जीव द्यावा? अशा मृत्यूबद्दल आपण रडावं तरी का? हसन माझा नवरा आहे. खुदानं माझा निका लावलाय त्याच्याशी. मी त्याची बिबी आहे. मी तुमची कशी होऊ?"

परस्परांवर पूर्ण लुब्ध असूनही एकरूप होऊ न शकलेल्या ह्या दोन प्रेमी जीवांच्या क्रिया-प्रतिक्रियातून खानोलकर मानवी मनातील काही ज्ञात-अज्ञात घडामोडींवर प्रकाश टाकतात. त्याला जुलमाचा राम-राम नको होता, तर तिला फक्त तेवढेच समजू शकत असावे. तिच्यावर यत्किंचितही जबरदस्ती न करण्याचा त्याचा भलताच समंजसपणा तिच्या रांगड्या मनाला भावला नसावा. एका संस्कारित मनाचे अनाक्रमक प्रेम तिच्या आकलनापलीकडील असावे. मात्र खानोलकरांना यातून संस्कारित मनाची महती सांगावयाची आहे असे मात्र नाही. कारण एके ठिकाणी ते लिहितात "म्हाताऱ्या सामंताच्या सगळ्याच मुलांना संस्काराचंही देणं लाभलं होतं. त्यांच्या डोळ्यातून जसे अश्रू येत, तसेच कुणाचा काटा कसा काढावा हेही त्यांना कळे आणि देखणं कोण आणि कुरूप कोण याचीही पारख त्यांना होती." ही वाक्ये फार काही सांगून जातात. तिच्यावर जबरदस्ती न करण्यामागे कदाचित सामंताचा श्रेष्ठत्वाचा, अहंकाराचा गंडही दडलेला असावा. तिच्यासारखी सौंदर्यसम्राज्ञी आपणहून वश होण्यातच त्याला आपल्या पौरुषाचा विजय वाटत असावा.

हसनच्या पत्नीच्या काही प्रतिक्रियातून स्त्री-पुरुषसंबंधातील एक पैलू खानोलकर उजेडात आणतात. तो म्हणजे पुरुषाच्या माराची त्याच्या पौरुषाशी व त्यायोगे होणाऱ्या वासना जागृतीशी सांगड घालणारे असंस्कारित स्त्रीचे मन. सामंताने दिलेल्या नोटा तिने जाळल्यावर तिला

मारण्यास तिच्यावर धावून गेलेला हसन जेव्हा तिची तापलेली दृष्टी पाहून माघारा वळतो तेव्हा तिला त्याच्या त्या षंढपणाची इतकी किळस येते की ती त्वेषाने कोपऱ्यात थुंकते आणि पुढे त्याच्या निरपराधपणाची सामंताजवळ तिने ग्वाही दिल्याबद्दल तिचे कौतुक करण्याऐवजी जेव्हा हसन बेभानपणे तिच्यावर लाथा घालतो तेव्हा ती विलक्षण सुखावते. कारण तो मार म्हणजे तिला त्याच्यातील पुरुष जागा झाल्याचे चिन्हच वाटते. तसेच सामंताने दिलेल्या चंद्रकळेचे तिने तुकडे केलेले पाहून सामंत तिच्यावर त्वेषाने हंटर उगारतो; पण तिच्यावरील असीम प्रेमाने त्याच्या हातून तो हंटर गळून पडतो, तेव्हा कीव भरल्या डोळ्यांनी ती त्याच्याकडे पाहाते. हसनची आणि त्याची तुलना करते. तिला वाटते, "त्याच्यात आणि ह्याच्यात फरक काय? तोही असाच ऐनवेळी नांगी टाकायचा. मग ह्याच्याहून तो काय वाईट? तो तर आपला नवराच आहे. याच्या हातात चाबूक असतानाही हा आपल्याला का घाबरला? माझ्यासारखं एक गरीब बाईमाणूस याचं काय करणार होतं? तिच्या डोळ्यात केवळ त्याच्याबद्दल तिटकाराच होता." खानोलकरांच्या 'राखीपाखरू' ह्या कथेतही गावठी स्त्रीची हीच वृत्ती त्यांनी टिपली आहे. त्या कथेतील इंदूचा पती तिला सक्तीने मुंबईस न नेता तिची मनधरणी करीत राहतो. पण त्यामुळेच ती अधिकाधिक संतापते, तिला वाटते "ह्याला हक्काचे सुद्धा घेता येत नाही. याला मी हवेय, पण हा माझ्या परवानगीने माझ्याकडे येणार!" तिची अशीही इच्छा असते की त्याने आपल्या गालावर सणकन् पंजा मारावा, आपला ओला तापला देह काठीने सडासडा फोडून काढावा. इतर स्त्रियांचे नवरे असेच करीत नाहीत का? मग हाच असा कसा? हसनच्या पत्नीलाही असेच वाटत असते. हसनला पेटवण्यासाठी ती त्याला म्हणते, 'मार मरे! घो आसस तुया. मार!' सामंताच्या बाबतीत तर ती कमाल करते. सर्व उपाय थकल्यावर त्याच्या सहनशीलतेचा अंत होऊन तिच्यावर उगारलेला त्याचा खंजीर वरच्यावरच राहतो व शरमेने काळवंडून तो जेव्हा तिला म्हणतो, 'क्षमा कर, तुझा शेवट करणं फार कठीण आहे. माझा शेवट मात्र माझ्या हाती आहे' तेव्हा देखील आपल्यासाठी त्याने केलेल्या बलिदानाची तिला काडीइतकीही किंमत वाटत नाही. उलट तिला त्याचा तो षंढपणा

वाटतो; व त्यामुळे त्याची इतकी घृणा वाटते की डोळे पांढरे करून उताण्या पडलेल्या त्याच्या प्रेताकडेही ती पाहात नाही. आणि म्हाताऱ्या सामंताच्या सांगण्यावरून त्या मध्यरात्री त्याचा थोरला मुलगा जेव्हा तिच्या देहावर चाबकाचे सपासप फटकारे ओढतो तेव्हा मात्र तिच्या पिवळ्याजर्द लालसर अंगकांतीवर चाबकाचे वळ उठत असताही ती गालातल्या गालात मंद मंद हसत असते. सामंत तिच्याकडे चकित होऊन पाहतो आणि तिचा असामान्य देखणेपणा दिसताच त्याच्याही हातून चाबूक गळून पडतो. एवढेच नव्हे तर तिच्या सौंदर्याने तो इतका मोहित होतो की बापाच्या सांगण्या-प्रमाणे चाबकाने तिचे चामडे सोलून तिला खंदकात फेकून देण्याऐवजी काळ्या बुरख्यात गुंडाळून तो तिला घोडीवर घालतो व रातोरात गावाची वेस ओलांडतो.

चानीचीच दुर्दशा हिच्याही वाट्यास येते. करुणा व भीती निर्माण करणाऱ्या शब्दात खानोलकर हिच्या दारुण अंताचे वर्णन करतात. त्यातील मूक वेदना आपल्या काळजाचा ठाव घेते. ते लिहितात, "दुसऱ्या की तिसऱ्या दिवशी हसनच्या बायकोचे प्रेत शेजारील गावच्या किनाऱ्यावर उचंबळणाऱ्या समुद्राच्या लाटांवरील फेसात तरंगत होतं. किरमिजी केस अजूनही चकाकत होते. —सकाळच्या कोवळ्या सूर्यकिरणात."

# ११. 'पाषाणपालवी': वासनेची अतिरेकी असोशी

खानोलकरांच्या मृत्यूनंतर पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेली ही कादंबरी. जणू काही त्याना काळाची चाहूल लागली होती असे वाटावे इतका त्यांच्या या कादंबरीचा विषय त्यांच्या पहिल्या कादंबरीशी आपले नाते जोडतो, आणि त्यांच्या कादंबरीक्षेत्राचे वर्तुळ जणू पूर्ण होते. 'रात्र काळी... घागर काळी' या त्यांच्या पहिल्या कादंबरीतील लक्ष्मीच्या लावण्य–आगीस स्पर्श करण्यास कोणी धजले नाही. म्हणून तिची घागर आयुष्यभर उपडीच वाहात राहिली, तर प्रस्तुत कादंबरीतील उमेला क्षयी पतीसाठी सौंदर्याचा बाजार मांडावा लागूनही आपल्या हळुवार व स्वप्नाळू कविमनास फुलविणारा मनाजोगा जोडीदार न मिळाल्यामुळे तिचीही घागर एका अर्थी उपडीच राहिली. वासना–अतृप्तीमुळे अतिसुंदर स्त्रीच्या मनाची होणारी तगमग व दुर्दशा हाच दोन्ही कादंबऱ्यांचा विषय. पार्श्वभूमी, वातावरण, संकटे व हाताळणी अर्थातच भिन्न भिन्न.

या कादंबरीतील उमा व विक्रम या परस्परात दोन ध्रुवांइतके अंतर असलेल्या प्रमुख व्यक्ती. तरुणपणी भावी आयुष्याची सोनेरी स्वप्ने पाहणाऱ्या, कविता करणाऱ्या, कमळांना कुरवाळणाऱ्या, अंतर्बाह्य निर्मळ

असलेल्या उमेची गाठ क्षयी पतीशी पडते, आणि पांढऱ्या शुभ्र कमळांच्या पाकळ्या मोजणारे तिचे डोळे संसार कसा चालवावा, या चिंतेने जळत राहातात. पतीस वाचविण्यासाठी त्याच्या सांगण्यावरून शील विकण्याचे दिव्य करता करता —

'तळे कुठे अन् कुठे कमळिणी; ओंजळीत हे काळोखाचे काळे पाणी' अशी तिची दारुण अवस्था होते. याच्या उलट विक्रमचा जीवनक्रम. चक्रम वाटावा इतकी त्याची वागणूक विपरीत. सरळ नाकासमोर चालणाऱ्या काटचाबरहुकूम आयुष्य आखून घेतलेला, पूर्ण अबोल व चाळीत राहूनही कमलपत्राप्रमाणे निर्लेप असलेला विक्रम साऱ्याना एक कोडेच वाटायचा. परंतु घराण्याच्या बांधिलकीमुळे त्याला असे वागणे अपरिहार्यच होते. त्याच्या घराण्यातील प्रत्येक पुरुष चारित्र्यसंपन्न. त्यामुळे त्या सगळ्यांच्या समाध्या बांधल्या गेल्या होत्या. त्यामुळे गावात कली शिरणार नव्हता. म्हणून केवळ व्यक्तीच्याच दृष्टीने नव्हे, तर गावाच्या दृष्टीनेही या परंपरेला फार मोठा अर्थ होता; व म्हणून त्यासाठी शरीर व मन निष्कलंक ठेवणे व सुखदु:खातीत होणे विक्रमला भाग होते. याप्रमाणे एकीकडे परंपरा झुगारून दिलेली, शीलविक्रय करणारी उमा, तर दुसरीकडे परंपरेस घट्ट चिकटून बसलेला पूर्ण निष्कलंक असा विक्रम. परंतु एवढ्या ह्या परस्परविरोधी असलेल्या व्यक्ती जवळ येतात तेव्हा त्यांना आपापले हरवलेले स्वत्व गवसते; आणि त्यांचे मनोमनी मीलन होते. विक्रमने स्वत:भोवती संयमाच्या व अलिप्ततेच्या उभारलेल्या भरभक्कम कोटाला उमेच्या पहिल्याच भेटीने तडा जातो, व उत्तरोत्तर या कोटाची एक एक वीट निखळून अखेर तो कोट भुईसपाट होतो. विक्रमवरील परंपरेची सारी दडपणे कुचकामाची ठरतात आणि रूढीचे अभेद्य तट उल्लंघून विक्रम पूर्णपणे उमेचा होतो. उमाही आतापर्यंत कोंडून ठेवलेल्या आपल्या सगळ्या हळव्या, काव्यात्म वृत्तीसह त्याला सर्वस्वाने सामोरी जाण्यास धावते. पण या स्वर्गवाटेवरून चाळकरी तिला नरकाकडे खेचतात. असा ह्या कादंबरीचा थोडक्यात भावार्थ.

परंतु अशा ह्या वजनदार आशयाचा आविष्कार खानोलकरांसारख्या

सिद्धहस्त लेखकास कलात्मक रीत्या करता आला नाही. बव्हंशी निवेदनाच्या पातळीवरच तो राहतो. संघर्षाची गुंफण थोडी घाईगर्दीने व काहीशा कृत्रिमतेने झाली असून एकूण रचनाच शिथिल वाटते; आणि मग मनाला अशी एक कटु शंका चाटून जाते की या कादंबरीतील उमेला क्षयी पतीसाठी जसा देहविक्रय करावा लागतो, त्याप्रमाणे खानोलकरांसारख्या श्रेष्ठ कलाकारासही जगण्यासाठी लेखणीविक्रय तर करावा लागला नसेल ना? या भीषण शंकेने मन व्याकूळ होते; व जगातील अनेक अस्सल कलावंतांच्या भाळी लिहिलेले ललाटलेख डोळ्यांपुढून तरळून जातात. अर्थात् खानोल-करांची फसलेली कलाकृतीही मनाला कुठेतरी स्पर्श करून जातेच व विचार करावयासही लावते. प्रस्तुत कादंबरीही त्यापैकीच एक.

विक्रम व उमा ही दोघेही अपवादात्मक परिस्थितीत सापडलेली असल्यामुळे त्यांच्या समोरील प्रश्नही सामान्य माणसाला पडणारे नेहमीचे प्रश्न नाहीत; व म्हणून त्यांची उत्तरेही चाकोरीबद्ध नाहीत. पाषाणवत् कोरडेपणाने जगू पाहणाऱ्या विक्रमच्या संवेदनाशून्य आयुष्याला पालवी फुटण्याचा चमत्कार घडतो तो स्त्रीच्या वाट्याला येणारे भोग पाहून. 'धुक्याआडच्या एखाद्या वेलीसारखी दिसणारी गव्हाळ कांतीची व काळ्या डोळ्यांची' शेजारची गार्गी, आणि 'अकालीच कुठेतरी काळजातल्या काळजात मार खाल्ल्याचे डोळ्याद्वारे दर्शविणारी' ऑफिसमधील देखणी अरुणा सामंत, यांच्यामुळे त्याच्या स्वस्थ जीवनात एक बेचैनी निर्माण होते. ऑफिस सुटल्यावर साहेबानी थांबण्यास सांगितल्याचा निरोप ऐकल्यावर अरुणाने काढलेल्या 'मला थांबलंच पाहिजे, नाहीतर ही नोकरीसुद्धा जायची' या अगतिक उद्‌गारानी त्याचे घट्ट मन त्याच्या नकळतच मेणासारखे वितळते, आणि त्याला कळून चुकते की 'जी वाट आपण चालण्याचा प्रयत्न करतो आहोत ती वाट दिसते तितकी सरळ नाही तर!' गार्गी व अरुणा यांच्याशी अनुक्रमे विरोधी व संवादी लयीत असलेल्या उमेचे जीवन तर विक्रमच्या आतापर्यंतच्या नीती-अनीतीच्या कल्पनांना, परंपरानिष्ठेला, रूढीवरील श्रद्धेला, नव्हे अगदी अस्तित्वाच्या अर्थालाच आव्हान देते. परंपरेने चालत आलेला

वसा अपरिहार्य मानून तो निमूटपणे स्वीकारणाऱ्या त्याच्या श्रद्धाळू मनाला उमेच्या दुर्दैवाने अकस्मात जाग येते. पतीपायी तिच्यावर कोसळलेल्या कलंकित जीवनाच्या आपत्तीने त्याच्या नीतिकल्पनांना भयंकर हादरा बसतो. त्याला वाटते, 'आतापर्यंतच्या त्याने पाहिलेल्या स्त्रिया चारित्र्यसंपन्न आहेत, कारण सगळ्यांच्या डोकीवर एक मजबूत छप्पर आहे. प्रत्येकीची सर्व तऱ्हेची गरज भागते आहे.' या विचाराने त्याने आतापर्यंत जोपासलेल्या नीतीमूल्यांना छेद जातो. ती मूल्ये त्याला खोटी, फसवी व टाकाऊ असल्याचे जाणवते. आणि त्यामुळे त्याने स्वत:भोवती उभारलेला निष्कलंक जीवनाचा बुरूज ढासळतो. पतीच्या मृत्यूनंतर त्याच्या क्रियाकर्मासाठी तशाही स्थितीत जारकर्म करून उमेने त्याला आणून दिलेली शंभराची नोट पाहताच त्याचे हात नकळत जोडले जातात. त्याला वाटते, 'एक बोंब द्यावी ... अरे, या मानवी जीवनाचा अर्थ काय? फक्त जन्म आणि मृत्यू यामधल्या कॉरिडॉरमध्ये एखाद्या जालिम औषधाच्या दर्पासारखं आम्ही रेंगाळायचं?' तिचे अप्रतिम लावण्य, उत्कट प्रेमासाठी आसुसलेले मन, त्याच्याकडील तिची अनिवार ओढ, चाळीतील लोकांच्या तिच्यावरील गिधाडी नजरा, तिची असुरक्षितता – या सर्वांमुळे त्याच्या विचारात विलक्षण उलथापालथ होते. 'भगवंतानं दिलेली कुडी जन्म आणि मृत्यू यामधल्या लांबलचक माळरानावर नुसती काय सावलीसारखी भटकणार आहे? आपलं घराणं, त्या घराण्याचा कुणीतरी एक मूळ पुरुष, खऱ्याखोट्याचे अर्थ त्याला समजले आणि त्याच्या पावलावर पाऊल ठेवून आपल्या घराण्यातले सगळे पुरूष, आपल्या वडिलापर्यंतचे, भावनाशून्यपणे शरीराला केवळ एक काष्ठ मानून जगत राहिले. समाधीच्या खड्ड्यापर्यंत. केवळ एक रूढी म्हणून? की खरोखर मनापासून जाणिवेनेणिवेच्या पलीकडे जाऊन या पुरुषांनी जन्ममृत्यूचा विचार केला?' या विचारानी त्याला इतके बळ येते की, तो तिला आपल्या खोलीत आसरा देतो; व प्रथम तिचे संरक्षण करण्यासाठी पुढे केलेला आपला हात शेवटी विवाहासाठी तिच्या हातात देतो!

नायिका उमा हिचे चित्रण प्रथमदर्शनी धक्का देणारे, तरीही तिच्या

करुण शेवटाने मन गलबलून टाकणारे झाले आहे. विक्रमशी झालेल्या पहिल्याच भेटीत ती त्याला सांगते, ' सगळं काही अटळ असतं. आपण फक्त विचार करतो. कुणाशीही बांधले जातो. त्याला म्हणतो ऋणानुबंध... स्त्री खूप देते आणि पुरुष फक्त घेणारा, तिचा स्वामी. ' हे तिचे निवेदन मात्र प्रत्ययकारी होत नाही. तिचा जो दु:खभोग पाषाणाला पालवी फुटण्यास कारणीभूत होतो, त्या भोगाचा पायाच ठिसूळ असल्यामुळे त्यावरील सारी इमारत डळमळीत होते. अलिकडील काळात व त्यातही मुंबईसारख्या शहरात क्षयी व्यक्तीसाठी अनेक सोयी उपलब्ध असल्यामुळे त्यासाठी शील-विक्रय करण्याची तिच्यावर आलेली आपत्ती मुळात ओढून ताणून आणलेली आपत्ती ठरते, व पुढे तिच्यावर कोसळलेल्या सर्व अनर्थांचा पायाच त्यामुळे ढासळतो. नंतरच्या तिच्या जीवनात झालेल्या घडामोडीही पटवून घेणे कठीण जाते. विवाह झाल्यावर दहा वर्षांनी तिच्या पतीस क्षय होतो, म्हणून तो तिला स्वत:साठी कुमार्गास लावतो. त्याच्या मृत्यूपर्यंत, म्हणजे दहा वर्षे ती हे दिव्य करीत असते; तिचा पति तिच्यावर एवढेच दुर्दैव लादून थांबत नाही, तर आपल्या रोगग्रस्त शरीरात अधिकाधिक पेटत जाणारी वासना तृप्त करण्यासाठी तिला परपुरुषाने तिच्याशी केलेल्या संभोगाची सविस्तर वर्णने वेळोवेळी करावयास लावतो, अगदी अखेरच्या क्षणीही. आणि उमाही पतीची ही आज्ञा निमूटपणे पाळते. एवढेच नव्हे, तर आपल्या मनाशी प्रामाणिक कबुलीही देते की, ' उमा, जे पुरुष तू भोगलेस त्यामुळे तू नाही का तृप्त झालीस ? ' तिच्या संभोगाची वर्णने लेखक चवीने करतो. ' वस्त्र फेडणे... टीपेचा प्रसंग विळख्यावर विळखे... शरीरातून वाफा, वासनेने उन्मत्त, मीही घट्ट मिठीत कवळला म्हणून तो अधिकच उन्मत्त झाला... एक झालो होतो तरीही कुणीच कुणाला आटोपत नव्हते. दोघानाही मधुरशी ग्लानी आली. ' हा सारा आटापिटा व अतिरेक कशासाठी ? हे अपरिहार्य होते का ? तिचा पति तिच्यावर असा अत्याचार करील, अशा काही खुणा त्याच्या व्यक्तिमत्त्वात आढळतात का ? अर्थात् त्याच्या वैवाहिक जीवनातील पहिल्या दहा सुस्थिर वर्षातील जीवनाबद्दल लेखकाने चतुराईने मौन पाळले असल्यामुळे आपल्या हातून ते साधन हुकते, पण नंतरच्या त्याच्या चित्रणातही अशा जागा आढळत नाहीत. उलट काळाची चाहूल

लागल्यावर तो उमेला विक्रमसारख्या सज्जन व्यक्तीच्या हाती सोपवतो व त्याला सांगतो की, 'रोगजर्जर शरीराइतकं व्रतस्थ काही नसेल. अहो, मला कळून आलंय – हा आकार कधीतरी गळणार,' तेव्हा लेखक सांगतो म्हणूनच आपण मानावयाचे असा हा प्रकार आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे असे महान् दिव्य करणाऱ्या उमेला त्याच्या निधनाने क्षणभरही दुःख होत नाही; उलट एकाएकी तिच्या सबंध देहातून अनेक वर्षानंतर एक सर कोसळून गेली. रक्ताच्या कणाकणाला अंकुर फुटले, आणि –

धुक्यात आहे डोह कुठेतरी, अथांग त्याचा तळ गाठावा
म्हणोन शिरले धुक्यात तरीही थेंब – न ओठी एक पडावा ?
'जळत्या अश्रूमधून माझ्या, ये ना सजणा काजळ घालू'

अशी तिची व्याकुळ अवस्था होते. 'तिच्या कौमार्यावस्थेचासुद्धा एक झोपाळा होतो, व पावलांच्या गतीला कस्तुरीमृगाचे चापल्य येते' असे सांगून लेखक तिच्या उफाळून आलेल्या तारुण्योन्मादाची जो वर्णने करतो, तीही केवळ सनसनाटी निर्माण करण्याच्या मोहाला बळी पडूनच त्याने केलेली आहेत, असे वाटते. वास्तविक जेव्हा विषयलंपट चाळकरी तिच्या-कडे जाण्याचे तिच्या पतीच्या समाचाराचे आपले निमित्त नाहीसे झाले म्हणून आपल्या वासनातृप्तीसाठी तिची झोपडपट्टीत रवानगी करण्याचा कट रचतात, तेव्हा जननिंदेची पर्वा न करता आपल्या खोलीत तिला आसरा देण्याचे धैर्य व औदार्य स्वतः व्रतस्थ असूनही विक्रम दाखवतो. पण अशा विक्रमला ती दोनचार दिवसातच आपल्या जाळ्यात पकडते. 'त्या नितंबा-पर्यंत रुळणाऱ्या केसांच्या भरघोस प्रवाहाकडे तो पहातच राहिला. पुरुषाला आव्हान देण्यात उमा मोठी चतुर होती. त्या केसांप्रमाणेच तिनं अनेक पुरुषांना लोळवलं असेल, त्यांची दमछाक झाली असेल. तिच्या चिरंजीव तरुणपणाला पेलणारं तिचं असं खूप होतं. विक्रमनं स्त्रीकडे इतक्या मनभावाळू डोळ्यांनी कधीच पाहिलं नव्हतं. चार महिन्यातच त्यांचा विवाहाचा दिवस निश्चित होतो व दुपारी दोन वाजता नोंदणीसाठी तुला नेण्यास येतो, असे सांगून जेव्हा विक्रम बाहेर पडतो तेव्हा आनंदाने बेहोश झालेल्या उमेची 'रात्र काळी' तील उपाशी लक्ष्मीसारखी अवस्था होते. 'तिनं अंगावरची सगळी वस्त्रं फेडून टाकली. जणू काय त्या वस्त्रांवरोबर

तिला जुना देहही फेडून टाकावयाचा होता.' तिला वाटते, 'एखाद्या आगी-सारखा हा देह आहे. पण ह्या आगीला खोलवर तळ आहे, पाण्यानं तुडुंब भरलेला.' 'प्राणाच्या पलिकडून वसंत बहराला येत होता. सांगत होता, उमा, बहराला ये, पुन्हा बाग फुलव, बरबटलेला देह गेला आहे जळून. नखावर मेंदी चढव, तू नववधू आहेस,' 'हे देहाचं झाड कुणीतरी लुटावे म्हणून तिचा तडफडाट चालला होता.' परंतु अशा रीतीने विक्रमच्या सह–जीवनाचा स्वर्गीय आनंद लुटण्याच्या कल्पनेन हरवून गेलेल्या उमेला पिसाळलेले चाळकरी 'विक्रमसाहेबानी तुम्हाला ऑफिसात बोलवलंय, खाली टॅक्सी उभी आहे,' असे एका बनावट पट्टेवाल्याकडून सांगून तिची फसवणूक करतात आणि क्षयी पतीच्या एका नरकवासातून मुक्त होऊन विक्रमच्या प्राप्तीमुळे आनंदाच्या अत्युच्च शिखरावर असलेल्या उमेला दुसऱ्या नरकवासात ढकलतात !

वास्तविक पाप, पुण्य, परंपरा इत्यादी कल्पनांचा मूलगामी विचार करू पाहणाऱ्या या कादंबरीचा आवाका फार मोठा होता. पण खानोलकराना सवड व शारीरिक स्वास्थ्य ही दोन्ही पुरेशी मिळाली नसावी, व म्हणून अवघ्या १७२ पृष्ठात त्यानी तो जबरदस्तीने कोंबून बसवला असेल. शिवाय कथानकाचा ठिसूळ पाया, नायिकेचे गैरवाजवी उदात्तीकरण, तिच्या संभोगाची व उन्मादाची अकारण उघडीवाघडी वर्णने, इत्यादी दोषांमुळे एक चांगला विषय वाया गेला असे खेदाने म्हणावे लागते.

# १२. खानोलकर : एक किमयागार

खोल जळाविण काय असावे वेदनेहुनी दुसरे ?
थरथरताना असेल झाले चांदणेही ग दुखरे

– आरती प्रभु

आतापर्यंत खानोलकरांच्या कादंबऱ्यांचा आपण क्रमशः विचार केला. आता या समारोपात्मक प्रकरणात या कादंबऱ्यांच्या बलस्थानांचा शोध घ्यावयाचा आहे.

: १ :

खानोलकरांच्या कादंबऱ्या वाचताना प्रथम आपल्या नजरेत भरते ते या माणसाचे झपाटलेपण. त्यांच्या साऱ्या पात्रांना हे झपाटलेपण वेढून राहिले आहे. त्यांची सर्व पात्रे कोणत्या ना कोणत्या प्रवृत्तीचे टोक गाठतात. अधेमधे थांबणे, तडजोड करणे, व्यावहारिक पातळीवर येणे त्यांना जमतच नाही. त्यापायी त्यांना फार मोठ्या दुःखाना तोंड द्यावे लागते. प्रसंगी मृत्यूलाही सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांच्या सर्व कादंबऱ्या शोकपर्यवसायी होतात. अश्वत्थाम्याच्या चिरंजीव वेदनेशी त्यांचे नाते आहे. ही वेदना मुख्यतः

स्त्रीची वेदना आहे. चानीची हकीकत ऐकताना दिनूसमोर ज्या प्रमाणे ' एक तिळा उघडत होती. पण आतल्या गुहेत हिरेमाणकांच्या राशी नव्हत्या, अथवा देवदूत किंवा पऱ्या नव्हत्या. फक्त डोळ्यासमोर उभी होती अनेक ठिकाणी घायाळ झालेली, पाठीपोटऱ्यांवर वळ असलेली, असह्य कर्माच्या कहाणीच्या ठणका पोवळ्यासारखा ओठात दाबून बसलेली ' पंधरा सोळा वर्षांची एक अतिशय देखणी मुलगी. त्याप्रमाणे खानोलकरांच्या कादंबऱ्यांतून जागोजागी घायाळ झालेल्या अनेक गुणसंपन्न लावण्यवती एकीमागून एक आपल्यासमोर प्रगट होत असतात.

तसे पाहिले असता वेदना हा खानोलकरांच्या सर्वच वाङ्मयाचा केंद्र-बिंदू आहे. त्यांच्या कवितेत तर या वेदनेचा पानोपानी प्रत्यय येतो. येथे 'व्यथांचे मेण साध्वीचे कुंकू टिकविते ' 'ओल्या उजेडात भोळे दुःख ठिबकत असते, ' ' फळाशिवाय जिणे कंठणारे वठलेले वृक्ष जागत बसतात, ' 'कुणाचे दुधाचे ओठ सुकतात ' तर ' कुणाच्या मनाचे काठ दुखतात. ' अशा ह्या जीवघेण्या दुःखांनी कवीच्या ' जिवाला काळोखाची गाठ बसते, ' कारण 'आम्ही आमच्या पडजिभेइतकेच सर्वार्थांनी एकमेकांचे आहोत ' अशी या कवीची धारणा आहे. स्त्रीचे शापित जीवन तर खानोलकरांना फार कासावीस करते. सर्व बाजूंनी तिच्यावर उगारल्या जाणाऱ्या तीक्ष्ण भाल्यांनी ते इतके व्यथित होतात की त्याचे पडसाद त्यांच्या वाङ्मयात उमटल्याशिवाय राहात नाहीत. अर्थात खानोलकर आधी कवी आहेत व नंतर कादंबरीकार, कथाकार, नाटककार आहेत. पण असे असूनही कादंबरी-कार म्हणून ते सर्वात अधिक यशस्वी झाले आहेत. कारण त्यांना मानवी जीवनातील दुःखच केवळ वाचकांपर्यंत पोचवावयाचे नव्हते, तर त्या दुःखा-मागील कारणांची उकल करून वाचकांना जाग आणावयाची होती.

घुसमटे खोल कळ किटेल्या शून्यात,
फुटायाचा आहे कोंभ आसूंच्या थेंबात.

असा त्यांचा आशावाद होता. हे कार्य त्यांना आपल्या कलाकृतींच्या द्वारे साधावयाचे होते. त्यासाठी बरेचसे बंधनरहित, शिथिल व विस्तारक्षम असे कादंबरीचे माध्यम सर्वात सोयिस्कर होते. त्यातून त्यांना मानवी

दुःखाला जसे सर्व बाजूंनी कवेत घेता आले तसेच त्या दुःखाच्या कारणांचाही समर्थपणे शोध घेता आला.

त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांतून दुःखाचा वणवा एवढा पेटलेला असतो की त्या वाचताना आपण एकाच वेळी जगातलेच, पण जगावेगळे काहीतरी अनुभवीत आहोत असे आपल्याला वाटत राहाते. तसेच या कादंबऱ्या इतक्या आशयसंपन्न आहेत की प्रत्येक वाचनात आपल्याला नवनवा अर्थ गवसतो. शिवाय हा आशय खानोलकर इतक्या हळुवारपणे फुलवतात की कोणीतरी मायेच्या ममतेने आपले बोट धरून मानवी वृत्ति-प्रवृत्तींच्या, जाणिवे-नेणिवेच्या बिकट मार्गावरून आपल्याला चालवीत आहे, आपल्या हृदयाला हलकेच स्पर्श करून जागवीत आहे असा भास होत राहतो. कधी मधेच आढळणाऱ्या या मार्गातील खोल दऱ्या, उंचच उंच डोंगर, वाघ सिंहादी हिंस्र पशू, या पशूनाही लाजवणारे नरराक्षस व त्यांच्या पायदळी तुडविली जाणारी निरागस स्त्री जीवने, हे सारे आपल्याला इतके भयभीत करते की आपण ह्या दुःखपूर्ण जगापासून दूर पळू पाहतो. पण त्याच वेळेस ही दुःखे निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत व म्हणून ती परिहार्य आहेत हेही खानोलकर मोठ्या कलात्मकतेने आपल्याला सुचवीत असल्याचे जाणवते. त्यामुळे आपल्याला दिलासा मिळतो व धीरही येतो, आणि आपण त्या जगाकडे पुन्हा खेचले जातो.

खानोलकरांच्या लिखाणाला असे सामर्थ्य लाभण्याचे कारण म्हणजे त्याला असलेला अनुभवांचा भरभक्कम आधार. ज्या अनुभवांनी खानोलकर विलक्षण विचलित होतात, अंतर्बाह्य ढवळून निघतात, त्यांच्या भाव–विश्वाचा स्फोट होतो व त्यांचे अणूरेणू कंपित होतात, ते आणि फक्त तेच अनुभव खानोलकर आपल्या कादंबऱ्यांतून आविष्कृत करतात. मग त्या अनुभवांना कोणी आदिम म्हणोत, अवास्तव म्हणोत, अतार्किक म्हणोत, विकृत म्हणोत, फँटॅस्टिक म्हणोत, रोमँटिक म्हणोत किंवा मिथ् म्हणोत, आपल्याला मात्र त्यातून अस्सल मराठी मनाचेच दर्शन घडते. त्यांच्या सर्व कादंबऱ्या मराठी मातीतून जन्मल्या आहेत व मराठी मातीशीच एकनिष्ठ राहिल्या आहेत. खानोलकरांवर पाश्चात्य लेखकांची तर नाहीच, पण

भारतीय लेखकांचीही छाप नाही. त्यांच्या कादंबऱ्यात आढळणारा अस्तित्व-वादही काफका, कामूपासून उसना घेतलेला नाही, तर खानोलकरांच्या अनुभवातून स्फुरलेला आहे. असा सर्व बाजूंनी स्वतंत्र असलेला लेखक निरळा.

आपल्या कादंबऱ्यांतून खानोलकरांनी कोणते आव्हान स्वीकारले आहे, स्त्रीच्या कोणत्या दुःखांनी ते अस्वस्थ होतात, ते दैववादी आहेत का इत्यादी सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांच्या अगदी मृत्यूपूर्वीच प्रसिद्ध झालेल्या 'रखेली' या नाटकातून आपल्याला मिळतात. या नाटकाचा नायक पद्मनाभ दाराशी आलेल्या एका वेश्येला आश्रय देताना तिला म्हणतो, 'परमेश्वराच्या हिशोबी वेश्या कुणीच नसते.' आक्षेप घेणाऱ्या आपल्या पत्नीला तो सांगतो की, 'आमच्या हातून जे घडेल ते पापच असेल असं नव्हे. तुमच्या दृष्टीनं ते पाप असेलही, पण प्रियाच्या बाजूनं विचार करता आमच्या हातून घडणारं कृत्य पुण्यही असावं. पाप आणि पुण्य हे शब्दांचे दोन बुडबुडे आहेत. आमच्या मनानं स्वीकारलेले संस्कृतीचे मानदंड हे गवताच्या काडीहून क्षुल्लक आहेत. प्रियासारखी कुंटणखान्यात शील घडलेली पोरसुद्धा या आदर्शांना आव्हान देऊ शकते. विचार करतोय की हे आव्हान कसं स्वीकारावं ? ' हे आव्हान खानोलकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून मोठ्या धैर्याने स्वीकारले व समर्थपणे पेलले. अप्रतिम लावण्य पापीच असते ह्या समजुतीपायी पतीने दूर लोटल्यामुळे परपुरुषांना जवळ करू पाहणारी लक्ष्मी, प्रतिष्ठित व प्रौढ व्यक्तींनी पापमार्गावर नेलेली पोरकी व अजाण चानी, संशयग्रस्त पतीने उपेक्षा केल्यामुळे आपल्यासाठी प्राण पाखडणाऱ्या दिराकडे मनाने ओढली जाणारी नंदिनी व क्षयी पतीसाठी जार कर्मे करणारी उमा या साऱ्याजणी पाप आणि पुण्य हे केवळ शब्दांचे बुडबुडे कसे आहेत हेच आपल्याला प्रखरतेने जाणवून देतात.

'रखेली' या नाटकाची नायिका प्रिया हिच्यावर अगदी अनाथा-श्रमापासून अनेकांनी बलात्कार केले. म्हणून पद्मनाभांना ती म्हणते, 'साहेब, परमेश्वर या जगात असलाच तर त्याला मी एकच विनंती करीन, परमेश्वरा ! या कुत्र्यांच्या जगात स्त्रीला जन्म देऊ नकोस ! ' खानोल-करांच्या कादंबऱ्यातील जाई, इंदू, सुशी, चानी, मधू, हसनची पत्नी या

साऱ्याजणी त्यांच्यावर झालेल्या अत्याचारांबद्दल ईश्वराजवळ हेच मागणे मागत असतील.

आईबापाचा पत्ता नसलेल्या प्रियेला त्या नाटकातील गडी विष्णू सांगतो की मागच्या जन्मातली कसली तरी पापं तिला नडत आहेत, तेव्हा पद्मनाभांना ती म्हणते, 'नाही हो. या जन्मातच कुणीतरी पाप करतं, आणि भोगावं लागतं ते माझ्यासारख्या मुलींना.' अशा ह्या दुर्दैवी प्रियेचा प्रेयसी म्हणून स्वीकार करण्याचे धैर्य पद्मनाभ ज्या क्षणी दाखवतो त्याच क्षणी त्याला कळते की प्रिया ही आपली पत्नी अपर्णा हिचीच लग्नापूर्वी झालेली मुलगी आहे. स्वाभाविकच तो पूर्ण हतबुद्ध होतो. एका दृष्टीने आपलीच मुलगी ठरलेल्या या प्रियेचे भयाण भवितव्य त्याला गुदमरून टाकते. तो आपल्या मनाशी म्हणतो, 'त्या भयानक वणव्यातून बाहेर पडलीस ती सुद्धा पुन्हा त्याहूनही भयंकर अशा दुसऱ्या वणव्यातून चालण्यासाठीं, प्रिया, तुझ्या शोकांतिकेला अंतही नाही आणि आरंभही नाही.' पण प्रतिष्ठेच्या आपल्या चुकीच्या कल्पनांमुळे व नीति-अनीतीच्या संकुचित व पक्षपाती नियमांमुळे प्रियेच्या नशिबी हा भोग आलेला असतो, दैवामुळे नव्हे, याची जाणीवही खानोलकर आपल्याला करून देतात व तीही कलेची पुरेपूर बूज राखत. त्यांच्या कादंबऱ्यांतील सर्वच स्त्रियांच्या वाट्याला अशाच अनेकविध कारणांनी दुःख आल्याचे ते दाखवतात. लेखकाच्या निवेदनास भरपूर वाव देणारा कादंबरीसारखा वाङमय प्रकार हाताळतानाही त्यांचे हे कलेचे भान सुटत नाही.

परंतु खानोलकरांच्या पात्रांवर कितीही संकटे ओढवली तरी ती हताश होऊन बसत नाहीत. उलट सर्व सामर्थ्यानिशी अखेरपर्यंत त्या संकटांना तोंड देत राहतात. मृत्यूचे भयही त्यांना त्यापासून परावृत्त करू शकत नाही. 'चानी' कादंबरीतील मामी अगदी सहजपणे गाऊन जाते :

अरे हासऱ्या जीवाला। भय मरणाचे काय ॥
आणि दुःखाचा रे राजा। पाय नको तेथे जाय ॥

त्यांची बहुतेक सर्व पात्रे मृत्यूच्या छायेत वावरतच स्वतःवर ओढवलेल्या संकटांशी निर्भयपणे मुकाबला करीत राहतात. बकुळ, पार्वती

थोरली वहिनी, अच्युत, नानू, विक्रम व रमाकांत ही याची ज्वलंत उदाहरणे आहेत. 'रात्र काळी ...' तील बकुळच्या दुर्दैवाला सीमा नसते. सदूचा व तिचा परस्परावर जीव जडतो तेव्हा ती अस्सल बीजाची नाही म्हणून लक्ष्मी तिला आपल्या मुलापासून तर तोडतेच पण वामनसारख्या आपल्यावर भाळलेल्या नादान माणसाशी तिचे लग्न लावून देते आणि वर दाजीसारख्या कामांधाला तिच्याकडे पाठवते. तरीही बकुळ मोडून पडत नाही. स्वसामर्थ्याने दाजीला माघारी फिरविते. 'तुम्ही मला लक्ष्मीच्या घरी कित्येक वेळा अशी पाहिली नव्हती का लहानपणी ? नंतर नेसायला लागले तेव्हा तुमचे डोळे लागले माझ्याकडे !' असे म्हणून त्याचा अविवेक त्याला जाणवून देते. पुढे तो आजारी पडल्यावर वामन निर्लज्जपणे जेव्हा तिला त्याच्याकडे जाण्यास सांगतो तेव्हा ताड्कन त्याच्या मुस्कटात ठेवून देण्यासही ती मागेपुढे पाहात नाही. लक्ष्मीने दिलेल्या नोटा ती जाळून टाकते व चरितार्थासाठी विड्या वळण्यासारखे कष्ट करते. ज्या लक्ष्मीने तिचे जीवन उद्ध्वस्त केले होते तिच्यासाठीही ती धडपडते. ती शुद्ध आहे हे सदूला समजाविण्याचा आटोकाट प्रयत्न करते. आयुष्यभर तिला तळमळत ठेवणाऱ्या वामनशी एकनिष्ठ राहते, आणि त्याच्या मृत्यूनंतरही त्याचे घर सांभाळत बसते. आधार म्हणून वेड्या नरूवर पुत्रवत् माया करते, पण तोही पुरुषच ठरतो, तेव्हा मात्र तिच्या दुःखाची परिसीमा होते. 'कोंडुरा' तील पार्वतीही अशाच ताकदीची. खानोलकरांच्या कादंबऱ्यातील ही एकमेव यशस्वी स्त्री. भव्यभीषण कोंडुऱ्यामुळे माणसाच्या मनात निर्माण होणारी अज्ञाताची जरब केवळ पर्शराम तात्यांनाच नव्हे तर उभ्या गावाला हैराण करून हतबल बनवीत असते. पण पार्वतीसारखी एक स्त्री त्याखाली चिरडली जात नाही. एवढेच नव्हे, तर सर्व बाजूंनी काजळू पाहणारे आपले भविष्य विवेकाच्या बळावर ती उजळते. शरीर व बुद्धी ठेचून माकड बनविल्या गेलेल्या वासूशी या लावण्यवतीचे लग्न लावले जाते. तरीही ती डगमगत नाही. त्याच्याशी तर ती एकनिष्ठ राहतेच, पण त्याची व्यंगे उपजत नसून त्याच्या काकाच्या स्वार्थातून ती निर्माण झाली आहेत, म्हणून ती दूर होऊ शकतात हेही ती जाणते व त्यासाठी सर्वतोपरी झटून त्याला पुन्हा माणसात आणतेही. याच्याउलट जेथे स्वार्थासाठी

नरराक्षस बनलेल्या पतीला माणसात आणणे अशक्यच असते तेथे खानोल-करांची 'अगोचर' मधील थोरल्या वहिनीसारखी स्त्री पतीच्या जीवनाचा अंत करण्यासही कचरत नाही. यातून खानोलकर पातिव्रत्याचा एक नवाच पैलू दाखवितात.

या स्त्रियांप्रमाणेच खानोलकरांच्या काही पुरुष-पात्रांतही हे बळ आढळते. बकुळला बांधावरून आणणारा अच्युत अनेकांची कोसळती जीवने सावरण्यासाठी जिवापाड झटतो. त्या प्रयत्नात स्वतःचा पाय गमावून बसतो त्याचे सर्व प्रयत्न असफल होतात. तरीही स्वीकृत कार्यापासून तो परावृत्त होत नाही. त्याच्याचप्रमाणे अनेकांना हात देणारा 'त्रिशंकू' तील नानू विवेकाची कास धरून अनेक संकटांना तोंड देतो व स्वतःवर दुःखाचा डोंगर कोसळला असताही आपल्या ब्रीदापासून ढळत नाही. पतीच्या आजारापायी पापकर्मांत गळ्यापर्यंत बुडालेल्या उमेला जवळ करण्याचे धैर्य व औदार्य खानोलकरांच्या 'पाषाण पालवी' तील विक्रम-जवळ आहे. त्यासाठी आपल्या घराण्याची थोर परंपराही तो मोडतो. तसेच 'असाही एक अश्वत्थामा' मधील रमाकांत आपल्या पत्नीचे विवाहपूर्व मातृत्व उदारपणे नजरेआड करू शकतो. पापपुण्याचे नेहमीचे अर्थ पुसून टाकण्याचे सामर्थ्य या नायकांत आहे.

परंतु पार्वतीचा अपवाद वगळल्यास खानोलकरांच्या पात्रांचे, विशेषतः स्त्री पात्रांचे भोग टळत नाहीत. त्यांच्या चिकाटीच्या प्रयत्नांमुळेही त्यांच्या आयुष्याची दिशा बदलत नाही. कारण त्या स्त्रियांच्या झुंजार वृत्ती-हूनही कितीतरी अधिक ताकदीचे असे क्रौर्य खानोलकरांच्या कादंबऱ्यांत पुरुषदेहधारी पशूंच्या रूपाने प्रगट होत असते. अच्युत, नानू, विक्रम आणि रमाकांत यांसारखे स्त्रियांची कदर करणारे, पुरुषी अत्याचारांपासून त्यांना वाचवू पाहणारे, त्यांच्या दुःखावर फुंकर घालणारे पुरुष खानोलकरांच्या कादंबऱ्यात हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच आहेत. स्त्रीचा विध्वंस करणारे पुरुष मात्र ठायीठायी आढळतात. त्यांच्या पाशवी वासनेपायी अनेक किशोरी मृत्युमुखी पडतात. सर्वांगानी उमलू पाहणाऱ्या सुकुमार कलिकांचा लिंगपिसाट पुरुषांपायी झालेला चोळामोळा खानोलकर अतिशय व्यथित

अंत:करणाने चित्रित करतात. ते त्यांचे फार मोठे दु:ख आहे. 'रात्र काळी ... .. ' तील दिगंबर उन्मादाच्या भरात जाईला ओरबाडून रक्तबंबाळ करतो. कधीही न पाहिलेल्या नाटककाराच्या ध्यासाने पछाडलेली 'अजगर' मधील इंदू झोपली असता तिच्यावर कोणीतरी कामांध बलात्कार करतो. ' जिच्या करुण डोळ्यांकडे पाहून यमालाही विचार करावा लागला असता ' अशी ' त्रिशंकू ' तील अजाण सुशी नानूकडून तारुण्याच्या व प्रेमाच्या बेहोशीत लुटली जाते. वडीलधाऱ्या मंडळींनी पापमार्गावर नेलेली पोरकी चानी उभ्या गावाकडून अत्यंत क्रूरपणे तुडवली जाते. चानी प्रमाणेच रात्रंदिवस काबाडकष्ट करून एकाकी जीवन कंठणाऱ्या ' अज्ञात कबुतरे ' मधील किशोरीही कामासक्त पुरुषांचे भक्ष्य बनते. या सर्व लावण्यमयी षोडशांची दुरवस्था खानोलकरांच्या पुढील काव्यपंक्तींची आठवण करून देते.

' पिकूं दिल्याविण कुणी कातरी गडद पोपटी फळे,
चोच उघडुनी विव्हळ झालें घरटयावरचें खुळें.

निष्पाप किशोरींच्या विध्वंसाने भयाकुल होणाऱ्या खानोलकरांची अवाक् अवस्था यातून व्यक्त होते. त्यांची ही व्याकुळता त्यांच्या नाटकांतूनही आविष्कृत होते. ' अभोगी ' या नाटकातील नायिका गगनगंधा वसंतराजाची राक्षसी वृत्ती पाहून त्याला म्हणते–

' मोत्यामधले सतेज पाणी
पिऊ पाहशी मौक्तिक फोडुनी ।। '

तरीही वसंतराज गगनगंधेला ' कच्ची कैरी ' म्हणून हावरेपणाने कवटाळतो. सशाप्रमाणे भ्यालेल्या या मुग्धेला विश्वासघाताने अरण्यात पकडतो आणि विकट हास्य करीत म्हणतो, ' आम्ही तुला आमच्या बाहुपाशात एखाद्या केळीच्या कळीदार कोवळया पानासारखी कुस्करून टाकतो ... ...थरथरू नकोस अशी दुधावरच्या सायीसारखी. '

या निरागस किशोरींप्रमाणे निरपराध विवाहित स्त्रियांवरही अत्याचार केले जातात. ' कोंडुरा ' तील नारोबा जडचे सुतारणीवर व खुद्द आपल्या भावजयीवरही बलात्कार करतो. या विटंबनेमुळे त्या दोघी

आत्महत्या करतात. अनसूयेवर तिचा पतीच अत्याचार करतो. तरी आपणच या सत्पुरुषांच्या मार्गात आलो म्हणून स्वतःला पापी ठरवून ती विहीर जवळ करते. चानीच्या आईवर एक अँग्लो-इंडियन सोल्जर बलात्कार करतो. पण सारा गाव तिलाच पापी ठरवून रामाच्या कोंडीत बुडवतो. नंदिनीवर तर सामूहिक बलात्कार केला जातो. त्यामुळे तिच्या दुरवस्थेस पारावार राहात नाही. शेवटी पेटत्या वाड्यात ती भस्मसात होते.

अशा रीतीने कामासक्त पुरुषांकडून धुळीस मिळालेल्या कुमारिका व प्रौढ स्त्रिया खानोलकर एकीकडे दाखवतात तर दुसरीकडे वासना-अतृप्तीने तडफडत असलेल्या अनेक नवतरुण, विवाहित स्त्रियाही ते रेखाटतात. त्यांना नववधू दिसते तीच मुळी हिरवेचुडे भरून, हिरवेगर्द पातळ नेसून, कमरेवर काळी घागर घेऊन पाण्यास निघालेल्या नवतीच्या रूपात. पण घागर पाण्यात बुडवताना दुर्दैवाने तिची पावले काठावरून घसरतात व ती प्रवाहात खेचली जाते. तिची घागर तेवढी पाण्यावर उघडी तरंगत राहाते. स्वाभाविकच तिच्यात थेंबभरही पाणी शिरू शकत नाही. भरगच्च प्रवाहात कोरडी राहणारी ही घागर म्हणजेच खानोलकरांची कामतृषार्त स्त्री. त्यांच्या कादंबऱ्यात अशा अनेक स्त्रिया आढळतात. अलौकिक सौंदर्य पापीच असते म्हणून लक्ष्मीचा पती तिला झिडकारतो, लक्ष्मीसाठी वेडा झालेला वामन बकुळला कधीही जवळ करीत नाही. पर्शरामतात्यांना कोंडुरा ब्रह्मचर्य पाळावयास सांगतो म्हणून त्याची पत्नी अनसूया शरीर झिजवत व मन मारत जन्मभर व्रती राहते. सुशीच्या जबाबदारीने नानू बांधला गेल्यामुळे मनाने त्याला वरणारी शकू कोरडीच राहते. ' नंदिनी माझी आहे ' असे भावाने सांगितल्यामुळे अच्युत संशयापायी नंदिनीला आयुष्यभर तळमळत ठेवतो.

दैवदुर्विलास असा की ज्या स्त्रियांची घागर भरते त्यापैकी बहुतेकींचा सर्वनाश होतो. जाई व सुशी ह्या भाविणीच्या मुली म्हणून, चानी व मधू पूर्ण पोरक्या म्हणून, व ' भागधेय ' मधील नायिकेचा पती हसन अतिशय मूर्ख म्हणून, ही सारीच पात्रे काळाच्या जबड्यात ढकलली जातात.

स्त्रीला भोगाव्या लागणाऱ्या ह्या अनेकविध दुःखांबरोबरच असफल

मातृत्वापायी तिच्या वात्सल्यभावनेचा होणारा कोंडमाराही खानोलकरांना फार बेचैन करतो. पहिल्याच कादंबरीत ह्या कोंडमाऱ्याच्या विविध परी ते दाखवितात. या कादंबरीतील अच्युतची पत्नी वांझपणाचे दुःख भोगते, वामनमुळे लक्ष्मी रितीच असते, दिगंबरने ओरबडलेली जाई गर्भ वाढेल या फसव्या आशेवर कशीबशी जगत राहते, आणि लक्ष्मीला मुलगा होऊनही अगदी अल्पकाळच पुत्रसुख मिळते. 'अजगर' मधील वात्सल्यतृषार्त पावस-करीण रस्त्यावरच्या एका अतिओंगळ पांगळ्यावर मायेचा वर्षाव करते, तर बकुळ वेड्याबागड्या नरूवर मायेची सावली धरते. पण या दोन्ही स्त्रियांचे दुर्दैव एवढे भयंकर की त्यांचे हेही सुख मृगजळवत् ठरते. ही दोन्ही मुले वयात येताच त्यांच्यातील पुरुष जागा होतो, व त्या धक्क्याने ह्या हतभागी स्त्रिया हतबल होतात. स्त्रीजीवनातील पुत्रसुखाच्या सर्वोच्च आनंदाला त्यांच्या बहुतेक स्त्रिया मुकल्या आहेत. काहींची घागरच उपडी असते, काही वांझ असतात, तर काहींच्या अपत्यांना गर्भातच मृत्यू येतो. ज्या काही फार थोड्या स्त्रियांना मुले होतात, ती एकतर सुतारणीच्या मुलासारखी दुधावाचून आक्रोश करीत मरतात, नाही तर हसनच्या मुलाप्रमाणे मातृ-वियोगाने व भुकेने व्याकूळ होत झिजत जातात. खानोलकरांच्या कादंबरीत मुलांच्या रडण्याचे उल्लेख फार सूचक आहेत. नानू व गणुराया भोवतालच्या मुलांचे रडणे ऐकून अतिशय कासावीस होतात. अनास्थेमुळे त्यांचे होणारे हाल त्यांना पाहवत नाहीत. म्हणून कोणाला जन्म देणेच नको असे गणु-रायास वाटते. या भीतीने तो आपल्या प्रेयसीस झिडकारीत राहतो. खानोल-करांच्या सर्व कादंबऱ्यात मुले एकूणच अत्यल्प व त्यांनाही ते मोठी होऊ देत नाहीत. जी दोनच मुले त्यांनी मोठी होऊ दिली त्यापैकी श्रीधरच्या नशीबी खेळण्याबागडण्याच्या वयातच हॉटेलचा पोऱ्या होऊन मरेमरेतो राबण्याचे दुर्दैव येते, व सदाशिवाला तर आपली आई व्यभिचारी आहे, आपण अनौरस आहोत या समजुतीने आईच्या नरड्याचा घोट घेण्याइतके क्रूर व्हावे लागते. अशा रीतीने खानोलकरांच्या जवळजवळ सर्वच स्त्रिया कोणत्या ना कोणत्या कारणाने अपत्यसुखाला आचवल्या आहेत.

स्त्रीची सर्व बाजूनी होणारी अशी दुर्दशा पाहून खानोलकर अस्वस्थ होतात. आपल्या कादंबऱ्यातून स्त्रीचे हे दुःख आविष्कृत केल्याशिवाय त्यांना

स्वस्थता लाभत नाही. एवढेच नव्हे तर वाचकांच्या मनावर हे दुःख बिंबावे यासाठी ते अधिकाधिक गडद करण्याचा हव्यास त्यांच्या ठिकाणी निर्माण झाल्याचे दिसते. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यात क्वचित कलात्मकतेचे भान सुटून उथळपणाच्या खुणाही डोकावतात. भडकपणा, अतिरेकीपणा, कृत्रिमता व असंभाव्यता हे दोषही निर्माण होतात. त्यांची सर्व स्त्रीपात्रे जितकी देखणी तितकीच गुणसंपन्न, मोठी सहनशील, कष्टाळू व निरपराध, आणि चारदोन अपवाद वगळता सारी पुरुषपात्रे मात्र वासनापिसाट, उन्मत्त, स्वार्थी व दुष्ट अशी रंगवलेली असतात. एकाहून एक वरचढ असे त्यांचे नारोबा, जडचे, दाजी, आप्पा बामण, म्हातारा सामंत व आनंदराव देसाई हे खलनायक आपल्या दुष्टपणात जगातील कोणत्याही क्रूरशक्तीला मागे टाकणारे आहेत. या त्यांच्या क्रौर्याला गावच्या लोकांचे सामूहिक क्रौर्यही येऊन मिळते व त्या भडक्यात चानी, नंदिनी यांसारख्या अश्राप तरुणी भस्मसात होतात. दुःख गडद करण्याच्या सोसापायी खानोलकर शेवटी नवीन पात्रे आणून काही वेळा कादंबऱ्यांचा घाटही विघडवतात. पण त्यांच्या कादंबऱ्यात वाचकांना झपाटून टाकण्याचे एवढे सामर्थ्य आहे की हे दोष सहजपणे दृष्टीआड होतात.

त्यांच्या कादंबऱ्यांच्या अंगी हे बळ येण्याचे कारण स्त्रीदुःखाचा त्यांनी अनेकांगांनी घेतलेला वेध हे आहे. या दुःखाची त्यांनी जी कलात्मक उकल केली त्यामुळे हे बळ अनेक पटींनी वाढले आहे. स्त्रीची बहुतेक दुःखे मानव-निर्मित असल्यामुळे ती दूर होऊ शकतात, हे कोणतेही भाष्य किंवा चर्चा न करता केवळ पात्रप्रसंगातून खानोलकर फक्त सुचवतात. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांतील दुःखांनी वाचक नुसताच व्याकूळ होऊन बसत नाही, तर त्याला एक नवीन जाग येते.

तरीही या कादंबऱ्यांवर असा एक गंभीर आक्षेप घेतला जाऊ शकतो की खानोलकरांनी त्यात फक्त स्त्रीदुःखाचेच व तेही वासनासंबद्ध दुःखाचेच चित्रण का करावे ? या कादंबऱ्यांतील अपत्यहीन स्त्रिया, पुरुषी वासनेस बळी पडलेल्या तरुणी व कामतृषेने तळमळत असलेल्या स्त्रिया पाहिल्यावर एखाद्याला असा प्रश्न पडेल की स्त्रीच्या जीवनाला याहून दुसरे

कोणतेच मूल्य नाही का? त्यांची सारी पात्रे प्रमाथी कामवासनेनेच पछाडलेली दिसतात. १९५६ साली प्रसिद्ध झालेल्या 'रात्र काळी ..' तील लक्ष्मी 'हा देहच तो नेसून जाईल' असे म्हणत विलक्षण बेचैन होऊन बसते, आणि १९७५ सालातील 'अगोचर' मध्ये नंदिनीही अशीच तळमळत असलेली पाहून स्वामी तिच्या पतीस सांगतात, 'तिच्या अस्पर्श देहाची घडी मोड.' हे कसे? त्यामुळे कादंबरीचा आशयही एकारत नाही का? स्त्रीचे असे चित्रण एकांगी होत नाही का? वरवर पाहता या आक्षेपात तथ्यांश दिसत असला तरी बारकाईने विचार केल्यास त्यातील वैयर्थ्य सहज लक्षात यावे. अनुभवनिष्ठा हे या आक्षेपाला संयुक्तिक उत्तर आहे. खानोलकरांना ज्या स्वरूपात स्त्रीचे दर्शन झाले त्या स्वरूपाशी त्यांनी पुरेपुर इमान राखले आहे. ऐन पंचविशीत असताना सर्व बाजूनी गांजलेल्या पुरुषी अत्याचाराने ओरबाडल्या गेलेल्या व मातृत्वासाठी आसुसलेल्या ज्या स्त्रिया त्यांनी पाहिल्या त्यांचा विसर या अतिसहृदय संवेदनशील कलावंताला पडणे शक्यच नव्हते. शिवाय स्त्रीला भोगावी लागणारी ही दुःखे अटळ नाहीत हे जेव्हा त्यांना जाणवते तेव्हा तर या दुःखानी जखमी झालेले त्यांचे मन इतके पेटून उठते की ते शब्दबद्ध केल्याखेरीज त्यांना शांती लाभत नाही, नव्हे त्यांच्या कलाकृतीतून ते अगदी आपोआप प्रगट होते. 'अंतरिक्षाचा इशारा' या कवितेत ते स्वतःच सांगतात-

बंद ओठांनी निघाला पेटलेला एकला,
फाटलेल्या अंतरीचा सूर झाला मोकळा.

या अनुभवनिष्ठेमुळे व उत्स्फूर्ततेमुळेच त्यांच्या कादंबऱ्या विलक्षण प्रभावी व प्रत्ययकारी झाल्या आहेत.

शिवाय आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनी एका सनातन प्रश्नाला हात घातला आहे. तसेच या कादंबऱ्यांचा विषय बाह्यतः जरी एकच दिसत असला तरी या विषयाची खोली व विस्तार दाखवताना खानोलकरांनी त्यात इतकी विविधता आणली आहे, की ती पाहून शाखोपशाखांनी समृद्ध असलेल्या एखाद्या प्रचंड वटवृक्षाचे स्मरण व्हावे. त्यांच्या सर्व कादंबऱ्यांत एकूण स्त्रीपात्रे पन्नासच्या वर आहेत. पण त्यातील प्रत्येकीवर येणारी

संकटे वेगळी आहेत, तिला भोगावी लागणारी दुःखे भिन्न आहेत व त्या दुःखाशी मुकाबला करण्याचे प्रत्येकीचे सामर्थ्य व पद्धती स्वतंत्र आहेत. त्यामुळे कादंबरीचा आशय एकारला जात नाही. उलट स्त्रीला अकारण भोगाव्या लागणाऱ्या दुःखाची खानोलकरांना असलेली तीव्र जाणीव, पुरुष–प्रधान समाजरचनेतील पक्षपाती नीतिनियमांची त्यांच्या मनाला लागलेली टोचणी, व सामाजिक मूल्यातील उणीवांचे त्यांना असलेले भान इ. संदर्भ लाभल्यामुळे हा आशय वजनदारही झाला आहे.

कामक्षुधा व अन्नक्षुधा या माणसाच्या दोन अतिशय मूलभूत व प्रबळ अशा भुका आहेत. त्यामुळे त्यांची उपासमार झाल्यास माणसाची विलक्षण तडफड होणे अगदी स्वाभाविकच असते. विषयवासनेच्या उपासमारीने तर माणसाचे विकृतीत किंवा वेडात रूपांतर होते, इतकी ही वासना माणसावर आपला प्रभाव गाजवते. पण खानोलकरांच्या नायिकांची तितकी हतबल अवस्था होत नाही. कारण वाटेल ती दुःखे पचविण्याचे स्त्रीच्या अंगी असलेले सामर्थ्य त्यांना जाणवले होते. स्त्रीच्या बाबतीत वात्सल्यभावनाही वरील दोन भावना इतकीच, किंबहुना थोडी अधिकच प्रभावी असते. त्यामुळे या भावनांच्या उपासमारीने स्त्रीची तडफड होणे अगदी स्वाभाविक होते. शिवाय खानोलकरांची बहुतेक स्त्रीपात्रे कोकणातील अगदी ग्रामीण भागात राहणारी आहेत, ती अशिक्षित आहेत, त्यांची लग्ने वडीलमंडळींनी आपआपल्या आवडीप्रमाणे किंवा लहरीप्रमाणे लावून दिली आहेत. देखण्या पार्वतीचे नशीब वासूसारख्या विद्रूप माणसाशी जोडले जाते, तेव्हा दुष्ट नारोबा सोहोनी मास्तरांना विचारतो, ' मग तिनं लग्न कसं केलं वासूशी ?' या प्रश्नाला सोहोनी मास्तरांनी जे उत्तर दिले त्यातून खानोलकर स्त्रीची बालवयापासून कशी फरपट होत असते ते दाखवितात. मास्तर म्हणतात, ' यात तिचा दोष काहीसुद्धा नाही. तिचा बापच तसला निघाला, त्याला ती काय करणार ? आपल्या समाजात बाईमाणसाला काय किंमत आहे ? नऊ नऊ वर्षाच्या मुली इथं स्मशानात नेऊन पुरल्यासारख्या दुसऱ्याच्या घरी दिल्या जातात. लग्नाचा अर्थही कळत नाही त्या लेकरांना. ' या कादंबऱ्यांतील काही स्त्रियांना तर देवाधर्माच्या

नावाखाली भाविणीचे जीवन कंठावे लागते. अशा स्थितीत या सर्व स्त्रियांचे चित्रण खानोलकरांनी केले– त्याहून वेगळे कसे होणार ? ज्या खेड्यातील पुरुषांसमोर संसाराखेरीज अन्य कसलाच पुरुषार्थ नाही, तेथील पराधीन व अशिक्षित स्त्रियांसमोर तरी दुसरे कोणते ध्येय असणे शक्य होते ? पण 'गणुराया' मधील चाहूल मुंबईसारख्या शहरात राहात असल्यामुळे तिची प्रतिक्रिया वेगळी होते. चाहूल शिकलेली आहे. ती नोकरी करते. त्यामुळे तिला स्वत्वाची जाणीव आहे, मानापमानाची चाड आहे. खानोलकरांच्या इतर स्त्रियांप्रमाणे ती आपला अपमान निमूटपणे सहन करीत नाही. उलट हुंडा मागणाऱ्या आपल्या प्रियकराला– त्याने आपली पैशात किंमत केली म्हणून– ती दूर लोटू शकते. आपले दुःख प्रेमळ मातापित्यांसमोरही ती प्रगट होऊ देत नाही. जगण्याचे वेगवेगळे पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या वातावरणामुळे स्त्रीच्या व्यक्तिमत्वाची कशी वाढ होते व त्यायोगे तिच्या अंगी केवढे सामर्थ्य येते हेच यातून खानोलकर दर्शवितात. स्त्रीच्या दुःखानी ते जसे व्याकूळ होतात तसेच तिच्या या सामर्थ्याने भारावूनही जातात. स्त्रीबद्दलचा त्यांचा हा आदर जागोजागी व्यक्त झाला आहे. स्त्रीची त्यांना विलक्षण कदर होती. तिचा अवमान होईल असे वर्णन ते कोठेही करत नाहीत. बलात्काराच्या वर्णनालाही ते ग्राम्यतेचा व अश्लीलतेचा स्पर्श होऊ देत नाहीत. त्यांची स्त्रीविषयक सारी वर्णने शरीर पातळीवर न राहता भावनिक पातळीवर जातात. त्यांच्या बहुतेक स्त्रिया नीतिमान आहेत. महान पतिव्रता आहेत. पावित्र्यरक्षणासाठी वाटेल ती किंमत देण्यास त्या तयार आहेत. स्त्रीची ही ताकद खानोलकरांनी अनेक कादंबऱ्यांतून दाखविली आहे. अर्थात् याला अपवाद असलेल्या अशा काही स्त्रियाही त्यांच्या नजरेतून सुटल्या नाहीत. पण तेथेही खानोलकर एक तर त्या स्त्रियांचे परपुरुषाशी मीलन होऊ देत नाहीत किंवा त्यांचे समर्थन तरी करतात. नानू व नंदिनी यांच्यातील प्रेम, दीर आणि भावजय यांतील प्रेम असल्यामुळे रूढिदृष्ट्या निषिद्ध होते तरीही खानोलकर त्याचे चित्रण मोठ्या आस्थेने करतात. दादू भटासारख्या दशग्रंथी ब्राह्मणाच्या तोंडून त्यातील नैतिकताही लक्षात आणून देतात. त्याचप्रमाणे हसनची पत्नी व मधला सामंत यांच्यातील भावबंध दोन अती देखण्या, मनस्वी व रसिक व्यक्तीं

मधील भावबंध म्हणून खानोलकरांना तो मणिकांचनयोगासारखा वाटतो. परंतु त्याचबरोबर या दोन्ही स्त्रियांना ते लक्ष्मणरेषा तर ओलांडू देत नाहीतच, पण त्या रेषेला स्पर्शही करू देत नाहीत, त्यांची लक्ष्मी मनाने नीतीच्या सर्व मर्यादा ओलांडते पण तिचे शरीर भ्रष्ट होत नाही. तिचे सौंदर्य हेच तिचे कवच ठरते. पोरक्या चानीला प्रतिष्ठित व्यक्ती पाप-मार्गावर नेतात, तरीही त्याबद्दल तिला देहदंडाचे भयंकर प्रायश्चित्त भोगावे लागते. स्त्री-पुरुष संबंधाच्या बाबतीत केवळ समाजच नव्हे तर निसर्गही कसा पक्षपाती असतो हे १९७० मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'पिशाच' ह्या कादंबरीत हे दाखवतात संपूर्ण पिशाच योनीवरच आधारलेली ही कादंबरी. हिच्यातील नायक काशीनाथ आत्महत्त्या करतो आणि पिशाच-रूपानेच तो या कादंबरीत वावरतो. अनेक चमत्कारांनी व अवास्तव घटनांनी भरलेल्या ह्या कादंबरीतही खानोलकर स्त्रीचे दुःख नजरेआड करू शकत नाहीत. या कादंबरीची नायिका सुतनू पिशाचरूपातील आपल्या प्रियकराला म्हणते, 'तुझ्यासारखा तूच. मी एक वेळ भान सोडून तुला देह अर्पण करायला गेले तर तू म्हणालास, तनू भानावर आहेस ना? उद्या समज, दुर्दैवाने तुझे माझ्याशी लग्न झाले नाही तर काय करशील? निसर्ग तुम्हा स्त्रियांना क्षमा करीत नाही तनू–' 'पाषाण पालवी' तील उमा व 'असाही एक अश्वथ्थामा' यातील विजया या दोघी मात्र याला अपवाद आहेत. खानोलकरांनी ह्या दोघींचे केलेले समर्थन लंगडे वाटते. त्यांच्या उमेने थोडीथोडकी नव्हे, तर दहा वर्षे पतीचे सुख अनुभवले होते. पुढील दहा वर्षात पतीच्या आजारासाठी का होईना, पण अनेक पुरूष तिने भोगले होते. त्यात काही वेळा सुख झाल्याची कबुलीही तिने दिली होती. असे असताना पती मरताच तिने विक्रमच्या इतके आहारी जाण्यात व तिच्या अंगी नववधूचा उत्साह उतू जात असलेला दाखवण्यात अतिरेकच झाला आहे. त्यातून मनासारखा जोडीदार न मिळाल्यामुळे होणारी तिची अतृप्ती प्रगटण्याऐवजी तिची अत्यंत प्रखर वासना व संयमाचा अभावच व्यक्त होतात. पण खानोलकर मात्र तिची ही तगमग स्वाभाविक ठरवून तिचे समर्थनच करतात.

खानोलकरांच्या निधनोत्तर १९७७ साली प्रसिद्ध झालेल्या 'असाही

एक अश्वत्थामा ' या कादंबरीचा चेहरामोहरा पूर्ण वेगळा आहे. येथे खानोलकरांनी सामाजिक व राजकीय समस्यांना समर्थपणे हात घातला आहे. त्यांना आणखी आयुष्य लाभले असते तर त्यांच्या कादंबरीने आणखी अनेक प्रभावी वळणे निश्चितच घेतली असती; ह्याचा ही कादंबरी एक पुरावाच आहे. या कादंबरीत स्वातंत्र्ययुद्धात पाय गमावून बसलेला, बर्फाच्या लादीवरून इंग्रजांनी नागडे करून ओढलेल्या वेदना जर्जर अश्व–त्थामाच असा क्रांतिवीर पोपटकर आहे. सातपुत्यांसारखा भ्रष्ट मंत्री आहे. त्या मंत्र्याचा अत्यंत प्रामाणिक सहिष्णू व प्रतिभावंत असा रमाकांत वेलणकर पी. ए. आहे आणि सातपुत्यांची कपट कारस्थाने वाटेल ती किंमत देऊन वेशीवर टांगण्यास निघालेल्या पोपटकरांवर पिस्तुल उडवणारी विजया आहे. आतापर्यंतच्या खानोलकरांच्या सर्व नायिकांहून सर्वस्वी भिन्न अशी ही विजया आहे. मॅट्रिकच्या वर्गात असताना एका कोळसेवाल्याच्या टग्या, टारगट पण राजबिंडचा वर्गमित्रावर सातपुत्यांवर तिचे प्रेम जडते व तिला दिवस जातात. तिने नाव सांगितले नाही म्हणून वडील तिच्यावर विलक्षण संतापतात, तिला मारतात व ' तू मला मेलीस ' असे म्हणून निघून जातात. पण हेडमास्तर दाते तिला उघडी टाकत नाहीत. त्यांच्यातील ' आभाळाएवढा माणूस ' जागा होतो. ' गर्भ पाडणे हे पाप आहे ' असे म्हणून आपल्या बहिणीकडे ते तिचे बाळंतपण करतात. तिच्या मुलाला स्वतंत्र जागी वाढवतात. त्याचे आईवडील स्वातंत्र्ययुद्धात गेले असे सांगून त्याला अनौरसपणाच्या यातनातून वाचवतात. पुढे सातपुते मंत्री होतो. विजया मुंबईस कॉलेजमध्ये जाते आणि रमाकांताशी तिचे लग्न होते. आपल्या प्रियकराखेरीज दुसरे कोणाचे मूल आपल्याला नको, म्हणून तिने पहिल्या बाळंतपणातच आपले गर्भाशय शिवून घेतलेले असते. डॉक्टरांकडून पुढे रमाकांताला जेव्हा हे कळते तेव्हा तो क्षणभर विचारमग्न होतो. पण ' एका सुंदर आयुष्याची शान कमी होऊ नये आणि विजयाच्या सातपुत्यां–वरील प्रेमाची प्रतिष्ठा कमी होऊ नये ' म्हणून रमाकांत लगेच सावरतो, व आपल्याला हे कळल्याचे तिला समजूही देत नाही. सर्व बाजूंनी तो तिला जपत राहतो. पण याबद्दल धन्यता वाटण्याऐवजी विजया विलक्षण संतापते, त्याचे प्रेम, औदार्य, सहनशीलता म्हणजे आपला छळच

आहे असे तिला वाटते. त्यामुळे ती त्याच्यावर सतत सूड उगवत राहते. 'तू वांझ आहेस' म्हणून त्यालाच टोचते. त्याने मुलगी मानलेल्या मनूवरून मुद्दाम त्याचा संशय घेते. तरीही तो शांत राहतो. शेवटी चिडून ती म्हणते, 'आजपासून तुझा-माझा संबंधच संपला !' यावर रमाकांत तिला जे सांगतो त्यातून स्त्रीपुरुषविषयक संबंधाबद्दल खानोलकरांचे तत्त्वज्ञानच जणू आपल्या हाती लागते. त्यातील व्यापक दृष्टी पाहून आपण चकित होतो. रमाकांत तिला म्हणतो 'ठीक. तुला ज्यात सुख वाटेल तशी तू वाग ! पण आयुष्याची शान, प्रतिष्ठा कायम ठेवून वाग ! स्त्रीचं आयुष्य एक अलंकार असतो विजू, खुद्द परमेश्वरानं बहाल केलेला. त्यातला प्रत्येक पैलू तजेलदार राहिला पाहिजे. पाप-पुण्याचे माझे हिशेब वेगळे आहेत विजया ! तुला मी पापी समजत नाही. कारण सातपुत्यांनी तुझ्यावर बलात्कार केलेला नाही. तेही पापी नव्हेत. पण मी मात्र तू माझी नसताना तुझा उपभोग घेतला. पापी असलोच तर मीच. पण त्यात तूही भागीदारीण आहेस. कारण प्रथम–पासूनच तू हे लपवून ठेवलंस. फसवलंस असं नाही म्हणत मी, पण खरं त्याच वेळी सांगितलं असतंस तर आज काही वेगळंच भवितव्य घडलं असतं !' स्त्री-पुरुषांच्या मनोमीलनाचं खानोलकरांना केवढे माहात्म्य वाटत होते, त्यासाठी पापपुण्याचे नेहमीचे निकष नाकारण्याचे धैर्य त्यांच्यात कसे होते हे यातून प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. पण ज्या नायिकेच्या संदर्भात हे तत्त्वज्ञान मांडले गेले आहे, ती नायिका विजया ही ताकदीची व जिद्दीची असली तरी स्वार्थी, बेइमानी, व आततायी अशी असल्यामुळे यातील औदार्य वाचकाला अस्थानी वाटते. अर्थात् स्त्रीच्या मनाचे व प्रेमाचे खानोलकरांना वाटत असलेले मोल यातून आपल्याला स्पष्टपणे प्रतीत होते.

अशा रीतीने स्त्री दुःखाचा वेध घेताना खानोलकर त्यांच्या तळापर्यंत जातात.

: २ :

स्त्रीदु:खाचा वेध घेताना खानोलकरांचे सहृदय व संवेदनक्षम मन जसे आपल्याला सतत जाणवत राहते तसे या दु:खांच्या कारणांचा शोध घेताना त्यांची बुद्धी मुक्त, मन जागरुक, न्यायबुद्धी शाबूत आणि विवेक कार्यरत असल्याचे आपल्या लक्षात येते आणि आपण स्तंभित होतो.

हा शोध घेताना खानोलकर श्रद्धा व विवेक यातील संघर्ष सर्वांगाने उलगडून दाखवितात. तो उलगडताना अज्ञात शक्तीवर माणसाची श्रद्धा का बसते व त्या श्रद्धेने त्याला बळ लाभते की तो दुबळा होतो या महत्त्वाच्या प्रश्नांना ते प्रथम हात घालतात. परलोक, पुनर्जन्म यांच्या कल्पनेने, व महापूर, वादळे, अनावृष्टी, अतिवृष्टी यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे भांबावलेला माणूस अज्ञात शक्तीच्या मागे लागतो. त्याचे भयग्रस्त मन अनाकलनीय असलेली सारी संकटे तर दैवी मानतेच, पण कोंडुऱ्यासारख्या भव्यभीषण वस्तूतही, त्याला ही अज्ञात शक्ती दिसते. खानोलकरांच्या कादंबऱ्यांतून कोंडुरा, यती, घंटानाद, देवी, अनेक सिद्धी प्राप्त असलेले स्वामी इत्यादी रूपातून ही अज्ञात शक्ती अवतरते. जवळजवळ सर्वच पात्रांची या शक्तीवर अढळ श्रद्धा असते. त्या श्रद्धेपायी सुतारीण आणि अनसूया यांच्याप्रमाणे ती आत्मबलिदानही करतात. तसेच ती चानीच्या आईसारख्या निरपराध स्त्रीला पापी ठरवून रामाच्या भयाण कोंडीत बुडवूही शकतात, किंवा चानीसारख्या पोरक्या मुलीस लाथाबुक्क्यांखाली तुडवूनही काढतात. यातून श्रद्धेने माणूस नुसताच दुबळा होत नाही तर उद्‌ध्वस्त होतो, किंवा दुसऱ्याच्या विध्वंसास कारणीभूत होतो हेच खानोलकर दाखवतात. पण असे असूनही माणूस अज्ञात शक्तीवरील श्रद्धेच्या आहारी गेल्याशिवाय राहात नाही हेही खानोलकराना जाणवत असते. त्यामुळे त्यांच्या मनाची मोठी घालमेल होते. 'कोंडुरा' तील पर्शरामतात्यांच्या चित्रणातून ही घालमेल ते प्रभावीपणे व्यक्त करतात. तात्यांच्या आयुष्याचा विचका कशामुळे झाला, असा प्रश्न खानोलकर या व्यक्तिरेखेतून वाचकांसमोर उभा करतात, व तात्यांच्या समग्र चित्रणातून या प्रश्नाचे उत्तर देतात की

तात्यांचे आयुष्य नियतीमुळे नव्हे – अज्ञात शक्तीमुळे नव्हे, तर कोंडुऱ्यां–वरील श्रद्धेने उस्कटून जाते. नशीब काढण्यासाठी मुंबईस निघालेल्या तात्यांच्या मार्गात नेमका यती यावाच का या प्रश्नाला योगायोग म्हणण्या–ऐवजी फार तर अज्ञात शक्ती हे उत्तर देता येईल. पण तात्यांचे जीवन सैरभैर होते त्याला ही अज्ञात शक्ती जबाबदार नसून तिच्यावर मात करण्याचे धैर्य व त्यासाठी लागणारे विवेकाचे बळ याचा तात्यांच्या अंगी असलेला अभाव जबाबदार होता. यतीच्या आज्ञेविरुद्ध जाण्याची तात्याना इच्छा होती, पण त्याच्यात पुरेशी हिंमत नव्हती. वास्तविक त्यांचे विवेकी मन अनेक शंकाकुशंका निर्माण करून त्यांची श्रद्धा उडवू पहात होते. पण यतीची आज्ञा मोडल्यास काय होईल या भीतीने ते यतीला शरण जातात. 'तू देवी आहेस' असे यतीने सांगितलेल्या सुतारणीवर जडचे बलात्कार करतो तेव्हा तर तात्यांची यतीवरील श्रद्धा चांगलीच डळमळीत होते. पण बुडत्याला काडीचा आधार त्याप्रमाणे त्यांचे मन घंटानादाचा आधार घेते. या आत्मवंचनेत इहलोकातील स्वार्थही असतो. लोकांनी त्यांच्यावर चढविलेल्या साधुत्वाच्या कफनीने त्यांना विनासायास मिळणारी प्रतिष्ठा व पार्वतीबद्दलची आसक्ती यामुळे ते ओढूनताणून आपली श्रद्धा टिकवू पाहतात. आपण ही चूक करीत आहोत अशी टोचणी त्यांच्या मनाला लागत होतीच. तेव्हा स्वसमर्थनासाठी कारणे शोधीत असलेल्या त्यांच्या अपराधी मनाला फक्त त्यांनाच ऐकू येणाऱ्या घंटानादाचा गवताच्या काडी-सारखा आधार मिळतो व ते श्रद्धेच्या आहारी जातात. यातून श्रद्धेची पकड माणसावर किती जबरदस्त असते हे खानोलकर दाखवतात. तसेच घंटा–नादाच्या चमत्कारात दडलेला खोल मानसशास्त्रीय अर्थही सुचवितात. अशा रीतीने कोंडुऱ्याच्या पोलादी मुठीत आपणच नव्हे, तर सारा गाव सुरक्षित असल्याची श्रद्धाच तात्यांच्या व इतर अनेकांच्या जीवनाची वाताहत करते. 'कोंडुरा' ह्या कादंबरीतून खानोलकरांना हेच सांगायचे आहे.

चानीचा भयानक अंतही गावाच्या व तिच्या देवीवरील श्रद्धेमुळे होतो. चानीला राजपुत्र मिळेल का, या दिनूच्या प्रश्नाला देवी अनुकूल कौल

देते. व तीच देवी चानीमुळे गावात पाप माजून गावावर संकट ओढवेल का या गावकऱ्यांच्या प्रश्नालाही अनुकूलच कौल देते. कारण ही देवी माणसानेच निर्माण केलेली असते. शेवटी याच देवीसमोर सारा गाव चानीला मरणोन्मुख होईपर्यंत क्रूरपणे मारहाण करू शकतो. या प्रसंगा–तून देवी, तिला लावले जाणारे कौल, यांचा फोलपणा खानोलकर दाखवतात.

'अगोचर' मधील सारा देखावाच अगोचराचे वैयर्थ्य तीव्रतेने जाणवून देतो. अगोचराचा वेध घेण्याचे सामर्थ्य असलेले खुद्द स्वामीच खानोलकरांनी पूर्ण निष्प्रभ व हतबल दाखवले आहेत. कादंबरीच्या अखेरीस त्यांच्यासह वाडा भस्मसात झालेला पाहून अगोचराच्या मागे लागल्यास मनुष्य येथील कर्तव्यास, न्यायनीतीस आणि विवेकास कसा पाठमोरा होतो हे आपल्याला प्रखरपणे जाणवते.

'कोंडुरा' तील सुतारणीवरील बलात्कार व त्यामुळे तिने केलेली आत्महत्त्या या घटना कोंडुऱ्याच्या व त्याच्या रूपाने आलेल्या यतीच्या सामर्थ्याचा फुगा फोडतात. अनसूयेची आत्महत्त्या 'स्त्री ही पुरुषाच्या अध्यात्म मार्गातील धोंड आहे' या कल्पनेचा फोलपणा जाणवून देते. 'त्रिशंकू' तील सुशीची हत्त्या धार्मिक, सामाजिक व नैतिक विचारांतील अन्याय वेशीवर टांगते. चानीची आई व चानी यांचा पापी म्हणून क्रूरपणे अंत केला जातो, आणि त्यांच्यावर हा भयंकर अन्याय करणारे मात्र सुरक्षित राहतात, पुण्यवान व प्रतिष्ठित समजले जातात. हे पाहून हा अंत फक्त या दोन स्त्रियांचा नसून आपल्या न्यायबुद्धीचा, विवेकाचा व माणुसकीचाही अंत आहे हे कटु सत्य आपल्या मनवर बिंबते.

या सर्व प्रसंगांतून अज्ञात शक्तीवरील श्रद्धेने मनुष्य दुबळा होतो, दुष्ट होतो हे सतत जाणवत राहते. उलट विवेकाची कास धरून आपल्यावरील संकटांना धैर्याने तोंड देणाऱ्या माणसास केवढे बळ मिळते, त्याच्याकडून न्यायाचे, नीतीचे, सत्याचे कसे पोषण होते, इतरांची दुःखे दूर करण्याचे सामर्थ्य त्याच्यात कसे निर्माण होते, आणि त्यामुळे त्याचे व्यक्तिमत्व

विकसित होऊन माणूस म्हणवून घेण्यास तो कसा पात्र ठरतो, हे पार्वती, नानू, थोरली वहिनी, विक्रम, रमाकांत इत्यादी पात्रांतून स्पष्ट होते.

अशा रीतीने विवेकवादी व श्रद्धावादी व्यक्तींच्या चित्रणांतून खानोलकर आपल्याला पटवून देतात की मानवी जीवन जर अर्थपूर्ण करावयाचे असेल तर माणसाने आपली बुद्धी शाबूत ठेवली पाहिजे. त्याकरिता या बुद्धीवर श्रद्धेने चढवलेली जाळी जळमटे प्रथम दूर केली पाहिजेत. श्रद्धेमुळे कार्यकारणभावाची सांगड घालणारी माणसाची बुद्धी काजळते. त्यातून पक्षपाती नीतिनियम व अनेक गैरसमज निर्माण होतात. चानीच्या आईची हत्या हे याचे भेदक उदाहरण आहे मोळी विकून पोट भरणाऱ्या या बाईवर रानात एक अँग्लो-इंडियन सोल्जर बलात्कार करतो. त्याची शिक्षा त्या सोल्जराला न होता तिलाच दिली जाते. आपण ह्या स्त्रीचे रक्षण करू शकलो नाही याची कसलीही खंत गावकऱ्यांना वाटत नाही; उलट पुढे जेव्हा गावातील गुरे ढोरे मरू लागतात, तेव्हा तिच्याच पापामुळे हे घडत आहे असे गावकऱ्यांना वाटते. लगेच देवीला कौल लावला जातो. तोही अनुकूल मिळतो, आणि त्या बिचाऱ्या बाईला ती गयावया करीत असता, नको नको म्हणत असता, नदीत बुडविले जाते.

अज्ञातावरील श्रद्धेपायी माणसाची बुद्धी अशी गंजते. आपल्यावर ओढवलेल्या आपत्तींमागील कार्यकारणभावाची संगती त्याला लावता येत नाही. वडाची साल पिंपळाला लावण्याचा मूर्खपणा त्याच्याकडून होतो. आपत्तींचे खापर निरपराध व्यक्तींच्या माथ्यावर फोडले जाऊन त्यांची दुर्दशा केली जाते. तसेच आप्पा बामण आणि आठवले मास्तर यांच्यासारखे लंपट, स्वार्थी व ढोंगी लोक या श्रद्धेचा धूर्तपणे फायदा घेत राहतात.

असे हे खानोलकरांचे कादंबरी विश्व पाहताना एकीकडे दुःखाने व्याकूळ होत असताच आपली श्रद्धा, आपली जीवनमूल्ये, आपली संस्कृती तपासून पाहण्याची तीव्र निकड आपल्याला भासते. तसेच परलोक, दैव, अदृष्ट, यांच्या दास्यातून आपण बाहेर पडू शकलो तरच 'माणूस' या पदवीवर आपला हक्क पोहोचू शकेल अशी प्रखर जाणीव आपल्यात निर्माण

होते, आणि मानवी जीवनाला विवेकाचे अधिष्ठान असणे किती आवश्यक आहे हे प्रकर्षाने जाणवते.

वाचकाला अशी असाधारण जाग खानोलकर आणू शकतात, हेच त्यांच्या कादंबऱ्यांचे महान यश आहे, महान सामर्थ्य आहे.

## : ३ :

खानोलकरांच्या कादंबरीतील हा समृद्ध आशय जेवढा मोलाचा तेवढाच त्याचा आविष्कार नवलाईचा. डोळे दिपवून टाकणाऱ्या प्रतिमांतून साकार झाल्यामुळेच हा करुणरम्य व सघन आशय वाचकाच्या मनात कायमचे स्थान मिळवून बसतो. श्रावणसरींसारख्या बरसणाऱ्या चेतोहारी प्रतिमांतून माणसाच्या प्रकृतिविकृतींचे खानोलकरांनी घडवलेले दर्शन वाचकाला स्तिमित करते. त्यांची प्रसन्न व चिरतरुण शैली आपल्याला मोहवून टाकते आपण जणू एखाद्या मंत्रशक्तीने भारले जात आहोत असे वाटत राहते.

खानोलकरांचे सारे प्रतिमाविश्व कोकणच्या निसर्गातून साकार झाले आहे. कुडाळच्या नितळ सौंदर्याने खानोलकरांमधील कलावंत हळुवारपणे जपला व जिव्हाळ्याने पोसला. दारिद्र्य, आजार, उपेक्षा इत्यादी आपत्तींनी त्यांच्या मनावर चढत असलेली काजळी येथील निसर्गाने अलगदपणे दूर केली. या रम्य भूमीत त्यांना जे अनुभव आले तेच मुळी निसर्गाचे रंग, रूप, गंध घेऊन. किंबहुना निसर्गात गुरफटूनच त्यांची पात्रे व प्रसंग आपल्यासमोर येतात. त्यांच्या कादंबऱ्यांचा गाभा जी वेदना तिला बिलगून असलेल्या काळोखाच्या प्रतिमेतूनच त्यांची पहिली कादंबरी 'रात्र काळी ...' अवतरते. कादंबरीचा अवघा आशय पेलून धरण्याचे सामर्थ्य या शीर्षकात आहे 'अजगर', 'त्रिशंकू', 'चानी', 'पाषाणपालवी' ही शीर्षकेही अशीच अर्थपूर्ण आहेत. 'रात्र काळी ..' तील लक्ष्मीभोवती सर्व अर्थांनी अंधार पसरला आहे. त्यामुळे तिचे सारे जीवन

काळवंडून गेले आहे. स्त्रीच्या दु:खाने व्यथित झालेल्या खानोलकरांवर काळोखाची मोहिनी जबरदस्त आहे. त्यांच्या इतर कादंबऱ्यांतूनही काळोखाच्या नानाविध प्रतिमांतून वेदनेचे स्वरूप व्यक्त झाले आहे. 'अजगर' मध्ये नेणिवेचा गूढपणा काळ्या कुत्र्यातून प्रगट होतो. कोंडुऱ्याच्या पायाशी असलेल्या खोलच खोल विवरातील काळोख म्हणजे तर जणू 'अमावास्येचे उगमस्थान' असते. संपूर्ण गावाला अमावास्येच्या रात्रीप्रमाणे भयग्रस्त करण्याची त्याची शक्ती यांतून जशी जाणवते, तशीच विवराच्या भीतीने गावकऱ्यांच्या मनात दाटलेल्या अंधाराचा गडदपणाही यातून व्यक्त होतो. दुर्दैवी चानीच्या आठवणी आल्या की दिनूचे मन 'एखाद्या काळ्याशार डोहावरील वर्तुळासारखी एक असह्य जाणीव देई.' आणि गणुराया म्हणतो, 'समुद्र असा काळाठिक्कर पडलेला आपल्याला आवडतो.' फेनधवल समुद्राला काळा ठिक्कर करून त्यातून खानोलकर गणुरायाची शोकांतिका सूचित करतात. 'काळी चंद्रकळा' हे शब्द उच्चारताच आपल्यासमोर एक लावण्यवती स्त्री उभी राहते. 'भागधेय' मधील चंद्रकळा नेसलेली रूपगर्विता अशीच आहे. खानोलकर तिच्या या रूपाचे काव्यमय वर्णन करतात. पण त्यातून साकार होणारे सुंदर दृश्य आपल्या नजरेपुढे तरळते न तरळते तोच या दृश्याला उभा छेद देणारे दुसरे दृश्य आपल्यापुढे ते उभे करतात. आर्त प्रियकराने दिलेल्या चंद्रकळेचे ही मानिनी तुकडे तुकडे करते. त्यातून सामंताची – आपल्या प्रियकराची अशीच दुर्दशा ती करणार की काय अशी शंका वाचकांना येते. कारण या दोन प्रेमिकांतील ताणलेले संबंध वाचकांसमोर साकार झालेले असतात. यापुढे जाऊन खानोलकर 'चंद्रकळेचे ते काळेभोर भरजरी तुकडे गोठून काळ्या पडलेल्या रक्तासारखे दिसत होते' असे लिहितात. या भयसूचक प्रतिमेतून आपली शंका दृढ होते. आणि लगेच काही काळाने सामंताचे प्रेत रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आपल्याला दिसते. खानोलकरांच्या अनेक प्रतिमा अशा भविष्यसूचक असतात. उमेची अवस्था 'ओंजळीत हे काळोखाचे काळे पाणी' अशी झालेली असते.

या काळेपणाच्या जोडीस पात्रांच्या मनांत दाटलेला अंधार येतो.

शिवाय एकाकी असलेले माळ, प्रचंड दगडी वाडे, सामंताच्या वाड्यामागील अर्धा माड, खोल खंदकातील काळोख, रामाची कोंडी – हेही सारे पात्रांच्या मनोव्यथांचे रूप घेऊन अवतरतात, आणि या काळोखात आणखी भयाण-पणा निर्माण करतात.

दुःखाशी संलग्न असलेल्या या काळोखाच्या अगदी विरोधी अशा वीज, प्राजक्त, चाफा, केवडा, सुवर्ण यांच्या प्रतिमा खानोलकर नायिकांच्या सौंदर्यवर्णनात योजतात व त्यातून त्यांच्या लख्ख सौंदर्याची प्रचीती घडव-तात. नुकतीच वयात आलेली लक्ष्मी आपले रूप स्वतःच निरखते, तेव्हा 'भरल्या ढगात वीज फिरावी तशी ती हुरहूर तिला असह्य होते.' पतीच्या मीलनाची स्वप्ने रंगवताना ती मनात म्हणते, 'हा देहच मुळी सगळं तारुण्य त्या जोडीदाराच्या पायाशी प्राजक्तासारखं फुलांचं पांघरूण ठेवणारा होता.' 'केतकी कांतीची, निळसर टपोऱ्या डोळ्यांची, चंद्रकोरीसारखा चेहरा असलेली' सुशी पाहून नानूला वाटते, 'ही फुले वेचतेच तर चाफाही फुले गाळीतच उभा राहील.' 'कोंडुरा' तील पार्वती कशी होती तर 'गोऱ्या झळझळीत कांतीची... पावले गोरीपान व कशी कमळासारखी. प्रत्येक हालचाल भरजरीची. पाहणाऱ्याच्या डोळ्यात विजेची कांडी फिरावी अशी' आणि हसनच्या पत्नीची कांती म्हणजे तर 'जणू काय विधात्यानं तिची मूर्ती घडवताना तप्त कांचनाची तार छेडली होती.'

खानोलकरांच्या कादंबऱ्यात अशा देखण्या प्रतिमांचा जागोजागी सडा पडलेला दिसतो. त्या सर्वांचा आस्वाद घ्यावयाचा म्हटल्यास एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. म्हणून येथे वानगीदाखल त्यांच्या फक्त काही प्रतिमांचाच विचार करणे शक्य आहे. पहिल्याच कादंबरीतील फक्त लक्ष्मीचाच विचार केला तरी खानोलकरांच्या प्रतिभा सामर्थ्याचा पुरेपूर प्रत्यय येऊ शकतो.

लक्ष्मीच्या सौंदर्याने तिच्याकडे खेचल्या जाणाऱ्या विविध व्यक्तींची झालेली दुरवस्था खानोलकर केवळ एखाद्या क्रियापदात, एखाद्या विशेषणात, एखाद्या वाक्यात अचूक पकडून त्या त्या व्यक्तीच्या दुर्दशेचे प्रत्यक्ष दर्शन घडवतात. तिच्यावर प्रथम भाळलेले केमळेकर तिला सांगतात, 'तुम्हाला मी

लग्न मंडपात पाह्यलं त्या दिवसापासून हे डोळे फुटले बघा.' यातून लक्ष्मी-खेरीज त्यांना दुसरे काही दिसतच नव्हते हे आपल्याला जाणवते. केमळेकर पुढे खरोखरीच आंधळे होतात. तरीही लक्ष्मीला काळ्या चंद्रकळेत पाहण्याची ओढ त्यांना लागलेली असते. लक्ष्मीच्या सौंदर्याने पावा वाजवण्याचे भान हरपलेला गोविंदा अंबेस निघालेल्या लक्ष्मीच्या मागोमाग जात असतो. खानोल-कर लिहितात, 'तिनं नुसतं वळून पाहिलं असतं तरी त्याचा वारा होऊन खोळीतला पावा फक्त वाजला असता. तो सावधपणे पावलं टाकीत होता, हातात काठोकाठ भरलेलं तेलाचं भांडं असल्यासारखा.' तिच्यापायी देहभान विसरलेला हा गोविंदा अंबेचे दर्शन घेऊन निघालेली लक्ष्मी दृष्टिआड होताच तिच्या मागोमाग जाणे अशक्य झाल्यामुळे पाव्याच्या सुरांनी जणू तो तिचा पाठलाग करतो. 'पाव्याचे सूर उठले तेव्हा तिला जिवाचं काजळ झाल्यासारखं वाटलं...एकेक सूर म्हणजे उंच उंच उडणारी रक्ताची चिळकांडी वाटत होती.' पहिल्या भेटीतच दाजीची जी अवस्था होते तिचे वर्णन करताना खानोलकर लिहितात, 'लक्ष्मीनं त्या देहाला नुसत्या चालण्या-बोलण्यानंच एक झोका दिला होता आणि आता त्याची आंदोलनं केव्हाच थांबणार नव्हती.' एका क्षणात सर्वस्वी पराधीन झालेल्या, 'दाजीच्या उभ्या आयुष्याची झटकी वहाण' झाल्यास नवल ते काय? वामन तर तिच्यापायी इतका वेडा होतो की, 'त्याचं वय झराझर ओसरून पंधरावरच थांबतं.' यातून वामन कधी मोठा कसा तो होतच नाही, ज्या पौगंडावस्थेत त्याला तिचा ध्यास लागला त्याच अवस्थेत मनाने तो जन्मभर राहिला हे लक्षात येते. या सर्वसाधारण व्यक्तींचे तर राहोच पण अच्युतसारख्या समंजस, संयमी व प्रौढ व्यक्तीचीही लक्ष्मीच्या नुसत्या बोलण्याने मोठी तारांबळ उडते. 'लक्ष्मीच्या आवाजातील नुसत्या गोडव्याने चाळीशी उलटलेला अच्युत हादरतो, दचकतो व त्याच्या चामडीला ओल भरून येते.' या सर्व वर्णनातून तिच्यावर भाळलेली सारी माणसे तिला स्पर्श देखील करण्यास का धजावत नव्हती हेही खानोलकर मोठ्या कौशल्याने सुचवतात. तिची नुसती दृष्टभेट होताच ही माणसे स्वतःची राहातच नव्हती. अशा पराधीन व्यक्तींकडून कोणतीही क्रिया घडणे कसे शक्य होते? माणसांप्रमाणेच लक्ष्मीचे सौंदर्य असंख्य वस्तूंवरही आपला प्रभाव गाजवते. स्वतःचे सौंदर्य पाहून लक्ष्मीला

एकटीला दचकायला होत नाही, तर तिच्या बरोबर देवचाफा, अंबेपुढील ज्योती व केळीचे बन ही सारी दचकतात आणि 'तिनं खाडीत पाऊल टाकताच पाणी थरारतं.' या वर्णनातून सारा आशय उजळून टाकण्याचे खानोलकरांचे सामर्थ्य आपल्या प्रत्ययास येते.

लक्ष्मीच्या ह्या विलक्षण सौंदर्याला कोणी स्पर्शही करू शकत नाही. त्यामुळे तिची मोठी विलक्षण तगमग होते. तिच्या वासनेची ही तडफड व जीवघेणी अतृप्ती रंगवताना खानोलकरांच्या वर्णनाचा प्रवास तिच्या पलंगापासून सुरू होऊन तिच्या बदललेल्या भूमिकेशी संपतो. खानोलकर सांगतात, 'पलंगाच्या मच्छरदाणी बसविण्याच्या चौकटीच्या प्रत्येक कोना–वरही तहान लागलेल्या चातकाच्या प्रतिमा बसविल्या होत्या आणि पलंग तरी किती काळा – काळाभोर .. एखादा श्रावणमासातला गच्च भरून काळा गर्द झालेला ढग उतरून त्यानं पलंगाचा आकार घेतलाय आणि त्याचाच गारवा सगळ्या घरादारातून पसरून राहिलाय असं वाटत होतं.' चातक पक्षी हे तृषार्ततेचे, सतत वापरले गेल्यामुळे गुळगुळीत झालेले प्रतीक. त्यात खानोलकर केवळ एक नव्हे तर चार चातकांची योजना करतात आणि त्यांचेही 'तहान लागलेल्या' असे अनावश्यक स्पष्टीकरण करतात. खानोलकरांच्या लेखनात सहसा न आढळणारा हा बटबटीतपणा वाचकाला खटकतो. पण लगेच पलंगाच्या काळेभोरपणाच्या वर्णनात दिसणारी त्यांची कल्पकता त्याला मोहवून टाकते. पुरुषाबद्दल व त्यातही सुंदर पुरुषाबद्दल लक्ष्मीला वाटणारी आसक्ती पुढील सुंदर उपमेतून ते दाखवतात. 'लाल-चुटुक ओठांच्या खटखटेच्या हासण्यानं लक्ष्मीला गुलाबपाणी शिंपडल्यासारखं वाटलं.' वासनेपायी तिची होणारी तडफड पुढील रूपकातून प्रभावितपणे व्यक्त होते. 'काचेत नुसती वात जळतेय. ही काच तरी फोडून टाका रे कोणीतरी. नुसते जवळ येता. कशासाठी येता ?' या तडफडाटामुळे लक्ष्मी पूर्वीची राहात नाही. तिचे लग्न होते तेव्हा 'देहाची किंमती घडी अजून मोडली नव्हती. उद्या हा देहच तो नेसून जाईल.' अशी तिची समर्पणाची भावना होती. पण पतीने तिला अकारण दूर लोटल्यामुळे तिची भूमिका आक्रमक बनते. आता तिचा देह दुसरा कोणी नेसणार नसून जणू तीच दुसऱ्याचा

देह नेसण्यास निवते. पातळ ओठांच्या नाजूक खटखटेला पाहून तिला वाटते, 'किती नाजूक हा ? किती नाजूक ? माथ्यात सहज माळून टाकता येईल. दागिन्यासारखा सहज गळयात घालता येईल. पदरासारखा लपेटूनही घेता येईल.' अशा ह्या मनस्वी लक्ष्मीच्या डोहाळयाचे वर्णन स्त्रीलाही लाज–विणाऱ्या बारकाव्यांसह खानोलकर करतात. त्यातून उत्कट व तीव्र अनु–भवांबरोबरच कोवळा व मुलायम अनुभवही अलगद शब्दबद्ध करण्याचे त्यांचे कौशल्य प्रत्ययास येते. ते लिहितात, 'पोटात गदळत होतं... स्वत.च्या श्वासनि:श्वासातून पेरूचा वास बेचैन करीत होता .. एका ध्यानीमनी नसलेल्या वस्तूला सगळी गात्रं एकवटून साद घालतात म्हणजे काय ?.. डोळयावर पातळ, शहाळयाच्या कातळीसारखी झापड येत होती. काय होतंय हे ? पोट असं भरून का येतंय ? गळयाकडे चुळा का सुटतात ?' पण असाधारण असलेल्या खानोलकरांच्या लक्ष्मीला सर्वसाधारण स्त्रियांप्रमाणे एवढेच डोहाळे लागून भागणार नव्हते. तिचे सौंदर्य जसे जगावेगळे, पतीशी मीलन जसे विपरीत, तसेच तिचे डोहाळेही अघटित, तिच्या स्वभावासारखेच आततायी, अतिरेकी व उतावळे ! हे डोहाळे म्हणजे तिच्या शोकांतिकेची जणू नांदीच. 'विहिरीत उडी घेऊन खोल तळाला जाऊन बसावं', 'आगीवर झडप घ्यावी', 'देह करपता करपता पेरू खावा', 'चुलीवर साडी पेटवून देह रक्षामय करावा', 'कोयत्यावर बोटं कापून घ्यावी व लालभडक रक्त पहात बसावं' असे अघोरी डोहाळे तिला लागतात. स्त्रीच्या गरोदरपणाची खानोलकरांना वाटत असलेली अपूर्वाई पुढील वर्णनात मूर्त झाली आहे. 'लक्ष्मी सगळा देह निरखीत होती. गरोदरपणाही हर्षासारखा अंगभर पसरला होता. पुरुषाची कर्तबगारी ईश्वराघरच्या ज्योतीसारखी सर्वांगातून प्रकाश टाकीत होती. पुरुषाला जे जन्मातही कधी पाहता येणार नाही, ते परमेश्वरी देणगीचं कौतुक लक्ष्मी सर्वांगानी भोगीत उभी होती.' तिच्या वात्सल्यानंदाचेही वर्णन खानोलकर अशाच भारावलेल्या मनाने करतात. 'सदूला तिनं पान्ह्याशी धरला. एक साईहून पातळ जिवणी चुटुपुटु पान्हा ओढीत होती. देहातलं वात्सल्य खेचलं जात होतं.. मनाला गुदगुल्या होत होत्या. गोलाकार त्वचेतून गोड झिणझिण्या उठत होत्या.'

अशा प्रकारे लोभस प्रतिमांतून लक्ष्मीचे व्यक्तिमत्त्व सूक्ष्मातिसूक्ष्म छटांसह खानोलकर कवेत घेतात आणि शेवटी तिच्या जीवनातील भीषण नाट्याचा परमोच्च बिंदू तशाच भीषण प्रतिमांत बद्ध करतात. आपण अनौरस आहोत असे ठाम मत करून घेतलेल्या सदाशिवच्या मनात तिच्याविषयी पेटवेली सूडबुद्धी आणि लक्ष्मीच्या अंतःकरणात कल्लोळ माजवणारी कामक्रोधांची वर्तुळे खानोलकर निसर्गाच्या तांडवनृत्यात लपेटून आपल्यापुढे साकार करतात. त्यामुळे सारा देखावा अधिकच उग्र रूप धारण करतो. आपल्या व्यभिचारी आईचे खुन्या कुत्र्याकडून नरडे फोडण्यासाठी सदाशिव लक्ष्मीच्या घरी येतो तेव्हा निसर्गही तसाच क्रूर झालेला असतो. 'वाऱ्याला पीळ पडत होता.. आणि अशा गोलगोल फिरणाऱ्या तुफानी हवेत मग पावसाच्या मुसळधारा आडव्यातिडव्या कोसळू लागल्या... आतडं चिरून टाकणारा विजेचा कडकडाट होताच.. कुत्रा सणसणून भुंकला ..झोपाळा हलत होता...त्याचा प्रत्येक झोका खुन्याला फसवीत होता. रस्त्यावर आकाश उतरून हुतुतू खेळत होतं. भीमाची गदा गरगर फिरत होती. खुन्यानं चवताळून उडी घेतली नि त्याच्या डोकीवर खाड्कन झोपाळा आदळला. एका जनावराची किंकाळी खोल घुसली. झोपाळा परत त्याच्या दातांवर सणकन बसला. खुन्याची आतडीच पेटली.' तिकडे बंद खोलीत लक्ष्मीच्या वासनेनेही असेच थैमान घातले होते. 'लक्ष्मीनं अण्णाच्या ओथंबलेल्या गालाचा कडकडून चावा घेतला. अण्णाचं मनगट मुरगळलं. तिच्या नसानसात वादळ भडकलं होतं. लक्ष्मीनं त्याच्या दोंदावर एक गुद्दा ठेवून दिला. अण्णा बोंब मारू लागला.' बाहेर तिचे नरडे फोडण्यास आतुर झालेला सदाशिव तिच्या बंद दारावर धक्के मारू लागला.' या भयानक प्रसंगाचा शेवट अतिभयानक व अकल्पनीय अशा घटनेनं करून खानोलकर वाचकांना मुळापासून हादरून टाकतात. 'आणि विजेची प्रचंड काच वातावरणात फुटताच खुन्यानं सदाशिवाच्या मानेवर उडी घेतली.' आणि ज्या 'आई' ह्या हाकेसाठी लक्ष्मी आयुष्यभर तळमळत असते ती हाक अखेरीस सदाशिवच्या तोंडून बाहेर पडते, अत्यंत आर्तपणे बाहेर पडते. पण दार उघडताच लक्ष्मीला दिसते ते पिसाळलेल्या खुन्याने अंतर्बाह्य ओरबाडून रक्तबंबाळ केलेले सदूचे कलेवर. 'लक्ष्मीने दार उघडलं. ती पहातच

राहिली. रक्ताच्या गोठलेल्या थारोळ्यात सदाशिव 'आ' वासून पडला आहे. ती 'सदू ऽ' म्हणत त्याच्या प्रेतावर कोसळली.

अशा या दुर्दैवी लक्ष्मीच्या जीवनचित्रणाचा शेवट खानोलकर मुलाच्या अस्थिविसर्जनासाठी निघालेल्या तिच्या प्रवासवर्णनाने करतात. 'बैलांचे घुंगुर वाजत होते... विचित्र ताल धरला होता त्यांनी .. त्या विचित्र तालातूनच लक्ष्मी काही वेचीत होती ... भरल्या आकाशात ओलसर सावलीतून एक नाव नसलेली, हिरवे चुडे भरून नुकती संसारात पाऊल ठेवणारी, कुणी हिरवं गर्द पातळ नेसून त्या काळचा नदीवर जात होती... त्या कुण्या कोवळ्या मुलीच्या कमरेवर एक काळी घागर होती. पाण्याचं सर्पाकृति वळण कातरवेळेचा काळोखही भरतीबरोबर शोषीत होतं. त्या शीतल गोऱ्या पावलांनी नदीचा काठ गाठला... आणि ती घागर प्रवाहात बुडवणार तोच तिची पावलंच काठावरून घसरली. ती प्रवाहात खेचली गेली .. नांव नसलेल्या त्या डोळ्यांची नीट उघडझापही झाली नसेल. एक मृण्मय देह जलमय होऊन गेला आणि मातीची काळी घागर मात्र पाण्यावर उपडी तरंगली.' अशा रीतीने ज्या प्रसंगाने तिच्या जीवनप्रवाहास सुरुवात होते, त्या प्रसंगाशीच येऊन तो प्रवास संपतो व लक्ष्मीच्या जीवनाचे वर्तुळ जणू पूर्ण होते.

पाणी म्हणजे वस्तुत: जीवन. परंतु दु:खाचा तळ शोधू पाहणारे खानोलकर त्याची सांगड सतत मरणाशी घालतात. पाण्याने गिळंकृत केलेल्या किती स्त्रिया त्यांनी दाखवाव्या ? पहिल्याच कादंबरीतील ही लक्ष्मी नववधू होण्याची स्वप्ने रंगवीत अंबेला जाण्यासाठी खाडीत पाय ठेवते तेव्हा तिच्या पायाला वहात आलेल्या कुण्या नववधूच्या प्रेताचा स्पर्श होतो व ते दृश्य आयुष्याच्या शेवटी गाव सोडून जात असताना तिच्या डोळ्यासमोर तरळते. सुतारणीचे प्रेत अत्यंत खोल अशा कोंडुऱ्याच्या विवरात गडप होते, व अनसूयेचे प्रेत अर्धवट खोदलेल्या विहिरीत अडकून पडलेले असते. चानीची आई व चानी यांची प्रेते रामाच्या कोंडीवर, तर हसनच्या पत्नीचे प्रेत समुद्रावर तरंगत असते.

स्त्रीचे देदीप्यमान लावण्य व त्या लावण्याला पूर्ण गिळून टाकणारा

तिच्या जीवनातील अत्यंत गडद असा काळोख या विरोधी लयीतून खानोलकर स्त्रीची शोकांतिका व्यक्त करतात. तसेच त्यांची दुष्ट पात्रे आपले काळे अंतरंग लपविण्यासाठी पांढरा शुभ्र पोषाख चढवतात. त्याला जोड म्हणून खानोलकर पांढरी शुभ्र घोडी व शुभ्र करकोचा ही प्रतीकेही योजतात. काळ्या पांढऱ्या विरोधी रंगाची ही योजना सांकेतिक म्हणून प्रभावशून्य होण्याची फार शक्यता होती. पण खानोलकरांच्या सृष्टीत त्यातून एक अद्‌भुतरम्य वातावरण प्रत्ययास येते. विजेच्या वेगाने बेफाम धावणारी म्हाताऱ्या सामंताची घोडी जमीनदाराचा उन्मत्तपणा, बेफिकीर-पणा व बेछूटपणा यथार्थपणे प्रगट करणारी आहे. उलट आठवले हे मास्तर असल्यामुळे स्वाभाविकच भित्रे, प्रतिष्ठेला बाह्यतः जपणारे, म्हणून त्यांना संधी साधून आपले भक्ष्य पटकावणाऱ्या व क्षणार्धात होडीच्या काठावर पुन्हा चित्रासारख्या बसणाऱ्या साळसूद करकोचासारखे दाखवण्यात मार्मिकता आहे.

पण खानोलकर जेव्हा एखाद्या वृत्तीचे निखळ दर्शन घडवण्यासाठी पात्रांची योजना करतात, तेव्हा मात्र त्यातून त्या त्या वृत्तीचे दर्शन घडत असले, तरी त्या पात्राना अन्याय होतो. ती केवळ साधने बनतात. उदा-हरणार्थ, परपुरुषांना सतत आव्हान देणाऱ्या लक्ष्मीच्या साऱ्या कृती. त्यातून लवथवती लैंगिक वासना तिच्या सर्व अंगोपांगासह आपल्यापुढे मूर्त होत असली तरी त्यामुळे लक्ष्मीचे चित्रण असंभाव्य, कृत्रिम व निर्जीव होते. तीच स्थिती अनेक प्रसंगात अहमदमिया व हसन यांची होते. खानोलकर 'मूर्खपणाचे प्रतीक' म्हणूनच केवळ त्यांचा अनेकदा उपयोग करतात. पण असे काही अपवाद सोडल्यास त्यांची इतर सारी प्रतीके 'जिवंत व्यक्ती' वाटाव्या इतकी प्रभावी आहेत. स्वच्छंदपणे बागडणारी, खेळकर, निरागस व लोभस चानी हे तर खानोलकरांचे सर्वात आवडते प्रतीक आहे. वासनोन्मत्त नर-राक्षसांपायी उद्‌ध्वस्त झालेल्या निरतिशय सुंदर व निष्पाप किशोरी यातून प्रतीत होतात. त्यांच्या बहुतेक सर्व कादंबऱ्यातून या चान्या मुक्तपणे बागडत असतात. 'पाषाणपालवी' तील उमा तर एक चानीच पाळते व तिच्याशी हितगुज करून आपले सांत्वन करू पाहते, आणि किशोरीच्या

जीवनातील कारुण्य हाच ज्या कादंबरीचा विषय आहे तिचे नावच खानोलकरानी ' चानी ' ठेवले आहे.

आपल्या पात्रांचे व्यक्तिमत्त्व प्रतिमेत पकडण्याचे खानोलकरांचे कौशल्य जागोजागी आढळते. स्त्रीच्या केसातूनही ते तिचे व्यक्तिमत्त्व दाखवतात. कामासक्त उमेच्या नितंबापर्यंत रुळणाऱ्या केसाच्या भरघोस प्रवाहाकडे पाहून विक्रमला वाटते, ' पुरुषाला आव्हान देण्यात उमा मोठी चतुर आहे. या केसांप्रमाणेच तिनं अनेक पुरुषांना लोळवलं असेल. त्यांची दमछाक झाली असेल. ' आपल्यासाठी प्राण पाखडणाऱ्या उमद्या व देखण्या सामंतालाही वश न होणाऱ्या हसनच्या पत्नीचे केस ' विषाची ओढ लावणारे होते. कुठल्याही पुरुषानं स्वतःच्या हातानं त्या केसावर गळा कापून घेतला असता. ' आणि सात्त्विक पार्वतीचा अंबाडा मात्र कसा होता तर ' विपुल केशभारांचा व अबोलीच्या वेणीने भलतीच प्रौढी मिरवणारा. '

प्रेमासारखी अमूर्त कल्पना केवळ एका शब्दातून मूर्त करण्याची किमया खानोलकरांजवळ आहे. मधल्या सामंताला डोळे भरून पाहण्यास अतिशय आतुर झालेली हसनची पत्नी नुसत्या आंब्यामागे लपत नाही तर ' तरण्या ' आंब्यामागे लपते. तू सुशीशी लग्न करू नकोस असे नानूला सांगण्यासाठी रात्री त्याच्या खोलीवर थाप मारणाऱ्या दाजीचे उलटे काळीज व कपटी वृत्ती खानोलकर पुढील वर्णनातून दाखवतात. ' दुसरी थाप बसताच मुस्कटात बसल्यासारखं दारानं ' आ ' वासला. केशवदाजी हिरवी शाल पांघरून निवडुंग उगवल्यासारखे दारावर उभे. ' नानू जेव्हा ' तुम्ही माकडासारखे दिसता आहात मला ! ' असे म्हणतो तेव्हा ' ते त्याच्याकडे एखाद्या सर्दी झालेल्या म्हाताऱ्या डुकरासारखे पाहात राहिले आणि खाजणात लोळून लोळून दाटलेल्या चिखलासारखी अंगावरची शाल अधिकच लपेटून घेत ते उभे राहिले. ' पतिमीलनासाठी नंदिनीची होत असलेली तळमळ पाहून स्वामी तिला म्हणतात, ' पतिव्रतेची गर्भाशयं ब्रह्म-हृदया सारखी असतात. तरी सुद्धा उपाशी कुंकवामागचं मेण वितळताना पाहिलं की डोळ्यांच्या खाचा होतात. ' यातून व्यक्त होणारी नंदिनीची व्यथा आपल्या काळजाचा ठाव घेते. चानीच्या सौंदर्याला बिलगून असलेले

कारुण्य पुढील प्रतिमेतून खानोलकर दाखवितात. 'एखाद्या वाद्यांचे करुण सूर कानी पडले की तिच्या निळचाभोर डोळचांची' दिनूला आठवण होई. रामाच्या भयाण कोंडीत माणसालाच काय पण होडीलाही पाहता पाहता गिळंकृत करणाऱ्या भयंकर सुसरी होत्या. पण त्यातच निरुपद्रवी व खेळकर माशांची 'चंदेरी धावाधाव' सुरू असायची. त्याचप्रमाणे विषयांध व दुष्ट लोकांच्या गराडचात चानी निःशंकपणे कशी वावरत असायची ते खानोलकर माशाच्या पुढील वर्णनातून सांगतात. 'मध्येच एखादा मोठा अर्धा फूट मासा तोंडावरचे कल्ले हलवीत पाण्यावर बुडबुडे सोडीत, पाण्यावर पट्कन थांबे आणि मग सुळ्कन नागमोडी गिरकी घेऊन पाण्यात अदृश्य होई,' चपळ, आनंदी, खेळकर व दणकट अशी चानीची सारी रूपे यातून व्यक्त होतात. हा मासा अर्धा फूट लांब होता तशीच चानीही उफाडचा अंगाची होती. तिचा नुसता एक हातच पाहिला तरी तो कसा होता तर 'दुडचा हाडाचा मजबूत–पहारीसारखा टणक. भलत्याच ताकदीने भरलेला.' तिच्या सगळचा हालचालीही अतिशय चपळाईच्या, आनंदी व निःशंक असत. आठवले मास्तरांच्या मिठीतून एक नागमोडी गिरकी घेऊन ती अगदी सहजपणे आप्पा बामणाकडे जाई. निरागस बकुळला तिचे रहस्य सांगण्याचा प्रसंग जेव्हा अच्युतवर येतो तेव्हा त्याचे नुसते सर्वांगच कापत नाही, तर आपला 'लाकडी पाय थरथरल्यासारखा' त्याला वाटतो. सदाशिववरील बकुळचे निर्मळ, निरागस व नितळ प्रेम खानोलकर कोणत्या प्रतिमातून दाखवतात पाहा : 'सदूचं घर तिनं उजळून काढलं ... संगळचा वस्तूंचे आकारच बदलल्यासारखे ... झाले. भांडी कशी हसल्यासारखी स्वच्छ झाली.' भांडचांचे असे वर्णन कोणीही कलावंत करील, पण या वर्णनाला ती 'आपोआप नाद देतील असं वाटत होतं.' अशी जोड द्यावी ती खानोलकरानीच.

वाचकाला अशा भारून टाकणाऱ्या, जागच्या जागी खिळवून टाकणाऱ्या या अम्लान प्रतिमांच्या कळचा पानापानावर उमलून आपल्याला खुणावत असतात त्यांना डावलून पुढे सरकणे कोणालाही अशक्यच व्हावे. पण स्थलाभावी हा मोह टाळणे भाग आहे. तरीही पात्रांच्या मनात व परिस्थितीत अचानक होणारी करुण स्थित्यंतरे संमिश्र आशय पेलणाऱ्या

प्रतिमातून खानोलकर किती प्रभावीपणे व्यक्त करतात, याची दोन उदाहरणे दिल्याशिवाय मात्र राहवत नाही.

'अगोचर' मधील अच्युत नंदिनीचा अकारण संशय घेऊन तिला सतत तळमळत ठेवतो. ते पाहून व्याकूळ झालेले स्वामी त्याला परोपरीने सांगतात की, 'ती शुद्ध आहे, तिला जवळ कर.' पण अच्युत 'ते होणे नाही' असे जेव्हा अगदी ठामपणे त्यांना उत्तर देतो तेव्हा या तीन शब्दांचे एक वादळच नाजुकशा नंदिनीवर घोंगावत येते. पण तरीही ती मोडत नाही. उलट ताठ होते तिच्या वृत्तीत होणारा हा आमूलाग्र फरक खानोलकर पुढील व्यामिश्र प्रतिमेतून मोठ्या कौशल्याने जाणवून देतात. 'बहरू पाहणारी एक वेल सर्पिणीसारखी फूत्कारली आणि वाड्यातल्या काळोखात निघून गेली.' पतीने झिडकारण्यापूर्वीचे नंदिनीचे हळुवार, प्रेमळ व मीलनोत्सुक व्यक्तिमत्त्व आणि त्याने झिडकारल्यानंतरचे तिचे उग्र, संतप्त व सूड घेऊ पाहणारे व्यक्तिमत्त्व खानोलकर या प्रतिमेतून आपल्यापुढे मूर्त करतात. 'बहरू पाहणारी वेल' या शब्दातून इवल्याशा वाऱ्याचाही आघात सोसू न शकणारी, आधाराशिवाय जगू न शकणारी व फळीफुली येण्यास उत्सुक अशी तिची प्रकृती दिसते. परंतु हक्काच्या पुरुषाने जवळ करण्यास ठाम नकार दिलेला ऐकताच ही प्रकृती क्षणार्धात फूत्कारणाऱ्या सर्पिणीचे रूप धारण करते. यातून पतीने केलेल्या अपमानामुळे सूडाच्या भावनेने पेटलेले तिचे मन तीव्रपणे आपल्याला जाणवते. शिवाय ह्या एकाच प्रतिमेत साम्यविरोधाची खानोलकरांनी घातलेली सांगडही मोठी लक्षणीय वाटते. लवलवणाऱ्या वेलीचे सळसळणाऱ्या सर्पिणीशी बाह्यात्कारी असलेले सादृश्य, पण अंतरंगी असलेले विलक्षण अंतर यातून लक्षात येते. प्रतिमानिर्मितीच्या अशा सामर्थ्यामुळेच पात्रांचे अंतरंग उलगडून दाखविण्यासाठी खानोलकरांना वेगळे भाष्य करावे लागत नाही.

तसेच चानीच्या पायातील चांदीच्या साखळ्यांचे वर्णन करताना तिच्या सौंदर्याच्या संदर्भात दिनूला होणारे त्यांचे स्मरण आणि तिच्या संदर्भात होणारे स्मरण यातील महदंतर खानोलकर दोन अगदी भिन्न पण सारख्याच देखण्या प्रतिमांतून किती समर्थपणे दाखवतात, ते पाहण्यासारखे

आहे. चानीच्या सौंदर्याने भारलेला दिनू म्हणतो, 'आज आठवताहेत ती लोभस, खुळी पावले .. चांदीच्या साखळ्या त्यावर कशा चांदण्याच्या चुण्या पडाव्यात तशा दिसत होत्या.' या वाक्यातील एकेका शब्दातून चानीच्या व्यक्तिमत्त्वाचे तिच्यावरील गाढ स्नेहाचे दर्शन घडते. 'लोभस' हे विशेषण तिचे सौंदर्य, तर 'खुळी' हे विशेषण तिचा भोळेपणा व निरागसपणा व्यक्त करते. तिच्या पायातील चांदीच्या साखळ्यांना चांदण्याच्या चुण्यांची उपमा देण्यातून खानोलकरांचे सूक्ष्म निरीक्षण व कमालीची काव्यात्मता तर आपल्याला जाणवतेच, पण त्याहूनही अधिक चानीच्या सौंदर्याची त्यांना वाटत असलेली नवलाई त्यातून प्रगट होते. 'चुण्या' या शब्दात साखळ्यांचा बाह्याकार ते अचूक पकडतात व 'चांदण्याच्या' या शब्दाने त्या साखळ्यांचे सौंदर्य शतपटीने वाढवतात. चांदीच्या साखळ्यांचे जडत्व व घट्टपणा चैतन्यमय व तरल अशा चांदण्याच्या उपमेने ते पूर्ण नाहीसा करतात. ही किमया चानीच्या सौंदर्याने केलेली असते हे खानोलकरांना यातून प्रामुख्याने जाणवून द्यावयाचे आहे

अंगाचेनि सुंदरपणे। लेणिया अंगचि होय लेणे। ह्या ज्ञानेश्वरांच्या उक्तीचे येथे स्मरण होते. परंतु याच साखळ्यांमुळे चानीवर ओढवलेल्या दुर्दैवाचे स्मरण होताच दिनू म्हणतो, 'आज कधीतरी एकांतात एकटा बसलो की दृष्टी कुठेतरी एकटक लागते आणि त्या दृष्टीसमोर चानीची रुबाबी पावले येतात त्या पावलांवरच्या त्या चांदीच्या साखळ्या दिसतात. आणि मनात येते, या कसल्या चांदीच्या साखळ्या, हे तर चानीच्या निळ्याभोर डोळ्यातून तिच्या पावलांवर ओघळलेले अश्रूंचे सर सुकलेत.' दिनूच्या या दुसऱ्या आठवणीत 'लोभस' ची जागा 'रुबाबी' हा शब्द घेतो या दुसऱ्या शब्दातून ती नुसतीच सुंदर नव्हती, त्या सौंदर्यात एक ऐट होती, एक दिमाख होता, एक दरारा होता हे खानोलकर सुचवतात. पण हा रुबाब चिरडून टाकणाऱ्या ज्या दुष्ट शक्ती चानीभोवती दबा धरून बसल्या होत्या, त्या शक्तीमुळे. चानीच्या ज्या सौंदर्याने त्या साखळ्यांना 'चांदण्याच्या चुण्यांचे' वैभव बहाल केले होते त्याच साखळ्यांना आता त्या सौंदर्य-सम्राज्ञीच्या निळ्याभोर डोळ्यातून ओघळून सुकलेल्या अश्रूंच्या सरांचे करुण रूप प्राप्त

होते. एका सुंदर जिवाचा हा करुण इतिहास खानोलकर केवळ दोन प्रतिमात गोठवून ठेवतात.

असे हे वेदनेलाही सुंदर रूप देणारे खानोलकरांचे प्रतिमाविश्व. यातून पुरुषाच्या जीवनात चांदण्यासारखे अलगद उतरू पाहणाऱ्या स्त्रीवर स्वतःच जागोजागी दुखरे होण्याची वेळ कशी येते ते खानोलकर समर्थपणे दाखवतात, ठिबकत्या रक्तासारखी स्त्रीची वेदना पाहाताना त्याची लाली व लयही ते जाणवून देतात. हे त्यांचे सामर्थ्य बघताना हिणाचेही सुवर्ण करणाऱ्या किमयागाराचे स्मरण होते.

अशी ही किमया 'पापण्यात गोठविली मी नदी आसवांची' असे दुःख भोगत असताना त्यांनी करावी ही त्यांची दुसरी किमया. प्रतिक्षणी नवचैतन्याने बहरणाऱ्या प्रतिभेचे भरगच्च लेणे लेऊन खानोलकर या जगात आले. अनेक दुःखांची कळ उरी दाबत, त्यांनी आपल्या प्रतिभेचा मराठी रसिकांवर मुक्त वर्षाव केला, त्यांच्या 'एकेका क्षणाचे मोगरे' केले; आणि स्वतः मात्र पूर्ण रिकामे होऊन ते निघून गेले. दुःख भोगले पण दिले मात्र सुखच – भरभरून. असा हा आगळ्या सामर्थ्याचा कलावंत !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०८५
दा. क्र.
विभाग २४५४.८
१४।३।८५
संदर्भ शाखा
REFBK-0024547
REFBK-0024547

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०८५
ग्रा. क्र.
मुंबई शाखा

देखण्या प्रतिमांनी बहरलेली चित्रं खानोलकरांची
कादंबरी म्हणजे दंवबिंदूंनी नटावलेली वनश्रीच.
जरासा धक्का लागला तरी सारे बिंदू ओघळून जायचे.
अशा अलवार लेखकाच्या कादंबरी लेखनाचा आस्वाद
प्रा. म. गं. नातू यांनी आपल्या विवेचक शैलीत
घेतला आहे.

अंधश्रध्दा, नीतीअनीतीचे पक्षपाती नियम,
कार्यकारणभावाचे अज्ञान, इत्यादीमुळे माणसाला —
त्यातल्या त्यात स्त्रीला — भोगावे लागणारे दुःख व तिची
होणारी दुर्दशा खानोलकर अतिशय कलात्मकतेने
चित्रित करतात.

कलेच्या आनंदा बरोबरच वाचकाला अंतर्मुख
करण्याचे, त्याचा विवेक जागृत करण्याचे त्यांचे
सामर्थ्य लक्षणीय आहे. प्रस्तुत पुस्तक म्हणजे
खानोलकरांचे हे सामर्थ्य शोधण्याचा एक प्रयत्न.